जून २०२०/पाने ९४

लोकराज्य

बा विठ्ठला...

“ आषाढीचे वारे वाहताहेत. पालख्यांचे प्रस्थान होत आहे. पण या वर्षीचा वारी सोहळा मात्र आगळावेगळा असेल. कोरोनाचे संकट जावो आणि पुढच्या वर्षी हा वारी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होवो, हेच पांडुरंगचरणी साकडे आणि प्रार्थना.

दरवर्षी वारकरी दिंड्या पंढरपुरी जातात आणि पांडुरंगाचे दर्शन घेतात. पंढरीची वारी रद्द करताना मुख्यमंत्री म्हणून मला व मंत्रिमंडळातील माझ्या सहकाऱ्यांना खूपच विचार करावा लागला. या वर्षी कोरोनाच्या महाभयंकर संकटामुळे पालखी सोहळ्याच्या वाटचालीवर काही बंधने पडली. दिंड्या-पताका आणि वारकऱ्यांना सहभागी होता येणार नाही. याचे शल्य मलाही आहे. पण मी प्रत्येक वारकऱ्यात पांडुरंगाला पाहतो आहे. माझा हा पांडुरंग म्हणजेच प्रत्येक वारकरी. तो सुदृढ आणि आरोग्यसंपन्न राहावा म्हणून वारीमध्ये काही बदल करावा लागला. परंतु, संतांच्या पादुका पंढरपूरी नेऊन पांडुरंगाला त्या भेटवण्याची परंपरा खंडित झालेली नाही. वारकरी हा सुज्ञ आहे. संयमी आहे. इतरांचा विचार करणारा आहे. म्हणूनच व्यापकतेचा विचार करून वारकऱ्यांनी, वारकरी संप्रदायांनी आणि त्यातील सर्व मंडळींनी सामंजस्याची भूमिका घेतली आणि एका आदर्शाला उभे केले. मी याबद्दल वारकरी संप्रदायातील सर्व महाराज, देवस्थाने, त्यांचे विश्वस्त, विविध पालख्यांचे प्रमुख तसेच माझ्या लक्षावधी वारकऱ्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो. ही आषाढी आगळ्यावेगळ्या रीतीने निश्चितपणे आपण साजरी करूया. ”

मा.श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

अंतरंग

पुनश्च हरि ओम ६

राज्यात ९ मार्च रोजी पुण्यात कोरोनाचा पहिला रुग्ण आढळल्यानंतर अवघ्या चार दिवसांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोनाविषयी विधानसभेत निवेदन केले. नागरिकांमध्ये जनजागृती सुरू करण्यात आली. आरोग्य विभागाच्या नियमित बैठका घेऊन मीडियाच्या माध्यमातून वेळोवेळी जनतेला आश्वस्त केले. आता ५ व्या टप्प्यात आपण लॉकडाऊन असा शब्द न वापरता 'मिशन बिगीन अगेन' असे म्हणत हळूहळू अनलॉक करणे सुरू केले आहे.

अभिमान कोरोनायोद्ध्यांचा ११

महाराष्ट्र आज कोरोनाच्या संकटाविरोधात एकजुटीने, निर्धाराने लढतो आहे. या लढाईत आपल्याला कुणाला हरवायचे नाही तर, स्वत:च स्वत:ला कोरोनापासून वाचवायचे आहे. कोरोनाविरुद्धच्या लढाईचे यश हे स्वसंरक्षणात लपलेले आहे. राज्यात २४ मार्चपासून टाळेबंदी आहे.

उद्योगातून अर्थचक्र रुळावर १५

कोविड -१९ विषाणूमुळे सध्या संपूर्ण जग मोठ्या संकटाचा सामना करत आहे. भारतही त्यास अपवाद नाही. या संकटामुळे मागील दोन महिन्यांपासून आर्थिक व्यवहार, दळणवळण, उद्योग-व्यवसाय बंद पडून अर्थचक्र ठप्प झाले होते. परंतु संकटासोबत संधीदेखील निर्माण होते हे आम्ही हेरून नियोजनबद्धरीत्या ठप्प झालेल्या उद्योग क्षेत्राला गतिमान केले. त्यासाठी उद्योग विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यामुळे आज राज्यात ५० हजारांहून अधिक उद्योग सुरू झाले असून राज्याचे अर्थचक्र रुळावर येत आहे.

सर्वसामान्यांसाठी अन्नसुरक्षा १७

लॉकडाऊनच्या काळात राज्यातील कुठलाही गोरगरीब नागरिक, कामगार, शेतकरी, मजूर व विद्यार्थी उपाशी राहू नये यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहे. सुमारे दीड लाख शिवभोजन थाळीचे दररोज वाटप करण्यात येत आहे. राज्यात प्रतिमाह जवळपास ८.५० लाख मे. टन अन्न धान्य वितरित करण्यात येत आहे. या विभागाचे सर्व अधिकारी/कर्मचारी तसेच ५२ हजार ४२४ स्वस्त धान्य दुकानदार तत्पर होऊन सेवा बजावत आहेत.



पोलीस दलाची अग्निपरीक्षा १९

कोरोनाचा प्रभाव लक्षात घेता हा लॉकडाऊन वाढवण्यात आला. लॉकडाऊनमुळे नागरिक मोठ्या प्रमाणात अस्वस्थ झालेले दिसून येतात. ते विविध कारणांनी घराबाहेर येत आहेत. महत्त्वाच्या कामाखेरीज त्यांनी रस्त्यावर येऊ नये यासाठी पोलीस २४ तास रस्त्यावर उभे राहून याचे नियंत्रण करीत आहेत.

कोरोनाशी समर्थपणे लढा... २३

राज्य शासन कोरोनाचा समर्थपणे मुकाबला करत आहे. कोरोनाबाबत आपल्या राज्याने आधीच खबरदारीचा उपाय म्हणून अनेक उपाययोजना केल्या. त्यामुळे आज राज्यात देशातील सर्वाधिक रुग्ण आपल्याकडे आढळत असतानाही आपण समर्थपणे या समस्येला तोंड देत आहोत. राज्याचा रुग्ण दुपटीचा दर हा १४ दिवसांवर आला आहे. राज्य शासनाने वेळोवेळी केलेल्या उपाययोजनांमुळे हे शक्य होत आहे. राज्यात दररोज एक हजारच्या आसपास रुग्ण बरे होऊन घरी जात आहेत.

पुनश्च हरि ओम	६	टाळेबंदीत दुर्बलांसोबत ठाम	३५
अभिमान कोरोनायोद्ध्यांचा	११	विद्यार्थी परतले	३८
उद्योगातून अर्थचक्र रुळावर	१५	कोरोनामुक्त	४०–४३
सर्वसामान्यांसाठी अन्नसुरक्षा	१७	दक्षता आणि संवेदनशीलता	४४–५९
पोलीस दलाची अग्निपरीक्षा	१९	कोरोनाला ठेवूया दूर	६०–६३
मुबलक जीवनावश्यक वस्तू	२१	डिजिटल प्लॅटफॉर्म	६४–६८
कोरोनाशी समर्थपणे लढा...	२३	समाजमाध्यमे वापरा जपून...	६९
शिक्षण प्रक्रिया निरंतर...	२६	मंत्रिमंडळात ठरले !	७१–७३
दुर्बलांना मदतीचा हात	२९	दृष्टिक्षेप	७४–९०
तत्पर डॉक्टर, सज्ज यंत्रणा	३१	आपत्तीत शासन पाठीशी	९१
बांधावर बियाणे व खते	३३		

वर्ष ७१ वे | अंक १२ | जून २०२०

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर, सुरेश वांदिले
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण साहाय्य — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरामुक्त शहरांमध्ये देशातील १४१ शहरांना तारांकित मानांकन मिळाले असून एकट्या महाराष्ट्रातील ७६ शहरांचा यात समावेश आहे. नवी मुंबई महानगरपालिकेला पंचतारांकित तर ३४ शहरांना तीन आणि ४१ शहरांना एक तारांकित शहराचा बहुमान मिळाला आहे.

'घनकचरामुक्त' शहरांमध्ये महाराष्ट्र देशात अव्वल

केंद्र शासनाच्या नागरीविकास, गृहनिर्माण व गरिबी उन्मूलन मंत्रालयाकडून देशभर राबवण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत २०१८ पासून कचरामुक्त शहरांना विविध मानकांच्या आधारावरील चाचण्यानंतर तारांकित शहरांचा बहुमान मिळतो. केंद्रीय नागरी विकास, गृहनिर्माण व गरिबी उन्मूलन राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) हरदीपसिंह पुरी यांनी वर्ष २०१९-२० साठी निवडण्यात आलेल्या कचरामुक्त तारांकित शहरांचा निकाल जाहीर केला.

कचरामुक्त शहरांच्या तारांकित मानांकनासाठी देशभरातील ४ हजार ३७२ शहरांपैकी १४३५ शहरांनी अर्ज पाठवले होते यापैकी डिजिटल एमआयएस चाचणीत ६९८ शहर बाद ठरली. उर्वरित ७३७ शहरांमध्ये नागरिकांचे मत व मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून त्यांची एकूण २० मानकांआधारे चाचणी करून अंतिम १४१ शहरांची निवड करण्यात आली. यात महाराष्ट्रातील ७६ शहरांनी बाजी मारली आहे. देशातील ६ शहरांना पंचतारांकित मानांकन देण्यात आले असून यात नवी मुंबई महानगरपालिकेने बहुमान मिळवला आहे. देशातील ६५ शहरांना तीन तारांकित शहरांचा मान मिळाला असून राज्यातील ३४ शहरांचा यात समावेश आहे. देशभरातील ७० शहरांना एक तारांकित शहरांचा मान मिळाला असून राज्यातील ४१ शहरांचा यात समावेश आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिका खालीलप्रमाणे:

पंचतारांकित मानांकन : नवी मुंबई महानगरपालिका

तीन तारांकित मानांकन : अंबरनाथ, भिवंडी निजामपूर, ब्रह्मपुरी, चंद्रपूर, देवळाळी प्रवरा, धुळे, गडहिंग्लज, इंदापूर, जळगाव, जालना, जेजुरी, जुन्नर, कागल, कराड, खेड, लोणावळा, महाबळेश्वर, मलकापूर, माथेरान, मौदा, मीराभाईंदर, मुर्गुड, नरखेड, पाचगणी, पन्हाळा, राजापूर, रत्नागिरी, आसवड, शिर्डी, तासगाव, ठाणे, वडगाव, वेंगुर्ला आणि विटा

एक तारांकित मानांकन : अहमदनगर, अकोला, अंजनगाव सुर्जी, आष्टा, बल्लारपूर, बार्शी, भगूर, दौंड, गेवराई, जामनेर, जव्हार, कल्याण-डोंबिवली, खानापूर, खापा, खोपोली, कुळगाव-बदलापूर, कुरुंदवाड, महाड, मलकापूर, मंगळवेढे, मुरबाड, नागभीड, नाशिक, पैठण, पनवेल, पेण, फुलंब्री, राजुरा, रामटेक, रावेर, सेलू, संगमनेर, शहादा, शेंदूरजनाघाट, शिरपूर-वरवाडे, उरण-इस्लामपूर, विजापूर, वरणगाव, वसई-विरार आणि वाळूज.

राज्य शासनाने घनकचरा व्यस्थापनाबाबत आखलेले ठोस धोरण आणि त्याच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरामुक्त शहरांमध्ये देशात आपले वर्चस्व निर्माण केले आहे.

स्वच्छ सर्वेक्षणासाठी देण्यात येणाऱ्या एकूण गुणांपैकी २५ टक्के म्हणजे ६००० पैकी १५०० गुण हे केवळ कचरामुक्तीसाठी देण्यात येत असल्याने तारांकित मानकांना विशेष महत्त्व असून यात महाराष्ट्राची सरशी पाहता येत्या काळात स्वच्छ सर्वेक्षण निकालातही महाराष्ट्र अग्रेसर ठरू शकतो.

मजबूत नेतृत्व, योग्य उपाययोजना

कोविड-१९ अर्थात कोरोनाच्या संकटातून संपूर्ण जग जात आहे. या महामारीने जगाची गतीच थांबवून टाकली आहे. आपला देश आणि राज्यही या संकटाशी मुकाबला करत आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासन करीत असलेल्या आवश्यक त्या सर्व उपाययोजनांमुळे या साथीचा प्रादुर्भाव अधिक लोकसंख्येची घनता असलेल्या या राज्यात आटोक्यात आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने वेळीच घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे या साथीचा प्रसार कमीत कमी राखण्यात यश आले आहे. कोरोनाच्या मुकाबल्यासाठी विशेष टास्क फोर्सची निर्मिती असो वा अर्थव्यवस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी तातडीने स्थापन केलेली उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील कोरोना उपसमिती यामुळे राज्याची घडी विस्कटली नाही.

शाळांना सुटी, कर्मचाऱ्यांच्या कमीत कमी उपस्थितीवर कार्यालये सुरू करण्याचा आणि त्याचबरोबर सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या बसेसमध्ये सामाजिक अंतर राखण्याचे उपाय तर टाळेबंदी लागू होण्यापूर्वीच राज्य शासनाने राबवण्यास सुरुवात केली. राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी टाळेबंदीदरम्यान अनेक उपाय योजत असतानाच एकही रुग्ण उपचाराविना राहू नये, याची विशेष दक्षता घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य शासनाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची वेळोवेळी सर्वसामान्य जनतेला माहिती करून देतानाच त्यांना राज्य शासन आपल्यासोबत खंबीरपणे उभे असल्याचे आश्वस्त केले. परिणामी राज्याचा प्रमुख कुटुंबप्रमुखाप्रमाणे आपली काळजी घेत असल्याचा विश्वास राज्यातील नागरिकांमध्ये रुजला आणि त्यामुळे लॉकडाऊनचे नियम काटेकोर राबवता आले. आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी राज्यातील कोरोनाबाधितांची माहिती आणि नागरिकांनी घ्यावयाची काळजी याबाबत केलेल्या वेळोवेळच्या मार्गदर्शनामुळे नागरिकांमध्ये कोरोनाविषयीची जागृती वाढण्यात आणि आपणहून चाचणी करण्यास नागरिक पुढे येऊ लागले. राज्यात मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ, सर्व प्रशासकीय यंत्रणा आणि नागरिक कोरोनाविरुद्धची लढाई लढत आहेत. टाळेबंदीच्या काळात सर्वात प्रभावित होणाऱ्या गरीब, स्थलांतरित मजूर यांच्या प्रश्नांकडे शासनाने गंभीरपणे आणि संवेदनशीलतेने पाहिले. विशेषतः गरिबांना गहू आणि तांदळाचे वाटप असेल, किंवा शिवभोजनाच्या माध्यमातून संस्थात्मक विलगीकरण केलेल्यांना तीन वेळचे अन्न असेल राज्य शासन खंबीरपणे या घटकाच्या मागे उभे राहिले. एका बाजूला जास्तीत जास्त चाचण्या आणि त्याचबरोबर संस्थात्मक विलगीकरण करून साथीचा प्रसार रोखण्यावर भर देत असतानाच परप्रांतीय मजुरांना अडकलेल्या ठिकाणीच राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. त्याचबरोबर ज्यांना आपल्या मूळगावी जायचे आहे, अशा लाखो स्थलांतरित मजुरांना त्यांच्या इच्छित गंतव्यस्थानी पोहोचवण्यासाठी रेल्वेच्या माध्यमातून मदत करण्यावर राज्य शासनाने भर दिला. एसटीने त्यांना राज्याच्या सिमेपर्यंत सोडण्यात आले. राज्यात विविध मैदानांवर कोविड केअर सेंटर उभारून विलगीकरण आणि उपचारासाठी सोयी उपलब्ध करून देण्याबरोबरच जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत होण्यावर भर दिल्याने या टाळेबंदीच्या काळातही लोकांचे जगणे सुसह्य झाले हे निश्चितच राज्य शासनाचे धोरण व त्याची अंमलबजावणी याचे हे यश आहे.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी या महामारीच्या काळात राज्यातील जनतेला दिलेला विश्वास या लढाईसाठी सर्वात महत्त्वाचा ठरला. त्यामुळे राज्य शासन आणि सर्वसामान्य जनता एकाच दिशेने लढताना दिसली. राज्याचे मजबूत नेतृत्व आणि योग्य उपाययोजनेने ही लढाई लढली जात आहे.

डॉ. दिलीप पांढरपट्टे
(मुख्य संपादक)

“राज्यात ९ मार्च रोजी पुण्यात कोरोनाचा पहिला रुग्ण आढळल्यानंतर अवघ्या चार दिवसांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोनाविषयी विधानसभेत निवेदन केले. नागरिकांमध्ये जनजागृती सुरू करण्यात आली. आरोग्य विभागाच्या नियमीत बैठका घेऊन प्रसारमाध्यमांद्वारे वेळोवेळी जनतेला आश्वस्त केले. आता ५ व्या टप्प्यात आपण लॉकडाऊन असा शब्द न वापरता ‘मिशन बिगीन अगेन’ असे म्हणत हळूहळू अनलॉक करणे सुरू केले आहे. एक गोष्ट निश्चितपणे सांगावीशी वाटते, ती म्हणजे संपूर्ण पारदर्शकता ठेवून, मोकळेपणाने आणि थेट नागरिकांशी मुख्यमंत्र्यांनी केलेला संवाद. सोशल आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून एकीकडे कोरोना लढाईचे सर्व अपडेट्स मुख्यमंत्री सर्वसामान्य जनतेला देत होते आणि दुसरीकडे साध्या शब्दांत आपुलकीने धीरही देत होते. कोरोनात प्रत्यक्ष संपर्काला भलेही मर्यादा पडत असेल, पण संवाद सातत्याने सुरूच राहिला, काम कधीच थांबले नाही आणि म्हणूनच मिशन बिगीन अगेन असे म्हणताना उत्साह वाटतो.”

कोविड-१९ च्या रुग्णांसाठी उभारण्यात आलेली रुग्णालये, तसेच क्वारंटाइन सेंटर्सची मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी स्वत: पाहणी केली.

पुनश्च हरि ओम

अनिरुद्ध अष्टपुत्रे

शनिवार, २५ जानेवारी २०२० ही नुसती तारीख नाही. हा दिवस लक्षात राहील तो कोरोनासारख्या महामारीचे संकट वेळीच ओळखून महाराष्ट्राने पावले उचलायला सुरुवात केली. बांद्र्याच्या रस्ते विकास महामंडळाच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीत त्यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह निवडक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीतच आरोग्य विभाग आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी मुंबईच्या विमानतळावर आतापर्यंत २५०० प्रवाशांची थर्मल तपासणी करून त्यांना प्रवेश दिल्याचे सांगितले. तीन रुग्णांना कस्तुरबा रुग्णालयात निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे, त्यातील दोघांचा चाचणी अहवाल निगेटिव्ह आल्याचा अहवाल राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेने दिल्याची माहितीही देण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी या वेळी तातडीने राज्य साथरोग नियंत्रण समितीची बैठक घेण्यास सांगितले. तपासणीसाठी नमुन्यांची संख्या वाढली तरी त्यासाठी राष्ट्रीय विषाणू

विज्ञान संस्थेने सज्ज राहावे, आवश्यकता भासल्यास खासगी लॅब, मुंबईतील खासगी रुग्णालयांचीदेखील मदत घ्यावी. नागरिकांना प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सजग करावे. रुग्णालयांमध्ये मास्कचा वापर, स्वच्छता, पुरेसा औषधसाठा याबाबत दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले आणि त्यानंतर बैठक संपली.

हे सर्व सांगायचे कारण म्हणजे, महाराष्ट्राने कोरोनाचा धोका ओळखून वेळीच टाकलेली पावले. दरम्यान २४ फेब्रुवारीपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन ठरले होते. ६ मार्च रोजी अर्थसंकल्प सादर होणार होता. त्याची तयारी वेगाने सुरू होती. राज्यात एकही कोरोनाग्रस्त नव्हता आणि प्रामुख्याने केंद्राने निर्देश दिल्याप्रमाणे विमानतळावर प्रवाशांची कसून तपासणी सुरूच होती. दरम्यान काही दिवसांतच जागतिक आरोग्य संघटनेने आंतरराष्ट्रीय आरोग्य आणीबाणी जाहीर केल्याने केंद्राने सांगितल्याप्रमाणे राज्यातील काही डॉक्टर्सचे या संदर्भातील प्रशिक्षणही सुरू झाले होते.

राज्यातील पहिला रुग्ण

जानेवारीच्या शेवटी केरळमध्ये देशातला पहिला रुग्ण आढळल्याची बातमी आली. पण महाराष्ट्रात काही नव्हते. ९ मार्च या दिवसाने राज्यात कोरोनाची सुरुवात झाली. पुण्यात पहिला रुग्ण आढळला. ४० जण १ मार्चला दुबईहून पुण्यात परत आले होते. त्यातील ही लागण लागलेली व्यक्ती होती. उरलेल्यांचाही लगेच शोध जोरात सुरू झाला होता.

मृत्युदर घटला

आज दोन सव्वादोन महिने या गोष्टीला झाले आहेत. वैद्यकीय आघाडीवर कोरोनाची काय परिस्थिती आहे, ते आपल्यासमोरच आहे. ९ मार्चला एक रुग्ण होता, आज हा लेख लिहीत असताना ७० हजारपेक्षा जास्त रुग्ण आतापर्यंत झाले आहेत. तर त्यापैकी ३२ हजारपेक्षा जास्त रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. या सर्व काळात महाराष्ट्राने काय नाही पाहिले? दर ३ दिवसांनी रुग्ण संख्या दुप्पट होत होती, मृत्युदरही देशापेक्षा कितीतरी जास्त म्हणजे एकदा तर ८ टक्क्यांपर्यंत पोहोचला होता. आज हाच मृत्यू दर घटून ३.४१ टक्क्यांवर आला आहे तर आता १७ दिवसानंतर रुग्ण दुप्पट होत आहेत. रुग्ण बरे होण्याचे प्रमाणही ५० टक्क्यांच्या आसपास पोहोचेल अशी परिस्थिती आहे.

जगात दर दहा लक्ष लोकांमागे ७७८ मृत्यू असताना महाराष्ट्रात हे प्रमाण ४८ इतके आहे. राज्यात आतापर्यंत ५ लक्ष चाचण्या झाल्या आहेत. राज्यात ३६३१ चाचण्या दर दशलक्ष झाल्या असून देशात २६२१ चाचण्या होतात. पूर्वी राज्यात एकूण झालेल्या चाचण्यांपैकी १८ टक्के पॉझिटिव्ह होत होते, आता ते कमी होऊन १५.५ टक्के झाले आहे.

आव्हानांचा डोंगर

गेल्या वर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये चीनपुरता असलेला कोरोनाचा विषाणू जेव्हा बघता बघता जग व्यापू लागला आणि आपल्याकडेही पोहोचला तेव्हा आपल्याला तीनच गोष्टी माहीत होत्या. एक म्हणजे हा नोव्हल म्हणजेच पूर्णपणे नवीन आहे. दुसरे म्हणजे यावर निश्चित उपचार नाहीत आणि तिसरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्याकडे याच्याशी लढण्यासाठी असलेली साधनसामग्री खूप तोकडी आहे.

साधनसामग्री म्हणजे काही केवळ उपकरणे, यंत्रे नव्हे तर या लढाईसाठी मनुष्यबळ उभे करणे गरजेचे होते. एकूणच कोरोनासारख्या महामारीचे स्वरूप पाहता शासनाकडे उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, परिचारिका, इतर कर्मचारी कमी पडणार हे उघडच होते. कोरोनावर मात करायची तर सुरक्षित शारीरिक अंतर, मास्क लावणे, स्वच्छता, गर्दी न करणे वगैरे लगेच थांबवणे आणि त्यासाठी लॉकडाऊनचा उपाय हे एक दुसरे आव्हानात्मक काम होते.

खंबीर महाराष्ट्र

महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन म्हणतो आपण. महाराष्ट्राने कोणती आपत्ती पाहिली नाही आजपर्यंत? भूकंप, पूर, चक्रीवादळ, दुष्काळ, अतिवृष्टी, अतिरेकी हल्ले, बॉम्बस्फोट पण देशाचे ग्रोथ इंजिन असलेले

मुख्यमंत्र्यांची तत्परता

राज्यात पहिला रुग्ण आढळल्यानंतर अवघ्या चार दिवसांत मुख्यमंत्र्यांनी कोरोनाविषयी विधानसभेत निवेदन केले. नागरिकांमध्ये जनजागृती सुरू करण्यात आली असून तपासणी वाढवली आहे. मुंबई, पुणे, नागपूरसहित आपल्या राज्यात जिथे आंतरराष्ट्रीय विमाने येतात तिथे सगळीकडे काळजी घेण्याची सूचना देण्यात आली. तोपर्यंत राज्यात कोरोनाचा रुग्ण नव्हता. पण दर दिवसाआड आरोग्य विभागाच्या बैठका सुरू आहेत आणि काळजी घेतली जात आहे असे मुख्यमंत्र्यांनी आश्वस्त केले. दोन-तीन दिवसांनी येणाऱ्या होळीचा आनंद घ्या पण काळजी घ्या. गर्दी करू नका असे आवाहन करायला ते विसरले नाहीत. दुसऱ्या दिवशी अर्थसंकल्प जाहीर झाला आणि पुढे ४ दिवस अधिवेशनाला होळी आणि धूलिवंदनाची सुट्टी होती. या सुट्टीनंतर बुधवार ११ मार्च दिवस उजाडला तो चिंतातुर होऊनच. कारण ९ मार्चला पुण्यात कोरोनाने शिरकाव केला होता. एका रुग्णाला नायडू रुग्णालयामध्ये दाखल केले होते. लगोलग विधिमंडळात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री राजेश टोपे, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी परिस्थितीचे गांभीर्य विधान परिषद सभापती, विधानसभा अध्यक्ष तसेच विरोधी पक्षनेत्यांना देखील सांगितले. मंत्रिमंडळ बैठक बोलावून याविषयी चर्चाही करण्यात आली. विधिमंडळ परिसरात अभ्यागतांना प्रवेश बंदी करण्यात आली. प्रवेश पासेसची संख्याही कमी करण्यात आली.

दरम्यान राज्यात ११ रुग्ण झाले होते. अधिवेशनाचे कामकाज १४ मार्च शनिवारपर्यंतच घेण्याचे ठरले. लोकप्रतिनिधी, अधिकारी आपापल्या ठिकाणी असावे, जेणेकरून कोरोनाची परिस्थिती उद्‌भवल्यास उपाययोजना करणे सोपे जाईल. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

प्रमुख आव्हाने

आतापर्यंत आपल्या राज्याने सर्वच संकटांवर मात केली खरी. पण कोरोनाची कहाणी काही वेगळीच आहे. भले भले देश यात होरपळताहेत ते डोळ्यादेखत होते. बरं, आपले राज्य देशातील कितीही पुढारलेले आणि विकसित असले तरी या कोरोना त्सुनामीचा आघात सहन करायचा तर आपले किती नुकसान होऊ शकते, याचे आकडे सर्वांच्याच डोळ्यासमोर नाचू लागले. म्हणजे ५ प्रमुख आव्हाने लगेचच उभी राहिली.

- संसर्ग तर होणारच आहे पण त्याला पसरण्यापासून रोखायचे कसे? मृत्यू कसे थांबवायचे?
- लॉकडाऊनची परिणामकारक अंमलबजावणी कशी करायची?
- कायदा सुव्यवस्था कशी राखायची?
- हे सगळे करताना निधीचे काय? आर्थिक भार कसा पेलायचा?

हे राज्य प्रत्येक वेळी मजबुतीने उभे राहिले. एक आहे की, या सगळ्या संकटातून आपण काही ना काही धडे शिकलो आणि मग त्या संकटांचा मुकाबला करणारी एक यंत्रणा आपल्याकडे तयार झाली. यात बऱ्याच गोष्टी मागच्या पानावरून पुढे चालू अशा स्वरूपाच्या असतात. प्रशासनाला माहीत असते की अमुक अमुक संकटात कुठली कार्यपद्धती अवलंबवायची ते.

लॉकडाऊनची पार्श्वभूमी

मुळातच लॉकडाऊन कशासाठी? त्याने काय होणार? कोरोना पळून जाणार का त्यामुळे? असे प्रश्न काही जणांनी उपस्थित केले. आजही करताना दिसतात. केंद्रीय आरोग्य मंत्रालय, जागतिक आरोग्य संघटना यांनी भारतामध्ये लॉकडाऊनसारखी पावले वेळीच उचलल्याने किती फायदा झाला आहे त्यावर यापूर्वीच शिक्कामोर्तब केले आहे. पण लॉकडाऊनचा उद्देश काही फक्त संक्रमणाचा वेग थांबवणे एवढाच नव्हता तर आपल्याला आपली संसाधने, सामग्री उभी करायला आणि पुढील नियोजनाला पुरेसा अवधी मिळणे. आणि महाराष्ट्रापुरते बोलायचे तर अक्षरशः शून्यातून सगळे सुरू करावे लागले.

सुसज्ज यंत्रणा

पूर्वी:- सुरुवातीला फक्त ३ आयसोलेशन रुग्णालये, १ चाचणी प्रयोगशाळा, ३५० बेड्सची सुविधा होती.

आज :- १४८४ कोविड केअर सेंटर्स, २ लाख ४८ हजार ६०० बेड्स, ५७३ डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर्स, २ लाख ४० हजार आयसोलेशन (ऑक्सिजनसह) उपलब्ध आहे आणि त्यात वाढच होत आहे. राज्याच्या महानगरे व शहरांमध्येही मोठ्या प्रमाणावर विलगीकरण सुविधा उभ्या राहत आहेत.

कोविड-१९ रुग्णालयातील सुसज्ज यंत्रणा.

आजमितीस २९० डेडिकेटेड कोविड रुग्णालये -८००० बेड्स, २८०० व्हेंटिलेटर आहेत.

आज:- ६६ प्रयोगशाळांमधून ११ हजार चाचण्या केल्या जातात.

आज:- २ लाख ३० हजार पीपीई, ४ लाख २० हजार एन-९५ मास्क आपल्याकडे आहेत.

मोफत आरोग्य सेवा

महात्मा फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती वाढवून सर्वच नागरिकांना त्यात सामावून घेतले आहे. राज्यातील सर्व रुग्णालयांतील ८० टक्के बेड्स शासनाने राखीव ठेवले आहेत. एवढेच नव्हे तर कोरोनावर अव्वाच्या सव्वा उपचाराचा खर्च कुणी घेऊ नये म्हणून दरही निश्चित करून दिले आहेत. मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेली आरोग्य विभागातील पदेही लगेचच भरण्यात येत आहेत. अनेक कोविड योद्धे यात मदतीसाठी पुढे आले आहेत. त्यात डॉक्टर्स, परिचारिका आहेत. वीज ग्राहकांना दिलासा देणे, अहोरात्र काम करणाऱ्या पोलिसांची दखल घेणे, कोविड लढाईत मरण पावलेल्यांना ५० लाखांचे कवच असे अनेक निर्णय शासनाने घेतले आणि या लढाईला बळ देण्याचा प्रयत्न केला.

चेस दि व्हायरस मोहीम

आज आपण 'चेस दि व्हायरस' म्हणजे विषाणूचा पाठलाग करायचा या एकाच उद्देशाने शोध मोहीम राबवली आहे. त्यासाठी राज्यात ठिकठिकाणी पथके घरोघरी फिरताहेत. रुग्णांचे जास्तीत जास्त संपर्क शोधणे आणि त्यांना उपचारासाठी आणणे सुरू आहे.

देशातील पहिला टास्क फोर्स आपण केला आहे. यात मुंबईतील नामवंत

डॉक्टर्सची टीम आहे. फिव्हर क्लिनिकच्या माध्यमातून लोकांचे सर्दी, पडसे यावर उपचार सुरू आहेत. मुंबईतल्या वरळी कोळीवाड्याचे उदाहरण देता येईल. या ठिकाणी संसर्गाला सुरुवात झाली. आणि महानगरपालिकेने त्यावर ज्या उपाययोजना केल्या ते मॉडेल देशभर चर्चिले गेले. खासगी डॉक्टर्सदेखील आता पुढे येत आहेत. बंधपत्र डॉक्टर्सच्या मानधनात मोठी वाढ केली आहे. खासगी डॉक्टर्सना आता पीपीई किट आणि इतर संरक्षक उपकरणे देण्यात येत आहेत.

शिक्षण व कृषीसाठी पुढाकार

शिक्षण, शेती यावरही कोरोनाचा प्रभाव पडणे स्वाभाविकच आहे. शाळा बंद राहिल्या तरी शिक्षण पुढे सुरू राहिले पाहिजे. त्यासाठी ऑनलाइन, डिजिटल असे पर्यायही वापरण्याची पूर्ण तयारी शासनाने केली आहे.

शेतीसारख्या बाबतीत तर हजारो शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर बी-बियाणे, खते देण्याचा उपक्रमही कमालीचा यशस्वी ठरला. कोरोना काळात शेतकऱ्यांनी थेट आपला भाजीपाला, अन्न धान्य ग्राहकांच्या घरापर्यंत पोहोचवले. प्रश्न किती नफा झाला यापेक्षा एक नावीन्यपूर्ण बाजारपेठ यंत्रणा पुढील काळात कायमस्वरूपी उभारण्याचा पाया घातला गेला.

शेतकऱ्यांच्या पीक कर्जाबाबतही शासनाने त्यांची चिंताच मिटवली. महात्मा जोतिराव फुले शेतकरी सन्मान योजनेचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना याचा फायदा मिळणार आहे. दुध उत्पादक शेतकऱ्यांना तोटा होऊ नये म्हणून त्यांच्याकडील दुधाचे भुकटीत रूपांतर करण्याचा निर्णयही अनेक शेतकऱ्यांसाठी हायसे वाटणारा होता.

सर्वसामान्यांची भरीव मदत

या सगळ्या काळात दानशूरपणाचा प्रत्ययही येत गेला. अगदी वाढदिवसासाठी जमवलेल्या पैशांपासून ते श्राद्ध कार्यासाठीचे पैसे लोकांनी सहायता निधीस देऊन हा गोवर्धन पर्वत तोलण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केला. आज सुमारे ३५० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मुख्यमंत्री सहायता निधीत जमा झाला.

शिवभोजन

शिवभोजन सारख्या सुरू झालेल्या योजनेने गरीब लोकांची जेवण्याची भ्रांतच मिटवली. केवळ ५ रुपयांत मिळणारी थाळी अनेक आशीर्वाद देऊन गेली. एकट्या मे महिन्यात ३० आणि ३५ लाख थाळ्यांमधील अन्न लोकांच्या पोटात गेले ही साधीसुधी गोष्ट नाही. दारिद्र्यरेषेवरील लोकांनादेखील शिधापत्रिकेवरील धान्य देण्याचा निर्णयही असाच माणुसकी दाखवणारा होता.

परराज्यातील श्रमिकांना निवारा

केंद्राने पहिला लॉकडाऊन जाहीर केला आणि परराज्यातील श्रमिक, कामगार वर्ग आपल्या राज्यातच थांबून राहिला. सुमारे ५.५ लाख श्रमिकांची निवाऱ्याची एवढेच नव्हे तर नाष्टा, दोन वेळेसचे जेवण याची पूर्ण सोय शासनाने सव्वादोन महिने केली. हे परप्रांतीय मजूर आपापल्या राज्यात श्रमिक ट्रेन्सने निघाल्यावर त्यांना प्रेमाने निरोप देण्याची माणुसकी ठिकठिकाणी प्रशासनाने दाखवली.

आर्थिक घडीसाठी तज्ज्ञ समिती

आर्थिक बाब तर सगळ्यात महत्त्वाची असते. एक मंत्रिमंडळ उपसमिती आणि एक तज्ज्ञ समिती अशा दोन समित्या नेमल्या आहेत. त्यांनी अभ्यास करून आपला अहवालही दिला आहे. खर्चावर बंधन आणून अनावश्यक योजना आणि कार्यक्रम यावरील खर्च पूर्णपणे बंद करण्याचे नियोजन सरकारने केले आहे.

उद्योग आणि रोजगार याशिवाय तर खऱ्या अर्थाने आपले अर्थचक्र सुरूच होणार नाही. जानेवारीत मुख्यमंत्र्यांनी देशातल्या नामवंत उद्योजकांसमवेत मुंबईत एक बैठक घेतली होती. कोण नव्हते त्या बैठकीत? रतन टाटा, आनंद महिंद्र, मुकेश अंबानी, उदय कोटक, आदि गोदरेज, जिंदाल, बाबा कल्याणी असे बरेच जण होते. मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले, महाराष्ट्रातून एकही उद्योग इतर राज्यांमध्ये जाऊ देणार नाही. उद्योगांच्या ज्या काही अडचणी आहेत त्यांचे फास्ट ट्रॅकवर निराकरण करून आणि संपूर्ण राज्याचा वैविध्यपूर्ण असा औद्योगिक विकास करू.

गुंतवणुकीच्या संधी खुल्या

एकीकडे कोरोनाचा मुकाबला सुरू असताना राज्याच्या औद्योगिक प्रगतीला कशी चालना द्यायची, येथील गुंतवणूकदारांमध्ये कसा विश्वास निर्माण करायचा याची जुळणी शासन करीतच होते. विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी उद्योग विभागाच्या माध्यमातून वाटाघाटी सुरू झाल्या. विशेष म्हणजे अनेक देश महाराष्ट्राकडे चौकशी करत होते आणि सध्याही करीत आहेत. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, जपान, तैवान, दक्षिण कोरिया येथील प्रतिनिधींनीदेखील विचारणा करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे त्यांना प्रतिसाद देण्यासाठी लगेच एक विशेष कृती दलही स्थापन करण्यात आले.

पुढील काळात राज्यात अनेक मोठे प्रकल्प सुरू होणार असल्याने साहजिकच लघु उद्योगांची सेवा आवश्यक आहेच. त्यामुळे त्यांच्याशीदेखील चर्चा सुरू झाल्या. उद्योगांसाठी रस्ते, पाणी, वीज व इतर सुविधांसह ४० हजार हेक्टर जागा उपलब्ध केली. ज्याला उद्योग सुरू करावयाचा त्याने येऊन तो सुरू करावा, अट एकच तो ग्रीन उद्योग असावा. याकरिता उद्योगांसाठी महापरवाना पद्धत अमलात आणली. महापरवाना मिळवण्यासाठी परकीय तसेच नवीन गुंतवणूकदारांनी जमीन नोंदणी करावी आणि ठोस प्रस्ताव द्यायचा. हा प्रस्ताव तपासण्यात येईल व तत्काळ त्यांना महापरवाना देण्यात येईल अशी व्यवस्था असेल.

देशविदेशातील उद्योजकांनी गुंतवणुकीसाठी पहिली पसंती महाराष्ट्रालाच

मिशन बिगीन अगेन

आता ५ व्या टप्प्यात आपण लॉकडाऊन असा शब्द न वापरता 'मिशन बिगीन अगेन' असे म्हणत हळूहळू अनलॉक करणे सुरू केले आहे. दोन सव्वा दोन महिने नागरिकांनी निश्चितपणे लॉकडाऊनच्या निमित्ताने एक नवी जीवनशैली अंगीकारली. तिचे तोटेही आहेत आणि फायदेही. सुरुवातीच्या काळात जबरदस्तीने लोकांना घरात बसवावे लागले. पोलीस यंत्रणेला यात मोठी भूमिका बजावावी लागली. कालांतराने जनतेने स्वयंस्फूर्तीने पालन करण्यास सुरुवात केली. हे सगळे करताना विविध महानगरपालिका, नगरपालिका, अगदी ग्रामपंचायती यांनी कोरोनाचे हे मिशन खूप गांभीर्याने घेतले, त्याचा परिणाम हा झाला की, संसर्गाला कुठेतरी अटकाव निश्चितपणे बसला. अजूनही हे संकट टळलेले नाही. आता येणाऱ्या पावसाळ्यात आव्हान आणखी वाढणार आहे. मात्र किमान आपल्याला वाटचाल कशी करायची आहे त्याची दिशा जरूर मिळाली आहे.

एक गोष्ट निश्चितपणे सांगावीशी वाटते, ती म्हणजे संपूर्ण पारदर्शकता ठेवून, मोकळेपणाने आणि थेट नागरिकांशी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलेला संवाद. सोशल आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून एकीकडे कोरोना लढाईचे सर्व अपडेट्स मुख्यमंत्री सर्वसामान्य जनतेला सांगत होते आणि दुसरीकडे साध्या शब्दांत आपुलकीने धीरही देत होते. कोरोनात प्रत्यक्ष संपर्काला भलेही मर्यादा पडत असेल पण संवाद सातत्याने सुरूच राहिला, काम कधीच थांबले नाही आणि म्हणूनच मिशन बिगीन अगेन असे म्हणताना उत्साह वाटतो.

द्यावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू झाले आहेत, आणि त्याला यशही मिळते आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळ आहे. या उद्योगांना येथेच उच्चशिक्षित, प्रशिक्षित मनुष्यबळ मिळणार आहे ही बाब तर या उद्योगांना ठाऊक आहेच, त्यामुळेही त्यांनी उत्सुकता दाखवली आहे. कोरोनामुळे उद्योगांना फटका बसला आहे. त्यामुळे स्थिर वीज बिलाबाबत उर्जामंत्र्यांसोबत चर्चा करून जेवढा विजेचा वापर होईल, तेवढेच बिल आकारण्याचा निर्णय घेतला. राज्यातील लघु उद्योगांना सावरण्यासाठी केंद्र शासनाने आर्थिक पॅकेज जाहीर केले आहे. उद्योग आणि गुंतवणूकदार यांनाही सवलती व इतर बाबी जाहीर केल्या आहेत, त्या सर्वांची काटेकोर अंमलबजावणी करून सर्वच उद्योग क्षेत्राला ताकदीने उभे करण्याचे शासनाने ठरवले आहे.

उद्योगांसाठी मनुष्यबळाची व्यवस्था

कोरोनामुळे राज्यातील परराज्यातील कामगार मोठ्या संख्येने त्यांच्या राज्यात परत गेला आहे. त्यामुळे काही प्रमाणात एक पोकळी निर्माण झाली आहे, स्थानिक लोकांमधून ही मनुष्यबळाची गरज भागवून घ्यावी असे ठरवण्यात आले. त्यासाठी कामगार ब्युरो निर्माण केला असून तो रोजगारविषयक आढावा घेणे आणि नोकरी देण्यासंदर्भातील समन्वय करणार आहे. यासाठी लवकरच एक पोर्टल पूर्ण होऊन आपल्यासमोर येईल.

रायगडमध्ये फार्मा पार्क

औषध उत्पादक कंपन्यांच्या सूचनांनुसार रायगड जिल्ह्यात देशातील सर्वात अद्ययावत अशा फार्मा पार्कचे नियोजन उद्योग विभागाने केले आहे. त्यात एक हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. महाराष्ट्रात फार्मा पार्क सुरू व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. औरंगाबाद येथे ऑरिक सिटी, शेंद्रा येथेही मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक अपेक्षित आहे. केंद्र शासनाच्या दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्पातील दिघी औद्योगिक क्षेत्रामधील अधिसूचित झालेले क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत विकसित करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

५४ हजार उद्योग

दरम्यान अर्थचक्राला चालना देण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. लॉकडाऊन शिथिल करीत रेड झोनबाहेरील सुमारे ५४ हजार उद्योग सुरू करण्यात आले असून सुमारे १४ लाख कामगार रुजूही झाले आहेत. अद्यापही पूर्ण क्षमतेने उद्योग सुरू करण्यात काही अडचणी आहेत. भांडवल, कामगार नसणे, बाजारपेठ अद्याप खुली न होणे, अगोदरचा माल पडून असणे वगैरे. पण शासन उद्योगांच्या पाठीशी आहे आणि निश्चितपणे यातून मार्ग काढला जाईल. आज कोरोनाचे संकट हे शासनाचे पहिले प्राधान्य आहे. आणि ते स्वाभाविक आहे. आरोग्य ठीक असेल तर पुढच्या गोष्टी होतील. आज मुंबई, ठाणे, पुणे या क्षेत्रांमध्ये सर्वाधिक कोरोना रुग्ण आहेत. त्यामुळे प्रत्येक पाऊल काळजीपूर्वक उचलण्यात येत आहे. लवकरच नेहमीप्रमाणे या भागातील उद्योग व्यवसाय जोरात सुरू होतील आणि राज्याला अधिकाधिक उंच अशी भरारी मारता येईल, असा विश्वास आहे.

लेखक हे मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी आहेत

“ महाराष्ट्र आज कोरोनाच्या संकटाविरोधात एकजुटीने, निर्धाराने लढतो आहे. या लढाईत आपल्याला कुणाला हरवायचे नाही तर स्वत:च स्वत:ला कोरोनापासून वाचवायचे आहे. कोरोनाविरुद्धच्या लढाईचे यश हे स्वसंरक्षणात लपलेले आहे. राज्यात २४ मार्चपासून टाळेबंदी आहे. गेले अडीच महिने टाळेबंदीच्या नियमांचे पालन करून स्वत:ला व इतरांना कोरोनापासून सुरक्षित ठेवल्याबद्दल आपणा सर्वांचे मी अभिनंदन करतो. हीच सुरक्षितता भविष्यातही बाळगायची आहे, याचीदेखील जाणीव करून देतो. ”

कर्तव्यतत्पर डॉक्टर्स व आरोग्य कर्मचारी.

अभिमान कोरोनायोद्ध्यांचा

अजित पवार
उपमुख्यमंत्री

या लेखाच्या माध्यमातून मी कोरोनाविरुद्धच्या लढाईत सहभागी झालेल्या राज्यातील प्रत्येक नागरिकाचे आभार मानतो. जोखीम पत्करून रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडीकल स्टाफचा मी मनापासून आभारी आहे. स्वच्छता, साफसफाई, निर्जंतुकीकरणाची जबाबदारी सांभाळणाऱ्या बांधवांचा मी आभारी आहे. रस्त्यावर उभे राहून लॉकडाऊनची अंमलबजावणी करणाऱ्या पोलीस बांधवांचा, गाव-खेड्यात, शहरांतील गल्लीबोळात सर्वेक्षण करणाऱ्या अंगणवाडी ताई, आशा वर्कर, स्थानिक स्वराज संस्थांचे असंख्य कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे तमाम कार्यकर्ते, अशा प्रत्येक बांधवाचा मी आभारी आहे.

राज्यात एकही जण उपाशी राहू नये म्हणून सामाजिक जाणिवेतून नागरिकांना अडीच महिने भोजन, अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या शासकीय, निमशासकीय विभागाचे कर्मचारी, स्थानिक स्वराज संस्थांचे कर्मचारी, खासगी व्यक्ती, स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांचा मी आभारी आहे.

राज्यातील अनेक जण कोरोनाविरुद्धच्या लढ्यात जोखीम पत्करून लढत आहेत, सर्वांचा उल्लेख करणे या ठिकाणी शक्य नाही, परंतु या लेखाच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक बांधवाचे मी जाहीर आभार मानतो व त्यांना मनापासून धन्यवाद देतो. महाराष्ट्राच्या रक्षणासाठी, मानवतेच्या कल्याणासाठी आपण सर्वांनी दिलेल्या सेवेबद्दल महाराष्ट्र आपला ऋणी राहील.

कोरोनामुक्त राज्याचे ध्येय

राज्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असताना दररोज कोरोनामुक्त होणाऱ्या रुग्णांची संख्याही खूप मोठी आहे, ही समाधानाची बाब आहे. कोरोना रुग्णांची संख्या हळुहळू कमी करत संपूर्ण राज्य कोरोनामुक्त करणे हे आपले ध्येय आहे. राज्याच्या आरोग्य, प्रशासकीय यंत्रणेने, सर्वच स्थानिक स्वराज संस्थांनी याबाबत उत्तम कामगिरी केली असून कोरोनासंदर्भातील परिस्थिती नियंत्रणात ठेवली आहे. परिस्थिती हाताबाहेर न जाण्याचे श्रेय जसे संबंधित यंत्रणांना आहे तसंच लॉकडाऊनचे नियम तंतोतंत पाळून दोन-अडीच महिने धीराने घरात थांबलेल्या जनतेला देखील आहे.

कोरोनायोद्ध्यांच्या त्यागाला वंदन

कोरोनाविरुद्धच्या लढाईत कर्तव्य बजावताना आपले काही डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, पोलीस, सफाई कामगार, शासकीय अधिकारी-कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी-कर्मचारी या कोरोनायोद्ध्यांचा दुर्दैवाने मृत्यू झाला. राज्यातील जनतेचा जीव वाचवण्यासाठी त्यांनी बलिदान दिले. या कोरोनायोद्ध्यांच्या त्यागाला मी वंदन करतो आणि कृतज्ञतापूर्वक आदरांजली वाहतो. त्यांच्या कुटुंबीयांबद्दल सहसंवेदना व्यक्त करतो तसेच कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या राज्यातील नागरिकांनाही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

स्वच्छता आणि सुरक्षितता

कोरोनाविरुद्धच्या लढाईला सुमारे तीन महिने होतील. जूनच्या पहिल्या आठवड्यापासून 'मिशन बिगीन अगेन' सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी केली आहे. याचाच अर्थ टाळेबंदी हळूहळू संपवत आपल्याला नव्याने सुरुवात करावयची आहे. 'मिशन बिगीन अगेन' यशस्वी करण्यासाठी आपल्यापैकी प्रत्येकाचा सक्रिय सहभाग व योगदान अपेक्षित आहे. 'मिशन बिगीन अगेन'ची सुरुवात करत असताना कोरोनाचे संकट अद्याप पूर्णपणे टळलेले नाही याची जाणीव ठेवून आपली वर्तणूक व व्यवहार असले पाहिजेत. स्वच्छता आणि सुरक्षितता हा आपल्या जीवनाचा अविभाज्य अंग बनला पाहिजे.

शासकीय कामकाजाच्या ठिकाणी हात निर्जंतुक करण्यासाठी उभारण्यात आलेली व्यवस्था.

कोरोनाचे संकट नियंत्रणात असले तरी ते अद्याप टळलेले नसून कोरोनाचा धोका कायम आहे. कोरोनाला संपूर्ण हरवणे, राज्यातून तसेच देशातून कोरोनाला नष्ट करणे हेच आपले ध्येय आहे. ते गाठेपर्यंत आपला लढा कायम राहणार आहे. कोरोनाने आपल्याला काही सवयी बदलण्यास भाग पाडले आहे. आता अस्वच्छ राहणे, परिसर अस्वच्छ ठेवणे परवडणार नाही. सर्वांना स्वच्छ राहावेच लागेल. सार्वजनिक ठिकाणी नाका-तोंडावर मास्क लावणे हा जीवनाचा भाग बनणार आहे. हात वारंवार स्वच्छ धुणे हे आरोग्याचे लक्षण ठरणार आहे. मला विश्वास आहे की, तुम्ही सर्व जण वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छतेची काळजी घेऊन कोरोनाविरुद्धच्या लढ्यात योगदान द्याल.

विकासाची नेमकी दिशा

महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकारकडून जनतेच्या अनेक आशा-आकांक्षा-अपेक्षा आहेत. या अपेक्षांच्या पूर्ततेसाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. सन्माननीय मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली सहा महिन्यांत सरकारने शेतकरी कर्जमाफीसारखे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. राज्याच्या पहिल्याच अर्थसंकल्पाने जनतेची मने, विश्वास जिंकला. विकासाची नेमकी दिशा अर्थसंकल्पातून स्पष्ट झाली. हीच दिशा भविष्यात कायम ठेवायची आहे.

नागरिकांच्या जीवितास प्राधान्य

राज्यावर आज कोरोनाचे संकट आहे, या संकटातून बाहेर पडून अर्थव्यवस्था पुढे नेण्यासाठी राज्यातील प्रत्येक घटक सक्रिय योगदान देईल, असा विश्वास आहे. महाराष्ट्राला कृषी, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात पुन्हा एकदा आघाडीवर न्यायचे आहे. तूर्तास, राज्याचे सर्वाधिक प्राधान्य कोरोनाविरुद्धच्या लढाईला आहे. जनतेचा जीव धोक्यात घालून पुढे जाण्याऐवजी लोकांना कोरोनापासून वाचवण्यास प्राधान्य देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

महाविकास आघाडी सरकार सत्तेवर

परप्रांतीय मजुरांना दिलासा

महाराष्ट्र औद्योगिक, आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्य असल्याने देशभरातून आलेले लाखो मजूर बांधव आपल्या राज्यात काम करतात. लॉकडाऊनमुळे हे मजूर संकटात आले. अशा साडेसहा लाख परप्रांतीय मजूरांची राज्यात ठिकठिकाणी शिबिरांमध्ये व्यवस्था केली. तिथे दोन ते अडीच महिने त्यांच्या निवास, भोजन, वैद्यकीय उपचारांची सोय करण्यात आली. १६ लाखांहून अधिक मजूरांना त्यांच्या इच्छेनुसार रेल्वेने, एसटीने त्यांच्या राज्यात पोहोचवण्याची व्यवस्था केली. यासाठीचा खर्च राज्य शासनाने केला. कोरोनाविरुद्धच्या लढाईत महाराष्ट्राने माणुसकी कधी हरवू दिली नाही. देशवासीयांमधील ऋणानुबंध घट्ट करण्याचे काम केले, याचा आम्हाला अभिमान आहे.

गावी जाण्याची सोय झाल्याने हजारो परप्रांतीय मजुरांना दिलासा मिळाला.

आल्यानंतर राज्य प्रगतीकडे वाटचाल करीत असतानाच हे कोरोनाचे संकट राज्यावर आले. जगभरात कोरोनाने माजवलेला हाहाकार लक्षात घेऊन राज्य शासनाने तातडीने उपाययोजना केल्या. प्राधान्यक्रम बदलून आर्थिक नुकसान झाले तरी चालेल, पण लोकांचे जीव वाचले पाहिजेत ही भूमिका घेतली. कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांना, आरोग्यसेवा मजबूत करण्याला प्राधान्य दिलं. रुग्णांचा शोध, तपासणी, चाचणी, उपचार, पाठपुरावा अशा अनेक आघाड्यांवर नियोजनबद्ध काम सुरू केले. उपलब्ध रुग्णालयांची सुधारणा केली. नवीन तात्पुरती रुग्णालये उभी केली. वैद्यकीय उपचार, रुग्णांचे अलगीकरण, विलगीकरणाची स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली. अशा अनेक उपाययोजनांमुळे कोरोनाच्या संक्रमणावर महाराष्ट्र बऱ्याच अंशी नियंत्रण ठेवू शकला.

कर्मचाऱ्यांना विमा कवच

आज आपले डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, पोलीस, होमगार्ड, अंगणवाडी ताई, स्थानिक स्वराज संस्थांचे कर्मचारी असे अनेकजण कोरोनाविरुद्धच्या लढ्यात कर्तव्यभावनेने जीवाची जोखीम पत्करून योगदान देत असताना त्यांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची काळजी घेणे आपले कर्तव्य होते. कोरोनाविरुद्धच्या लढ्यात कर्तव्य बजावताना कोरोनाची लागण होऊन दुर्दैवाने मृत्यू झाल्यास त्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे निश्चितच कोरोनायोद्ध्यांच्या लढाईला बळ मिळेल, असा विश्वास आहे.

कोरोनावर मात करण्याचा विश्वास

याकाळात आपल्या काही बांधवांना कर्तव्य पार पाडताना कोरोनाची लागण झाली. त्यांच्यापैकी बहुतांश जण कोरोनावर मात करून घरी कुटुंबात परत आले. कोरोना बरा होतो हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे, लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम कोरोनावर मात केलेल्या या बांधवांनी केले आहे, त्याबद्दल सर्वांचे मनापासून अभिनंदन आणि आभार. आपले अनेक बांधव आजही राज्यातल्या विविध रुग्णालयात कोरोनावर उपचार घेत आहेत, तेही लवकर बरे होतील असा विश्वास आहे.

आरोग्य यंत्रणेचे आभार व्यक्त करताना कोरोनामुक्त झालेली व्यक्ती.

कोरोना लढ्याला आर्थिक बळ

कोरोनाविरुद्धची लढाई ही सर्वांनी आपापली काळजी घेऊन जिंकायची आहे. कोरोनाचा संसर्ग स्वत:ला होऊ न देणे व झाल्यास दुसऱ्याला त्याचा प्रादुर्भाव होऊ न देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यातूनही जर कोरोनाचा संसर्ग झाल्यास, राज्यातील समस्त १२ कोटी जनतेचे कोरोनावरील उपचार महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत एक हजार रुग्णालयांमध्ये मोफत करण्याची सोय राज्य शासनाने उपलब्ध केली आहे. खासगी रुग्णालयातील ८० टक्के खाटा शासनाकडून अधिग्रहित करण्यात आल्या असून तिथे रुग्णांना

कृषी क्षेत्रालाही मदत

कोरोनाविरुद्धची लढाई लढत असताना समाजातील शेतकरी, कष्टकरी, दुर्बल, वंचित घटकांची संपूर्ण काळजी राज्य शासनाने घेतली. कृषी क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेऊन या क्षेत्राला सुरुवातीपासूनच निर्बंधातून मोकळीक दिली. दूध उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी त्यांच्याकडील दूधाची दोन महिने खरेदी करून या कालावधीत चार कोटी लिटर दुधाचे पावडरमध्ये रुपांतर करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी १२७ कोटी रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करून दिला. महात्मा जोतीराव फुले कर्जमुक्ती योजनेतील पात्र लाभार्थींच्या अंतिम यादीत नाव असलेल्या परंतु कोरोना संकटामुळे कर्जमुक्तीचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना ते थकबाकीदार असल्याने नवीन कर्ज मिळत नव्हते. राज्य शासनाने यासंदर्भात पुढाकार घेऊन रिझर्व्ह बँकेला पत्र दिले व अशा सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात येणार असल्यामुळे त्यांना खरीप हंगामासाठी कर्ज द्यावे, अशी विनंती केली आहे, तसेच कर्जाची रक्कम राज्य शासनाकडून संबंधित बँकेत जमा होईपर्यंतचे व्याज देण्याची जबाबदारीदेखील शासनाने घेतली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून खरीप पेरणीसाठी नवीन कर्ज उपलब्ध होण्याचा त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

शेतकऱ्यांना थेट मालविक्रीची मुभा.

नियंत्रित दराने उपचार उपलब्ध होणार आहेत. या रुग्णालयांमध्ये नागरिकांच्या मदतीसाठी स्थानिक स्वराज संस्थांचे अधिकारी उपलब्ध असणार आहेत.

राज्यात ठिकठिकाणी कोरोना रुग्णांसाठी तात्पुरती रुग्णालये, अलगीकरण, विलगीकरण केंद्रे उभारण्यात आली आहेत. कोरोनाविरुद्धच्या लढ्यात कोणतीही उणीव राहू नये, असाच शासनाचा सर्वतोपरी प्रयत्न आहे. कोरोनाविरुद्धच्या लढ्याला बळ देण्यासाठी निधीची कुठलीही कमतरता पडणार नाही, लागेल तेवढा निधी शासन उपलब्ध करेल, असा विश्वास राज्याचा उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री या नात्याने मी आपल्याला देत आहे. जिल्हा विकास योजनेंतर्गत उपलब्ध २५ टक्के निधी कोरोनाविरुद्धच्या उपाययोजनांसाठी वापरण्यास आपण परवानगी दिली आहे.

दुर्बल घटकांना मदत

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्तिवेतन योजना, केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तिवेतन योजना आणि राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनांच्या लाभार्थ्यांची काळजीही शासनाने घेतली. या दुर्बल घटकांच्या मदतीसाठी तीन महिन्यांचा १ हजार २७३ कोटींचा निधी सामाजिक न्याय विभागाकडे आगाऊ सुपूर्द करण्यात आला.

आरोग्य सेवेसाठी औषधे, उपकरणे, यंत्रसामग्रीसह सेवाखर्चावरील निर्बंध आधीच वगळले आहेत. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तज्ज्ञ गटाच्या शिफारशींनुसार उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्य शासनाकडून गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत, अर्थसंकल्पाच्या माध्यमातून तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या लोकोपयोगी निर्णयांची यादी मोठी आहे. 'लोकराज्य'मासिकाच्या माध्यमातून ती आपल्यापर्यंत पोहोचेलच. लढाई कोरोनाविरुद्धची असो की महाराष्ट्राच्या प्रगतीसाठीची, चांगल्या कामाला निधी कमी पडणार नाही, असा विश्वास आपल्याला देतो.

महाराष्ट्रातल्या तमाम बांधवांना मी आणखी एक विश्वास देतो की, कोरोनाविरुद्धच्या लढाईत संपूर्ण महाराष्ट्र एकजूट आहे. महाराष्ट्रातील कुठलीही व्यक्ती या लढाईत एकटी नाही. कोरोनाविरुद्धची लढाई आपण जिंकूच आणि विजयाचा आदर्श निर्माण करू.. धन्यवाद...

शब्दांकन : संजय देशमुख,
उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी

“कोविड -१९ विषाणूमुळे सध्या संपूर्ण जग मोठ्या संकटाचा सामना करत आहे. भारतही त्यास अपवाद नाही. या संकटामुळे मागील दोन महिन्यांपासून आर्थिक व्यवहार, दळणवळण, उद्योग-व्यवसाय बंद पडून अर्थचक्र ठप्प झाले होते. परंतु संकटासोबत संधी देखील निर्माण होते हे आम्ही हेरून नियोजनबद्धरीत्या ठप्प झालेल्या उद्योग क्षेत्राला गतिमान केले. त्यासाठी उद्योग विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यामुळे आज राज्यात ५४ हजार उद्योग सुरू झाले असून राज्याचे अर्थचक्र रुळावर येत आहे.”

उद्योगातून अर्थचक्र रुळावर

सुभाष देसाई
उद्योग मंत्री

कोरोना व्हायरस किंवा कोविड-१९ नावाने हे संकट जगाला घाबरवू लागले. महाराष्ट्रासह भारताला या साथीचा विळखा बसू लागताच, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तहानभूक विसरून कामाला लागले. नजीकच्या काळात आपले राज्य आणि देश या संकटावर मात करेल यात शंका नाही. मात्र या संकटाने देशाची आणि राज्याची आर्थिक व्यवस्था अति संकटात आहे, हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे. ‘कोरोना’पूर्व आणि ‘कोरोना’नंतरचा काळ पूर्णपणे वेगळा असणार आहे. काल आर्थिकदृष्ट्या संपन्न असणारे अनेक प्रगत देश आज घोर आर्थिक संकटात सापडले आहेत. सगळ्या जगाचीच आर्थिक, औद्योगिक, सामाजिक पातळीवर मोठी कोंडी झाली आहे. आज उद्योग बंद आहेत, उत्पादन गोठले आहे आणि सर्वच उद्योगातील कामगार उद्याच्या चिंतेने भयभीत झाले आहेत.

लॉकडाऊनच्या काळातच अनेक लहान आणि मध्यम स्वरूपाचे उद्योग-व्यवसाय बंद पडले. त्यापैकी थोडे उद्याच्या आर्थिक आणीबाणीच्या काळात तग धरू शकण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीत राज्यातील अकुशल कामगार, शेती आणि शेतीपूरक व्यवसाय करणारे लोक, मुख्य म्हणजे शेतकरी वर्ग, निम्न आणि मध्यमवर्गातील सुशिक्षित बेकार आणि सर्व क्षेत्रांतील कष्टकरी-कामगार यांना रोजगार देऊन त्यांची जगण्याची उमेद आपल्याला वाढवावी लागणार आहे. यासाठी उद्योग विभागाच्या माध्यमातून तातडीने उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे.

ऑनलाइन परवाने

राज्यात २० एप्रिलनंतर केंद्र शासनाने लॉकडाऊन काही प्रमाणात शिथिल केल्यानंतर उद्योग विभागाने उद्योग क्षेत्राला हळूहळू गती देण्याचा निर्धार केला. प्रारंभी ग्रीन व ऑरेंज झोनमध्ये उद्योग सुरू करण्यास मान्यता दिली. हे करत असताना कामगारांची सुरक्षा, सॅनिटायझरचा वापर, दळणवळण, मजुरांची वाहतूक आदी बाबींची काटेकोरपणे पालन करणाऱ्या उद्योगांना ऑनलाइन परवाने देण्यात आले. यासाठी उद्योग विभागाने वेबपोर्टल सुरू केले.

समस्या जाणून तोडगा काढला

उद्योगांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेण्यासाठी मी उद्योगमंत्री या नात्याने सीआयआय, मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज ॲण्ड ॲग्रिकल्चर, मराठवाडा, विदर्भातील उद्योजकांच्या संघटना, महिला उद्योजक, निर्यातदार संघटना, डायमंड बोर्ड आदींसोबत सखोल चर्चा केली. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्या सोडवण्यासाठी अधिकाऱ्यांचा टास्क फोर्स तयार करून सर्व समस्यांवर मार्ग काढला. हे केल्यानंतर मागील सव्वा महिन्यांत (२० एप्रिलनंतर) रेड झोन वगळून जवळपास ७० हजार उद्योगांना उद्योग सुरू करण्याचे परवाने देण्यात आले. त्यापैकी ५४ हजार उद्योग प्रत्यक्षात सुरू झाले आहेत. त्यामध्ये सुमारे १४ लाख कामगार कामावर रुजू झाले आहेत. यामुळे मागील दोन महिन्यांपासून ठप्प झालेले उद्योगविश्व हळूहळू गतिमान झाले आहे. हे करत असताना रेड झोनमधील उद्योगांवरील निर्बंध मात्र कायम ठेवण्यात आले. रेड झोनमध्ये बहुतांश महापालिका

औरंगाबादेतील चिकलठाणा परिसरात उभारण्यात येत असलेल्या सुसज्ज रुग्णालयाची पाहणी करताना उद्योगमंत्री तथा पालकमंत्री सुभाष देसाई.

दृष्टिक्षेपात

● (२० एप्रिलनंतर) रेड झोन वगळून जवळपास सत्तर हजार उद्योगांना उद्योग सुरू करण्याचे परवाने. त्यापैकी ५२ हजार उद्योग प्रत्यक्षात सुरू. त्यामध्ये सुमारे साडेबारा लाख कामगार कामावर रुजू. ● या उद्योगांसाठी काही नियम. उद्योगांना आपल्या कामगारांना कारखान्याच्या किंवा कंपनीच्या आवारातच राहण्याची व्यवस्था करावी. सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून कामगारांच्या वाहतुकीची व्यवस्था करावी. कोरोनाचा प्रादुर्भाव असलेल्या भागातून कामगारांची ने-आण करण्यास मनाई. ● कामगार विनिमय ब्युरो स्थापन. उद्योगांना अवघ्या सात दिवसांत कुशल, अर्धकुशल कामगार, मजूर याद्वारे उपलब्ध होणार. ● चाळीस हजार हेक्टर जमीन विदेशी गुंतवणूकदारांसाठी राखीव. ● उद्योग सुरू करण्यासाठी 'महापरवाना' पद्धत सुरू.

क्षेत्र येतात. त्या ठिकाणी उद्योगांना परवाने दिल्यास कोरोनाचा प्रादुर्भाव अधिक वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार नागरिकांच्या जीवितास अधिक प्राधान्य देऊन रेड झोनमधील उद्योग अद्याप सुरू केलेले नाहीत. मात्र, अत्यावश्यक सेवा देणारे उद्योग, डायमंड, निर्यात करणाऱ्या कंपन्यांना परवाने दिले आहेत.

सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

उद्योग सुरू करताना कामगारांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. कामगारांची ने-आण टाळण्यासाठी काही ठिकाणी एमआयडीसी क्षेत्रात निवासाची सोय करण्यात आली आहे.

औद्योगिक कामगार विनिमय ब्युरो

स्थलांतरित कामगारांमुळे उद्योगांना कामगारांची कमतरता भासू नये, याची विशेष खबरदारी घेण्यात आली. राज्य शासनाने 'कामगार विनिमय ब्युरो' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. उद्योगांना कुशल, अर्धकुशल कामगार, मजुरांची असणारी गरज अवघ्या सात दिवसांत याद्वारे पूर्ण केली जाणार आहे. कामगार, उद्योग व कौशल्य विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा ब्युरो काम करणार आहे.

एमआयडीसीतर्फे धान्य वाटप

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कायम सामाजिक बांधिलकी जोपासत आहे. त्याचाच एक भाग म्हणून धारावी परिसरातील गरजू नागरिकांना महामंडळातर्फे दोन लाख किलो धान्याचे वाटप केले. धान्य, तांदूळ, आटा, तेल, तूरडाळ, रवा, मसाला-मीठ, साबण आदींचे वाटप करण्यात आले. सुमारे दहा हजार नागरिकांना याचा फायदा झाला आहे.

कोविड मदतनिधी १०० कोटी

मागील अडीच महिन्यांपासून राज्याच्या विविध भागांतून स्थलांतरित झालेल्या नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले जात आहे. आतापर्यंत सुमारे तीन लाख किलो धान्याचे वितरण करण्यात आले आहे. 'मुख्यमंत्री-कोविड १९ - मदत निधीस' विविध उद्योगसमूहांकडून व कर्मचारी वेतनातून एकत्रित केलेली १०० कोटींची रक्कम देण्यात येत आहे. यापैकी ९० कोटी रुपये मुख्यमंत्री निधीत जमा करण्यात आले आहेत. शिवाय १५५ व्हेंटिलेटर्स, ५० हजार पीपीई किट्स, ८.५ लाख मास्क इत्यादी साहित्य एमआयडीसीमार्फत शासकीय रुग्णालयांना पुरवण्यात आले आहे.

औरंगाबादसाठी कोरोना रुग्णालय

औरंगाबादचा पालकमंत्री म्हणून काम पाहताना जिल्ह्यातील चिकलठाणा एमआयडीसी परिसरात २५० खाटांचे सुसज्ज रुग्णालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे या रुग्णालयाची घोषणा केल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत यावर कार्यवाही सुरू केली. जूनच्या पहिल्या आठवड्यात औरंगाबादकरांसाठी हे रुग्णालय सज्ज होईल.

उद्योगमित्र राज्य

कोरोनाचे संकट किती काळ चालेल हे कोणीच सांगू शकत नाही. संकट आले तर त्यासोबत संधीदेखील निर्माण होते हे हेरून उद्योग विभागाने चीनमधून बाहेर पडणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना महाराष्ट्रात आकर्षित करण्यासाठी काही योजना तयार केल्या आहेत. राज्यातील विविध भागात सुमारे चाळीस हजार हेक्टर जमीन विदेशी गुंतवणूकदारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. या ठिकाणी रस्ते, वीज, पाणी आदी सुविधा सज्ज ठेवल्या आहेत.

नव्याने उद्योग सुरू करणाऱ्या उद्योजकांना बांधकाम करून उत्पादनास वेळ लागू नये, यासाठी एमआयडीसीने स्वखर्चातून तयार शेड उभारण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या विविध परवान्यांचा जाच कमी करून 'महापरवाना' पद्धत सुरू करण्यात आली आहे. एकदा उद्योग सुरू झाल्यानंतर पुढील तीन वर्षांपर्यंत संबंधित उद्योगांना कुठल्याही परवान्याची गरज भासणार नाही. येणाऱ्या उद्योगांना एका परवान्याद्वारे उद्योग सुरू करता येईल. महापरवाना मिळाल्यानंतर इतर परवाने हळूहळू घेता येतील. अडथळ्याविना गुंतवणूक येईल. मोठ्या गुंतवणूकदारांना त्यांचे उद्योग सुरू करण्यासाठी 'उद्योगमित्र' संकल्पना राबवली जात आहे.

शब्दांकन : अर्चना शंभरकर,
विभागीय संपर्क अधिकारी
सुरेश चित्ते, उद्योगमंत्री महोदयांचे
जनसंपर्क अधिकारी

“ लॉकडाऊनच्या काळात राज्यातील कुठलाही गोरगरीब नागरिक, कामगार, शेतकरी, मजूर व विद्यार्थी उपाशी राहू नये यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहे. सुमारे दीड लाख शिवभोजन थाळीचे दररोज वाटप करण्यात येत आहे. राज्यात प्रतिमाह जवळपास ८.५० लाख मे.टन अन्नधान्य वितरित करण्यात येत आहे. या विभागाचे सर्व अधिकारी/कर्मचारी तसेच ५२ हजार ४२४ स्वस्त धान्य दुकानदार तत्पर होऊन सेवा बजावत आहेत. त्याचबरोबर जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्यांवर दक्षता पथकांच्या माध्यमातून कडक कारवाई केली जात आहे. ”

सर्वसामान्यांसाठी अन्नसुरक्षा

छगन भुजबळ
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

सामान्य परिस्थितीमध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत महिन्यात साधारणतः ३.५० लाख मे. टन धान्य वितरित केले जात आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेच्या ३.५० लाख मे.टन मोफत तांदळामुळे एप्रिल ते जून या तीन महिन्यांत दुप्पट म्हणजे ७ लाख मे.टन अन्नधान्य वाटप करण्यात आले आहे. मे आणि जूनमध्ये केशरी कार्डधारकांनादेखील अतिरिक्त १.५० लाख मे.टन धान्य वाटप केले जात आहे. प्रति माह जवळपास ८.५० लाख मे.टन धान्य वितरित करण्यात येत आहे.

केशरी कार्डधारकांनाही धान्य

शिधावाटप दुकानांमधून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या राज्यातील ३ कोटी ८ लक्ष (केशरी) कार्डधारक नागरिकांना अन्नधान्य देण्यात येत नव्हते. मात्र, सध्याची परिस्थिती पाहून लॉकडाऊनच्या परिस्थितीत राज्यातील नागरिकांना अन्नधान्याचा तुटवडा होऊ नये, यासाठी ५९ हजार ते १ लाख रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या केशरी शिधापत्रिकाधारकांना १२ रुपये प्रति किलोने दोन किलो तांदूळ व ८ रुपये किलोने तीन किलो गहू प्रति व्यक्ती देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत समाविष्ट होऊ न शकलेल्या राज्यातील ३ कोटी ८ लाख एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना मे व जून, २०२० या दोन महिन्यांच्या कालावधीकरिता गहू रु. ८/- प्रति किलो व तांदूळ रु. १२/- प्रति किलो या दराने प्रतिमाह प्रतिव्यक्ती ३ किलो गहू व २ दोन किलो तांदूळ याप्रमाणे ५ किलो अन्नधान्य देण्यात येत आहे. यासाठी केंद्र शासनाकडून २१ रुपये किलो दराने गहू व २२ रुपये किलोप्रमाणे तांदूळ खरेदी करून केशरी कार्डधारकांना अल्प दरात धान्याचे वितरण केले जात आहे. या धान्याचे वाटप १ मेपूर्वीच सुरू करण्यात आले.

सुरक्षेसाठी बायोमेट्रिकला स्थगिती

कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील लाभार्थ्यांना संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्यातील ५२ हजार ४२४ रास्त भाव दुकानातून शिधा वस्तूंचे वितरण करताना लाभार्थ्यांची बायोमेट्रिक पडताळणी न करता रास्त भाव दुकानदारांनी स्वतःचे आधार अधिप्रमाणित करून धान्य वाटपाची सुविधा ई-पॉस उपकरणावर उपलब्ध करण्यात आली आहे. यामुळे लाभार्थ्यांना ई-पॉस उपकरणावर बोट, अंगठा लावण्याची आवश्यकता नाही. ही अट मार्च, एप्रिल व मे महिन्यात शिथिल करण्यात आली.

स्वस्त धान्य दुकानदार कोरोनाच्या काळामध्ये जीव धोक्यात घालून काम करीत असल्याने रास्त भाव दुकानदार व

संग्रहित छायाचित्र

शिवभोजनाचा लाभ घेताना सर्वसामान्य नागरिक.

पाच रुपयांत शिवभोजन

राज्यातील गोरगरीब, कामगार, शेतकरी, मजूर व विद्यार्थी उपाशी राहू नये, यासाठी १ एप्रिलपासून राज्यात शिवभोजन योजनेचा विस्तार करून दररोज १ लाख थाळी शिवभोजन शहरांसोबत तालुकास्तरावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. कोरोना प्रादुर्भाव कालावधीत केवळ पाच रुपयांत शिवभोजन उपलब्ध करून देण्यात येत असून त्याची वेळ ११ ते ३ करण्यात आली आहे. २३ एप्रिलपासून शिवभोजन थाळीच्या संख्येत ५० हजारांची वाढ करण्यात आली आहे. राज्यात आता दररोज दीड लाख शिवभोजन थाळ्यांचे वितरण होत आहे.

सध्या अनेक स्वयंसेवी संस्था गरजू लोकांना अन्नधान्य वितरण व अन्नछत्र चालवीत आहेत त्यांना ओएमएसएस (ओपन मार्केट सेल स्कीम) अंतर्गत एफसीआयमधून २१ रुपये प्रति किलो गहू व २२ रुपये प्रति किलो तांदूळ उपलब्ध करून देण्यात येत आहे.

त्या दुकानदारांकडे नोंदणी केलेला मदतनीस यांना विम्याचे कवच देण्याचे प्रस्तावित आहे.

साठेबाजीला आळा

राज्यातील जीवनावश्यक वस्तूची साठेबाजी करणाऱ्या आणि त्याची चढ्या दराने विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. त्यांच्यावर वैधमापनशास्त्र व दक्षता विभाग कारवाई करत आहे. साठेबाजार व काळाबाजार रोखण्यासाठी दक्षता पथके तयार करण्यात आली आहे.

जीवनावश्यक वस्तूंना प्राधान्य

लॉकडाऊनमध्ये जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत सुरू राहण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या वाहनांना लॉकडाऊनमधून सूट देण्यात आली. जीवनावश्यक वस्तू अधिनियम अंतर्गत (इसेन्शियल कमोडिटी ॲक्ट १९५५) मास्क व हॅण्ड सॅनिटायझर या वस्तूंचा जीवनावश्यक वस्तू म्हणून समावेश केला.

विनाशिधापत्रिका धारकांना धान्य

लॉकडाऊनमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी केंद्र शासनाच्या आत्मनिर्भर भारत वित्तीय साह्य पॅकेज अंतर्गत केंद्र शासनाच्या दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या विनाशिधापत्रिका धारकांना मे व जून २०२० या दोन माहिन्याच्या कालावधीकरिता प्रति व्यक्ती प्रतिमाह ५ किलो मोफत तांदूळ वितरण करण्यात येत आहे.

शासनाच्या या योजनेंतर्गत राज्यातील ज्या नागरिकांनी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमधील शिधापत्रिकेसाठी अर्ज केला आहे. परंतु अद्यापपर्यंत शिधापत्रिका प्राप्त न झालेल्या व्यक्ती, अन्न धान्याची गरज असलेले सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विस्थापित मजूर, रोजंदारी मजूर तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व इतर राज्य योजनेतील विनाशिधापत्रिकाधारकांना या योजनेचा लाभ देण्यात येत आहे. या विना शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना ऑफलाइन धान्य वितरण करण्यात येत असून या लाभार्थ्यांकडून त्यांचा प्रमाणित आधार कार्ड नंबर किंवा शासनाकडून देण्यात आलेले कोणतेही ओळखपत्र पाहून त्याची स्वतंत्र नोंद करण्यात येत आहे.

रेशन कार्ड नसलेल्या गरीब व गरजू नागरिकांना मे व जून या दोन महिन्यांच्या कालावधीकरिता प्रति व्यक्ती प्रतिमाह ५ किलो मोफत तांदूळ वितरण करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शिधापत्रिका नसलेल्या राज्यातील ७० लाख १ हजार ६३८ गरीब व गरजू नागरिकांना लाभ मिळणार असून यासाठी ३५ हजार मेट्रिक टन तांदळाचे वाटप करण्यात येत आहे.

जानेवारी २०२० पासून महाराष्ट्रात 'वन नेशन वन रेशन'ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा कार्डधारक आधार बायोमेट्रिक ऑथेंटिकेशन करून तो ज्या भागात आहे त्या ठिकाणी धान्य घेऊ शकतो. राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्था आधुनिक प्रणालीद्वारे अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी त्यामध्ये येणाऱ्या अडचणी सोडवून डिजिटलायझेशन सिस्टिमचे अपग्रेडेशन करण्यात येणार आहे.

धान्य खरेदी

विदर्भातील धान्य खरेदी करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत असलेली मुदत वाढवून ती ३० एप्रिलपर्यंत करण्यात आली. धान्य खरेदीसाठी मुदतवाढ मिळालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या प्रोत्साहन अनुदानाचा लाभ देण्यात आला आहे.

किमान आधारभूत किंमत भरड धान्य योजनेद्वारे रब्बी हंगामातील ज्वारी व मका या भरड धान्याची हमी भावामध्ये खरेदी करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना

या योजनेंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या पात्र ७ कोटी लाभार्थ्यांना एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांच्या कालावधीत प्रति व्यक्ती ५ किलो मोफत तांदूळ वाटप. तसेच मोफत तूरडाळ/चणाडाळ या दोन्हींपैकी एक डाळ प्रत्येक महिन्याला प्रति कार्ड एक किलो या प्रमाणे वाटप.

शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,
विभागीय संपर्क अधिकारी

“ कोरोना पार्श्वभूमीवर राज्यात सर्वत्र लॉकडाऊन सुरू आहे. या काळात राज्याचा गृह विभाग आपल्या घोषवाक्याला म्हणजे सद्रक्षणाय खलनिग्रहणाय यास अनुसरून अहोरात्र कार्यरत आहे. याचा मला अभिमान आहे. संपूर्ण देशात २४ मार्चपासून कोरोना प्रतिबंध करण्यासाठी लॉकडाऊन सुरू आहे. कोरोनाचा प्रभाव लक्षात घेता हा लॉकडाऊन वाढवण्यात आला. लॉकडाऊनमुळे नागरिक मोठ्या प्रमाणात अस्वस्थ झालेले दिसून येतात. ते विविध कारणांनी घराबाहेर येत आहेत. महत्त्वाच्या कामाखेरीज त्यांनी रस्त्यावर येऊ नये यासाठी पोलीस २४ तास रस्त्यावर उभे राहून याचे नियंत्रण करीत आहेत. ”

पोलीस दलाची अग्नीपरीक्षा

अनिल देशमुख
गृहमंत्री

राज्याचे संपूर्ण पोलीस दल हे एक मोठे कुटुंब असून गृहमंत्री या नात्याने मी त्यांचा कुटुंबप्रमुख आहे. या लॉकडाऊनमध्ये मी स्वतः मुंबईसह १८ जिल्ह्यात भेटी देऊन त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची विचारपूस केली. ते करीत असलेल्या कामाचे कौतुक केले. तसेच भेटी दिलेल्या जिल्ह्यामध्ये त्या जिल्ह्याचे विभागीय आयुक्त, आय.जी. पोलीस, पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक इतर अधिकारी बहुतेक जिल्ह्यांमध्ये तेथील पदाधिकारी यांच्यासोबत कोरोनासंदर्भात आढावा बैठक घेतली. महाराष्ट्र पोलिसांच्या बरोबरीने आपले राज्य राखीव दलातील जवानदेखील कार्यरत आहेत.

राज्यात असलेल्या ५९ तुकड्यांशी मी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणींबाबत चर्चा केली. यातील काही जणांना कोरोनाची बाधा झाली होती, पण एकूण कोरोनाग्रस्त जवानांच्या ७० टक्के जवान आतापर्यंत बरे झाले आहेत. जे जवान खासगी रुग्णालयांमध्ये कोरोनाचा उपचार घेत आहेत. त्यांना तातडीने वेल्फेअर फंडातून एक लाख रुपये देण्यात येत आहेत. राज्य राखीव पोलीस बलाच्या सर्व केंद्रावर जवानांसाठी ऑक्सिमीटरची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे तेथील जवानांचे ऑक्सिजन लेव्हलची तपासणी होऊ शकेल.

जवानांची विचारपूस

राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेल्या जवानांशी देखील मी ऑनलाइन संवाद साधून त्यांची विचारपूस केली. त्यांना मिळत असलेले औषध उपचार, तेथील सुविधा याबाबत सविस्तर माहिती घेतली. उपचार सुरू असलेल्या जवानांनी त्यांना उत्तम सुविधा व औषध उपचार मिळत असल्याचे व त्याबद्दल ते समाधानी असल्याचे मला सांगितले. या शिवाय मी उपचार घेऊन कोरोना आजाराच्या संसर्गातून मुक्त झालेले ३ पोलीस अधिकारी व ३५ पोलीस कर्मचारी तसेच गट मुख्यालयात विलगीकरण कक्षात असलेल्या ६५ पोलीस कर्मचारी यांच्याशी देखील ऑनलाइन संवाद साधला.

आणखी एक महत्त्वाची व कौतुकास्पद बाब अशी की, आमच्या या राज्य राखीव दल पोलीस जवानांच्या कुटुंबीयांनी बचत गटाच्या माध्यमातून मास्क व सॅनिटायझरची निर्मिती केली असून ते मास्क स्थलांतरित मजुरांसाठी देण्यात आले.

जनतेचा खरा मित्र

असे म्हणतात की, संकटकाळी खऱ्या मित्राची ओळख होते, तसेच आमच्या पोलिसांनी आपल्या कृतीतून पोलीस हा जनतेचा खरा मित्र व हितचिंतक असल्याचे दाखवून दिले आहे. यापुढेही ते आपली सेवा याच निष्ठेने आणि समर्पणाच्या भावेनेने देत राहतील, याची मला पूर्णतः खात्री आहे.

कोरोना योद्धे

अतिशय दुःखद अंतकरणाने मला हे नमूद करावे लागत आहे की, कोरोनाविरुद्धच्या या लढाईत आमच्या काही पोलीस योद्ध्यांना आपला जीव गमावावा लागला. त्या सर्वांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. आमच्या पोलीस दलातील प्रत्येक कर्मचाऱ्याच्या कुटुंबाच्या मागे महाराष्ट्राचे गृह खाते व महाराष्ट्र शासन तसेच महाराष्ट्रातील जनता ठामपणे उभी आहे.

सानुग्रह अनुदान

या आजाराचा मुकाबला करताना दुर्दैवाने जर एखाद्या पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबीयास दहा लाख रुपये पोलीस वेल्फेअरमधून तर पाच लाख रुपये ॲक्सिस बँक आणि पन्नास लाख रुपये राज्य सरकार असे एकूण ६५ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान दिले जाते. राज्य सरकारचे पन्नास लाख रुपये अर्थमंत्री

तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून मंजूर करून घेतले आहेत. आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावत असताना हजार पेक्षा जास्त पोलीस बंधू-भगिनी यांना कोरोना विषाणूचा संसर्ग झाला असून ते कोरोनाशी लढत आहेत. तब्येत ठीक झाल्यानंतर पुन्हा नव्या जोमाने जनतेच्या सेवेसाठी रस्त्यावर उतरत आहेत. मी पोलीस दलातील प्रत्येकाला हे सांगू इच्छितो की, पोलीस बंधू-भगिनींनो तुमचा जीव हा आमच्यासाठी सर्वोच्च आहे, म्हणून स्वत:ची काळजी घ्या.

विविध सुविधा

राज्यातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी कोरोना पार्श्वभूमीवर विविध सुविधा देण्यात येत आहेत. यात पोलिसांच्या सुरक्षिततेसाठी गृह विभागाने प्रामुख्याने पुढील बाबी केल्या आहेत.

कोविड-१९ हेल्पलाइन : राज्यातील पोलिसांना विविध कोविड रुग्णालयांमध्ये तातडीने उपचार मिळावेत, याकरिता एक कोविड हेल्पलाइन पूर्ण राज्यात जिल्हानिहाय सुरू करण्यात आली. याद्वारे समुपदेशन तसेच आवश्यक असल्यास रुग्णालयात भरती करण्यात येते.

साधनसामग्री : राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना विविध प्रकारचे मास्क सॅनिटायझर, फेस शिल्ड, हॅन्ड ग्लोव्हज्, ड्रोन कॅमेरा अशा आवश्यक असलेल्या वस्तूंचे वाटप करण्यात आलेले आहे.

मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील पोलिसांसाठीदेखील अशाच आवश्यक वस्तू मोठ्या प्रमाणात देण्यात आलेल्या आहेत. याखेरीज बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांसाठी अल्पोपाहार व मिनरल वॉटरची व्यवस्थादेखील करण्यात येते.

कर्तव्याचा नवा आदर्श

मी आवर्जून सांगतो की, मुंबईसह महाराष्ट्रातील सव्वा दोन लाख पोलीस बांधवांनी, गेली २ महिने कामाचे तास, सुट्टी, प्रवासाची सोय-गैरसोय, कामावर येण्या-जाण्याकरिता असलेल्या वाहतुकीच्या अडी-अडचणी या कशाचीही पर्वा न करता, अथक परिश्रम करून आपल्या कठोर कर्तव्याचा नवा आदर्श महाराष्ट्रातील तमाम जनतेसमोर निर्माण केला आहे. याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे.

खरेदीचे अधिकार : पोलिसांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या वस्तूंची कमतरता पडू नये, याकरिता कोविंड १९ प्रतिबंधात्मक आवश्यक असलेल्या वस्तूंच्या खरेदीकरिता पोलिस कल्याण निधीतून खरेदीचे अधिकार सर्व घटक प्रमुखांना देण्यात आले आहेत.

प्रतिबंधात्मक औषधे : पोलीस बांधवांना कोरोनाविरुद्ध लढण्यासाठी, त्यांची प्रतिबंधात्मक शक्ती वाढावी तसेच शारीरिक क्षमता टिकून राहावी, यासाठी विविध प्रकारच्या प्रतिबंधात्मक औषधांचे वाटप देखील करण्यात येत आहे.

कोविड अग्रिम : कोविडबाधित पोलिसांना पोलीस कल्याण निधीतून एक लाख रुपयाचा अग्रिम देण्यात येत आहे.

शासकीय अनुदान : कोविडसंदर्भात साधनसामग्री घेण्याकरिता राज्यात पोलीस विभागाला ११ कोटी रुपयांचे अनुदान कार्यालयीन खर्चापोटी देण्यात आले.

रोकडविरहित उपचार : महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्र पोलीस कुटुंब योजनेंतर्गत कोविड-१९ उपचार राज्यातील नामांकित रुग्णालयात करण्यात येत आहेत. कोविडबाधित पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांबाबत घटक प्रमुखांकडून विशेष लक्ष देण्यात येत आहे. त्यांना सर्वोत्तम उपचार मिळावेत, याकडेही लक्ष आहे. तसेच त्यांच्या कुटुंबाशीदेखील संवाद साधला जातो.

कर्तव्यात सूट : ५० वर्षांच्या वरील १२ हजार पोलीस कर्मचाऱ्यांना जनतेशी संपर्क येईल, अशी कोणतीही कामे दिली जात नाहीत. तसेच ५५ वर्षांवरील २३ हजार पोलिसांना कोणत्याही प्रकारे पगारात कपात न करता रजा घेण्याची परवानगीदेखील देण्यात आलेली आहे.

ताप तपासणी केंद्र : कोविडसंदर्भात काही लक्षणे दिसल्यास अथवा शंका आल्यास मुंबईमध्ये महानगरपालिकेच्या सहकाऱ्यांने दोन ठिकाणी ताप तपासणी केंद्रदेखील सुरू केली आहेत. या ठिकाणी पोलीस व त्यांचे कुटुंब येऊन तपासणी करू शकतात. अशाप्रकारे विविध सुविधा, सोयी देऊन पोलीस व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याचे रक्षण करण्याचा प्रयत्न गृह विभागामार्फत, शासनामार्फत होत आहे. नागरिकांनीदेखील पोलिसांना योग्य ते सहकार्य करून कोरोनाविरुद्धच्या लढ्यात आपला सहभाग द्यावा, असे आवाहन मी करतो.

शब्दांकन : डॉ.राजू पाटोदकर
विभागीय संपर्क अधिकारी

“ लॉकडाऊनच्या काळात सर्वसामान्य जनतेला अन्नधान्य, भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा होऊ नये, मागणी वाढल्यास दरवाढ, काळाबाजार, साठेबाजी होऊ नये यासाठी राज्य शासन अहोरात्र परिश्रम घेत आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह सर्व विभागांचे मंत्री कोरोनाच्या संकट काळात जनतेच्या हितासाठी झटत आहेत. मार्चपासून आतापर्यंत अन्न व औषध प्रशासन विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. मास्क, सॅनिटायझर व आवश्यक औषधी उपलब्ध करण्यात आली. या वस्तूंच्या साठेबाजीला व अवाजवी किंमत वाढीवर नियंत्रण ठेवण्यात यश आले. ”

मुबलक जीवनावश्यक वस्तू

डॉ. राजेंद्र शिंगणे
अन्न व औषध प्रशासन मंत्री

लॉकडाऊनदरम्यान प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तसेच औषधविक्रेते बांधव, अन्न व औषध उत्पादक संस्था व त्यांचे वितरक यांनीदेखील या महामारीच्या काळात चांगली सेवा दिली आहे. राज्यात कोरोनाचा पहिला रुग्ण आढळण्यापूर्वीच सर्व यंत्रणा सतर्क होत्या. लॉकडाऊनच्या कालावधीत शासनाने केलेल्या उपाययोजना, रुग्णालयात मास्क, सॅनिटायझर, पीपीई किटचे वाटप तसेच इतर औषधी व रक्त / रक्तघटक यांचा तुटवडा होऊ नये यासाठी घेतलेली खबरदारी व निरंतर रुग्णसेवा यामुळे हजारो रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत व जात आहेत.

किमती नियंत्रित

बाजारात सॅनिटायझर व मास्कचा तुटवडा होऊ नये, काळाबाजार होऊ नये, अवाजवी किमतीने विक्री होऊ नये यासाठी १४ मार्च २०२० रोजी मुंबई व कोकण विभागातील सॅनिटायझर/डिसइन्फेक्टंट उत्पादकांची व प्रमुख वितरकांची बैठक घेऊन त्यांच्याकडे किती साठा शिल्लक आहे, उत्पादन क्षमता किती आहे, मागणी किती आहे, कच्चा माल पॅकिंग मटेरियल किती प्रमाणात आहे, इत्यादी बाबींचा आढावा घेतला. दरम्यान तुटवडा भासणार नाही, काळाबाजार व अवाजवी किंमत आकारली जाणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान प्रशासनाच्या पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती येथील सह आयुक्तांनी त्यांच्या स्तरावर अशी बैठक घेऊन स्थानिक उत्पादक व वितरकांना महत्त्वपूर्ण निर्देश देऊन आश्वस्त केले.

सॅनिटायझरच्या उत्पादकांना आवश्यक असलेले अल्कोहोल अधिक प्रमाणात उपलब्ध करून दिले गेले. बाजारात बनावट किंवा विनापरवाना किंवा कमी दर्जाच्या सॅनिटायझरची विक्री होऊ नये, मास्क व सॅनिटायझरचा काळाबाजार होऊ नये यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तपासणी व धाडसत्र सुरू ठेवले. दर दिवशी केलेल्या कारवाईची माहिती घेतली जात आहे. प्रशासनाचे सर्व अधिकारी कर्मचारी दिवस-रात्र काम करीत आहेत. अनेक ठिकाणी धाडी टाकून २ कोटींहून अधिक किमतीचा साठा जप्त करण्यात आला.

औषधपुरवठ्याची केली खातरजमा

देशात लॉकडाऊन, राज्यात संचारबंदी कलम १४४ लागू करण्यात आल्याने औषध विक्रेते, उत्पादक, वितरक, कच्चे द्रव्ये व पॅकिंग मटेरियल पुरवठा करणाऱ्यांना व त्यांच्या कामगारांना तसेच वाहतूक संस्थांना येणाऱ्या अडचणी दूर केल्या गेल्या. कोरोना विषाणूग्रस्त रुग्णांच्या उपचारासाठी, चाचणीसाठी लागणाऱ्या औषधांचे उत्पादक सॅनिटायझर व मास्कचे तसेच व्हेंटिलेटरचे उत्पादक व पुरवठादारांचीही बैठक घेऊन त्यांच्याकडील साठा, उत्पादन क्षमता व त्यांच्या अडचणींचा आढावा घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात आली.

बाजारात औषध विक्रेत्यांकडे (मुंबई, कुलाबा, वरळी) मी स्वत:भेट देऊन बाजारात सॅनिटायझर / मास्कची विक्री वितरणाचा आढावा घेतला. कोणीही सॅनिटायझर / मास्कची अवाजवी साठेबाजी, काळाबाजार, अधिक किंमत आकारणी न करता जनतेला योग्य किमतीत सॅनिटायझर/मास्क उपलब्ध करून देण्याबाबत आवाहन केले. बिलाने खरेदी करून बिलाद्वारेच विक्री करण्याबाबत सुद्धा दुकानदारांना निर्देश देण्यात आले.

तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक

राज्यातील जनतेला औषधे उपलब्ध करण्यासाठी, उत्पादकांना औषधे उत्पादनाची, वितरकांना वितरण / विक्रीसंदर्भात काहीही अडचणी येत असेल तर त्यांचे निराकरण करण्यास्तव अन्न व औषध प्रशासनाच्या, आयुक्त कार्यालयात कंट्रोल रूमची व्यवस्था करण्यात आली असून ते २४ तास कार्यरत आहे. तक्रार नोंदविण्याकामी संबंधित व्यक्ती टोल फ्री नं. १८००२२२३६५ वर संपर्क करू शकतात.

एका दिवसात परवाने

बाजारात तुटवडा जाणवू लागल्याने जास्त प्रमाणात सॅनिटायझरचे उत्पादन अधिकाधिक उत्पादकांनी करावे यासाठी इच्छुक अल्कोहोल उत्पादकांना एका दिवसात परवाने मंजूर करण्यात आले.

रक्तदानासाठी पुढे यावे

कोरोनाचे भीषण संकट पाहता साहजिकच रक्ताची निकड मोठ्या प्रमाणावर भासू शकते. सध्या ८ ते १० दिवस पुरेल इतका रक्तसाठा आहे. त्यामुळे रक्तपेढ्यांना मोठ्या व मध्यम रहिवासी संकुलात रक्तदान शिबिर आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सध्या परराज्यातील व परगावातील मजूरवर्ग त्यांच्या गावी परतत असल्याने तसेच कोरोनाच्या भीतीपोटी रक्तदात्यांची संख्या कमी झाली आहे. ही बाब विचारात घेऊन मी स्वत: टीव्ही व इतर प्रसिद्धी माध्यमांतून जनतेला रक्तदान करण्यासाठी आवाहन करत आहे. राज्यातील रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणावर रक्तदान हे श्रेष्ठदान कोरोनाच्या संकटात करून आपल्या सामाजिक बांधिलकीचा परिचय करून द्यावा, असे मी आवाहन करत आहे. रक्तदान वाढवण्यासाठी नॉनरेड झोन क्षेत्रातील स्थानिक रक्तपेढ्यांच्या सहकार्याने रेडझोनमधील रक्तपेढ्या शिबिरे आयोजित करत आहेत.

केंद्र शासनाशी संपर्क करून सॅनिटायझर / मास्क व त्याला लागणाऱ्या कच्चा मालाचे सिलिंग दरनिश्चितीसाठी प्रयत्न केले. आता प्रति २०० मि.ली.साठी १००/- रुपये निश्चित झाले. सॅनिटायझरचे उत्पादन वाढल्याने साठेबाजी व काळाबाजारही थांबला.

रक्त पुरवठा नियमित व्हावा म्हणून..

संचारबंदी/लॉकडाऊनमुळे ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी व थॅलेसेमिया रुग्णांना रक्तपुरवठा नियमित अथवा रक्ताची कमतरता येऊ नये यासाठी तातडीने मुंबई-ठाणे येथील रक्तपेढ्यांचे तज्ज्ञ व्यक्ती, बीटीओ व प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. पुरेसा रक्तसाठा उपलब्ध ठेवण्यासाठी पावले उचलण्यात आली. अधिकाधिक रक्तदान शिबिरे घेण्यात आली.

पीपीई किट व मास्कचा पुरेसा साठा

मुख्यमंत्र्यांनी खासगी रुग्णालये सुरू करण्यासाठी केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने खासगी वैद्यकीय व्यावसायिकांना व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना पीपीई किट व मास्कची गरज विचारात घेऊन प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन घाऊक वितरक व १० किरकोळ औषध विक्रेत्यांकडे खासगी व्यावसायिकांसाठी माफक दरात पीपीई किट व एन-९५ मास्क किंवा या दर्जाचे इतर मास्क उपलब्ध करण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे सध्या शासकीय व निमशासकीय रुग्णालयात पीपीई किट व मास्कचा तुटवडा नसून पुरेसा साठा उपलब्ध आहे.

वाहतुकीची समस्या सोडवली

औषध उत्पादक व पुरवठादाराचे कामगार, रक्तपेढीतील कर्मचारी व रक्तदान करण्यासाठी रक्तपेढीत / शिबिरात जाण्यासाठी त्यांच्या वाहतुकीची समस्या दूर करण्यात आली. औषध उत्पादकांना आयात केलेला कच्चा माल पोर्टवरून मिळण्यास विलंब होत असल्याचे त्यांनी सांगितले तरी यासंदर्भात केंद्र शासनाच्या संबधित अधिकाऱ्यांना कळवण्यात येत आहे. उत्पादकांनी त्यांच्या १०० टक्के क्षमतेने काम करावे यासाठी आवश्यक कच्चा माल व पॅकिंग मटेरियलसह उत्पादकांनासुद्धा जीवनावश्यक सेवेच्या कक्षेत आणले जाईल.

अन्नपदार्थांच्या किमती नियंत्रित

अन्नपदार्थ उत्पादक व वितरकांच्या प्रतिनिधींच्या बैठकीदरम्यान निदर्शनास आलेल्या अडचणींवर शासन व प्रशासनाने पुढाकार घेऊन त्या अडचणी सोडवल्या. त्यामुळे वाहतुकीचा प्रश्न सुटला व पुरवठा सुरळीत झाला. प्राईज इन्डेक्स ५ टक्क्यांपेक्षा कमी राहिला. काळाबाजार झाला नाही. कोणत्याही अन्नपदार्थाची अवाजवी किंमतवाढ झाली नाही. या सर्व बाबींसाठी उत्पादकांनी शासनाचे व प्रशासनाचे आभार मानले.

या संकटाच्या काळात सर्व नागरिकांनी केंद्र व राज्य सरकार व प्रशासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. मास्क, सॅनिटायझरचा वापर करावा व किमान एक मीटर एवढे अंतर (सोशल डिस्टन्सिंग) एकमेकांपासून ठेवावे.

शब्दांकन : अर्चना शंभरकर,
विभागीय संपर्क अधिकारी

मुंबईतील महालक्ष्मी येथे उभारण्यात आलेले ६०० बेड्सचे कोरोना केअर सेंटर.

“ राज्य शासन कोरोनाचा समर्थपणे मुकाबला करत आहे. कोरोनाबाबत आपल्या राज्याने आधीच खबरदारी घेऊन अनेक उपाययोजना केल्या. त्यामुळे आज राज्यात देशातील सर्वाधिक रुग्ण आपल्याकडे आढळत असतानाही आपण समर्थपणे या समस्येला तोंड देत आहोत. राज्याचा रुग्ण दुपटीचा दर हा १४ दिवसांवर आला आहे. राज्य शासनाने वेळोवेळी केलेल्या उपाययोजनांमुळे हे शक्य होत आहे. रुग्ण वाढताहेत तसे बरे होणाऱ्या रुग्णांचीही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यात दररोज एक हजारच्या आसपास रुग्ण बरे होऊन घरी जात आहेत. ”

कोरोनाशी समर्थपणे लढा...

राजेश टोपे
सार्वजनिक आरोग्य मंत्री

आरोग्य विभागाचा मंत्री झाल्यानंतर राज्यात आरोग्याच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या दिशेने आम्ही पावले टाकत असतानाच जगाला भेडसावणारे कोरोनाचे संकट आपल्या राज्यातही येऊन धडकले आणि त्याला रोखण्यासाठी संपूर्ण आरोग्य यंत्रणाच जुंपली गेली.

कोरोनाबाबत आपल्या राज्याने आधीच खबरदारीचा उपाय म्हणून ज्या काही उपाययोजना केल्या. त्यामुळे आज राज्यात देशातील सर्वाधिक रुग्ण आपल्याकडे आढळत असतानाही पण समर्थपणे तोंड देत आहोत. साधारणपणे जानेवारीच्या १८ तारखेपासून कोरोनाबाधित भागातून येणाऱ्या प्रवाशांची मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर तपासणीला सुरुवात केली. त्यामध्ये केंद्र शासनाकडून वेळोवेळी आलेल्या सूचनांनुसार बदल करीत प्रवाशांची तपासणी, त्यांचा आरोग्यविषयक पाठपुरावा करण्यात आला.

अधिक सतर्क

देशभरात कोरोनाचे रुग्ण आढळल्यानंतर राज्य शासन अधिक सतर्क झाले. याच दरम्यान विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना ९ मार्चला महाराष्ट्रात पहिला कोरोनाबाधित रुग्ण आढळला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांनी अधिवेशन लवकर संपवण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर मॉल, चित्रपटगृहे, शाळा,

कार्यालये बंद करण्याबाबत टप्प्याटप्प्याने निर्णय घेतला. पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूरबरोबरच मुंबईतही कोरोनाचे रुग्ण आढळल्यानंतर महाराष्ट्र लॉकडाऊन करण्याचा निर्णय झाला. अगदी गेल्या किमान १०० वर्षांत मुंबईची जीवनवाहिनी अशी ओळख असलेली लोकलसेवा बंद झाली. हे सगळे आपल्याला माहीत आहेच.

राज्य 'न भूतो न भविष्यति' अशी परिस्थिती अनुभवत आहे. दररोज मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आम्ही सर्व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांशी संवाद साधत आहोत. मुख्यमंत्रीही नागरिकांना दिलासा देत आहेत. प्रसंगानुरूप निर्णय घेतले जात आहेत. राज्याच्या परिस्थितीवर मुख्य सचिवांच्या मार्गदर्शनाखाली सचिवांचा गट नियंत्रण ठेवून आहे.

रुग्णसंख्येचा गुणाकार रोखण्यात यश

राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असला तरी परिस्थिती नियंत्रणात आहे. राज्य शासनाने अगदी सुरुवातीपासून प्रतिबंधात्मक पावले उचलल्याने राज्यात कोरोनाच्या रुग्णसंख्येचा गुणाकार रोखण्यास यश मिळाले आहे. राज्याचा रुग्ण दुपटीचा दर (डबलिंग रेट) हा १४ दिवसांवर (२८ मेपर्यंत) गेला आहे. राज्य शासनाने वेळोवेळी केलेल्या उपाययोजनांमुळे हे शक्य होत आहे. मात्र रुग्ण वाढताहेत तसे बरे होणाऱ्या रुग्णांचीही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यात दररोज एक हजारच्या आसपास रुग्ण बरे होऊन घरी जात आहेत.

'चेस द व्हायरस' मोहीम

मुंबईत कॉन्टॅक्ट ट्रेसिंगवर भर देण्यात येत असून त्यासाठी 'चेस द व्हायरस' ही नवी मोहीम हाती घेण्यात येत आहे. या अंतर्गत एका पॉझिटिव्ह रुग्णाच्या निकट सहवासातील १५ जणांना सक्तीने संस्थात्मक क्वारंटाईन केले जात आहे. कम्युनिटी लिडर नेमले असून त्यांना सहा प्रकारचे काम नेमून देण्यात आले आहे. त्यामध्ये कोमॉर्बीड रुग्णांची माहिती देणे. संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये मिळणाऱ्या जेवणाची माहिती देणे, स्वच्छतागृहांची स्वच्छता, खासगी दवाखाने उघडले की नाही याची माहिती ते देतात. यासाठी प्रत्येक वार्डमध्ये वॉर रुम उघडण्यात आली आहे. मुंबई महापालिकेमार्फत प्रत्येक बेडला विशिष्ट ओळख क्रमांक दिला जात असून त्या माध्यमातून उपलब्ध बेडच्या संख्येबाबतची माहिती ऑनलाइन उपलब्ध केली जात आहे. रेल्वे, मुंबई पोर्ट ट्रस्ट, भारतीय लष्कर आणि इतर केंद्र शासनाच्या अखत्यारीतील रुग्णालये व संस्था यांना त्यांच्या राज्यभरातील सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी विनंती केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे स्वत: वरिष्ठ पातळीवर बोलले आहेत.

प्रयोगशाळांची संख्या वाढवली

आरोग्य यंत्रणेचा प्रत्यक्ष आढावा घेताना आरोग्यमंत्री राजेश टोपे.

राज्यात रुग्णनिदान होण्यासाठी चाचण्यांची संख्या वाढविण्यावर सुरुवातीपासून भर देण्यात येत आहे. सुरुवातीला तीन ठिकाणी असलेली प्रयोगशाळांची संख्या वाढवत ती आता ७२ झाली आहे. त्यामुळे दररोज राज्यात १० हजारांहून अधिक चाचण्यांची क्षमता निर्माण झाली आहे.

पल्स ऑक्सिमीटरचा वापर करून लवकर निदानाची सोयही करण्यात आली आहे. या चाचणीच्या माध्यमातून शरीरातील ऑक्सिजनची पातळी मोजून त्यावरून प्राथमिक अंदाज येतो. त्यामुळे ही चाचणीदेखील केली जात आहे. विशेष करून दाट लोकवस्तीच्या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या वयोवृद्ध नागरिकांच्या तपासणीला प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मोफत व कॅशलेस विमा संरक्षण

राज्य शासनाच्या महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून राज्यातील १०० टक्के जनतेला मोफत आरोग्य उपचार देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्रदिनी आम्ही घेतला आहे. राज्यातील नागरिकांना मोफत व कॅशलेस विमा संरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य ठरले आहे. त्याचबरोबर कोरोनाच्या रुग्णांवर उपचार करताना खासगी रुग्णालयांकडून मनमानी पद्धतीने दर आकारणी केली जात आहे. तिला चाप लावण्याचा धाडसी निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

कोरोना रुग्णांच्या उपचाराचा भार सरकारी रुग्णालयांवर पडत आहे. अनेक खासगी रुग्णालये वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याची कारणे देतात ही बाब लक्षात घेऊन शासनाने अत्यावश्यक सेवा नियंत्रण अधिनियमानुसार उपलब्ध खाटांसाठी लागणारा कर्मचारी वर्ग रुग्णालयांनी पुरवणे बंधनकारक केले असून त्यांना माफक दरात हे ८० टक्के बेड कोविड आणि नॉन कोविड रुग्णांसाठी देणे बंधनकारक केले.

दृष्टिक्षेपात (२९ मे २०२० पर्यंतची आकडेवारी)

● राज्यात कोरोनाच्या रुग्णांसाठी त्रिस्तरीय उपचार पद्धती असून २५७६ उपचार केंद्रे कार्यान्वित आहेत. ● डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल (डीसीएच) २७६ आहेत. ● डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल सेंटर (डीसीएचसी) ४५४ आहेत. ● कोविड केअर सेंटर (सीसीसी) १६४१ आहेत. ● वर्गवारी न केलेली २०५ उपचार केंद्रे आहेत. ● २५७६ उपचार केंद्रांमध्ये २ लाख ७८ हजार ९८ आयसोलेशन बेड्स आहेत. त्यातील १ लाख १८ हजार ४८८ आयसोलेशन बेड्स हे कोरोना बाधितांसाठी आहेत. तर कोरोना संशयित रुग्णांसाठी १ लाख ५९ हजार १५५ आयसोलेशन बेड्स आहेत. अतिदक्षता विभागातील एकूण बेड्स ८६१७ आहेत. ● राज्यात व्हेंटिलेटर्स ३०८४, पीपीई किट्स ४ लाख ५८ हजार ६६०, एन-९५ मास्क ९ लाख १६ हजार ८२४ उपलब्ध आहेत.

सरकारने काढलेले आदेश सर्वच प्रकारच्या रुग्णांसाठी आहेत. राज्यातील ८५ ते ९० टक्के कुटुंबे पिवळे व केशरी शिधापत्रिकाधारक असून ते महात्मा जोतिबा फुले योजनेमध्ये लाभार्थी आहेत व त्यांनाही उपचार मोफत आहेत.

डॉक्टर आणि आणि इतर आरोग्य कर्मचारी थकू नयेत, याकरिता त्यांना सलग ड्यूटी न लावता सात-सात दिवसांच्या टप्प्याटप्प्याने आपण त्यांना कामाची वेळ ठरवून दिल्या आहेत. कोविड योद्धा किंवा कोविड वॉरिअर्स संकेतस्थळाच्या निमित्ताने अनेक स्वयंसेवी लोक आणि संस्था मदतीसाठी पुढे येत आहेत. या सगळ्यांच्या सहकार्याने येणाऱ्या काळातदेखील रुग्ण उपचार सर्वेक्षण याच्यामध्ये सेवा अखंड मिळत राहण्यासाठी राज्य शासन तत्पर आहे.

आवश्यक पदभरती

राज्यभरातील आरोग्य विभागातील १७ हजार विविध रिक्त पदे आहेत ती भरण्यासाठी विशेष यंत्रणा उभी केली आहे. सोबतच वैद्यकीय शिक्षण आणि विविध महापालिकांमधील रिक्त पदे भरण्यास देखील मुख्यमंत्री यांनी मान्यता दिली आहे. या व्यतिरिक्त जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्तांना कोरोना प्रतिबंधासाठी लागणारी पदे थेट भरता येतील.

'फाईट फ्रॉम फ्रंट'

साधनसामुग्रीची उपलब्धता करतानाच कोरोना रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर्स, नर्स अन्य आरोग्य कर्मचारी यांचे मनोबल उंचावण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्याची सुरुवात केली ती पुण्याच्या राष्ट्रीय विषाणू संस्थेला भेट देण्यापासून. या ठिकाणी काम करणाऱ्या तज्ज्ञांना मी भेटलो. त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. देशातील एकमेव असणारी ही संस्था आपल्या राज्यात कार्यरत आहे, त्याचा मला नक्कीच अभिमान आहे. मी पुण्याचे नायडू रुग्णालय, मुंबईच्या कस्तुरबा रुग्णालयाला भेट दिली. तेथील डॉक्टर्स, नर्स यांना मी अभिवादन केले. त्यांचे काम पाहिले तर खरोखर तुम्ही त्यांच्यापुढे नतमस्तक होतात.

तत्पर रुग्णसेवेची खात्री करून घेताना आरोग्यमंत्री राजेश टोपे.

आपण स्वत: पुढाकार घेतला आणि काम केले की लोकांना बळ मिळते हे तत्त्व महत्त्वाचे आहे. अब्राहम लिंकन यांच्या सिव्हिल वॉरवरील पुस्तकातून मला बरीच प्रेरणा मिळाली. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी किल्लारी येथे भूकंप पुनर्वसनाच्या काळात केलेले काम आजही मला प्रेरणादायी आहे. पवार साहेब किल्लारीला जाऊन गावात मुक्काम करायचे. यामुळे प्रशासनाला नक्कीच बळ मिळायचे. 'फाईट फ्रॉम फ्रंट' या तीन एफनुसार मी कार्यपद्धती अवलंबली आहे. त्यामुळे जे प्रत्यक्षात लढतात त्यांनाही आपण बळ देत असतो.

या संकटावरही करू मात

सध्या लॉकडाऊन सुरू आहे. त्याचे पुढे काय होईल अशी भावना लोकांमध्ये आहे. माझे आपणाला आवाहन आहे की, तुम्ही घरीच थांबा. बाहेर पडू नका. लोक भाजी बाजारात खरेदीसाठी गर्दी करत राहिले तर लॉकडाऊनचा काय उपयोग होईल? राज्य शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद द्या, एवढेच मी सांगेन.

राज्यावर यापूर्वीही अनेक संकटे आली त्याला धीराने तोंड दिले गेले. यावेळचे संकट मात्र वेगळे आहे. त्यालाही परतवून लावण्यात आपण नक्कीच यशस्वी होऊ. मात्र कोरोनामुळे अनेक सामाजिक आणि मानसिक प्रश्न निर्माण झालेत आणि होतीलही. त्याला भविष्यात सामोरे जावे लागणार आहे. लोकांची मानसिकता बदलताना जे रुग्ण आहेत त्यांचे कुटुंबीय यांना मानसिक आधार देण्याचे काम शासन करीत आहे.

कोरोनामुळे शासकीय आरोग्यसेवेवरचा लोकांचा विश्वास वाढला ही चांगली बाब यातून घडली. परंतु एवढ्यावरच समाधान न मानता आता शासकीय आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी पायभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, याची मी ग्वाही देतो. रुग्णालयांची संख्या वाढवतानाच डॉक्टरांना मिळणारे वेतन असेल त्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा असतील, याकडे अधिक गांभीर्याने बघितले जाईल. कोरोनाला राज्यातून हद्दपार करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करू या.

शब्दांकन : अजय जाधव,
विभागीय संपर्क अधिकारी

“ कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर येणारे शैक्षणिक वर्ष शिक्षण या संकल्पनेवरच पुनर्विचार करण्यास लावणारे आहे. अभ्यासक्रम, शाळांचे मूल्यमापन, शिक्षकांची भूमिका या सर्वांवर नव्या अंगाने विचार करणे गरजेचे आहे. आव्हान मोठे आहे. मात्र शालेय शिक्षण विभाग या सर्व आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यास सज्ज आहे. शिक्षणासाठीचे ऑनलाइन पर्याय, शैक्षणिक सत्र, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक शुल्क, परीक्षा, शिक्षकांचे प्रशिक्षण, विद्यार्थ्यांची कोविड-१९ या विषाणूपासून सुरक्षा यांबाबत शालेय शिक्षण विभागाने विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत व घेत आहे. ”

शिक्षण प्रक्रिया निरंतर...

प्रा. वर्षा गायकवाड
शालेय शिक्षण मंत्री

राज्यात कोविड-१९ या विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी २५ मार्च २०२० पासून लॉकडाऊनचा निर्णय घ्यावा लागला. त्यामुळे १० वी, १२ वीच्या बोर्डाचे काही पेपर, विद्यापीठाच्या परीक्षा, तसेच इयत्ता १ ली ते ९ व्या वर्गाच्या परीक्षा घेणे शक्य झाले नाही. मार्चमधील राहिलेला अभ्यासक्रम तसाच अपूर्णच राहिला आणि विद्यार्थी, पालक, शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक संबंधित घटक गोंधळून गेला की आता पुढे काय? आणि कसे?

अशा वेळी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने हा सार्वत्रिक गोंधळ, संभ्रम दूर करण्यासाठी तातडीने काही पावले उचलली आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून लॉकडाऊन झालेले शिक्षण पुन्हा विद्यार्थ्यांपर्यंत विविध मार्गांनी पोहोचवण्यास सुरुवात केली. तंत्रज्ञानाचा अचूक वेळी सुयोग्य पद्धतीने वापर करून शिक्षण विद्यार्थ्यांच्या घराघरात पोहोचवण्याचा यशस्वी प्रयत्न सुरू केला आहे.

शाळा बंद... शिक्षण आहे

या उपक्रमांतर्गत लॉकडाऊन झाल्यानंतर राज्यस्तरावरून अध्ययनाचे दैनंदिन नियोजन करून दररोज इयत्तानिहाय प्रत्येक वर्षातील दुसऱ्या सत्राच्या घटकाची लिंक विकसित करून व्हॉट्सॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली जात आहे. या लिंकच्या माध्यमातून दीक्षा ॲपवरील ई-साहित्य मुलांसाठी उपलब्ध होते. यामध्ये अनुरूप चित्रे, संवाद, ध्वनिचित्रफीती, कृती व प्रश्नांचा समावेश आहे. २७ एप्रिलपासून सहशालेय उपक्रम व कृतीवर आधारित घटकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना स्पोकन इंग्लिश, पूरक वाचनासाठी गोष्टींची पुस्तके, कार्यानुभवाच्या छोट्या कृती, कलेतील संगीत नाटक, गायन, वादनाचा समावेश केला आहे. इयत्ता ५ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी इत्यादी बाबी मुलांना उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

राज्यातील जवळपास २२.४ लाख विद्यार्थ्यांनी या ऑनलाइन स्वअध्ययन मालिकेचा लाभ घेतला असून १.१६ कोटी इतक्या वेळा हे ई-साहित्य पाहण्यात आले आहे. हे ई-साहित्य उपयुक्त असल्याबाबतच्या प्रतिक्रिया राज्यभरातून विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

डीडी सह्याद्रीवर कार्यक्रम

वय वर्ष ३ ते ८ असणाऱ्या बालकांमध्ये कार्टूनच्या माध्यमातून काही सहज सोप्या, दैनंदिन जीवनाशी निगडित बाबी तसेच प्राथमिक स्वरूपातील शिक्षण गोष्टींच्या स्वरूपात पोहोचवण्याचा प्रयत्न डीडी सह्याद्री वाहिनीवर ‘गली गली सिम सिम’ या कार्यक्रमातून केला जात आहे. हा

कार्यक्रम दररोज सकाळी १० वाजता प्रक्षेपित होतो. त्याचप्रमाणे 'डीडी नॅशनल' चॅनलवर सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत.

शाळेबाहेरची शाळा

नागपूर विभागातील ६ जिल्ह्यांमध्ये सध्या हा उपक्रम अंगणवाडी तसेच इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी दर मंगळवारी ते शुक्रवारी सकाळी १०.३५ वाजता रेडिओ चॅनल ५१२.८khz आणि ५८५mhz वर 'शाळेबाहेरची शाळा' हा कार्यक्रम प्रथम संस्थेच्या सहकार्याने प्रसारित केला जातो. गावांतील मंदिरामधील लाऊडस्पीकरवरसुद्धा या कार्यक्रमाचे प्रसारण करण्याची सोय करण्यात आली आहे. समाज सहभागाच्या माध्यमातून शाळेबाहेरची शाळा हा उपक्रम सुरू आहे.

मिस कॉल द्या, गोष्ट ऐका

राज्यातील मुलांसाठी प्रथम संस्थेच्या सहकार्याने 'मिस कॉल द्या, गोष्ट ऐका' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. ०८०३३०९४२४३ या क्रमांकावर मिस कॉल देऊन मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड या भाषेतील गोष्टी मुलांना ऐकता येतात.

अवांतर वाचनासाठी पुस्तके

उन्हाळ्याच्या सुट्ट्या आणि सोबतच लॉकडाऊन यामुळे मुलांना कंटाळा येऊ नये म्हणून आणि सोबतच मुलांचे वाचन कौशल्य विकसित व्हावे यासाठी रोज एक ई-पुस्तक मुलांना अवांतर वाचनासाठी उपलब्ध करून दिले जात आहे .

ऑनलाइन व्यावसायिक विकास मंच

लॉकडाऊनमध्ये केवळ विद्यार्थीच नव्हे तर शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे सक्षमीकरण ऑनलाइन व्यावसायिक विकास मंचद्वारे अतिशय नियोजितपणे सुरू आहे. ६ एप्रिलपासून हा उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील शिक्षण उपसंचालक, प्राचार्य, शिक्षणाधिकारी, ज्येष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, विषय सहायक व परिषदेतील सर्व अधिकारी असे राज्यातील जवळपास ८०० अधिकारी झूमद्वारे या ऑनलाइन सक्षमीकरण सत्रात सहभागी झालेत.

लिडरशिप फॉर इक्विटी या संस्थेच्या सहकार्याने हा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. माइंड वेलनेस, मूल्यमापन व संनियंत्रण, ताणतणावाचे व्यवस्थापन, शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाची भूमिका, विविध देशातील शैक्षणिक धोरणे व तेथील शैक्षणिक प्रयोग, दिल्लीमधील शैक्षणिक प्रयोगांबाबत मनीष सिसोदिया, उपमुख्यमंत्री (शिक्षणमंत्री), श्री. विनय भूषण (शिक्षण संचालक, दिल्ली), श्री. शैलेंद्र शर्मा (शिक्षण संचालक, दिल्ली), पालकत्व व मानसिक आरोग्य, अच्युत गोडबोले यांचे माझ्या लेखनामागची प्रेरणा तसेच महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विठ्ठल वाघ, डॉ. यशवंत पाटणे, इंद्रजित भालेराव, सतीश सोळांकूरकर, डॉ. संजय मालपाणी यांचे शिक्षणातील 'फाइव्ह-एस', डॉ अर्चना ठोंबरे यांचे 'आरोग्य शिक्षण काळाची गरज' आणि 'अधिकारी घडताना', संदीप वासलेकर यांचा ज्ञानाचा प्रवास अशी २० सत्रे संपन्न झाली.

शैक्षणिक नेतृत्व विकास कार्यक्रम

केंद्रप्रमुख हा प्रशासकीय यंत्रणेतील शिक्षण व शाळांसाठी जवळचा घटक आहे. या बदलत्या पार्श्वभूमीवर त्यांचे उद्‌बोधन आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता वेबिनारद्वारे केंद्र प्रमुख शैक्षणिक नेतृत्व विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमांचे पाच सत्रांमध्ये नियोजन केले आहे.

केंद्रप्रमुख हा केंद्रातील शाळांचे नेतृत्व करीत असतो. केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षकांना मार्गदर्शन करणे, शालेय गुणवत्ता वाढवणे, राज्याचे धोरण शाळांपर्यंत पोहोचवणे, त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम केंद्रप्रमुख करत असतात. ह्या सर्व बाबी अधिक परिणामकारक व्हाव्यात, यासाठी वेबिनारच्या माध्यमातून उद्‌बोधन केले जात आहे. यामध्ये जवळपास ३,९३६ केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांनी सहभाग नोंदवला आहे. प्रत्येक सत्रामध्ये या वेबिनारच्या माध्यमातून केंद्रप्रमुखांना कामाची दिशा देण्यात येत आहे

१-१२ वीची पाठ्यपुस्तके ऑनलाइन

दरवर्षी एप्रिल किंवा मे महिन्यापासून दहावी, बारावीचे विद्यार्थी अभ्यास करण्यास सुरुवात करतात. मात्र यंदा लॉकडाऊनमुळे पुस्तकेच उपलब्ध नसल्याने सर्व विद्यार्थी चिंताग्रस्त झाले होते. त्यात यावर्षी १२ वीचा अभ्यासक्रमही बदललेला असल्याने त्यांची चिंता साहजिकच होती. पण आम्ही तातडीने निर्णय घेऊन फक्त १२ वीच नव्हे तर १ ली ते १२ वीची पाठ्यपुस्तके बालभारतीच्या वेबसाईटला पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार ती पुस्तके विनाशुल्क सहज डाऊनलोड करून अभ्यास करता येईल. तब्बल ६७ लाख विद्यार्थ्यांनी ही पुस्तके डाऊनलोड केली आहेत.

शिक्षणाचा नवा आदर्श

वरील सर्व उपक्रम म्हणजे लॉकडाऊनच्या काळातही शांत स्वस्थ न बसता निरंतर शिक्षण विकासातून शाश्वत विकासाकडे मार्गक्रमण करण्याची ही नांदी

तंत्रस्नेही शिक्षक व समुपदेशन

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा उपयोग येणाऱ्या काळात अधिकाधिक करणे गरजेचे असणार आहे. सध्या राज्यात २३ टक्के शिक्षक तंत्रस्नेही आहेत. यात वाढ करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने विचार करून आम्ही ब्लेन्डेड मोडमध्ये शिक्षकांना अधिकाधिक तंत्रस्नेही बनवण्याचा प्रयत्न करणार आहोत. येणाऱ्या काळात समुपदेशनाची गरज विद्यार्थी, पालक, शिक्षक या सर्वांनाच भासणार आहे. सध्या राज्यात ४०३ समुपदेशक कार्यरत आहेत. पण समुपदेशनाची गरज लक्षात घेता अधिक शिक्षकांना समुपदेशनाचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीनेही आम्ही प्रयत्न करीत आहोत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर पुढील येणारे शैक्षणिक वर्ष शिक्षण या संकल्पनेवरच पुनर्विचार करण्यास लावणारे वर्ष आहे. अभ्यासक्रम, मूल्यमापन शाळांची, शिक्षकांची भूमिका या सर्वावर नव्या अंगाने विचार करणे गरजेचे आहे. आव्हान मोठे आहे आणि समस्या पण विविध पैलू घेऊन येणाऱ्या आहेत. मात्र शालेय शिक्षण विभाग या सर्व आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यास सज्ज आहे, असा मला विश्वास आहे.

आहे. या विभागाची प्रमुख म्हणून मला माहीत आहे, हे काम सोपे नाही. अजूनही २०-३० टक्के विद्यार्थी या सर्वच बाबींपासून वेगवेगळ्या कारणांमुळे अलिप्त आहेत. पण म्हणून हातावर हात धरून बसून वाट बघण्यापेक्षा उपलब्ध संसाधनांचा जास्तीत जास्त उपयोग करून माझ्या अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचा आमचा हा प्रयत्न आहे. आमचे सर्व अधिकारी, शिक्षक यांचा या कठीण वेळी असणारा पाठिंबा आणि प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत हे सर्व उपक्रम पोहोचवण्याची त्यांची धडपड हाच माझा विश्वास आहे. कोविड-१९ चे संकट तूर्तास संपणारे दिसत नाही. त्याच्या सोबतच जगणे आणि पुढे जाणे हे आपल्याला शिकायलाच पाहिजे आणि हे शिकवण्याचे एक आदर्श उदाहरण शिक्षण विभागाने या उपक्रमांच्या माध्यमातून घालून दिले आहे.

पुढील वर्गात बढती

दरवर्षी साधारणपणे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात इयत्ता पहिली ते नववीच्या वर्गांचे निकाल विद्यार्थ्यांना प्राप्त होतात. पण यावर्षी लॉकडाऊन आणि सोशल डिस्टन्सिंगचा विचार करता मुलांच्या २०१९-२० ची अंतिम सत्राची परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्षभराच्या कामगिरीची सरासरी काढून विद्यार्थ्याला पुढील वर्गात बढती देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे निकाल ऑनलाइन जाहीर करण्यात आले आहेत.

शैक्षणिक सत्राचा प्रारंभ

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यासाठी अवघे काही दिवस उरले आहेत. जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात साधारणतः १५ जून रोजी दरवर्षी शाळा सुरू होतात. पण यावर्षी कोरोनाचा दिवसागणिक वाढणारा संसर्ग विचारात घेता शाळा नेहमीप्रमाणे सुरू कराव्यात की नाही याबद्दल सर्व साशंक आहेत. पण कोरोनाबाबत योग्य ती खबरदारी घेत आपल्याला जगणे शिकायचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकासाचा विचार करता रेड झोन वगळता आवश्यक ती खबरदारी घेऊन १५ जूनपासून शाळा सुरू करण्याचा आमचा विचार आहे.

शाळा दोन सत्रांमध्ये

शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे कोरोना विषाणूच्या संसर्गापासून संरक्षण व्हावे, यासाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये शाळा दोन सत्रांमध्ये घेण्यात याव्यात, याविषयी चर्चा सुरू आहेत. जेणेकरून अधिक विद्यार्थ्यांचा एकमेकांशी संपर्क येणार नाही. त्याचप्रमाणे शाळांचे तास कमी करण्याबाबतचाही आमचा विचार आहे. तसेच एका बाकावर एकच विद्यार्थी बसेल अशी शाळांनी काळजी घ्यावी अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

या शैक्षणिक वर्षात फी वाढ नाही

२०२०-२१ या शैक्षणिक वर्षात फी वाढ न करण्याचे आदेश सर्व शिक्षण संस्थांना दिले आहेत. त्याचप्रमाणे 'कोरोना' संकटाच्या पार्श्वभूमीवर पालकांवर फी वाढीचा बोजा पडू नये म्हणून महाराष्ट्रात यंदा इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या कोणत्याही अभ्यासक्रमाची फी वाढ शिक्षण संस्थांना करता येणार नाही. चालू शैक्षणिक वर्षाची जी फी विद्यार्थ्यांना भरायची आहे, ती एकरकमी भरण्याची सक्ती नसावी, तर टप्पाटप्प्याने (मासिक किंवा त्रैमासिक) भरण्याची सोयही करून देण्याचे निर्देश शिक्षण विभागातर्फे देण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांची सुरक्षितता

शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना कोरोनाचा संसर्ग होऊ नये म्हणून शाळांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे निर्देश शिक्षण विभागाला देण्यात आले आहेत. बऱ्याच शाळांमध्ये स्थलांतरित मजुरांचे विलगीकरण करण्यात आलेले आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी या सर्व शाळा निर्जंतुक करणे, शाळांमध्ये हॅण्डवॉश स्टेशन, सॅनिटायझर यांची पुरेशी व्यवस्था असणे, मुलांना नियमित मास्क घालायला लावून स्वच्छतेच्या सवयी लावणे. यासारखे उपक्रम तातडीने राबवण्याबाबत शिक्षण विभागाला कळवण्यात आले आहे.

शब्दांकन : अर्चना शंभरकर,
विभागीय संपर्क अधिकारी

“राज्यात सध्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदी सुरू आहे. या लॉकडाऊनच्या काळात सामान्य नागरिक, स्थलांतरित मजूर, विद्यार्थी यांना मदतीसाठी शासनातर्फे विविध उपाययोजना करण्यात येत आहे. मदत व पुनर्वसन विभागाकडून आतापर्यंत १९२ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. आवश्यकता भासेल त्या प्रमाणात आणखीही निधी देण्यात येणार आहे. कोरोना प्रतिबंधासाठी आवश्यक असणारी वैद्यकीय यंत्रसामग्री, साहित्य व औषधे खरेदी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून विभागीय आयुक्तांना आतापर्यंत एकूण १७१ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात अडकलेल्या मजुरांसाठी महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत एसटीने प्रवास करण्यासाठी २१ कोटी रुपये एसटी महामंडळाला देण्यात आले.”

दुर्बलांना मदतीचा हात

विजय वडेट्टीवार
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन,
इतर मागास बहुजन कल्याण विकास मंत्री

विभागांना निधी

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी पहिल्या टप्यात कोकण विभागासाठी १५ कोटी, पुणे विभागासाठी १० कोटी, नागपूर विभागासाठी ५ कोटी, अमरावती विभागासाठी ५ कोटी, औरंगाबाद विभागासाठी ५ कोटी, नाशिक विभागासाठी ५ याप्रमाणे ४५ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. तर दुसऱ्या टप्प्यात कोकण विभागासाठी १५कोटी, पुणे विभागासाठी १० कोटी, नागपूर विभागासाठी ५ कोटी, अमरावती विभागासाठी ५ कोटी, औरंगाबाद विभागासाठी ५ कोटी, नाशिक विभागासाठी ५ याप्रमाणे ४५ कोटी, तर तिसऱ्या टप्प्यासाठी कोकण विभागासाठी ४० कोटी, पुणे विभागासाठी १५ कोटी, नागपूर विभागासाठी १० कोटी, अमरावती विभागासाठी ६ कोटी, औरंगाबाद विभागासाठी १० कोटी, याप्रमाणे एकूण ८१ कोटीं असा आतापर्यंत एकूण १७१ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

सर्व प्रकारची मदत

वितरित केलेल्या निधीमधून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी बाधित व्यक्तींसाठी विलगीकरण कक्ष स्थापन करणे, तात्पुरती निवासी व्यवस्था करणे, मदत छावण्या, अन्न, कपडे वैद्यकीय देखभाल, नमुने गोळा करण्यावरील खर्च तपासणी/छाननीसाठी साहाय्य, कॉन्टॅक्ट ट्रेसिंग, शासनाच्या अतिरिक्त चाचणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा खर्च व उपभोग्य वस्तू, अग्निशमन, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था व आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक संरक्षणासाठी प्रतिरोधक साधनांचा खर्च व व्हेंटिलेटर, हवा शुद्धीकरण यंत्र, थर्मल स्कॅनर्स व इतर साधनांसाठी खर्च करण्यासाठी हा निधी देण्यात आला आहे. राज्यात थैमान घातलेल्या कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू दिला जाणार नाही.

गरजूंना आवश्यक साहित्याचे वाटप करताना मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार.

सर्वांनी पुढे यावे

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट क्षेत्राने सामाजिक उत्तरदायित्व निधीत (सीएसआर) व इतर माध्यमातून मदत करावी, या आवाहनाला कॉर्पोरेट क्षेत्राने चांगला प्रतिसाद दिला आहे. तरीही सध्याच्या परिस्थितीत ही मदत अपूरी पडत असून अजूनही मोठ्या मदतीची कॉर्पोरेट क्षेत्राकडून अपेक्षा आहे. कॉर्पोरेट क्षेत्र नेहमी देशावर व राज्यावर आलेल्या संकटाच्या वेळीस मदत करीत असते. आता सुद्धा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट क्षेत्राने पुढे यावे.

आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फतचा सीएसआर फंडसाठीचा अकाऊंट नं.
State Bank of India, Wodehouse Rd Branch, IFSC : SBIN0000572
Account No: 39265578866

घरी पोहोचवण्यासाठी मदत

महाराष्ट्रामधील वेगवेगळ्या जिल्ह्यात असणाऱ्या लोकांना त्यांच्या स्वगावी सोडण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्देशानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला २१ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. परिवहन मंत्री अनिल परब यांच्याशी याबाबत चर्चा केली. त्यांनी संचारबंदीमुळे विविध जिल्ह्यांत अडकलेल्यांना त्यांच्या स्वगावी पोहोचवण्यासाठी परिवहन बसेस देण्यास परवानगी दिली. १० हजार मोफत बसेसद्वारे संचारबंदीमुळे अडकलेल्या लोकांना स्वजिल्ह्यात पोहोचवण्याचे काम सुरू झाले आहे.

मजुर स्वग्रामी

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशात व जगात राज्यातील नागरिक व विद्यार्थी अडकले आहेत. यासाठी केंद्र शासनामार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या माध्यमातून नागरिक व विद्यार्थ्यांना राज्यात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. कोविड १९ या विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी संचारबंदी लागू करण्यात आली. चंद्रपूर जिल्ह्यातील १० हजार अठ्ठावन्न तेलंगणा राज्यात, २ हजार सहाशे त्रेचाळीस आंध्रप्रदेश राज्यात व गडचिरोली जिल्ह्यातील अंदाजे दहा हजार तेलंगणा राज्यात, दोन हजार मजूर आंध्र प्रदेश राज्यात मागील चार महिन्यांपासून अडकले आहेत. खरीप हंगामाच्या पूर्वतयारीला सुरुवात झाली असून या मजुरांअभावी जिल्ह्यातील कामे खोळंबली जाऊ शकतात. त्यामुळे या मजुरांना तत्काळ स्वगावी आणण्यासाठी शासनस्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात आला. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारला पत्र देऊन सतत पाठपुरावा केला होता. श्री. वडेट्टीवार यांच्या प्रयत्नांमुळे परराज्यात अडकलेले मजूर, विद्यार्थ्यांचा घरवापसीचा मार्ग मोकळा झाला असून या सर्वांना आणण्यासाठी बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

परप्रांतीयांना त्यांच्या राज्यात जाण्यासाठी बसेसची व्यवस्था करण्यात आली. या वेळी त्यांना निरोप देताना मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार.

तेलंगणा व आंध्र प्रदेश राज्यात अडकलेले मजूर तसेच पुणे, दिल्ली, विजयवाडा, राजस्थानमधील कोटा येथील विद्यार्थ्यांना तसेच मुंबईसह राज्याच्या अन्य जिल्ह्यात अडकलेल्या विद्यार्थ्यांना परत आणण्यासाठी विभागामार्फत विशेष व्यवस्था व नियंत्रण कक्षाद्वारे प्रयत्न करण्यात आले.

मजुरांसाठी रेल्वे तिकिटाची सोय

गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील जवळपास १ हजार ५०० मजुरांच्या रेल्वे तिकिटाची सोय केली आहे. तसेच आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यातून महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत आलेल्या मजुरांना २०० गाड्या रोज तीन दिवस पाठवण्यात आल्या आहेत. त्यांच्या स्वगावी जाता यावे म्हणून स्वखर्चातून सीमाभागात गाड्या पाठवण्यात आल्या होत्या.

टाळेबंदीच्या काळात मजुरांच्या स्थलांतरासाठी मोठी मोहीम चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात राबवण्यात आली. कधी तेलंगणाच्या सीमेवर जाऊन त्यांनी मजुरांना जिल्ह्यात आपापल्या गावी रवाना केले. तर उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड आदी राज्यांतील मजुरांना परत पाठवण्यासाठी पुढाकार घेतला. पडोली याठिकाणी त्यांनी स्वतः या मजुरांना निरोप दिला.

सध्याच्या टाळेबंदीच्या परिस्थितीत स्थलांतर केलेल्या मजुरांसाठी प्रशासनातर्फे कोकण विभागात ६८१ कॅम्पमध्ये ४६ हजार ५२३ मजूर, नाशिक विभागात ८ कॅम्पमध्ये ४३७ मजूर, पुणे विभागात २३७ कॅम्पमध्ये २३ हजार ४४३ मजूर, औरंगाबाद विभागात ९० कॅम्पमध्ये २९६० मजूर, अमरावती विभागात ९ कॅम्पमध्ये १५२ मजूर, नागपूर विभागात ३२८ कॅम्पमध्ये ८ हजार ९०७ मजूर, असे राज्यात १३५३ कॅम्पमध्ये ८२ हजार ४२२ मजुरांची सोय करण्यात आली होती. या कॅम्पमध्ये एकूण १० लाख ४५ हजार ८२१ एवढ्या अन्न पाकिटांचे वाटप करण्यात आले. (२४ मे,२०२० आकडेवारी)

शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,
विभागीय संपर्क अधिकारी

“ सध्या जगभरात कोविड-१९ या विषाणूमुळे होणाऱ्या आजाराने धुमाकूळ घातला असून संपूर्ण देशातील आरोग्य यंत्रणेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. मात्र या अशा कठीण परिस्थितीत राज्यातील आरोग्य यंत्रणा या आजाराचे निदान व बाधितांवर यशस्वी उपचार करत आहे. ९० वर्षांच्या आजीबाईंपासून ते २२ दिवसांच्या चिमुकलीपर्यंत अनेकांनी या आजारावर मात केली आहे, हजारो नागरिक बरे होऊन घरी परतत आहेत, हे आपल्या आरोग्य यंत्रणेचे यश आहे. ”

तत्पर डॉक्टर, सज्ज यंत्रणा

अमित विलासराव देशमुख
वैद्यकीय शिक्षण मंत्री

कोविड -१९ च्या सुरुवातीच्या काळात सर्वात महत्त्वाचे आव्हान होते ते आजार निदान करण्यासाठी लागणाऱ्या प्रयोगशाळांचे. राज्याच्या वैद्यकीय आणि शिक्षण विभागाने रुग्णांचे निदान वेळेत आणि सर्वांना या सुविधेचा लाभ मिळावा याकरिता विक्रमी वेळेत संपूर्ण राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांत प्रयोगशाळेचे जाळे उभारले. त्यामुळे रुग्णाचे तत्काळ निदान होऊन उपचार प्रक्रियेला गती मिळाली.

प्रयोगशाळांचे जाळे

मार्च महिन्यातील दुसऱ्या आठवड्यात ज्या वेळी कोविड-१९ ने महाराष्ट्रात शिरकाव केला होता, त्या वेळी केवळ पुणेस्थित नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी (एनआयव्ही) या प्रयोगशाळेत या आजाराचे निदान होत होते. आजाराचे गांभीर्य लक्षात घेता भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या (आयसीएमआर) मान्यतेने पुरेशा प्रयोगशाळा उभारण्यात आल्या. पुण्यातील ससून रुग्णालय, मुंबईतील जे, जे. रुग्णालय आणि हाफकिन रुग्णालय तसेच औरंगाबाद, अकोला, धुळे, मिरज, लातूर आणि नागपूर या ६ ठिकाणी शासकीय वैद्यकीय रुग्णालयांत कोरोना तपासणी लॅब कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळांमार्फत हजारोच्या संख्येने रुग्णांच्या तपासण्या होत आहेत. सध्या खासगी आणि शासकीय मिळून ७० प्रयोगशाळा राज्याच्या विविध भागात कार्यरत आहेत. खासगी महाविद्यालयांनीही अशा प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे. भविष्यात नेमकी काय परिस्थिती निर्माण होईल हे माहीत नसल्याने अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी अधिकच्या प्रयोगशाळा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मुंबईसाठी विशेष तरतूद

मुंबई शहरातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता पहिल्या काही दिवसांतच जे.जे. समूह रुग्णालयातील सेंट जॉर्ज रुग्णालय आणि जी.टी. रुग्णालय येथे कोरोनाग्रस्तांसाठी उभारण्यात येणाऱ्या रुग्णालयांचे आपत्कालीन व्यवस्थापन करण्यासाठी सनदी अधिकारी विनिता सिंगल यांची नेमणूक करण्यात आली आहे. जे.जे. समूह रुग्णालयातील सेंट जॉर्ज रुग्णालयात ३०० खाटांची स्वतंत्र व्यवस्था आणि ६० खाटांचा आयसीयू विभाग असेल त्याचप्रमाणे जी.टी. रुग्णालयात २५० खाटांची स्वतंत्र व्यवस्था आणि ५० खाटांच्या आयसीयू विभागाची व्यवस्था करण्यात आली असून लवकरच जे.जे. रुग्णालयातही १ हजार खाटांची स्वतंत्र व्यवस्था करण्याचे काम सुरू आहे.

मोफत उपचार

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व नागरिकांना महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार करण्याकरिता या दोन्ही योजनांचे लाभार्थी नसलेल्या इतर रुग्णांनादेखील महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत असलेल्या अंगीकृत खासगी रुग्णालयांमध्ये कोरोनासाठी मोफत उपचार घेता येतील.

स्वच्छतेचा जागर

कोविड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेऊन सर्व वैद्यकीय रुग्णालय/ महाविद्यालयाचे

फिव्हर ओपीडी

रुग्णांना तत्काळ उपचार मिळावे म्हणून राज्य शासनाने ठिकठिकाणी फिव्हर ओपीडी सुरू केली आहे. या क्लिनिकच्या माध्यमातून कोरोना तपासणीची सुलभ व्यवस्था करण्यात आली आहे. ज्यांना सर्दी, खोकला, ताप अशी लक्षणे दिसत असतील त्यांनी तातडीने या ठिकाणी जाऊन कोरोना तपासणी करून घ्यावी. आजार लवकर लक्षात आल्यास लवकर उपचार करणे आणि लवकर बरे होणे शक्य असल्याने अधिकाधिक लोकांनी पुढे यावे.

अधिष्ठाता यांना माझी भूमिका मांडली. रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालयांच्या स्वच्छतेला प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या. रुग्णालयात आणि महाविद्यालयात स्वच्छतेबाबतची संस्कृती रुजवण्यासाठी अधिष्ठाता यांना विशेष प्रयत्न करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे कोरोना विषाणूचा प्रसार कशामुळे होतो, त्यापासून बचाव कसा करावा, त्याची नेमकी लक्षणे कोणती, याबाबत महानगरपालिका/नगरपालिका यांच्या मदतीने जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली. महाविद्यालयांच्या आवारात, वर्तमानपत्रात, आर्टवर्कच्या मदतीने, समाजमाध्यमांवरून याबाबत जनजागृती करण्याच्या सूचनाही अधिष्ठातांना देण्यात आल्या.

चाचण्या व उपचार नि:शुल्क

कोविड-१९ या आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारीतील शासकीय वैद्यकीय तसेच दंत महाविद्यालयांमध्ये व रुग्णालयांमध्ये यासंदर्भातील सर्व चाचण्या आणि उपचार नि:शुल्क करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोविड-१९ ग्रस्त रुग्णांना सुलभतेने उपचार घेता यावेत व यावर उपचार घेण्यासाठी अधिकाधिक रुग्णांनी पुढे यावे या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. मलासुद्धा या काळात खोकला आणि नंतर ताप आल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मी जे. जे. रुग्णालयात कोरोना टेस्ट करून घेतली. टेस्ट निगेटिव्ह आली. त्यामुळे आपला आजार लपवू नका, उपचारासाठी पुढे यावे.

प्लाझ्मा थेरपी

काही दिवसांपूर्वी भारतीय वैद्यक संशोधन परिषदने प्लाझ्मा थेरपी पद्धतीची क्लिनिकल ट्रायल करण्यास परवानगी दिली होती. यामध्ये देशातील बऱ्याच रुग्णालयांनी क्लिनिकल ट्रायलमध्ये सहभाग होण्यासाठी उत्सुकता दाखवली होती. यामध्ये केरळ, दिल्ली, पंजाब आणि महाराष्ट्र राज्याने सहभाग नोंदवला आहे. पुणे येथील ससून रुग्णालयात प्लाझ्मा थेरपीचा यशस्वीपणे वापर केला गेला.

परीक्षा पुढे ढकलल्या

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत उन्हाळी २०२० च्या पदवी व पदव्युत्तर परीक्षा घेण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या शिफारशीनुसार या परीक्षा पुढील सूचनेपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

सांगली पॅटर्न ठरला 'बेस्ट पॅटर्न'

मुंबई-पुण्यानंतर अचानकपणे सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे २४ कोरोनाबाधित रुग्ण आढळून आल्याने याची गांभीर्याने दखल घेऊन मिरज येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचे करोना रुग्णालयात रूपांतर करण्यात आले. इस्लामपूर येथे वाढलेल्या कोरोना रुग्णांची संख्या लक्षात येताच मुंबईतील जे.जे. समूह रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे यांच्या अध्यक्षतेखाली तातडीने त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली. डॉ. पल्लवी सापळे यांनी तातडीने मिरज येथे भेट देऊन मिरज येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाचे तातडीने ३०० खाटांच्या कोरोना रुग्णालयात रूपांतर केले. तीन ते चार दिवसांत तपासणी केंद्राची निर्मिती करण्यात आली. मिरज येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील सर्व रेसिडेंट डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ. वाहन चालक व अन्य कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले गेले. त्यामुळे राज्यात सांगली पॅटर्न काहीसा वेगळा ठरला.

बाधित परिसरात तज्ज्ञांची नेमणूक

राज्यातील अहमदनगर, मालेगाव आणि सोलापूर शहरात कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढत असल्याने या तिन्ही ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाची नेमणूक करण्याची विनंती सार्वजनिक आरोग्य विभागाकडून करण्यात आली होती. यानुसार या तिन्ही ठिकाणी वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत तज्ज्ञ पथकांची नेमणूक करण्यात आली. कोविड-१९ ला आळा घालण्यासाठी संबंधित यंत्रणांना यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

बायोमेट्रिक पद्धत बंद

कोरोनाच्या काळात कोणत्याही प्रकारचा प्रादुर्भाव वैद्यकीय महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना होऊ नये याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून बायोमेट्रिक पद्धत बंद करून हजेरीपटाद्वारे हजेरी घेतली जात आहे. येणाऱ्या काळात फेस रीडरद्वारे हजेरी घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील व हे सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येतील.

शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,
विभागीय संपर्क अधिकारी

“ कोरोना प्रादुर्भावामुळे राज्यात असलेल्या लॉकडाऊनच्या काळात शेतमालाचे आणि शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी शेती कामांना लॉकडाऊनमधून वगळण्यात आले आहे. या काळात खरीप हंगामाचे योग्य नियोजन व कृषी माल विक्रीचे योग्य नियोजन करण्यात आले आहे. ”

बांधावर बियाणे व खते

दादाजी भुसे
कृषिमंत्री

राज्याच्या कृषी क्षेत्रासाठी खरीप हंगामाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र यंदा या हंगामाचे नियोजनास सुरुवात करतानाच राज्यात कोरोनाच्या प्रादुर्भावास सुरुवात झाली. त्यामुळे राज्यात लॉकडाऊन सुरू झाले. सोशल डिस्टन्सिंग पाळणे आणि संसर्ग होऊ नये यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामासाठी बियाणे, खते, कीटकनाशके (कृषी निविष्ठा) त्यांच्या शेताच्या बांधापर्यंत पोहोचवण्यासाठी कृषी विभागाने नियोजन केले. त्यासाठी कृषी सेवा केंद्र आणि शेतकरी गटांच्या माध्यमातून कार्यवाही करताना कृषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी गावपातळीवर समन्वयक म्हणून काम पाहण्यास सांगितले. त्याचा तालुकास्तरावर कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात आला.

कृषी निविष्ठांचा पुरवठा

कृषी विभागाच्या समन्वयाने कृषी निविष्ठांचा पुरवठा कृषी सेवा केंद्र आणि शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांच्यामार्फत करण्याचा निर्णय घेतला. यामुळे खरेदीसाठी कृषी सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांची गर्दी होणार नाही आणि त्यामुळे विषाणूचा फैलाव रोखणे शक्य होईल असे नियोजन करण्यात आले.

खरीप हंगाम आढावा बैठक

राज्यातील खरीप हंगामाच्या तयारीच्या दृष्टीने सर्व जिल्ह्यांच्या आढावा बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात आल्या. सर्व पालकमंत्र्यांनी आपापल्या जिल्ह्याच्या खरीप नियोजन बैठका घेतल्या. राज्यात प्रथमच या वर्षी राज्यस्तरीय खरीप हंगाम आढावा बैठक कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात आली. त्यानंतर मी राज्यभर खरीप हंगाम आढावा बैठकीसाठी दौरे केले. किमान २५ जिल्ह्यांमध्ये मी या बैठका घेतल्या. क्षेत्रीय कृषी यंत्रणेला खरिपासाठी अधिक प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या. विविध कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे ऑनलाइन प्रशिक्षण वर्गदेखील या काळात घेण्यात आले.

शेतमालाची थेट विक्री करणाऱ्या वाहनांना हिरवी झेंडी दाखवताना कृषिमंत्री दादाजी भुसे व इतर मान्यवर.

कृषी अभ्यासक्रमाच्या परीक्षा

राज्यातील कृषी व संलग्न अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी चारही कृषी विद्यापीठातील परीक्षांच्या नियोजनाचा कृषी अनुसंधान परिषदेने तयार केलेला कृतिआराखडा जाहीर केला. यामुळे राज्यातील कृषी अभ्यासक्रम असणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. अंतिम सत्राच्या परीक्षा लॉकडाऊन उघडल्यावर साधारणपणे जून ते जुलै या महिन्यात घेण्यात येतील. कृषी पदविका अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा लॉकडाऊन उघडल्यानंतर शक्यतो जून महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात घेण्यात येईल. कृषी तंत्रनिकेतन अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा ८ ते १५ जूनच्या दरम्यान संबंधित क्षेत्रातील परिस्थितीनुसार घेण्यात येईल.

कोरोनामुळे राज्यातील सर्वाधिक जिल्हे बाधित आहेत. त्यातील बहुतांश जिल्हे रेड झोनमध्ये आहेत. अशा परिस्थितीमध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या आधारे कृषी विद्यापीठातील शैक्षणिक गुणवत्ता अबाधित राखण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

शेतमालाची थेट विक्री

कोरोनामुळे राज्यात सुरू असलेल्या टाळेबंदीमध्ये शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालाला बाजारपेठ देतानाच नागरिकांनाही भाजीपाला, धान्य, फळे माफक दरात मिळावी यासाठी कृषी विभागाने संपूर्ण नियोजन करून मोठ्या शहरांमधील सोसायट्यांमध्ये थेट शेतमाल विक्रीची

कोरोना काळात कृषी विभागामार्फत करण्यात आलेल्या उपाययोजना

● जिल्हा, राज्यस्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना ● शेतमाल विक्री व वाहतुकीसाठी तसेच कृषी निविष्ठांची विक्री व वाहतुकीसाठी परिवहन व गृह विभागाचे परवाने ● राज्यातील बहुतेक कृषी उत्पन्न बाजार समित्यांतून शेतमालाची विक्री व्यवस्था पूर्ववत ● कृषी माल निर्यातीसाठी आवश्यक फायटोसॅनिटरी प्रमाणपत्रे निर्गमित करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना ● लॉकडाऊननंतर (२७ मार्च, २०२०) पासून दररोज सरासरी २००० टन भाजीपाला व फळे यांची ३२०० पेक्षा जास्त ठिकाणावर उत्पादक ते ग्राहक विक्री ● सहकार विभागाच्या मदतीने शेतकरी उत्पादक गट, संस्था व सहकारी गृहनिर्माण संस्था यांचा शेतमाल विक्रीसाठी समन्वय ● कोकण विभागामार्फत हापूस आंब्याच्या विक्रीसाठी कृषी विभागाची यंत्रणा कार्यरत ● शेतकऱ्यांना उन्हाळी बारमाही पिकांसाठी तसेच खरीप हंगामपूर्व तयारीबाबत विद्यापीठे व कृषी संशोधन केंद्रे यांच्या मदतीने मार्गदर्शन व सल्ले निर्गमित ● खरीप हंगामासाठी आवश्यक सर्व प्रकारची खते विक्री केंद्रावर उपलब्ध ● खत वाहतूक व त्यासाठी रेल्वे रॅक पॉइंटवर लागणाऱ्या मजुरांच्या उपलब्धतेबाबत संबंधितांस निर्देश जारी ● शेतकऱ्यांना स्वत:कडील बियाणे वापर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना जारी व त्यानुसार बियाणांची उगवण शक्ती तपासणीची मोहीम सुरू ● महाबीज, राष्ट्रीय बीज निगम व बियाणे उत्पादन व विक्री करणाऱ्या खासगी कंपन्या यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधून आवश्यक सूचना देण्यात आल्या.

आणि ऑनलाइन विक्रीची व्यवस्था निर्माण केली. त्यामुळे राज्यात २९८६ शेतकरी उत्पादक गट, आत्मा गट यांच्या माध्यमातून शेतमालाची ऑनलाइन आणि थेट विक्री सुमारे दररोज २ हजार टन एवढी होत आहे. यासाठी ३४ जिल्ह्यांमध्ये ३२०० थेट विक्रीची ठिकाणे निश्चित करण्यात आली. कृषी विभागाच्या पुढाकारामुळे शेतकऱ्यांच्या नाशवंत मालाला बाजारपेठ तर मिळाली शिवाय टाळेबंदीत नागरिकांना घरपोहोच भाजीपालाही मिळाला. राज्यात टाळेबंदी लागू झाल्यानंतर नागरिकांना जीवनावश्यक वस्तू पुरवण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेत किराणा दुकाने, भाजीपाला, औषधे यांची दुकाने सुरू ठेवली. मात्र ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेला शेतमाल शहरी भागात पोहोचवण्याचे मोठे आव्हान होते. ते कृषी विभागाने सहज सोपे करून शेतमाल शहरी भागात पोहोचवण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. यामुळे बळीराजासोबतच ग्राहकही समाधानी झाले.

टोळधाडीच्या बंदोबस्तासाठीची ड्रोनद्वारे फवारणीचे प्रात्यक्षिक पाहताना कृषिमंत्री दादाजी भुसे.

ड्रोनद्वारे टोळधाडीचा बंदोबस्त

कोरोनाचे संकट असतानाच मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विदर्भातील अमरावती आणि नागपूर जिल्ह्यातील काही भागात कीटकांची टोळधाड आली. त्याच्या नियंत्रणासाठी यंत्रणा कामाला लागली. मी अकोला, नागपूर येथे भेटी दिल्या. या टोळधाडीचा बंदोबस्त करण्यासाठी ड्रोनच्या माध्यमातून कीटकनाशकांची फवारणीचा प्रयोग केला. शेतकरी केंद्रबिंदू मानून कोरोनाच्या संकट काळात शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले.

ऑनलाइन पद्धतीने नोंदणी

कृषी उत्पन्न बाजार समित्या, आठवडे बाजार आदी प्रचलित मुल्य साखळीच्या माध्यमातून शेतमालाचा होणारा पुरवठा वाहतुकदार, हमाल यांच्याअभावी विस्कळीत झाला होता. या पार्श्वभूमीवर कृषी विभागामार्फत जिल्ह्यांमध्ये स्थापन करण्यात आलेले शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, संस्था, आत्मा गट, स्वयंसाहाय्यता गट, व्यक्तीगट उत्पादक यांच्या माध्यमातून थेट ग्राहकांपर्यंत स्थानिक प्रशासनाच्या मदतीने निश्चित केलेल्या ठिकाणी शेतमालाची विक्री तसेच ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करून त्याची विक्री यासाठी कृषी विभागाने तयारी केली. या व्यवस्थेमध्ये एकवाक्यता ठेवण्यासाठी विभागीय कृषी सहसंचालक आणि जिल्हा कृषी अधीक्षकांना, कृषी अधिकारी यांना विभागाचे सचिव एकनाथ डवले आणि आयुक्त सुहास दिवसे यांनी २७ मार्चला सूचना दिल्या.

यासाठी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, तहसीलदार यांच्या समन्वयातून शेट विक्रीसाठी स्थळ निश्चिती केली. आणि संबंधित शेतकरी गट आणि उत्पादक कंपन्यांना त्याच्याशी जोडणी करून दिली. ऑनलाइन विक्रीसाठी शेतकरी गट आणि उत्पादक संस्थांच्या प्रतिनिधींचे संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी आदी माहिती नागरिकापर्यंत पोहोचवण्यात आली. मालाची वाहतूक करणे सुरळीत व्हावे यासाठी शहरातील वॉर्ड हे ठरावीक संस्थांना जोडून देण्याचे काम केले. कांदे, बटाटे, टोमॅटो, वांगे यांची एकत्रित आकारमान निश्चित केलेली पिशवी तयार करून त्याची विक्री करण्यात येत आहे. या सर्व व्यवस्थेच्या सनियंत्रणासाठी तालुका, जिल्हास्तरावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयांमध्ये स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला.

शब्दांकन : अजय जाधव,
विभागीय संपर्क अधिकारी

“ राज्यात सध्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन सुरू आहे, अशा परिस्थितीत समाजातील दुर्बल, वंचित, निराधार, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच ऊसतोड मजुरांसाठी सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने विविध उपाययोजना केल्या आहेत. निराधार नागरिकांसाठी १२५७ कोटी रुपये, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी ४६२.६९ कोटी, तसेच दिव्यांगांसाठी विशेष साहाय्य देण्यात आले आहे. ”

टाळेबंदीत दुर्बलांसोबत ठाम

धनंजय मुंडे,
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग मंत्री

संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तिवेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन, इंदिरा गांधी दिव्यांग निवृत्ती वेतन या पाच योजनांच्या राज्यातील ३५ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना एप्रिल, मे व जून महिन्याचे मानधन एकत्रित देण्यात यावे याबाबत केंद्र सरकारने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाने राज्याची आर्थिक परिस्थिती नाजूक असताना १२५७ कोटी ५० लक्ष निधी यासाठी मंजूर केला आहे. तसेच या योजनांचा केवळ ३० टक्के वाटा देणाऱ्या केंद्र सरकारने राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता घोषित केलेल्या विशेष आर्थिक पॅकेजमधून या योजनेचा ७० टक्के वाटा उचलावा, अशी मागणीही केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व वित्त विभागाकडे केली आहे.

दोन लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

राज्यातील जवळपास २ लाख अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रीशिपची शिष्यवृत्ती अदा करण्यात यावी यासाठी ४६२.६९ कोटी रुपये मंजूर करून २१ मे २०२० रोजी समाज कल्याण आयुक्तालयास वर्ग करण्यात आले. याद्वारे १ लाख ६९ हजार विद्यार्थ्यांची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती तर २७ हजार ८४५ विद्यार्थ्यांची फ्रीशिप शिष्यवृत्ती अशी एकूण जवळपास दोन लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

ऊसतोड मजुरांची देखभाल

टाळेबंदीच्या पहिल्या टप्प्यात राज्य शासनाच्या व संबंधित कारखाना प्रशासनातर्फे विविध साखर कारखान्यांवर अडकलेल्या ऊसतोड मजुरांची निवारा, भोजन, आरोग्यविषयक सुविधा करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. स्वतः च्या कार्यालयात यासाठी स्वतंत्र मदत कक्ष स्थापन करण्यात आला होता. टाळेबंदीच्या दुसऱ्या टप्प्यात १७ एप्रिल

संग्रहित छायाचित्र

२०२० रोजी राज्य शासनाने परवानगी दिल्याप्रमाणे राज्याच्या विविध भागांत अडकलेल्या एक लाख ४१ हजार ऊसतोड मजुरांचे राज्यातील सर्वात मोठे स्थलांतर; यामध्ये संबंधित साखर कारखाने त्या-त्या जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी पोलीस प्रशासन या सर्वांच्या सहकार्याने एकही कोरोनाबाधित रुग्ण आढळला नाही किंवा इतर कोणत्याही प्रकारची दुर्घटना या स्थलांतरादरम्यान घडली नाही!

वस्त्यांच्या कामांना वेग

लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या नागरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमधील कामांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत एकूण ३२८७ कामांना २६७३२.१८ लक्ष निधी मंजूर करण्यात आला असून १०६९२.८७ लक्ष निधी २६ मार्च २०२० वितरित करण्यात आला आहे.

दिव्यांगांवर प्राधान्याने उपचार

कोविड - १९ / कोरोना रुग्णावर उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल केलेल्या दिव्यांग व्यक्ती / रुग्णांवर प्राधान्याने उपचार करणे, सुरक्षेची सुविधा, दिव्यांगांसाठी स्वच्छता, परिचारिका, काळजीवाहक, सुगम्य सेवा पुरविणे इ. साठी मार्गदर्शिका प्रसिद्ध केली आहे. तसेच आरोग्य केंद्र, दवाखाने आदी ठिकाणी पुरेशी सुलभता असणे. संनियंत्रण कक्षामध्ये सॅनिटायझर, हातमोजे, साबण, स्वच्छता साधने आदी दिव्यांगांना सुगम्य असावीत. रेलिंग सह सुगम्य रॅम्पची सुविधा कमी उंचीचे काऊंटर सुलभ तसेच प्रवेशासाठी लिफ्टची सोय करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेवर भर

शासनाद्वारे थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेवर भर देण्यात येत आहे. या निर्णयाचा परिणाम सर्व प्रशासकीय विभागाच्या कल्याणकारी योजनांच्या कार्यपद्धतीवर होणार असल्याने नियोजन विभागाकडील शासन निर्णय ५ डिसेंबर २०१६ मधील परिशिष्ट 'अ'मधील दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणाऱ्या साहित्याचा उल्लेख आहे. यामध्ये कोविड-१९ च्या अनुषंगाने जीवनावश्यक वस्तूंचा समावेश करण्याबाबत नियोजन विभागाकडे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तसेच नगरविकास विभाग व ग्रामविकास विभागांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ५ टक्के आरक्षित निधीअंतर्गत घेण्यात येणाऱ्या योजना व निर्णयामध्ये एकसुत्रता राखण्याचे स्पष्टीकरणात्मक आदेश निर्गमित होणेबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. मानसिक दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या/ कार्यरत असलेल्या संस्थांमध्ये असलेल्या दिव्यांग व्यक्तींच्या उपचारासाठी मानसिक आरोग्य मार्गदर्शिका प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

मोफत भोजन व पाणी वाटप

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत पुणे येथील बार्टी अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे टाळेबंदीच्या काळात २९ मार्च २०२० पासून ते १७ मे २०२० पर्यंत एकूण सलग ५० दिवस पुण्यात अडकलेल्या बेघर, गरजू व गरिबांना मोफत भोजन व पाणी वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. भोजन वाटप टीमला कोरोना संसर्गापासून बचावासाठी सर्व साहित्य बार्टीमार्फत पुरेशा प्रमाणात पुरवण्यात आले. भौतिक अंतर राखून स्वच्छतेच्या सर्व सूचनांचे आणि साधनांचे

दिव्यांगासाठी विशेष मोहीम

सामाजिक न्याय विभागाने कर्णबधीर प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना कोविड-१९ ची योग्य माहिती पोहोचवण्याच्या दृष्टीने सांकेतिक भाषेमध्ये व्हिडिओ तयार करण्यात आले असून या व्हिडिओंना समाज माध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्यात आली आहे. राज्यभरातील दिव्यांग व्यक्तींना मदतीची मागणी नोंदवण्यासाठी https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSfdR8JgSsf0MC318mb4L7lJ_ZOOsJDIsBj9lg60ikBjI4Uq0Q/viewform लिंक तयार करून प्रसिद्ध करण्यात आली आहे. दिव्यांग व्यक्ती या लिंकवर आपल्या मोबाइलवरून ऑनलाइन मागणी नोंदवतात. त्याचे नियंत्रण दिव्यांग कल्याण आयुक्तालयामार्फत करण्यात येत आहे. दिव्यांग व्यक्तींनी ऑनलाइन मदतीची मागणी नोंदवल्यानंतर दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडून जिल्हा दिव्यांग कक्षाकडे वर्ग करण्यात येते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाशी समन्वय साधून दिव्यांग व्यक्तींना मागणीनुसार मदत पोहोचवण्यात येते. आजपर्यंत १४६७७ दिव्यांग व्यक्तींना मदत पोहोचवण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील मानसिक आरोग्य व दिव्यांग क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळीमार्फत कोरोना विषाणुसंबंधी ऑनलाइन हेल्पलाईनद्वारे मोफत व शास्त्रशुद्ध मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे.

ज्येष्ठ नागरिकांना मदत

कोविडविरुद्धच्या लढ्यात राज्यातील सर्व महानगरपालिका व जिल्हा समाज कल्याण कार्यालयांमध्ये दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी स्वतंत्र मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. याद्वारे कोरोना संसर्ग रोखण्यासह विविध उपाययोजनांची माहिती व टाळेबंदीदरम्यान दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक यांचे हाल होणार नाहीत, यासह जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मुंबई, पुणे, बुलडाणा यांसह काही जिल्ह्यांमध्ये कम्युनिटी किचनच्या माध्यमातून हजारो दिव्यांग व एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिक यांना मोफत जेवण पुरवले जात आहे. प्रत्येक जिल्ह्यात समाज कल्याण विभागाच्या कर्मचारी हेल्पलाईनमार्फत विविध ठिकाणी आढळणारे मनोरुग्ण, बेवारस अशा लोकांची निवारागृह / वसतिगृह / आश्रमशाळा अशा ठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे.

सामाजिक न्याय विभागाने आर्थिक वर्ष २०१९- २० समाप्तीच्या उद्देशाने विभागाला प्राप्त झालेले पात्र असलेले रमाई घरकुल योजनेचे प्रस्ताव निकाली काढले. ३१ मार्चअखेर एकट्या बीड जिल्ह्यात पात्र असलेल्या सात हजार १८८ घरकुलांना मंजुरी देण्यात आली.

या लॉकडाऊनच्या काळात विभागांतर्गत येणाऱ्या हातावर पोट असणाऱ्या छोट्या उद्योजकांचे, वेगवेगळ्या महामंडळांकडून कर्ज घेऊन व्यवसाय करणाऱ्यांचे खूप आर्थिक नुकसान होत आहे. येणाऱ्या काळात त्यांचे हे नुकसान कसे टाळता येईल किंवा त्यांना कशी मदत करता येईल, यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांना अभ्यास करून त्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य शासन सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांना कोविड विषाणूच्या बाधेची जास्त भीती असल्यामुळे त्यांना सर्व शासकीय कार्यालयांमधील उपस्थितीतून सूट मिळावी, यासाठी राज्य सरकारकडून २१ एप्रिल २०२० रोजी मान्यता मिळवली आहे.

काटेकोरपणे पालन करून बार्टीच्या या टीममार्फत दैनंदिन भोजन वाटप शहराच्या विविध भागातील गरजूंना करण्यात आले. यात बीड येथील पुण्यात अडकलेले ऊसतोड कामगार, स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी, विविध कामगार दिव्यांग, भिक्षेकरी, मनोरुग्ण वृद्ध, महिला, बालके तसेच अत्यावश्यक सेवा पुरवणारे विविध कर्मचारी उदा. वाहतूक पोलीस, सफाई कर्मचारी, पत्रकार इत्यादींचा समावेश होता. या पन्नास दिवसांच्या काळात बार्टीने दररोज ६०० ते ७०० फूड पॅकेटचे आणि सीलबंद पाणी बॉटलचे पुणे शहरातील विविध भागांतील गरजू नागरिकांना यशस्वीरीत्या वाटप केले आहे.

विद्यार्थ्यांसाठी विविध उपाय

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग मंत्री धनंजय मुंडे, प्रधान सचिव पराग जैन यांच्या विशेष प्रयत्नांमुळे दिल्ली येथील आयुक्त, जिल्हाधिकारी, केंद्रीय गृह मंत्रालय, महाराष्ट्र सदन व इतर यंत्रणांशी संपर्क साधून १६ मे २०२० रोजी दिल्ली येथून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या महाराष्ट्रातील १४०० विद्यार्थ्यांना परत आणण्याकरिता सोडलेल्या विशेष रेल्वे गाडीमध्ये बार्टीच्या ८६ विद्यार्थ्यांची वर्णी लावण्यात आली. उर्वरित विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्र दिल्ली निवडल्याने तेथेच राहणे पसंत केले. महाराष्ट्राच्या ज्या जिल्ह्यांमधील हे विद्यार्थी होते तेथील जिल्हाधिकाऱ्यांना लेखी पत्र देऊन व समतादूतांकरवी प्रत्यक्ष संपर्क करून स्टेशनवरून त्यांची एसटीद्वारे प्रवासाची सोय करण्यात आली. विद्यार्थी रेल्वे स्टेशनवर उतरल्यापासून त्यांच्या आरोग्य तपासणीच्या प्रक्रियेत सुलभता आणण्यापासून ते त्यांच्या गावामधील त्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुकर करण्यापर्यंत बार्टीने कार्यवाही केली. याव्यतिरिक्त दिल्ली येथे प्रशिक्षण घेत असलेल्या या विद्यार्थ्यांची प्रशिक्षण मुदत एप्रिल २०२० मध्येच संपली असतानाही दिल्लीत अडकलेल्या या विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची गैरसोय होऊ नये म्हणून बार्टीचे महासंचालक कैलास कणसे यांनी आपल्या विशेष अधिकारांचा वापर करून मे महिन्याचे प्रति विद्यार्थी १२ हजार रुपये अतिरिक्त विद्यावेतन अदा करून सहकार्य केले.

अलगीकरणास बार्टीची मदत

बार्टीने लॉकडाऊन काळात नागपूर, पुणे यांसह विविध ठिकाणी असलेले विद्यार्थी यांची भोजन, आरोग्य, गावी परतणे आदी सर्व व्यवस्था आवश्यकतेनुसार प्रमाणात उपलब्ध करून दिली. रिकामी झालेली वसतिगृहे राज्य शासनास अलगीकरण कक्ष स्थापन करण्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत.

प्रत्येक जिल्ह्याच्या दिव्यांग कल्याण निधीतून हालचाल न करू शकणारे दिव्यांग ज्येष्ठ नागरिक आदींसाठी एक महिन्याचे रेशन, आवश्यक किराणा तसेच आरोग्यविषयक जीवनावश्यक वस्तू आदींचे किट वाटप करण्याचा निर्णय राज्य दिव्यांग कल्याण मंडळाच्या आयुक्त यांच्यामार्फत २७ मार्च २०२० रोजी घेतला तसेच इतर दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक यांना रेशन खरेदी बँक व्यवहार विना रांग उपलब्ध करून द्यावेत असे निर्देश सर्व जिल्हा प्रशासनाला देण्यात आले.

शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,
विभागीय संपर्क अधिकारी

“केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी दिल्ली येथे गेलेले राज्यातील हजारो विद्यार्थी लॉकडाऊनमध्ये अडकले होते, राजस्थानमधील कोटा येथे विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी राज्यातून गेलेले सुमारे ८०० विद्यार्थी लॉकडाऊनपासून अडकून होते. तसेच तामिळनाडू राज्यात येरवड येथे रेल्वे विभागात प्रशिक्षण घेत असलेले मनमाड येथील १२ विद्यार्थी लॉकडाऊनमुळे अडकले होते. या सर्वांना राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला यश आले.”

परराज्यातून भुसावळ रेल्वेस्थानकावर दाखल झालेले विद्यार्थी.

विद्यार्थी परतले

विद्यार्थी स्वगृही

दिल्लीहून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना घेऊन निघालेली विशेष रेल्वे १७ मे रोजी दुपारी भुसावळ रेल्वे स्थानकावर आली. या रेल्वेने राज्यातील १ हजार ३४५ विद्यार्थ्यांचे आगमन झाले. यापैकी १९ जिल्ह्यांतील ३६९ विद्यार्थी भुसावळ रेल्वे स्थानकावर उतरले. या वेळी या विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला. दोन महिन्यांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर राज्यात आल्याचा आनंद व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी ‘जय महाराष्ट्र’च्या घोषणा दिल्या.

कोरोना विषाणू संसर्गामुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊनमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षेच्या अभ्यासासाठी दिल्ली येथे गेलेले महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थी दिल्ली येथे अडकले होते. या विद्यार्थ्यांना राज्यात आणण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार राज्यातील विद्यार्थ्यांसाठी दिल्लीहून विशेष रेल्वेने पाठवण्याचे निश्चित झाले होते. त्यानुसार राज्यातील १ हजार ३४५ विद्यार्थ्यांना घेऊन आलेल्या रेल्वेचे भुसावळ रेल्वे स्थानकावर आगमन झाले.

दिल्लीहून या रेल्वेने राज्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये अकोला-२४, अमरावती-२०, वर्धा-१४, गडचिरोली-८, चंद्रपूर-१७, यवतमाळ-१७, धुळे-१४, नंदुरबार-९, जळगाव-२९, औरंगाबाद-३१, जालना-१३, परभणी-२५, नागपूर-३३, भंडारा-११, गोंदिया-८, बुलडाणा-३०, वाशिम-१९, हिंगोली-१५, नांदेड-३२ याप्रमाणे विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांचे भुसावळ रेल्वे स्थानकावर आगमन झाल्यानंतर त्यांची तपासणी करण्यात आली. तसेच त्यांच्या हातावर होम क्वारंटाईनचा शिक्का मारण्यात आला. त्यानंतर या विद्यार्थ्यांना जेवणाचे पॅकेट, केळी, पिण्याचे पाणी व इतर आवश्यक बाबी उपलब्ध करून देण्यात आल्यात. नंतर एसटी महामंडळाच्या जळगाव आगारातील १६ बसेसमधून या विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्याकडे रवाना करण्यात आले. तर उर्वरित विद्यार्थ्यांना घेऊन या विशेष रेल्वेने नाशिककडे प्रस्थान केले. या रेल्वेला नाशिक, कल्याण व पुणे येथे थांबा देण्यात आले असून त्या-त्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उतरवण्यात आले.

कोटा

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठीच्या लॉकडाऊनमुळे महाराष्ट्रातील सुमारे १८०० विद्यार्थी राजस्थानातील कोटा येथे अडकून पडले होते. या विद्यार्थ्यांना घेऊन येण्यासाठी पाठवण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस कोटा येथून रवाना झाल्या. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री अनिल परब यांचे आभार मानले.

राजस्थानमधील कोटा येथे विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी राज्यातून गेलेले हे विद्यार्थी लॉकडाऊनपासून तेथे अडकून होते. त्यांना परत आणण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्याशी चर्चा केली होती. पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे हे राजस्थान शासनाच्या संपर्कात होते. या विद्यार्थ्यांना राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून आणण्यासाठी परिवहन मंत्री अनिल परब आणि उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत प्रयत्नशील होते. या विद्यार्थ्यांचा प्रवास मध्य प्रदेश तसेच गुजरात राज्यांतून होणार असल्याने मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार हे संबंधित राज्याच्या यंत्रणांशी संपर्कात होते.

याशिवाय एसटी बसेसमधून विद्यार्थ्यांना आणताना कोविड-१९च्या आरोग्य सुरक्षेचे, सोशल डिस्टन्सिंगचे पूर्णपणे पालन करण्यात येत आहे. राज्यात परतल्यानंतर त्यांची आरोग्य तपासणीही करून विलगीकरणही करण्यात आले.

परिवहन महामंडळाच्या धुळे आगाराच्या सुमारे ७६ बसेस कोटा येथे पोहोचल्यानंतर तेथून विद्यार्थ्यांना घेऊन रवाना झाल्या. त्यानंतर एक दोन दिवसांनी संबंधित बसेस त्या-त्या जिल्ह्यांत पोहोचल्या. या दरम्यान महामंडळाने बसेसचे सॅनिटायझेशन, चालकांची पुरेशी संख्या, त्यांची विश्रांती अशा गोष्टींचेही पुरेसे नियोजन केले आहे.

बस रवाना होताना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मोबाइल व्हिडिओही चित्रित केले. त्यामध्ये त्यांनी आपल्या घरी परतण्यासाठी मुख्यमंत्री श्री. ठाकरे, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या पुढाकारासह पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, परिवहन मंत्री श्री. परब, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. सामंत, मदत व पुनर्वसन मंत्री श्री. वडेट्टीवार यांनी समन्वयाने केलेल्या प्रयत्नांचा आवर्जून उल्लेख केला. कोविड-१९च्या आरोग्य सुरक्षा मानकांचे पालन करून सुखरूपपणे घरी परतण्याचा प्रवास सुरू होतानाच त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान तरळू लागले होते. त्यांना घरी घेऊन जाण्यासाठी आलेल्या एसटी बसेसचे चालक आदींनाही त्यांनी अभिवादन केले.

मनमाडचे विद्यार्थी

तामिळनाडू राज्यात येरवड येथे रेल्वे विभागात प्रशिक्षण घेत असलेले मनमाड येथील १२ विद्यार्थी लॉकडाऊनमुळे याठिकाणी अडकले होते. हे विद्यार्थी सेलम, मिरज येथून जळगावपर्यंत पोहोचल्यानंतर मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नातून खासगी बसच्या माध्यमातून मनमाड येथे सुखरूप पोहोचले आहे.

तामिळनाडू राज्यात येरवड येथे रेल्वे विभागात प्रशिक्षण घेत असलेले मनमाड येथील विद्यार्थ्यांनी लॉकडाऊनमुळे त्याच ठिकाणी अडकल्याने राज्याचे अन्न, नागरी पुरवठा मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांच्याशी संपर्क करत घरी परतण्यासाठी मदत मागितली. हे सर्व विद्यार्थी तामिळनाडू येथून सेलम, त्यानंतर मिरज सांगली येथून जळगाव येथे पोहोचल्यावर त्यांना मनमाड येथे परतण्यासाठी खासगी बसची व्यवस्था केली. तेथून हे सर्व विद्यार्थी सुखरूप घरी पोहोचले आहे.

'लॉकडाऊन सुरू असल्याने आम्ही तामिळनाडू राज्यात येरवड येथे रेल्वे विभागात प्रशिक्षण घेणारे १२ विद्यार्थी अडकलो होतो. त्यानंतर आम्ही नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांच्याकडे परतण्यासाठी मदत मागितली. त्यांनी मनमाड येथे सुखरूप पोहोचण्याची व्यवस्था केली. प्रवासात ते सातत्याने आमच्याशी संपर्कात होते. ज्या-ज्या ठिकाणी आम्हाला अडचणी आल्या त्या त्यांनी तत्काळ सोडवल्या. आम्ही सर्व विद्यार्थी पालकमंत्री छगन भुजबळ यांचे आभारी आहोत.'

– **हर्षल गायकवाड,** विद्यार्थी

परराज्यातून बसने स्वगृही परतलेले विद्यार्थी.

“ कोरोनाची लागण झाल्यानंतर रुग्णांनी आरोग्य यंत्रणेला सहकार्य करून यशस्वीरीत्या कोरोनावर मात केल्याचे प्रमाण वाढत आहे. या संकटावर न डगमगता ज्या व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह होत्या त्या व्यक्तींनी आरोग्य यंत्रणेबरोबर एक योद्धा म्हणून सहभाग घेऊन कोरोनावर मात केल्याची काही उदाहरणे.. ”

कोरोनामुक्त

९४ वर्षांच्या आजींची कोरोनावर यशस्वी मात

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील कामेरी येथील ९४ वर्षांच्या आजींनी कोरोनावर यशस्वी मात केली आहे. मिरज कोरोना रुग्णालयातून कोरोनामुक्त ९४ वर्षीय आजीला डिस्चार्ज देण्यात आला आहे. या वेळी वैद्यकीय अधिकारी आणि परिचारिका यांच्याकडून टाळ्या वाजवत शुभेच्छा देण्यात आल्या.

कामेरी येथील कोरोना पॉझिटिव्ह रुग्णाच्या संपर्कात आलेल्या आजींना कोरोनाची लागण झाली होती. त्यांना मिरजेतील आयसोलेशन कक्षात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून योग्य प्रकारे उपचार करण्यात आले. त्यांची काळजी घेण्यात आली. या सर्वांच्या प्रयत्नामुळे त्या कोरोनामुक्त झाल्या. आयसोलेशन कक्षात दाखल केल्यापासून १४ दिवसानंतर आजींची स्वॅब टेस्ट घेण्यात आली. दोन टेस्टमध्ये त्यांचा रिपोर्ट निगेटिव्ह आला. त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

यापूर्वी दोन वर्षांच्या कोरोना पॉझिटिव्ह बाळावरही यशस्वी उपचार करून त्यालाही कोरोनामुक्त करण्यात आले आहे. सर्वच रुग्णांना या हॉस्पिटलचे डॉक्टर्स व सर्व स्टाफ अत्यंत चांगल्या प्रकारे व गुणवत्तापूर्ण सेवा देतात. रुग्ण हा केंद्रबिंदू समजून सेवा दिली जाते. जिल्हा प्रशासन व कोविड हॉस्पिटल यांच्यात अत्यंत चांगला समन्वय आहे.

मानवरुपी परमेश्वरामुळेच बरा झालो

कृषी क्षेत्राशी संबंधित व्यावसायिक असल्यामुळे शहरापासून गावखेड्यापर्यंतच्या नागरिकांशी नियमित संपर्क येतो. व्यवसायाच्या निमित्ताने वेगवेगळ्या ठिकाणी फिरणे आलेच. त्यामुळे ॲलर्जी व खोकल्याचा त्रास सुरुवातीपासूनच होता. पण त्यात कोरोनाची लागण झाल्याचे कळताच मनात थोडी धास्ती वाटली. मात्र यातून आपण लवकरच बरे होऊ, असा ठाम विश्वास होता. त्याला कारणही तसेच होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉक्टरांनी प्रत्येक क्षणी आमच्यासाठी घेतलेली मेहनत अनुभवायला मिळाली. या मानवरुपी परमेश्वरामुळेच आम्ही बरे झालो, अशी कृतज्ञता व्यक्त केली कोरोनाची लागण झालेल्या व आता पूर्णपणे ठणठणीत असलेल्या व्यावसायिकाने. कोरोनावर उपचार शक्य आहे. त्यामुळे नागरिकांनो घाबरू नका, मात्र प्रशासनाच्या आदेशाचे पालन करा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

यवतमाळ जिल्ह्यात सुरुवातीला तीन जण कोरोना पॉझिटिव्ह निघाले. त्यात मी आणि माझी पत्नी होतो. आम्हाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आयसोलेशन वॉर्डमध्ये दाखल करण्यात आले. तिघांसाठीही वेगवेगळी खोली, वेगवेगळे संडास-बाथरूम, सर्वत्र स्वच्छता. अशी नियोजनबद्ध कार्यपद्धती तर मोठमोठ्या खासगी दवाखान्यातसुद्धा अनुभवायला मिळत नाही. जे आम्ही वैद्यकीय महाविद्यालयात अनुभवले. आम्ही तर पॉझिटिव्ह रुग्ण होतो. पण येथील वैद्यकीय अधिकारी आणि वैद्यकीय सेवेशी निगडीत सर्व कर्मचाऱ्यांनी अतिशय काळजीपूर्वक व आपुलकीने आमच्यावर उपचार केले. इतरत्र ऐकून होतो की, अशा पेशंटजवळ कोणी येत नाही. पण तत्कालीन अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे किट परिधान करून आमच्या खोलीमध्ये

येऊन आस्थेने विचारपूस करीत होते. एवढेच नाही तर आम्हाला घरचे जेवण घेण्याची मुभा होती. घरून टिफिन आला की नाही, वेळेवर जेवले की नाही, अशा किती तरी बाबींची डॉक्टरांकडून विचारणा होत होती. त्यांनी केलेल्या उपचारांमुळेच आमचा पॉझिटिव्हकडून निगेटिव्हकडे प्रवास सुकर झाला.

बठ्ठा, डॉक्टर मना मायबाप शेतस्!

बठ्ठा, डॉक्टर मना मायबाप शेतस्! अशा शब्दांत कोरोनामुक्त झालेल्या रुग्ण महिलेने आपल्या भावना व्यक्त केल्या. जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील मुंगसे येथील ६० वर्षीय महिलेचे १४ दिवसांच्या उपचाराअंती शेवटचे दोन्ही अहवाल निगेटिव्ह आल्यानंतर त्यांना घरी पाठवण्यात आले. ही महिला कोरोनाबाधित आढळून आली होती. या महिला रुग्णाचा दुसरा व तिसरा तपासणी अहवाल निगेटिव्ह आला. त्यामुळे त्यांना टाळ्यांच्या गजरात घरी पाठवण्यात आले. रुग्णालयातून जाताना ही महिला भावनाविवश झालेली दिसून येत होती. शिवाय तिच्या चेहऱ्यावर आनंदही दिसत होता.

जळगाव जिल्ह्यात कोरोनाबाधित रुग्ण वाढत असताना जिल्ह्यातील विशेषत: ग्रामीण भागातील पहिला रुग्ण तिही महिला कोरोनामुक्त होऊन घरी गेली. कोरोनामुक्त झालेल्या या महिलेस उत्साहात व टाळ्यांच्या गजरात निरोप देण्यात आला. या वेळी या महिलेस विचारले असता बठ्ठा, डॉक्टर मना मायबाप, भाऊ शेतस्! सगळ्यांचे चांगले होईल, असा माझा आशीर्वाद असल्याचे उद्‌गार काढले आणि रुग्णालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतलेले परिश्रम सार्थकी लागले. त्यानंतर त्यांना रुग्णवाहिकेतून त्यांच्या घरी पाठवण्यात आले.

डॉक्टरच खरे रक्षणकर्ते

ये डॉक्टर लोगोंकी बडी मेहेरबानी है, जान का खतरा होने के बावजूद ये लोग मौत के कुएँ मे हमारे लिए उतरते है अशा शब्दात कोविड-१९ संसर्गमुक्त झालेल्या रुग्णाने आपल्या भावना व्यक्त केल्या. नंदुरबारच्या एकाच कुटुंबातील चार व्यक्तींना उपचाराअंती त्यांचे शेवटचे दोन अहवाल निगेटिव्ह आल्यानंतर त्यांना घरी पाठवण्यात आले. त्यात ७१ वर्षांच्या वृद्ध महिलेनेदेखील कोविड-१९ वर यशस्वीपणे मात केली आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील पहिल्या रुग्णाचा दुसरा अहवाल पॉझिटिव्ह आला होता.

तीन वर्षांच्या बालकाची कोरोनाविरुद्ध चिवट झुंज

अकोला येथील एका तीन वर्षाच्या बालकाने तब्बल एक महिना कोरोनाशी चिवट झुंज देऊन विजयी मुद्रेने रुग्णालयाबाहेर पाऊल ठेवले. या वेळी सर्व वैद्यकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी त्याला टाळ्या वाजवत निरोप दिला. कोरोना म्हणजे काय? हेही कदाचित त्या बालकाला माहिती नसावे. त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या संपर्कातून त्यालाही कोरोनाची लागण झाली. साहजिकच लहान असल्याने त्याची झुंज मोठ्या विषाणूशी होती. तब्बल एक महिन्याने त्याला या झुंजीत विजय मिळाला. या दरम्यान त्याची तब्येत पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह अहवालांच्या दोन टोकांमध्ये हेलकावे खात होती. या दरम्यान या बालकाच्या एक नव्हे दोन नव्हे, तब्बल आठ चाचण्या झाल्या. त्यातल्या पहिल्या चार तर पॉझिटिव्ह आल्या. पाचवी चाचणी निगेटिव्ह आली. पुन्हा आशा उंचावली. मात्र पाच दिवसांनी घेतलेली सहावी चाचणी पुन्हा पॉझिटिव्ह आली. २४ तासांनंतर सातवी चाचणी पुन्हा निगेटिव्ह आली. त्यानंतर पुन्हा पाच दिवसांनी झालेली चाचणी निगेटिव्ह आली. त्यानंतरही त्याच्या एक्स-रेसहित विविध चाचण्या घेऊन चार दिवस त्याला पुन्हा डॉक्टरांनी निरीक्षणाखाली ठेवले. सर्व तपासण्या आणि चाचण्यांचे अहवाल समाधानकारक आल्यानंतरच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कोविड उपचार पथकाने या बालकाला पूर्ण बरे झाल्यानंतरच निरोप दिला. आता हा बालक १४ दिवस घरातच क्वारंटाईन करून राहील. त्याने ज्या चिवटपणे कोरोनाविरुद्ध झुंज दिली. त्याची जिद्द वाखाणण्यासारखीच आहे. डॉक्टरांनीही जिद्दीने उपचारांची शर्थ केली आणि त्याला कोरोनाच्या जबड्यातून बाहेर काढले. इथंच कोरोना हरला!

मात्र त्याचा तिसरा आणि चौथा अहवाल निगेटिव्ह आला. त्याच्या कुटुंबातील इतर तिघांचा दुसरा व तिसरा अहवाल निगेटिव्ह आला. त्यामुळे चौघांना टाळ्यांच्या गजरात आणि फुलांची उधळण करीत घरी पाठवण्यात आले. जाताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

फुलांची उधळण होत असताना वृद्ध आजींचे 'हा बेटा हां, सबके लिए दुवा है मेरी, सबका अच्छा होगा..' हे समाधानाचे शब्द रुग्णालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतलेले परिश्रम सार्थकी लावणारे होते.

कोरोनामुक्तीचा अध्याय

फक्त दहा महिन्यांचे बाळ कोरोनामुक्त झाले त्याला माहीतही नसेल तो केवढे मोठे संकट लिलया पेलून सुखरूप बाहेर पडला आहे. आईवडिलांनी हिंमत धरून मागील दोन आठवडे ज्या धीरोदत्तपणे काढले. त्यांच्या आनंदाला आज पारावार राहिला नसेल. १० महिन्यांचे बाळ पॉझिटिव्ह आल्याची बातमी आली. त्यावेळी सर्वांच्या मनात धस्स झाले. बाळ बरे व्हावे असे बरेच जण बोलून दाखवत होते.

कृष्णा हॉस्पिटलचे डॉक्टर्स, नर्स, सर्व आरोग्य कर्मचारी रुग्ण बरे व्हावेत म्हणून अपार कष्ट करत आहेत. हे बाळ कोरोनामुक्त झाल्याचे ऐकून लाखोंच्या सदिच्छा त्यांच्या व्यावसायिक कर्तव्य मूल्यात अजून भर घालतील. बाळाचे १४ आणि १५ व्या दिवसाचे रिपोर्ट निगेटिव्ह आले आणि तो कोरोनामुक्त झाला. दहा महिन्यांच्या बाळाने कोरोनावर विजय मिळवला होता, त्याच वेळी एक आजी वय वर्षे ७५ याही कोरोनाची जंग जिंकून बाहेर आल्या. एक दहा महिन्यांचे बाळ आणि ७५ वर्षांच्या आजी दोघांनीही या राज्याला मोठा धीर दिला. आत्मविश्वासाने, संयमाने, दक्षता घेऊन कोरोनाविरुद्धची लढाई आपण जिंकू शकतो. कोरोना विषाणू संसर्ग हा आपल्या संयमाची परीक्षा घेतो आहे. आपण घरात बसण्याचा संयम पाळू या. कोरोना दूर होईल. आजचे हे आश्वासक चित्र सातारकरांना आत्मबळ देणार आहे.

कराड (जि.सातारा) येथील कृष्णा हॉस्पिटलमधून तीन रुग्ण कोरोनामुक्त झाले. एक १० महिन्यांचे बाळ, ७५ वर्षांच्या आजी आणि २८ वर्षांचा तरुण !! तीन वेगवेगळ्या वयोगटांनी कोरोनाला हरवले.

अखेर बालयोद्ध्याने कोरोना चक्रव्यूह भेदले!

रायगडमधील उरण तालुक्यातील जासई येथे आई आणि वडील यांच्याबरोबर राहणाऱ्या अवघ्या १८ महिन्यांच्या बाळाला ताप आल्याचे निमित्त झाले. आईवडिलांनी जासईतल्या संजीवनी हॉस्पिटलमधील डॉक्टरांकडे नेले. त्यांनी बाळाला तपासणी करून त्यांना उरणच्या ग्रामीण रुग्णालयाला पाठवले. येथील शासकीय यंत्रणा तातडीने कामाला लागली, बाळाला तपासल्यानंतर त्याच्या जीवाला कोणत्याही प्रकारचा धोका नको म्हणून त्याच दिवशी कामोठे येथील एमजीएम इस्पितळात दाखल केले. सातव्या दिवशी बाळ कोविड-१९ च्या चाचणीत पॉझिटिव्ह आले. आरोग्य यंत्रणेने या बाळावर सात दिवस आवश्यक ते उपचार केले आणि रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. वैद्यकीय यंत्रणेच्या प्रयत्नांना यश मिळाले अन् हा बालयोद्धा कोरोना नामक महाभयंकर चक्रव्यूह भेदून यशस्वीपणे परत आला. त्याचे, त्याच्या आई-वडिलांचे सर्वांनी टाळ्या वाजवून अभिनंदन केले.

कोरोनामुक्त बालकाला डिस्चार्ज

सहा महिन्यांचा चिमुकला आपल्या आईच्या कडेवर बसून लिफ्टमधून बाहेर येताच रुग्णालयातील डॉक्टर, नर्सेस, वैद्यकीय साहाय्यक स्टाफ आणि इतरांनी टाळ्यांचा गजर करीत या बालकाच्या कोरोनामुक्तीचे स्वागत केले. १५ दिवसांच्या उपचार व तपासणीनंतर साखरतर येथील या बालकाचा कोरोनावरील विजय हा संपूर्ण आरोग्य यंत्रणेचा विजय ठरला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील साखरतर हे शहरानजीकचे गाव. या गावात कोणताही प्रवास इतिहास नसताना एका महिलेस कोरोना झाल्याचे निदर्शनास आले. त्यापाठोपाठ त्याच घरातील अन्य एका महिलेसह सहा महिन्यांच्या चिमुकल्यासदेखील कोरोना बाधा झाली

नॉकडाऊन होण्यापेक्षा लॉकडाऊन व्हा

आयुष्य हे एकदाच मिळते. माझ्यामुळे माझ्या बहिणीला कोरोना झाला. ही खंत नेहमी राहील. प्रशासन खूप चांगल्या उपाययोजना करत आहे. प्रशासन आणि डॉक्टर आमच्यासाठी देवदूत ठरले. म्हणून आम्ही दोघेही बहीण-भाऊ कोरोनामुक्त झालो. आयुष्यातून नॉकडाऊन होण्यापेक्षा लॉकडाऊन व्हा. प्रशासनाला सहकार्य करा.. किमान आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या, असा संदेश कोरोनामुक्त झालेल्या जिल्ह्यातील पहिल्या रुग्णाने स्वानुभवातून दिला.

पुण्याहून आपल्या बहिणीला भेटण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील भक्तिपूजानगर येथे आलेल्या भावाला कोरोनाची लागण झाल्याचे निष्पन्न झाले. दोन दिवसांनंतर त्याच्या बहिणीलाही कोरोनाचा संसर्ग झाल्याचे आढळले. या दोघांनाही सरनोबतवाडी येथील अथायू रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. २३ दिवसांनंतर टाळ्यांच्या गजरात, फुलांच्या वर्षावात या दोघांनाही घरी पाठवण्यात आले. अजूनही माझ्यामुळे माझ्या बहिणीला संसर्ग झाला ही खंत भावाला लागून राहिली आहे. त्यामुळे घरी अलगीकरण होण्यापेक्षा त्याने आणखी काही दिवस अथायू रुग्णालयातच स्वत:हून थांबण्याचा निर्णय घेतला.

कोविड -१९ या विलगीकरण कक्षातून ते रुग्णवाहिकेत बसेपर्यंत दोन्ही बाजूला रांगोळ्या काढल्या होत्या. भिंतीवर फुगे लावण्यात आले होते. मुख्य प्रवेशद्वारावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. तत्पूर्वी श्रीगणेशाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. तुळशीचे रोप देऊन स्वागत करायला साक्षात महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आणि पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख हे उभे होते.

भक्तिपूजानगर येथे आल्यानंतर घरच्यांनी तर स्वागत केलेच, पण शेजाऱ्यांनीही स्वागत केले. हे पाहून आम्ही खूप भारावून गेलो. सर्वांशी भेटून, बोलून रात्री मीच पुन्हा काही दिवस रुग्णालयात राहण्याचाच निर्णय घेतला. प्रशासन, डॉक्टर्स जीव धोक्यात घालून आपल्यासाठीच उत्तम काम करत आहेत. या सर्वांचे आपण ऐकायला हवे. आयुष्यातून नॉकडाऊन होण्यापेक्षा काही दिवस लॉकडाऊन व्हायला काय हरकत आहे, असा स्वानुभवातून त्याने जिल्हावासीयांना संदेश दिला आहे.

होती. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात या रुग्णांवर उपचार करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे कोरोना रुग्णांवर योग्य उपचार होऊन ते बरे झाले आहेत.

जीवनदान मिळाले

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आम्ही भयभीत झालो होतो. जेव्हा आमची चाचणी करण्यात आली, तेव्हा अख्खे कुटुंब पॉझिटिव्ह असल्याचे अहवाल प्राप्त झाले. आमचे कसे होणार, आयुष्याचे काही खरे नाही, अशी चिंता लागली होती. परंतु डॉक्टरांच्या अथक प्रयत्नामुळे आम्ही बरे झालो, अशी भावना पुणे स्टेशन परिसरातील एका कुटुंबाने व्यक्त केली.

या कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य कृतज्ञतापूर्व भावना व्यक्त करताना म्हणतात, सुरुवातीला आमच्या वडिलांना न्युमोनिया झाला. नंतर आम्ही त्यांना उपचारासाठी खासगी दवाखान्यात नेले, पण कोणी दाखल करून घेतले नाही. अखेर पुणे महानगरपालिकेच्या नायडू इस्पितळात नेले. मात्र त्यांनी ससून रुग्णालयात पाठवले, त्यांना कोरोनाची लागण झाल्याने स्वतंत्र वॉर्डात ठेवण्यात आले. व्हेंटिलेटरवर ठेवून उपचार करण्यात आले. परंतु न्युमोनिया असल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

पुन्हा आमच्या कुटुंबातील सर्व सदस्यांच्या चाचण्या करण्यात आल्या. आमचे कुटुंब व नातेवाईक मिळून जवळपास २० जणांना कोरोनाची बाधा झाली. सर्व जण घाबरलो, २० पैकी ८ जण आम्ही एकाच कुटुंबांतील होतो. आम्हाला लवळे येथील सिम्बॉयोसिस रुग्णालयात उपचारार्थ आयसोलेशनसाठी ठेवण्यात आले होते. खरे तर फार चिंतेत होतो, संपूर्ण कुटुंब कोरोनाबाधित झाले. पण सुदैवाने आम्ही बरे झालो. या १५ दिवसांत तणाव होता, परंतु डॉक्टर्स, नर्स आणि रुग्णालयातील सर्व सदस्य एवढ्या आपुलकीने वागत होते की, जणू काही आम्ही त्यांच्याच कुटुंबातील सदस्य आहोत. खूप आपुलकीची भावना निर्माण झाली. या निमित्ताने नागरिकांना आम्ही असे आवाहन करतो की, घाबरू नका, पण काळजी घ्या. शासन आपल्यासाठी खूप काही करत आहे. सर्दी, ताप, खोकला झाल्यास बिनधास्त दवाखान्यात जा, उपचार करून घ्या. कोरोनाची लागण झाली तरी हिमतीने सामोरे जा. आपल्यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा दिवसरात्र राबते आहे. आपल्याला फक्त हिंमत द्यायची असते.

“कोविड-१९ अर्थात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आणि त्याचा सामुदायिक संपर्क थांबवण्यासाठी राज्यातील विविध विभागांनी विशेष प्रयत्न केले. टाळेबंदीच्या काळात रुग्णसंख्या वाढू नये याची काळजी घेतानाच स्थलांतरित मजूर, विद्यार्थी यांची विशेष काळजी घेण्यात आली. सर्वसामान्य नागरिकांना अत्यावश्यक सेवा सुरू ठेवतानाच जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवण्यात यश आले आहे. साथीचा प्रसार रोखण्यासाठी संस्थात्मक विलगीकरणाच्या सोयी पुरवण्यासह स्थलांतरित मजुरांना भोजनाची सुविधा योग्य पुरवल्यामुळे राज्याच्या ग्रामीण भागातील जनजीवन सुरळीत ठेवतानाच तेथे साथीचा प्रसार रोखण्यात यश आले आहे.”

दक्षता आणि संवेदनशीलता

नागपूर विभाग

प्रभावी अंमलबजावणी

राज्यात कमी रुग्णसंख्या, रुग्णवाढीचा अल्प दर, बाधितांमधील सर्वात कमी मृत्यू, रुग्ण बरे होण्याचे सर्वाधिक प्रमाण, ॲक्टिव्ह केसेसची कमी संख्या आणि वर्तमानासह भविष्यासाठी सुसज्ज करण्यात आलेली प्रशिक्षित यंत्रणा या नागपूर विभागाच्या कोरोनाविरोधातील युद्धातील काही महत्त्वाच्या नोंदी आहेत.

मे महिन्याच्या अखेरीस देशातील कोविड-१९ च्या बाधितांच्या संख्येने जवळपास पावणेदोन लाखांचा टप्पा गाठलेला असताना आणि राज्यातील संख्या ६५ हजारांहून अधिक झाली असताना नागपूर शहर आणि विभागातील सहा जिल्ह्यांत कोरोनाबाधितांची संख्या सहाशेच्या जवळपास म्हणजे राज्याच्या अवघी एक टक्का इतकी आहे. अगदी कालपरवापर्यंत या विभागातील गडचिरोली आणि वर्धा हे दोनच जिल्हे राज्यात ग्रीन झोन असण्याचा सन्मान टिकवून होते. या विभागात कोरोनासंदर्भात नियोजनपूर्वक केलेल्या उपाययोजनांचेच हे यश आहे.

या उपाययोजना सर्वस्पर्शी आणि सर्व पातळ्यांवर करण्यात आल्याने त्यांची दखल एक मार्गदर्शक मॉडेल म्हणून घ्यावी लागेल. एकाच वेळी कोरोनाला प्रतिबंध आणि बाधितांवर उपचारासाठी आवश्यक ती कार्यवाही करतानाच कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा परिणाम म्हणून भेडसावणाऱ्या इतर विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी द्रष्टे आणि दूरगामी नियोजन करून त्याची झालेली प्रभावी अंमलबजावणी हे या विभागाचे वेगळेपण आहे. विभागीय आयुक्त डॉ. संजीवकुमार यांच्या नेतृत्वाखाली महसूली यंत्रणेसोबतच नागपूर महापालिकेने केलेल्या उपाययोजनाही या आपत्तीत वैशिष्ट्यपूर्ण सिद्ध झाल्या आहेत.

कोविड केअर सेंटर

राज्यात विविध ठिकाणी स्थानिक पातळीवरील यंत्रणांनी तेथील परिस्थितीची गरज ओळखून काही वेगळे प्रयोग केले. त्यात काही यशस्वी ठरलेत, अशी प्रयोगशीलता आणि तिच्या यशस्वितेत नागपूर विभाग राज्यात निश्चितच अव्वल ठरला आहे. मग ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अवघ्या महिनाभरात तयार झालेले १२८० खाटांचे कोविड हॉस्पिटल असो वा नागपूर महानगरपालिकेने एका आठवड्यात उभारलेले पाच हजार खाटांचे देशातील सर्वात मोठे ठरू शकणारे कोविड केअर सेंटर... याशिवाय तब्बल सहा हजारांच्या प्रशिक्षित वैद्यकीय मनुष्यबळाची उपलब्धता, स्थलांतरित मजुरांसाठी निर्मिलेली निवारागृहे, पोलीस विभागाकडून सुरू असलेला अन्नछत्राचा उपक्रम, मजुरांसाठी सुरू झालेली रोजगार हमीची कामे, शिवभोजन थाळीच्या माध्यमातून गरजूंना मिळालेला दिलासा, नागपूर हेल्थ सर्व्हिलन्स ॲप, गोरगरिबांना धान्यवाटप, श्रमिकांना रेल्वेने दिलेला आधार, या कार्यवाहींचा वेळोवेळी घेतलेला आढावा, यामुळे आपत्ती निवारणाचा एक चांगला वस्तूपाठच नागपूर विभागाने घालून दिला

नागपूर येथील सुसज्ज कोविड केअर सेंटर.

पथदर्शी आणि परिपूर्ण

विभागात सहा प्रयोगशाळा कार्यान्वित केल्याने प्रतिदिन १२०० नमुन्यांची तपासणी शक्य आहे. विभागात तब्बल ४०० व्हेंटिलेटर्स उपलब्ध असताना सध्या सहा जिल्ह्यांत सरासरीने दररोज केवळ दोन जण व्हेंटिलेटरवर आहेत. नागपुरात जवळपास तीन हजार खाटा उपलब्ध आहेत, तर विभागात ऑक्सिजनचा पुरवठा असलेले साडेचार हजार बेड्स तयार आहेत.

याशिवाय संभाव्य प्रसार लक्षात घेऊन वैद्यकीय प्रशिक्षित मनुष्यबळाची केलेली उपलब्धता महत्त्वपूर्ण आहे. विभागात कोविड रुग्णांसाठी उपलब्ध केलेल्या आयसीयू आणि एचडीयू बेडच्या अनुषंगाने डॉक्टर्स, विशेषज्ञ, परिचारिका, इतर तंत्रज्ञ व कर्मचारी असे जास्तीचे तब्बल पाच हजार आठशे इतके प्रशिक्षित मनुष्यबळ मदतीसाठी तैनात करण्यात येत आहेत.

या संकटपर्वात नागपूर महापालिकेने बजावलेली कामगिरी मॉडेल ठरू शकेल. एकीकडे कोविड-१९ विरुद्ध लढण्याचे आव्हान आणि दुसरीकडे लॉकडाऊनमुळे आर्थिकदृष्ट्या संकटात सापडलेल्या नागरिकांना मदतीसाठी राबवावयाच्या उपाययोजना, या दोन्ही पातळ्यांवर या महानगरपालिकेने बजावलेली कामगिरी महत्त्वपूर्ण आहे.

आहे. येथील कोविड रुग्ण बरे होण्याचे प्रमाण देशातील सर्वाधिक प्रमाण असलेल्या शहरांपैकी एक आहे. तत्परतेने झालेल्या तपासण्या, विषाणूंची बाधा होण्याच्या पहिल्या टप्प्यातच शोधण्यात आलेले बहुतांशी रुग्ण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयात उभारलेले स्वतंत्र कोविड वॉर्ड, उपचारासाठी अहोरात्र धडपडणारी डॉक्टरांचे पथकामुळे हे शक्य झाले.

सतर्कता आणि जबाबदारी

भौगोलिकदृष्ट्या देशातील मध्यवर्ती स्थान, एक आंतरराष्ट्रीय गेटवे आणि देशातील एक महत्त्वाचे लॉजिस्टिक हब असल्याने नागपूरची बहुपदरी कनेक्टिव्हिटी या बाबी कोरोनाला पूरक-पोषक ठरू शकतील अशी भीती भेडसावत असतानाच विभागात प्रशासनाकडून अत्यंत सकारात्मकतेने सर्व पातळ्यांवर झालेल्या प्रयत्नांनी या आपत्तीला प्रारंभापासूनच सुव्यवस्थितपणे व समन्वय राखून नियंत्रणात ठेवण्यात यश आले आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे यांसह बाहेरून आलेल्या प्रवाशांची काटेकोर तपासणी करण्यात आली. त्यातील पंधरा हजारांहून अधिक संशयितांना संस्थात्मक आणि गृह अशा दोन्ही स्तरावर विलगीकरण केल्याने व्यापक फैलाव रोखला. समूह विलगीकरणाचा धाडसी प्रयोग राबवल्याने मोठ्या संख्येने बाधित रुग्ण शोधण्यात यश आले. सध्या विभागात साडेसतरा हजारांपर्यंत विलगीकरणाची क्षमता आहे.

ॲक्शन प्लॅन

मेअखेरीस नागपूर महानगरपालिका हद्दीत जवळपास साडेचारशे पॉझिटिव्ह रुग्ण आढळले. यामधील आठ जणांचा मृत्यू झाला. शहरात पहिला रुग्ण आढळल्यापासून घेतलेले योग्य निर्णय, त्याची झालेली प्रभावी अंमलबजावणी, प्रसार रोखण्यासाठी सर्वच स्तरावर आखलेली रणनीति यामुळे शहरात विषाणूचा प्रसार आटोक्यात आणण्यात यश आले आहे. नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केलेल्या विशेष ॲक्शन प्लॅनमधील काही महत्त्वाच्या बाबींमध्ये कोरोना वॉर रूम, कोरोना नियंत्रण कक्ष, डी-३ (डिफाईन, डिझाईन आणि ड्राईव्ह), टी-३ (ट्रेसिंग, टेस्टिंग आणि ट्रीटमेंट), रॅपिड रिस्पॉन्स टीम, क्षमतावृद्धी आणि प्रशिक्षण, विमानतळ आणि रेल्वे स्थानकावर प्रवाशांची तपासणी, प्रतिबंधित क्षेत्रासाठी धोरणात्मक निर्णय, प्रतिबंधित क्षेत्रात सर्वेक्षण, समूह विलगीकरण, एसएआरआय/एआरडीएस सर्व्हे/खासगी रुग्णालयातील अतिधोकादायक आजारातील रुग्णांची तपासणी, कोविड-१९ साठी २०२० सर्वसमावेशक सर्वेक्षण, गरोदर माता, टीबी आणि कुष्ठरोग, कर्करोग रुग्णांची विशेष काळजी, फीव्हर क्लिनिक, कोविड-१९ मोबाइल ॲप्लिकेशन, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी विशेष हेल्पलाईन, पाच हजार बेड क्षमतेचे कोविड केअर सेंटर, बेघर निवारा आणि गरजूंना मदत आणि भविष्यासाठी नियोजन व तयारी यांचा समावेश आहे. यामुळे शहरातील कोविड-१९ रुग्णसंख्येचा गुणाकार थांबवण्यात यश आले. चार हजारांपेक्षा अधिक व्यक्तींची विलगीकरण कक्षात रवानगी आणि त्यांची चाचणी शक्य झाले. संपूर्ण भारतात अशा प्रकारचे समूह विलगीकरण पहिल्यांदाच नागपुरात झाले. याशिवाय ४५० बेड क्षमतेच्या आणि ४० आयसीयू बेड असलेल्या कोविड आरोग्य केंद्राची विक्रमी वेळेत उभारणी करण्यात येत आहे. तर पाच हजार बेड क्षमतेचे कोविड केअर सेंटर केवळ सात दिवसांत उभारण्यात आले. तसेच सर्वेक्षणामुळे अतिधोकादायक आजार असलेल्या रुग्णांचे कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर प्रभावी व्यवस्थापन करण्यात यश आल्याचे सिद्ध झाले.

अतिधोकादायक आजार असलेल्या व्यक्तींची माहिती प्राप्त झाल्याने त्यांच्यावर विशेष लक्ष देण्यात आले. नागपुरात कोरोनाचा मृत्युदर अत्यंत कमी असण्याचे हे महत्त्वाचे कारण आहे. यासोबतच महानगरपालिकेची यंत्रणा ५० हजारांपेक्षा अधिक व्यक्तींना दररोज फूड पॅकेट्स वाटप करत असून आतापर्यंत १३ लाखांपेक्षा अधिक फूड पॅकेट्सचे वितरण झाले आहेत.

चंद्रपूर

सरपंचांचा सहभाग

नागपूर विभागातील काही जिल्ह्यांनी स्थानिक स्तरावर केलेल्या उपाययोजना या साऱ्या लढाईत मोलाच्या ठरल्या आहे. त्यात चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने कोरोनाविरुद्धच्या लढाईत सर्व सरपंचांना

सहभागी करून घेतले. ५०० सरपंचांच्या सक्रिय सहभागामुळे प्रत्येक गावात यशस्वी चाचण्या व विलगीकरण करता आले. तसेच महिला बचत गटातर्फे ६० हजार मास्कचे घरपोच वाटप करण्यात आले.

जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, महानगरपालिका व सर्व नगरपालिका यांच्या समन्वयाने 'एकत्रित आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष' स्थापन करण्यात आला. याशिवाय आत्मभान अभियानामुळे कोरोनाबद्दलची अनाठायी भीतीही कमी करण्यास मदत झाली.

वर्धा

नावीन्यपूर्ण उपक्रम

वर्धा जिल्हा प्रशासनाने राबवलेल्या अनेक नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे जिल्हा दीर्घकाळ कोरोनामुक्त ठेवण्यात यशस्वी झाले होते. फेब्रुवारीत बीजिंग शहरातील १३ विद्यार्थिनी हिंदी विद्यापीठात आल्या होत्या. त्यांना तत्काळ होम क्वारंटाईन केले गेले. त्यानंतर प्रशासन सतर्क झाले. शहरातील गर्दी होत असलेले भाजी बाजार मोकळ्या मैदानात स्थलांतरित केले. तिथे प्रत्येक भाजी विक्रेत्याकडे सॅनिटायझर, सोशल डिस्टन्सिंग, हॅण्ड ग्लोव्हज, मास्क तसेच प्रवेशद्वारावरच हॅन्ड वॉश स्टेशन तसेच कापडी पिशव्यांची सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आल्या. जिल्ह्यात येणारे १६ मुख्य मार्ग आणि ९८ छुप्या मार्गांवर निगराणी पथक तैनात करण्यात आले. तसेच जिल्ह्याबाहेरून येणाऱ्या नागरिकांना प्रतिबंध घालण्यासाठी सरपंचाच्या अध्यक्षतेखाली ग्रामस्तरीय निगराणी पथक स्थापन करण्यात आले.

जिल्ह्याबाहेरून येणाऱ्या भाजीवर प्रतिबंध करण्यासह जीवनावश्यक वस्तू घेऊन येणाऱ्या वाहनांसाठी शहराबाहेरच अनलोडिंग पॉईंट करण्यात आला. बाहेरच्या जिल्ह्यातून येणाऱ्या गाड्यांचे चेक पोस्टला निर्जंतुकीकरण करण्यासोबत यामधील व्यक्तींची चेक पोस्टला आरोग्य तपासणी करण्यात आली.

गडचिरोली

टाळेबंदी यशस्वी

राज्यात सर्वात शेवटी कोरोनाग्रस्त झालेल्या गडचिरोलीत सर्व कोरोनाबाधित रुग्ण हे जिल्ह्याबाहेरून आलेले असून एकाही स्थानिक व्यक्तीला कोरोना संसर्ग झालेला नाही. ५० हजारांहून अधिक नागरिक जिल्ह्यात परतले असून या सर्वांची तपासणी सीमा भागातच करण्यात आली. जिल्ह्यात दुर्गम भागातील लोकांनी टाळेबंदीची यशस्वी अंमलबजावणी केली. बाहेरून आलेल्यांना शाळेमध्ये राहण्याची व्यवस्था ग्रामस्थांकडून करण्यात आली. कोरोनाबाबत दुर्गम भागातही माडिया गोंड या स्थानिक बोलीत संदेश आणि माहितीपटांच्या वापर करून जनजागृती करण्यात आल्याने येथील आदिवासी मंडळी त्याबाबत सजग झाली आहेत.

भंडारा

आत्मनिर्भरतेचा नवा अध्याय

कोरोना प्रतिबंधासह टाळेबंदीत मनरेगामध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात भंडारा राज्यात अव्वल आहे. छत्तीसगडमधील झाडू निर्मिती कामगारांना निवारागृहातच रोजगार उपलब्ध करून देऊन आत्मनिर्भरतेचा एक नवा अध्याय साकारला. पोलीस दलाच्या उल्लेखाशिवाय नागपूरची ही यशोगाथा अपूर्ण ठरेल. नागपूर शहरात एकही नागरिक उपाशीपोटी झोपू नये यासाठी पोलिसांनी समन्वयकाच्या भूमिकेतून केलेले अन्नदान आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप पोलिसिंगला नव्या आयाम देणारे ठरले आहे. १३२ सामाजिक संस्था आणि अनेक दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने हा उपक्रम पोलिसांची कृतिशील संवेदनशीलता दर्शवणारा आहे. अप्पर पोलीस आयुक्त निलेश भरणे यांच्या पुढाकारामुळे हे शक्य झाले.

हेमराज बागुल,
संचालक (माहिती) नागपूर-अमरावती विभाग

पुणे विभाग

समन्वय आणि सुसूत्रता

पुण्यात आंतरराष्ट्रीय विमान सेवा असल्याने येथे कोरोना संसर्गाचा धोका होताच. त्यामुळे पुणे महानगरपालिकेकडून नायडू रुग्णालयाच्या तयारीसाठी २६ फेब्रुवारीपासून कामाला सुरुवात झाली. ६ मार्च रोजी नायडू रुग्णालय सर्व तयारीनिशी सज्ज झाले होते. परदेशी प्रवाशांची विमानतळावर तपासणी करण्यास सुरुवात करण्यात आली. आवश्यकतेनुसार संस्थात्मक विलगीकरण करण्यात आले.

पुणे जिल्ह्यात कोरोनाचा पहिला रुग्ण ९ मार्च २०२० मध्ये नायडू रुग्णलयात भरती करण्यात आला. हा रुग्ण दुबई व अबुधाबी प्रवास करून मुंबईमार्गे पुण्यात आला होता. तो व त्याचे १७ सहप्रवासी प्रामुख्याने परदेश प्रवासगमन केलेले व मुंबई विमानतळावर उतरून पुण्यात आले होते. यापैकी ९ व्यक्ती कोरोनाबाधित होत्या.

प्राथमिक तपासणी

रुग्णालयांचे बळकटीकरण

पुणे जिल्ह्यातील खासगी रुग्णालयांचे कोविड-१९ उपचारासाठी अधिग्रहण करण्यात आले. डॉक्टर व रुग्णालयातील इतर आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक साधनसामग्रीचा आवश्यक तेवढा प्रमाणात पुरवठा करण्यात आला. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड

महानगरपालिका, ससून यांच्याकडे एन-९५ मास्क, पीपीई किट, त्रिस्तरीय मास्क, हायड्रोक्सिक्लोरोक्वीन गोळ्या, असिलटॅमिहिर गोळ्या, अजिथ्रोमायसिन गोळ्या, लोपीनावीर गोळ्या या औषधी व साधनसामग्रीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. सध्या ग्रामीण भागातही रुग्णसंख्या वाढत असल्याने या भागातील प्रसार कमी करण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपाययोजना करत आहेत. परराज्य व परजिल्ह्यातून प्रवास करून आलेल्या तसेच प्रतिबंधित क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक व श्वसनाशी संबंधित आजार, उच्च रक्तदाब, मधुमेह, गरोदर महिला, बालके यांची माहिती संकलित करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना तेथेच योग्य उपचार मिळावे यासाठी सार्वजनिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयांचे बळकटीकरण, मनुष्यबळाची उपलब्धता यावर भर देण्यात आला आहे.

प्रशासकीय यंत्रणेचे समन्वयाने काम

विभागीय आयुक्त डॉ. दीपक म्हैसेकर, जिल्हाधिकारी नवल किशोर राम, पुणे महापालिकेचे आयुक्त शेखर गायकवाड, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्यासह पोलीस विभाग, आरोग्य विभाग आणि इतर प्रशासकीय यंत्रणा समन्वयाने काम करीत आहे. कोरोनाच्या संसर्गास आळा घालण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपाय योजण्यात आले. शासनामार्फत नियुक्त वरिष्ठ अधिकाऱ्यांना पुणे महानगरपालिकेतील विविध भागांत विशेष जबाबदारी देण्यात आली. प्रतिबंधित क्षेत्रातील दैनंदिन सर्वेक्षण व सहवासित पाठपुराव्याच्या माध्यमातून कोरोनासदृश लक्षणे असलेल्या व्यक्तींची ओळख आणि गरजेनुसार रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला. कोरोनासदृश लक्षणे असलेल्या व्यक्तींचे नमुने मोठ्या प्रमाणात संकलित करून तपासणी करण्यात आली. बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून रुग्णालय येथे स्वतंत्र कोविड-१९ रुग्णालयाची स्थापना करण्यात आली. डॉ. दिलीप कदम यांच्या अध्यक्षतेखाली गंभीर रुग्ण उपचार पद्धती सुचवण्यासाठी कृती दलाची स्थापना करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या शिफारशीनुसार गंभीर व अतिगंभीर रुग्ण व्यवस्थापन प्रोटोकॉल, औषध प्रोटोकॉल सुचवण्यात आला असून त्याचा वापर करण्यात येत आहे.

सुसज्ज कोविड योद्धे

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यासाठी शासनातर्फे अतिरिक्त अधिकारी नियुक्त करण्यात आले. पुणे महानगरपालिकेसाठी अतिरिक्त मुख्य सचिव(महसूल) नितीन करीर, साखर आयुक्त सौरभ राव, सहकार आयुक्त अनिल कवडे, पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे संचालक कौस्तुभ दिवेगावकर, पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी प्रधान सचिव (नगरविकास) महेश पाठक तर ससून प्रशासनासाठी जमाबंदी आयुक्त एस. चोक्कलिंगम यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली.

पुणे विभागीय आयुक्त स्तरावरही अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग यांच्याकडे रुग्णालय व अतिदक्षता विभाग व्यवस्थापन, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे आयुक्त विक्रमकुमार यांच्याकडे अलगीकरण कक्ष व्यवस्थापन, शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांच्याकडे विलगीकरण प्रक्रियेचे व्यवस्थापन व अतिरिक्त विलगीकरण सुविधा निर्माण करणे, कृषी आयुक्त सुहास दिवसे यांच्याकडे जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता, पीएमपीएमएलच्या संचालक नयना गुंडे यांच्याकडे वाहतूक व्यवस्थापन, अपंग कल्याण आयुक्त प्रेरणा देशभ्रतार यांच्याकडे रेशन व इंधन पुरवठा, मृद व जलसंधारणचे व्यवस्थापकीय संचालक ऋषिकेश यशोद यांच्याकडे अन्न व औषधी, वैद्यकीय साधने व इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा याबाबत जबाबदारी सोपवली आहे. या व्यतिरिक्त अतिरिक्त-उप जिल्हाधिकाऱ्यांची शीर्ष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उपाययोजनेसाठी निधी

पुणे जिल्ह्यासाठी कोरोना मुकाबल्याकरिता एकूण २३ कोटी ४० लक्ष रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. जिल्हा वार्षिक नियोजनातून २०१९-२० मध्ये ससून रुग्णालयाला १६ कोटी १६ लाख निधी उपलब्ध करून देण्यात आला. यातून आयसीयू युनिट यंत्रसामग्री, औषध खरेदी, ऑक्सिजन गॅस पाईपलाईन, वातानुकूलित सुविधा करणे ही कामे करण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सकांना औषधे व यंत्रसामग्री खरेदीसाठी ४ कोटी ७ लाख रुपये, तर जिल्हा आरोग्य अधिकारी यांना औषधे व यंत्रसामग्री तसेच जीवनसत्व विषयक औषधे खरेदी करण्यासाठी ७ कोटी ८९ लाख रुपये उपलब्ध करून देण्यात आले. आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये ससून रुग्णालयाला विद्युतविषयक कामे व २५०० कोरोना टेस्ट किट खरेदीसाठी १ कोटी ७१ लाख रुपये, जिल्हा शल्यचिकित्सक यांना ९ ग्रामीण रुग्णालयांना सेंट्रल ऑक्सिजन गॅस पाईपलाईन तसेच औषधे व यंत्रसामग्री

खरेदीसाठी ११ कोटी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांना खासगी दवाखान्यांना संदर्भित केलेल्या रुग्णांच्या औषधोपचार खर्च प्रतिपूर्तीसाठी पाच कोटी उपलब्ध करून दिले आहेत. जिल्हा वार्षिक नियोजनातून २०१९-२० मध्ये एकूण २८ कोटी १२ लाख आणि आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये १७ कोटी ७१ लाख असा एकूण ४५ कोटी ८३ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी दिली.

डिजिटल संवाद

विभागीय आयुक्त, पोलीस आयुक्त, दोन्ही महापालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी रोज संयुक्त पत्रकार परिषद घेऊन कोरोनाच्या अनुषंगाने प्रशासन करीत असलेले काम व सद्य:स्थिती सर्वसामान्य नागरिकांना अवगत करून दिली. २४ मार्चपासून लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर वेब लिंक तसेच गुगल मीट या दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून पत्रकारांशी संवाद साधून माहिती दिली जाऊ लागली.

कोविड हॉस्पिटल

विक्रमी वेळेत ससूनचे कोरोना हॉस्पिटल - पुण्याची लोकसंख्या व संभाव्य परिस्थिती पाहून बी.जे.मेडिकल कॉलेजच्या ११ मजली इमारतीत कोविड हॉस्पिटल सुरू करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बैठकीत झाला. तसेच जिल्हा नियोजन समितीतून २५ टक्के निधी खर्च करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. लॉकडाऊनच्या परिस्थितीत कोविड हॉस्पिटलचे काम पूर्ण करणे एक आव्हान होते, परंतु विक्रमी वेळेत केवळ १३ दिवसांत हे काम पूर्ण झाले.

वॉर रुम उपयुक्त

शहरातील कोरोनाच्या परिस्थितीची अद्ययावत माहिती मिळण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेने वॉर रुम कार्यान्वित केली आहे. यामुळे शहरात नेमकी कुठे काय परिस्थिती आहे, याची नेमकी माहिती मिळत असते. त्यामुळे कार्यवाही करणे सोपे जाते.

खासगी रुग्णालयांशी समन्वय

मुंबईनंतर पुण्याची परिस्थिती गंभीर असली तरी नियंत्रणात आहे. शहरातील सिम्बॉयसिस, भारती, मंगेशकर, जहांगीर रुबी, नोबल, सह्याद्री यांसारख्या मोठ्या खासगी रुग्णालयांबरोबर सुरुवातीपासूनच समन्वय ठेवल्यामुळे कोरोनाचे रुग्ण त्या ठिकाणी ॲडमिट करणे सोपे जाऊ लागले. आता तर ८० टक्के खाटा शासनाला देण्याचे सर्वांनीच मान्य केले आहे.

लॉकडाऊनमुळे मजूर व कामगार मोठ्या प्रमाणात अडकले होते. त्यांच्या राहण्याची व जेवणाची उत्तम सोय करण्यात प्रशासन यशस्वी झाले. त्यानंतर त्यांना त्यांच्या गावी पाठवणे हे जिकिरीचे कामही उत्तम पद्धतीने हाताळले गेले.

बारामती पॅटर्न

बारामती शहरात कोरोनाला अटकाव करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तेथील नागरिक व अधिकाऱ्यांनी अभिनव उपक्रम राबवला. शहरातील तरुणांना सहभागी करून घेतले. नागरिकांना घराबाहेर पडू नका. जीवनावश्यक वस्तू घरपोच देण्यात येईल, असे आवाहन केले. परिणामी कोरोनावर नियंत्रण मिळवण्यात यश आले. संभाव्य रुग्णांची संख्या पाहता व खबरदारीची उपाययोजना म्हणून रेल्वे डब्यातही आयसोलेशन वॉर्ड तयार करण्यात आले आहे. कोरोनाबाधित व्यक्तींसाठी विलगीकरण सुविधा, अलगीकरण सुविधा करण्यात आल्या. कोरोना नमुना तपासणीसाठी प्रयोगशाळा निश्चित करण्यात आल्या.

सातारा

श्रमिक सुरक्षित पोहोचवले

शासनाने इतर राज्यातील श्रमिक या परिस्थितीत सुरक्षितपणे त्यांच्या गावी पोहोचावेत म्हणून एसटीला हाक दिली. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सातारा विभागामार्फत ७ मे रोजी सातारा ते पुदुचेरी २३ प्रवासी, सातारा ते राजस्थान येथील राणिवाडा २३ प्रवासी, वडूज राणिवाडा २२ प्रवाशी असे एकूण ६८ प्रवासी एसटी बसेसने सोडण्यात आले. ९ मे रोजी सातारा-वडूज ते भंडारा २२, १० मे रोजी मेढा ते उत्तर प्रदेश येथील वाराणसी येथे २३ असे एकूण ४५ प्रवासी

सोडण्यात आले.

११ मे रोजी वडूत ते कर्नाटक राज्यातील हल्ल्याळ येथे २२, कराड ते तामिळनाडू येथील सेलम ९ एसटी बसेस सोडण्यात आल्या आहेत यातून २०१ प्रवासी सोडण्यात आले आहेत. सातारा ते मध्य प्रदेश येथील सुलतानपूर येथे २३ प्रवासी सोडण्यात आले आहेत. तसेच महामंडळाच्या सातारा विभागामार्फत हैदराबाद व गुलबर्गा येथे लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या मजुरांना सोडण्यात आले आहे.

सोलापूर

उपाययोजनांमध्ये सुसूत्रता

पुणे शहरापेक्षा पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीणची परिस्थिती नियंत्रणात आहे. पुणे विभागात सोलापूरची परिस्थिती थोडीशी चिंताजनक होऊ लागली आहे. लोकांची ये-जा वाढल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. पंढरपूरला आषाढी वारीची परंपरा आहे. सध्याची परिस्थिती पाहता शासनाच्या परवानगीशिवाय कोणतीही दिंडी काढता येणार नाही, असा निर्णय घ्यावा लागला. सोलापूर जिल्ह्यात कोरोना

विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजनांमध्ये सुसूत्रता आणण्यात आली. सोलापूरचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पी. शिव शंकर, पोलीस अधीक्षक मनोज पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश वायचळ, वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदिप ढेले, महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्या समन्वयाने हे काम चालू आहे. कोरोना विषाणूचा सामना केवळ वैद्यकीय आघाडीवर नसून सर्वच विभागांत जास्तीत जास्त सुसूत्रता आणण्यावर भर आहे.

कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र डॉक्टर आणि नर्स नेमणे, त्यांच्या राहण्याची व्यवस्था, खासगी इंटेसिव्हिस्ट डॉक्टरांची मदत याबाबींचा अवलंब करण्यात आला. शहरातील सर्व्हे करताना थर्मल स्कॅनरचा वापर, कंटेनमेंट झोनमध्ये मास्क वितरण, सार्वजनिक शौचालयाचे सॅनिटायझेशन दिवसातून दोन-तीन वेळा करणे, कंटेनमेंट झोनमधील ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर लक्ष ठेवणे आदींचा त्यात समावेश आहे.

विभागीय माहिती कार्यालय, पुणे

औरंगाबाद विभाग

प्रशासनाचा निर्धार

औरंगाबाद विभागात औरंगाबाद, जालना, बीड आणि परभणी जिल्ह्यात कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आणि कोरोनामुक्त रुग्णांचे प्रमाण वाढवण्यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा रूग्णालय आणि महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्यामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या यंत्रणांच्या प्रयत्नांमुळे कोरोना रुग्ण बरे होण्याचे प्रमाणही या विभागात जास्त आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी शहरात ताप उपचार केंद्र सुरू केले आहेत. इतर जिल्ह्यांत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्थलांतर करणाऱ्यांकरिता संदर्भात नोंद ठेवणे, कोरोना (कोविड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे व त्यानुषंगाने इतर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी तालुक्यातील प्रत्येक गावासाठी एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे.

बऱ्या झालेल्या रुग्णाला केक कापून निरोप देताना आरोग्य कर्मचारी.

जिल्ह्यातील राष्ट्रीय आत्मसुरक्षा योजना व शेतकरी योजनेंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळत नसलेल्या सर्व शिधापत्रिकाधारकांना या योजनेंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे. तसेच विभागात वेळोवेळी आरोग्यमंत्री राजेश टोपे, औरंगाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री सुभाष देसाई, बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे, परभणीचे पालकमंत्री नवाब मलिक हे नियमित आढावा बैठक आणि भेटी देत आहेत. त्यामुळे जनतेमध्ये नक्कीच कोरोनाविषयी नाहक भीती कमी झालेली पाहावयास मिळते आहे.

टॉवर लोकेशन, कॉन्टॅक्ट मॅपिंग

कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी टॉवर लोकेशन, कॉन्टॅक्ट मॅपिंग ही पद्धत खूप उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे तातडीने रुग्णांच्या संपर्कातील संशयितांची तपासणी करून कोविड प्रसाराला रोखता येणे शक्य होत आहे. मोठ्या प्रमाणात संशयितांची तपासणी वाढवली असून वेळीच संसर्गाला अटकाव करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

माझा वॉर्ड कोरोनामुक्त वॉर्ड

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे 'माझा वॉर्ड कोरोनामुक्त वॉर्ड' या अभियानात महानगरपालिका आयुक्त आस्तिककुमार पांडेय यांनी स्वत: हातात ध्वनिक्षेपक घेऊन या अभियानाची जनजागृती केली.

कोविड रुग्णालय

शहरातील एमआयडीसी क्षेत्रातील चिकलठाणा येथे कोविड रुग्णालयाचे काम प्रगतिपथावर आहे.

MHMH मोबाइल ॲप्लिकेशन

MHMH (माझी हेल्थ माझ्या हाती) हे मोबाइल ॲप्लिकेशन उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामध्ये नागरिकांनी रोज स्व-तपासणी (ऑक्सिमीटरद्वारे शरीरातील ऑक्सिजन पातळी तपासणे, थर्मामीटरद्वारे शरीराचे तापमान मोजणे) करून त्याची माहिती या ॲपवर टाकायाची आहे. त्यामूळे लवकर उपचार आणि संसर्ग रोखण्यात यश येत आहे.

जालना

श्रमिक रेल्वे

उत्तर प्रदेशातील उन्नाव येथील २ हजार ३८० श्रमिकांसाठी दोन विशेष रेल्वे, तर बिहार राज्यातील छापरापर्यंत ८६० नागरिकांना एका विशेष रेल्वेद्वारे त्यांच्या गावी पोहोचवण्यात आले. भोपाळ येथील १४१ तर जबलपूर येथील १३३ नागरिकांना औरंगाबाद येथून सोडलेल्या विशेष रेल्वेने त्यांच्या राज्यात पोहोचवण्यात आले.

उज्ज्वला गॅस

या योजनेद्वारे जिल्ह्यात ७७ हजार ३८५ मोफत गॅस सिलिंडरचा लाभ देण्यात आला.

शिवभोजन योजना

या योजनेद्वारे मार्च ते मे महिन्यात ८२ हजार ४४८ गरजूंना शिवभोजन उपलब्ध करून देण्यात आले.

बीड

जिल्ह्यातील कोरोना रुग्णांची तपासणी करण्याकरिता प्रयोगशाळेसाठी वैद्यकीय महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागांतर्गत व्हायरल रिसर्च डायग्नोस्टिक लॅबसाठी तीन कोटी रूपये निधी नियोजित करण्यात आला आहे. या प्रयोगशाळेस आयसीएमआर देशपातळीवरील संस्थेची मान्यता मिळाली असून हापकीनच्या माध्यामातून विविध प्रकाराची अत्याधुनिक साधनसामग्री उपलब्ध केली जात आहे.

परभणी

संगणकीय रुग्ण सुविधा

हॉस्पिटल इन्फर्मेशन कलेक्शन सिस्टिम या संगणक प्रणालीद्वारे रुग्णालयामध्ये उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सुविधा तसेच स्टाफ, रिक्त बेडची संख्या, रुग्णांची संख्या आदी माहिती भरावयाची आहे. त्यामुळे या ॲपद्वारे नागरिकांची गैरसोय टळली आहे.

पीबीएन शॉप ॲप

या मोबाइल ॲपद्वारे नागरिकांना घरबसल्या किराणा मालासोबत भाजीपाला देखील ऑनलाइन खरेदी करता येणार आहे, त्यामूळे गर्दीवर नियंत्रण येईल.

विभागीय माहिती कार्यालय, औरंगाबाद

नाशिक विभाग

संकटावर एकजुटीने मात

कोरोना संकटाचा सामना करण्यासाठी सर्वत्र संचारबंदी...नेहमी माणसांच्या गर्दीने वाहणाऱ्या रस्त्यावर तुरळक वाहतूक...संकटात अडकलेल्या मजुरांच्या मदतीसाठी सरसावलेले प्रशासन, मदतीसाठी पुढे आलेले हजारो हात...कोरोनायोद्ध्यांची कर्तव्यनिष्ठा... संसर्गमुक्त होणाऱ्या रुग्णांमुळे जनतेच्या मनातील कमी झालेली भीती... त्याचवेळी शासन आणि प्रशासनाबाबत निर्माण झालेली विश्वासाची भावना... या संकटाच्या वेळी एकजुटीने होत असलेल्या अनुकूल बदलाचे हे उदाहरण. नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यांत असेच सकारात्मक चित्र दिसून येत आहे.

नाशिक येथे पालकमंत्री छगन भुजबळ, वेळोवेळी नाशिककडे लक्ष देणारे आरोग्यमंत्री राजेश टोपे, कृषिमंत्री दादाजी भुसे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाधिकारी सूरज मांढरे यांच्या नेतृत्वाखाली इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर उभारण्यात आले. जिल्ह्यातील कोरोनाबाधितांची संख्या वाढली असली तरी भविष्यातील धोके ओळखून दाट वस्ती भागातील रहिवाशांचे विलगीकरण करणे, मालेगावसारख्या ठिकाणी नागरिकांचे समुपदेशन आणि शहरातील कोरोनाचा फैलाव ग्रामीण भागात तसेच नजीकच्या तालुक्यात होऊ नये यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलली. अनेक रुग्णांना कोरोनामुक्त करण्यात यश आले असून राज्यातील सर्वाधिक बरे होण्याचे प्रमाण मालेगावमधून आहे.

लॅबची निर्मिती

मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या स्व. डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेज येथे कोरोना टेस्टिंग लॅबची स्थापना करण्यात आली. दिवसाला २४ तासांत ५४० टेस्ट करण्याची क्षमता या लॅबमध्ये आहे.

'महाकवच' ॲपची निर्मिती

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि संसर्ग रोखण्यासाठी केंद्र शासनाचे राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, नाशिक डिस्ट्रिक्ट इनोव्हेशन कौन्सिल आणि नाशिक महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाकवच' ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. या ॲपमुळे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग आणि क्वारंटाईन ट्रॅकिंग कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करण्यात आले.

औद्योगिक आस्थापना

जिल्ह्यात इमर्जन्सी ऑपरेशन सेंटरच्या माध्यमातून अत्यावश्यक उद्योग व व्यवसायांना चालना देण्याचा प्रयत्न सुरू आहे. औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाच्या माध्यमातून आजपर्यंत ६ हजार कंपन्यांना सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. ८० हजार कर्मचारी मजूर सध्या त्यात काम करत आहेत.

औषध निर्मिती व पुरवठा

नाशिक जिल्ह्यातील १२ औषध उत्पादक व १६ डिस्ट्रिलरी ऑपरेटर्स असे २८ उत्पादकांना हॅण्ड सॅनिटायझर उत्पादनाचे परवाने मंजूर करण्यात आले आहेत. मेडिकल ऑक्सिजन उत्पादनासाठी नाशिक शहरातील सातपूर येथील अक्षय ऑक्सिजन ॲण्ड इंडस्ट्रियल गॅसेस या कंपनीला परवानगी दिली आहे.

बचत गटांचा वाटा

जिल्हा परिषदेने सर्व बचत गटांना जास्तीत जास्त मास्कची निर्मिती करून ग्रामस्तरावर विक्री करण्याचे आवाहन केले. बचत गटांनीही सामाजिक दायित्व आणि रोजगाराची संधी म्हणून मोठ्या उमेदीने मास्क तयार करून त्याची विक्री

मास्कची निर्मिती करणाऱ्या बचत गटाच्या महिला.

सुरू केली आहे.

शेतकऱ्यांसाठी केलेल्या उपाययोजना

लॉकडाऊनमध्ये जिल्ह्यातून १२ हजार मेट्रिक टन फळे, भाजीपाला व इतर शेतमालाचा पुरवठा करण्यात आला. मुंबई, पुणे आणि नाशिकमधील मोठ्या सोसायट्यांमध्ये थेट शेतकऱ्यांच्या माध्यमातून भाजीपाला विक्री करण्यात आला.

स्वयंसेवी संस्थांद्वारे अन्नदान

कोरोनाकाळात मुंबई-आग्रा महामार्गावरून पायी जाणाऱ्या परप्रांतीयांसाठी अन्नदान करणे गरजेचे होते. त्यांच्यासह शहरातील गरजवंतही उपाशी राहू नये यासाठी ४७ स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्तींना एकत्र करून व विविध संस्थांशी संवाद साधून १० लाख लोकांना अन्नदान करण्यात आले.

मनरेगाच्या माध्यमातून रोजगार

नाशिक जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून २० हजार ३४४ मजुरांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

शेल्टरमुक्त नाशिक

जवळपास दोन हजार परप्रांतीयांना मुंबई-आग्रा महामार्गावरील इगतपुरी, नाशिक, चांदवड आदी ठिकाणी टप्प्याटप्प्याने थांबवण्यात आले होते. तसेच जिल्हाभरात २९ निवारागृहांत या मजुरांची सोय करण्यात आली होती. नंतर शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार या सर्व परप्रांतीयांना रेल्वे व बसने त्यांच्या राज्यात पोहोचवण्यात आले आहे.

नंदुरबार

नाशिक विभागात रेड झोनमध्ये नसलेला नंदुरबार हा एकमेव जिल्हा आहे. जिल्हाधिकारी डॉ.राजेंद्र भारुड यांच्या संकल्पनेतून जिल्ह्याच्या सीमेवरील प्रत्येक गावात ग्रामरक्षक दल स्थापन केल्याने जिल्ह्यात कोरोनाचा संसर्ग नियंत्रित करण्यात प्रशासनाला बऱ्याच अंशी यश आले आहे.

सुरक्षित नाना-नानी अभियान

कोरोना संसर्गाचा धोका वयोवृद्धांना अधिक असल्याने पिरामल फाऊंडेशन आणि प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने 'सुरक्षित नाना-नानी' अभियानाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्यात आला. त्यांना आजाराविषयी माहिती देण्याबरोबर आवश्यक वस्तू पोहोचवण्याची सुविधादेखील करण्यात आली.

ॲन्टी कोविड फोर्स

कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनेत कोरोनायोद्ध्यांच्या सहकार्यासाठी 'ॲन्टी कोविड फोर्स'साठी स्वयंसेवकांची नोंदणी करण्यात आली. ३५०० युवकांनी यासाठी नोंदणी केली. गरजेनुसार त्यांचे सहकार्य विविध कामांसाठी घेण्यात आले.

मजुरांची 'घरवापसी'

जिल्हा प्रशासनाने रेल्वे व बसेसद्वारे सुमारे ३० हजार मजुरांना राज्याच्या सीमेवर आणि त्यांच्या गावी सोडले आहे. बाहेरील राज्यातून जिल्ह्यातील नागरिकांना आणण्यासाठी पालकमंत्री ॲड.के.सी. पाडवी यांनी विशेष प्रयत्न केले. आदिवासी विकास विभागाने या नागरिकांना आणण्यासाठी बस आणि रेल्वेचा खर्च केला.

संकटकाळातील 'उमेद'

कोविड संकटाच्या काळात रोजगाराचे प्रश्न निर्माण होत असताना जिल्ह्यातील महिला स्वयंसहायता समूहांनी 'उमेद' अभियानांतर्गत मास्क तयार करण्याचा उपक्रम हाती घेऊन रोजगार निर्मितीचा पर्याय निवडला. याशिवाय घरपोच किराणा माल पोहोचवणे, खतांची विक्री आणि भाजीपाला विक्रीतूनही समूहांनी उत्पन्नाचे साधन निर्माण केले आहे. या सर्व उपक्रमांना मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

गतवर्षी घंटाणी गावातील ग्रामसंघाने घरपोच खत वितरित केले. त्यात सदस्यांना चांगला लाभ झाला असल्याने यावर्षी चार ग्रामसंघांनी एक हजार बॅग खत खरेदीचे नियोजन केले आहे.

मजुरांना काम

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ५९७ पैकी ४७६ गावांत ४९ हजार मजुरांना रोजगार उपलब्ध झाला आहे. मनरेगांतर्गत शेल्फवर पुरेशी कामे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून आणि मास्क घालून कामे करण्यात येत आहेत.

जिल्ह्यात मस्टर संपल्यानंतर आठ दिवसांच्या आत १०० टक्के मजुरांच्या खात्यावर मजुरीची रक्कम थेट जमा करण्यात येते. २७ मेपर्यंत ३.७५ लाख मनुष्यदिन निर्मिती झाली असून ९ कोटींपेक्षा जास्त रुपये वितरित करण्यात आले आहेत.

अहमदनगर

अहमदनगर जिल्ह्यात कोरोना संसर्ग झालेल्या रुग्णांची तातडीने संपर्क साखळी शोधण्यात यश आल्याने संसर्गावर चांगल्या प्रकारे नियंत्रण करता आले.

सारी सर्वेक्षण

श्वसन विकाराचा तीव्र त्रास होत असणारे (सारी) रुग्ण रुग्णालयापर्यंत येण्याची वाट न पाहता विविध पथकांमार्फत सर्वेक्षण करून आजाराची लक्षणे असणाऱ्या रुग्णांना उपचारासाठी दाखल करून

घेण्यात येत आहे. सर्व खासगी दवाखान्यांत आलेल्या या रुग्णांना शासकीय रुग्णालयात पाठवण्याबाबत जिल्हाधिकारी राहुल द्विवेदी यांनी आदेश जारी केले. त्यामुळे रुग्णावर वेळेत उपचार शक्य झाले.

अन्नधान्य वितरण

लॉकडाऊनच्या काळात नागरिकांना अन्नधान्याचा तुटवडा जाणवू नये, याची काळजी प्रशासनाने घेतली. अंत्योदय कुटुंब योजना, प्राधान्य कुटुंब आणि केशरी

लाभार्थ्यांना धान्य वाटप

कुटुंब लाभार्थी योजनेतील ४५ लाख नागरिकांना अन्नधान्याचे वितरण करण्यात आले. शिवभोजन योजनेच्या माध्यमातून गरजू, बेघर, स्थलांतरित कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार यांना भोजन उपलब्ध करून देण्यात आले.

कोरोना टेस्ट लॅब

राज्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील पहिली करोना टेस्ट लॅब अहमदनगर येथे कार्यान्वित झाली. त्यामुळे जिल्ह्यात चाचण्यांचे प्रमाण वाढवण्यास मदत झाली. दिवसाला (तीन पाळ्यांत) येथे ३०० स्त्राव चाचण्या घेण्याची क्षमता प्रस्थापित करण्यात आली आहे.

स्थलांतरित मजुरांची रवानगी

रेल्वेने उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार आदी राज्यांत १६ हजारांहून अधिक नागरिकांना रवाना करण्यात आले. याशिवाय, विविध बसेसद्वारे १५ हजारांहून अधिक नागरिकांना त्यांच्या राज्याच्या सीमांपर्यंत सोडण्यात आले.

लोकप्रतिनिधींचा सकारात्मक पाठिंबा

जिल्हा प्रशासनाच्या उपाययोजनांना जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी सकारात्मक प्रतिसाद दिला. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, पालकमंत्री हसन मुश्रीफ, मृद् व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख आणि आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी वारंवार विविध उपाययोजनांचा आढावा घेत कामकाजाला गती दिली. त्यामुळे कोरोनाचा लढा खऱ्या अर्थाने संपूर्ण जिल्ह्याचा झाला आणि आतापर्यंत तरी या कोरोनाला प्रभावीपणे रोखण्यात यशस्वी झाल्याचे चित्र दिसत आहे.

धुळे

पहिली प्रयोगशाळा

धुळे येथील श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेत (व्हायरल रिसर्च ॲण्ड डायग्नोस्टिक लॅबोरेटरी) कोरोना विषाणूच्या तपासणीस ३१ मार्च २०२० पासून सुरुवात झाली असून २८ मे २०२० पर्यंत ११ हजार नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे.

कोरोना विषाणूच्या प्रतिबंधासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून सुमारे चार कोटी रुपयांचा निधी औषधे व अत्यावश्यक यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी उपलब्ध करून दिला असून आवश्यकता असल्यास अधिक मदत करण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

अद्ययावत यंत्रणा

जळगाव

जळगाव जिल्ह्यात जिल्हा प्रशासन, आरोग्य प्रशासनाने केलेल्या उपाययोजना आणि त्रिस्तरीय रुग्ण तपासणी पद्धती यामुळे कोरोनाबाधित रुग्णांवर वेळीच उपचार करणे शक्य होत आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि जिल्हाधिकारी डॉ.अविनाश ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने कोरोना प्रतिबंधाचे उत्तम नियोजन केले आहे. जिल्ह्यात वाढती रुग्ण संख्या लक्षात घेता भुसावळ, चाळीसगावचे ट्रामा सेंटर, जळगाव शहरातील गणपती रुग्णालय, भुसावळचे रेल्वे रुग्णालय अधिग्रहित करण्यात आले. यात रुग्णांवर उपचार केले जातात. सोबतच ७८ कोविड केअर सेंटर, ३६ डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर, २४ डेडिकेटेड हेल्थ सेंटर सुरू करून तालुकास्तरावर ग्रामीण भागातील रुग्णांवर उपचार करण्याची सोय करण्यात आली आहे. जळगाव आयएमए संघटनेच्या १५० डॉक्टरांनी कोविड रुग्णांलयात सेवा देण्यास मान्यता दिली आहे.

चार विशेष रेल्वे गाड्या

केंद्र व राज्य शासनाने जेव्हा परप्रांतीयांना त्यांच्या राज्यास जाण्यास परवानगी दिली तेव्हा चार विशेष रेल्वे गाड्या जळगाव जिल्ह्यातून सोडण्यात आल्या. त्याचबरोबर एसटी बसेसमधून मध्य प्रदेश, तेलंगणा, झारखंड या तीन राज्यांच्या सीमेपर्यंत १० हजारांपेक्षा अधिक नागरिकांना सोडण्यात आले आहे.

निवारागृह सुविधा

जेव्हा परप्रांतीय मजूर रोजगार न मिळाल्याने त्यांच्या गावाकडे जाऊ लागले होते तेव्हा जिल्हा प्रशासनाने जळगावसह विविध ठिकाणी निवारागृहांची सोय केली. त्यात पाच हजार मजुरांची सोय करण्यात आली होती. स्वयंसेवी संस्था, व्यक्ती, महसूल कर्मचारी यांच्या मदतीने गरजूंना धान्य, किराणा, इतर वस्तू पुरवण्यात आल्या आहेत.

विभागीय माहिती कार्यालय, नाशिक

लातूर विभाग

प्रभावी नियोजन

मराठवाड्यातील लातूर, उस्मानाबाद, नांदेड आणि हिंगोली या चारही जिल्ह्यात राज्य शासनाकडून येणाऱ्या सूचनांची कडक अंमलबजावणी सुरू होती. त्याबरोबरच जिल्हाधिकारी पातळीवरही काही निर्णय घेतले जात होते. त्यांच्या काटेकोरपणे अंमलबजावणीमुळे कोरोनाला रोखण्यास जिल्हा प्रशासनास बऱ्यापैकी यश आले.

सर्वांचा सहभाग

जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी तातडीने उपाययोजना हाती घेतल्या. लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक यांच्या प्रभावी समन्वय आणि सहभागातून जिल्ह्यातील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात त्यांना यश मिळाले. लातूर महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका आहे जिथे हा लेख लिहीत असताना एकाही स्थानिकाचा कोरोनाबाधित रुग्ण म्हणून नोंद नाही. जिल्हाधिकारी २२ मार्चपासून रोज सायंकाळी साडेसात ते आठ या कालावधीत जनतेशी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून संवाद साधत आहेत.

लॉकडाऊनच्या पाचव्या टप्प्यात लातूरची गंजगोलाई बाजारपेठ व जिल्ह्यातील जवळपास ९० टक्क्यांपेक्षा अधिक उद्योग-व्यवसाय सुरू झाले आहेत. गंजगोलाईचा भाग ग्राहकांनी गजबजून गेला असला तरी पूर्णपणे फिजिकल डिस्टन्सचे आणि प्रशासनाने दिलेल्या सर्व सूचनांचे पालन काटेकोरपणे केले जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: मोटारसायकलवरून त्या भागात पेट्रोलिंग केली आणि त्या भागातील व्यापारी, व्यावसायिक यांच्याशी संवाद साधला.

व्हॉट्सॲप ग्रुपचा उत्तम वापर

लातूर जिल्ह्यात एकूण ३० कंटेन्मेंट झोन होते. त्यापैकी ४ कंटेन्मेंट झोन बंद करण्यात आले आहेत. कंटेन्मेंट झोन निर्धारित केलेल्या भागात त्या भागातील १०० घरातील प्रमुख, प्रतिनिधी यांचा व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आला आहे. या ग्रुपमध्ये कॉमन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक, गटविकास अधिकारी, नगर परिषद, नगर पंचायतचे मुख्याधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, अत्यावश्यक सेवा घरपोच पुरवण्यासाठी सेवानिहाय चार अधिकारी (उदा. औषधी पुरवठा, पाणीपुरवठा, किराणा व दूध, भाजीपाला व फळे) हे अधिकारी या ग्रुपमध्ये असणार आहेत. निर्धारित कंटेन्मेंट झोनमधील १०० घरांतील प्रमुख, प्रतिनिधी यांचे व्हॉट्सॲप क्रमांक संकलित करून त्यांना जीवनावश्यक वस्तूचा पुरवठा घरपोच करण्याची जबाबदारी अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्या चार अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे. प्रत्येक कंटेन्मेंट झोनमध्ये स्वतंत्र व्हॉट्सॲप ग्रुप करण्यात आले आहेत. हे ग्रुप तयार करण्याची जबाबदारी संबंधित तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

संस्थात्मक क्वारंटाइन नागरिकांचे समुपदेशन करताना आरोग्य व पोलीस यंत्रणा.

याबरोबरच तालुकानिहाय एक स्वतंत्र व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून त्यात कॉमन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक किंवा अपर पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. या ग्रुपमध्ये तालुकास्तरावरील संबंधित अधिकारी तसेच ग्रामस्तरावरील सरपंच, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी आदींचा समावेश करण्यात आला आहे. हा व्हॉट्सॲप ग्रुप जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी तयार केला आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी तालुका आणि गावस्तरावरील अधिकारी, कर्मचारी यांना संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी ॲड करत आहेत. हे व्हॉट्सॲप ग्रुप कंटेन्मेंट झोनमधील नागरिकांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने व त्यांना जीवनावश्यक सुविधा पुरवण्यासाठी तसेच क्लस्टर कंटेन्मेंट प्लॅनच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तयार करण्यात आले आहेत. तसेच या प्रत्येक कंटेन्मेंट झोनमध्ये विशेषता एका महिला अधिकारी यांची आवर्जून नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे महिलांना संवाद साधताना अडचण येत नाही. विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी या सर्व बाबींचे कौतूक करून या

ॲन्टी कोरोना फोर्स

घरातून बाहेर जाण्यासाठी घरातील एका व्यक्तीची ॲन्टी कोरोना पोलीस (एसीपी) म्हणून निवड करण्याची हाक जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी दिली होती. याची सुरुवात जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी त्यांच्या घरातूनच त्यांच्या मुलीची ॲन्टी कोरोना पोलीस म्हणून निवड करून केली. त्यास जिल्ह्यात उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

बाबी इतर जिल्ह्यांतही सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

ॲन्टी कोरोना फोर्सच्या हाकेला प्रतिसाद

लातूर जिल्ह्यातील सर्व ९२९ गावामध्ये ॲन्टी कोरोना फोर्सची स्थापना करण्याची हाक जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी दिली. त्यास गावांनी चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे जिल्ह्यात १५३१ ठिकाणी या कोरोना फोर्सच्या नाक्यांची स्थापना झाली आहे. या सर्व नाक्यांवर १२ हजार ९७९ व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली आहे.

हिंगोली

जिल्ह्यात कोरानाशी लढा देण्याकरिता सक्षम आरोग्य यंत्रणा तयार करण्यात आली आहे. याकरिता दोन टी (टेस्ट ॲण्ड ट्रीट), एक सीसीसी (कोरोनो केअर सेंटर) डीसीएचसी (डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर), डीसीएच (डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल) अशी दोन हजार खाटांची व्यवस्था असलेली आरोग्य यंत्रणा उभारण्यात आली आहे. तसेच कोरोनाबाधित रुग्णांचे समुपदेशन करण्यात येत आहे. रुग्णांचा शोध घेऊन त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना शोधण्यासाठी पोलीस विभागाच्या सायबर शाखेची मदत घेण्यात येते. जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांनी दक्षिण कोरिया आणि जर्मनीमध्ये राबवण्यात आलेल्या मॉडेलची माहिती दिल्याने जिल्ह्यात कोरोनाबाबतच्या उपाययोजना राबवण्यास अधिक फायदा झाला. जिल्हा व ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, आरोग्य सेवकांनीही देशसेवेच्या भावनेने काम केले. तसेच बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या व्यक्तींची तपासणी करून त्यांना विलगीकरणात ठेवण्यासाठी जिल्ह्यातील पाचही तालुक्यांत गावनिहाय व्हीआरआरटी पथकाची स्थापना करण्यात आली. या पथकामार्फत ४२ हजार ५३८ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. याकरिता जिल्ह्यातील १००८ आशा स्वयंसेविका, ३७ गट प्रवर्तक, १२१४ अंगणवाडी कार्यकर्त्या, ५०० आरोग्य कर्मचारी, ११९ समुदाय आरोग्य अधिकारी, ६४ तालुका वैद्यकीय अधिकारी व ५ तालुका आरोग्य अधिकारी यांच्यासह शिक्षण, कृषी व नगरपालिका आदी विभागांचे कर्मचारी याकरिता कार्यरत आहेत. सोशल डिस्टन्सिंगचे पालन व्हावे याकरिता जिल्ह्यात एक दिवसाआड किराणा माल आणि भाजीपाला दुकाने सुरू ठेवण्यात आली होती. औषधी दुकान व इतर अत्यावश्यक सेवेसाठी नियोजन करण्यात आले.

लॉकडाऊनच्या कालावधीत जिल्ह्यातील नागरिक उपाशी राहू नये याकरिता अन्नधान्य पुरवठा विभागामार्फत विविध उपाययोजना करण्यात आल्या. जिल्ह्यातील ३१ हजार १२ शिधापत्रिकाधारकांना सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून १८ हजार ८३ मेट्रिक टन अन्नधान्याचे वितरण करण्यात आले. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन सुरू असल्याने गरजू व्यक्तींच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेली शिवभोजन योजना

शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून लाभार्थ्यांना धान्य वाटप.

या गरजूंसाठी वरदान ठरली. जिल्ह्यात सुमारे १ लाख २५ हजार लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला. बाहेरील राज्यांतील व जिल्ह्यातील २ हजार २९२ नागरिकांसाठी जिल्ह्यात १८ ठिकाणी निवारागृहे सुरू करून त्यांची राहण्याची व भोजनाची सोय करण्यात आली. १३ ठिकाणी कम्युनिटी किचन सुरू करून गरजू नागरिकांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. अंगणवाडीतील सुमारे ४८ हजार बालकांना घरपोच आहार देण्यात येत आहे. तसेच नगर परिषदेमार्फत जागोजागी हात धुण्याकरिता सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच जिल्ह्यातील विविध भाग आणि शहरातील रस्त्यांवर फवारणी करण्यात आली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या शालेय शिक्षण मंत्री तथा हिंगोली जिल्ह्याच्या पालकमंत्री प्रा.वर्षा गायकवाड या हिंगोली दौऱ्यावर आल्या होत्या. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना आखून दिल्या, त्याचाही मोठा लाभ झाला.

नांदेड

जिल्हा रेड झोनपासून सुरक्षित

नांदेड जिल्ह्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढणार नाही याकरिता सुरुवातीपासूनच जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी नियोजन केले.

रोजगार व शिक्षणासाठी विविध परराज्यातून आलेले श्रमिक कामगार, मजूर, विद्यार्थी, नागरिक देशात टाळेबंदी लागू झाल्याने नांदेड जिल्ह्यात अडकले होते. या अवस्थेत या नागरिकांची जिल्ह्यात विविध मंगल कार्यालये व शिबिरांमध्ये निवास, नाष्ट्यासह दोन वेळचे जेवण, आरोग्याची उत्तम सोय नांदेड जिल्हा प्रशासनाने व स्वयंसेवी संस्थांनी केली होती. या नागरिकांचे समुपदेशकांमार्फत समुपदेशनही केले होते.

टाळेबंदीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या विना शिधापत्रिकाधारकांना मे व जून २०२० या दोन महिन्यांच्या कालावधीत प्रतिव्यक्ती प्रतिमाह पाच किलो मोफत तांदूळ वितरण करण्यात आले आहे. जिल्हास्तरावर नांदेड शहरात चार शिवभोजन, तर तालुक्यात प्रत्येकी एक

याप्रमाणे १५ शिवभोजन केंद्रांची निवड केली आहे.

देशात टाळेबंदीमुळे अडकलेल्या उत्तर प्रदेश व बिहार राज्यातील जवळपास २ हजार ४८७ श्रमिक मजुरांना नांदेड जिल्हा प्रशासनाने हुजूर साहेब नांदेड रेल्वे स्थानक येथून विशेष श्रमिक रेल्वेने त्यांना त्यांच्या राज्यात पाठवण्यात आले.

नव्यानेच कोरोना नमुना स्वॅब तपासणी प्रयोगशाळा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे सुरू करण्यात आली आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रासह ३६ कोविड सेंटरची उभारणी करण्यात आली आहे. त्रिस्तरीय रचना असून २० कोविड केअर सेंटर आहेत. कोविड केअर सेंटरअंतर्गत जिल्ह्यात ३ हजार ४० बेडची व्यवस्था करण्यात आली आहे.

डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर्सअंतर्गत ७ रुग्णालये कार्यान्वित करण्यात आली आहेत. यात ४८० बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. डेडिकेटेड कोविड हॉस्पिटलअंतर्गत तीन शासकीय, तर सहा खासगी रुग्णालये कार्यान्वित करण्यात आली. तसेच डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड (बेडची व्यवस्था १६०), श्री गुरुगोविंदसिंघजी जिल्हा रुग्णालय नांदेड (बेडची व्यवस्था ५०) व उपजिल्हा रुग्णालय मुखेड (बेडची व्यवस्था ५०) अशा एकूण २६० बेडची व्यवस्था जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आली आहे. तसेच ६ खासगी रुग्णालयांमध्ये ५१० बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्ह्यात कोविड केअर सेंटर ३ हजार ४०, डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर्स ४८०, डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल ७७० अशी एकूण ४ हजार २९० बेडची व्यवस्था करण्यात आली आहे.

इतर जिल्ह्यांतून व राज्य सीमेवरून कोरोना विषाणू संक्रमित रुग्ण नांदेड जिल्ह्यात प्रवेश करू नये, यासाठी नांदेड जिल्ह्याच्या जिल्हा व राज्य सीमेवर लावण्यात आलेल्या २५ चेकपोस्टवर इन्फ्रारेड थर्मामीटर मशीनचे (ताप तपासणी उपकरण) वाटप करण्यात आले आहे.

कंटेनमेन्ट झोनमध्ये मोटारसायकलवर कोविड पेट्रोलिंगमुळे पोलिसांवरील बंदोबस्ताचा ताण कमी होत असून ही मोटार सायकल कंटेनमेन्ट झोनमध्ये पेट्रोलिंगदरम्यान पी.ए. सिस्टिमद्वारे नागरिकांना सतत कोरोना विषाणू आजाराबाबत जनजागृती करून त्यांना घरात राहण्याबाबत आवाहन केले जाते. जिल्ह्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ॲन्टी कोरोना कवच / फोर्सची स्थापना जिल्हाधिकारी डॉ. विपिन यांनी केली आहे.

उस्मानाबाद

कोरोनाची बाधा रोखण्यासाठी उस्मानाबाद जिल्हा प्रशासनाने आकाशवाणी माध्यमाचा उत्तम उपयोग केला. त्यासाठी उस्मानाबाद आकाशवाणी केंद्रावरून जिल्ह्यात कोरोना विषाणूचा शिरकाव होऊ नये, यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे आणि नागरिकांनी नियमांचे स्वत:हून पालन करावे यासाठी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी आवाहन केले. उस्मानाबाद जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन कोरोनामुक्तीचा निर्धार केला. हजारो नागरिकांनी न्यूज ऑन एअर (News on air) हे ॲप्लिकेशन गुगल प्ले-स्टोरमधून आपल्या मोबाइलमध्ये डाऊनलोड करून या कोरोनाविरुद्धच्या लढाईत प्रशासनाला सहकार्य करण्याची शपथ घेतली.

उस्मानाबादच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे दिलेल्या पत्रास जनतेने सकारात्मक प्रतिसाद देऊन सहकार्य केले.

विभागीय माहिती कार्यालय, लातूर

अमरावती विभाग

संसर्गाला वेळीच पायबंद

कोरोनाच्या संसर्गाला अमरावती विभागही अपवाद राहिला नाही. मात्र प्रशासनाने केलेल्या विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे अपवाद वगळता मोठ्या संसर्गाला वेळीच पायबंद घातला गेला. त्याचा परिणाम म्हणून सुरुवातीला ज्या भागात रुग्ण आढळून आले, त्या ठिकाणी आता नवे रुग्ण सहसा आढळून येत नाहीत.

वाशिम

फिव्हर क्लिनिक

अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांपैकी वाशिम जिल्ह्यात आतापर्यंत सर्वात कमी संसर्ग झाला. जिल्ह्याच्या सीमेवरील चेक पोस्टवरच आरोग्य तपासणी होत असल्याने जिल्ह्यात कोरोनाला 'ब्रेक' लागला. आतापर्यंत सुमारे ३५ हजारांवर नागरिकांची तपासणी झाली. या चेक पोस्टवरूनच ८ कोरोनाबाधित व्यक्तींना

संग्रहित छायाचित्र

अनेक ठिकाणी असे फिव्हर क्लिनिक उभारण्यात आले आहेत.

थेट रुग्णालयात दाखल करण्यात आले.

गावातील संसर्ग रोखण्यासाठी जिल्ह्याबाहेरून येणाऱ्या नागरिकांची माहिती देण्याची जबाबदारी ग्रामस्तरीय समितीवर सोपवण्यात आली. या समितीतर्फेच आरोग्य तपासणी आणि विलगीकरणाचे कार्य जबाबदारीने पार पाडण्यात आले.

प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी 'फिव्हर क्लिनिक' उभारले असून सर्दी, खोकला, तापावर या ठिकाणी उपचार केले जात आहे. जिल्ह्यात १० कोविड केअर सेंटर (८१० बेड्स), ३ कोविड हेल्थ सेंटर (१८० बेड्स) व १ डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल (५० बेड्स) सज्ज ठेवले आहेत.

बुलडाणा

कोरोना साखळी खंडित

जिल्ह्यातील २२ प्रतिबंधित क्षेत्रात नियमित स्वरूपात सर्वेक्षण करण्यात येत असल्यामुळे सध्या स्थिती नियंत्रणात आहे. कोरोना नियंत्रणात पोलिसांची कामगिरी महत्त्वाची आहे. दुर्दैवाने त्यांना कोरोनाचा संसर्ग झाल्यास त्यांचा संपर्क शोधण्यासाठी प्रत्येक पोलिसाला छोटी डायरी देण्यात आली आहे. यात पोलिसांनी कुठे-कुठे भेटी दिल्या, याची नोंद ठेवायची आहे.

लॉकडाऊनच्या काळात गरजू नागरिकांना अन्नधान्याचे वाटपही महत्त्वाचे होते. प्रशासनाच्या चोख नियोजनामुळे जिल्ह्यात उद्दिष्टाच्या ९६.३९ टक्के धान्याचे वितरण झाले. लॉकडाऊनच्या काळात कुठल्याही धान्याची टंचाई झाली नाही.

अमरावती

आरोग्य यंत्रणा सक्षम

शहरात सुरुवातीला केवळ पाचच रुग्ण होते. त्यानंतरच्या काळात रुग्ण आढळून येत नसले तरी प्रशासन आणि महापालिकेने शहरातील प्रत्येक क्षेत्रासाठी नियोजन केले. हैदरपुऱ्यातील बाधितांकडून स्थानिक नागरिकांना संसर्ग होऊ नये म्हणून परिसरात विशेष खबरदारी घेण्यात आली.

कोरोनाबाधितांची संख्या पाहता कोरोना प्रतिबंधासाठी परिसरनिहाय सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे. महापालिकेकडून कंटेनमेंट व इतर परिसरासाठी विविध पथके नियुक्त करण्यात आली. पथकांमार्फत कंटेनमेंट झोनमध्ये पोलीस विभाग व महानगरपालिका यांच्या समन्वयाने या क्षेत्रावर नियंत्रण व अत्यावश्यक सुविधा पुरवण्यात येत आहेत. ही पथके संशयितांवर लक्ष ठेवणे, कंटेनमेंट झोनच्या बाहेर निघू न देणे, तसेच बाहेरच्या व्यक्तींना आतमध्ये प्रवेश न देणे, आरोग्य सुविधा, सर्वेक्षण, हाय रिस्क व लो रिस्क संपर्कातील व्यक्तींना क्वारंटाईनसाठी सहकार्य करणे, आजाराचा प्रसार रोखण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

महानगरपालिकेचे सहायक क्षेत्रीय अधिकारी हे पथक प्रमुख आहेत. त्यांच्यासह वैद्यकीय अधिकारी व पोलीस अधिकारी यांच्यासह विविध कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात कोरोना चाचणी प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्याने मोठी सोय झाली. येथील डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालयात प्रयोगशाळेचे काम अंतिम टप्प्यात असून ही प्रयोगशाळाही लगेच कार्यरत होईल. त्यामुळे नागपूरला नमुने पाठवायला लागत नसल्याने वेळ वाचला आहे.

यवतमाळ

प्रत्येक घराचे सर्वेक्षण

जिल्ह्याचा १२ मार्चपासून कोरोनाशी लढा सुरू आहे. योग्य उपचारासह रुग्णांचे पहिल्या दिवसापासूनच मनोबल उंचावण्यासाठी समुपदेशन करण्यात आले. रुग्ण ज्या भागात वास्तव्यास होते, त्यांच्या निकट संपर्कात असलेल्यांचा शोध घेऊन रुग्णालयात दाखल करण्यासोबतच क्षेत्र प्रतिबंधित करण्याची प्रक्रिया काटेकोरपणे पाळली गेली. अंगणवाडी सेविका, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक यांच्यामार्फत प्रत्येक घराचे सर्वेक्षण करण्यात येत आहे.

लॉकडाऊनच्या काळात मुस्लिमधर्मीयांचा रमजान हा महत्त्वाचा सण आला. रमजान ईदनिमित्त इंदिरानगर येथे ९०० धान्य किट आणि ९०० दूध पाकिटांचे वितरणही करण्यात आले. कोरोनाबाबत सामाजिकस्तरावर कार्य करताना दुसऱ्या बाजूने वैद्यकीय सोयी-सुविधाही सक्षमपणे उभी राहिली आहे. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ५०० खाटांची व्यवस्था, जिल्ह्यातील १२ कोविड केअर सेंटरमध्ये दोन हजार ७०० खाटांची सुविधा, तर कोविड हेल्थ सेंटरमध्ये ५८० खाटांची सुविधा तयार आहे.

९१ फिव्हर क्लिनिकद्वारे ठिकठिकाणी सर्दी, ताप, सारीची लक्षणे तपासली जातात आहेत. जिल्हा प्रशासनाने ३०० पल्स ऑक्सिमीटर उपलब्ध करून दिले आहेत. १६ तालुक्यांच्या ठिकाणी 'मोबाइल फिव्हर क्लिनिक' सुरू केले.

अकोला

संसर्गाच्या पहिल्या दिवसापासून बैदपुरा हॉटस्पॉट ठरला. दाट वस्तीच्या वस्तीमुळे संसर्ग रोखणे हे महानगरपालिका, महसूल आणि पोलीस यंत्रणेसमोर आव्हान होते.

पहिला रुग्ण आढळल्यापासून येथील प्रतिबंधित क्षेत्र म्हणून बंद करण्यात आले. दाट लोकवस्ती असल्याने स्थानिक विक्रेत्यामार्फतच दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यास सुरुवात केली. प्रतिबंधित क्षेत्रातीलच ग्राहक आणि विक्रेते असल्याने बाहेरचा संपर्क झाला नाही. आरोग्याच्या सुविधेसाठी प्रशासनाने येथे 'कम्युनिटी क्लिनिक' सुरू केले. या भागात तब्बल ३६ हजार १९० तपासण्या झाल्या.

त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोकांचे स्क्रीनिंग करणे शक्य झाले. मध्यंतरी बैदपुरा भागातील रुग्ण संख्या वाढली, परंतु त्यामुळे संसर्गित लोक कोण? हे लवकर लक्षात आले. त्यांना तातडीने क्वारंटाईन वा आवश्यकतेनुसार उपचारासाठी विलगीकरणात ठेवण्यात आले. त्यामुळे समूहसंक्रमण रोखता आले.

मेळघाटात अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी गर्भवती महिला आणि स्तनदा मातांना घरपोच पोषण आहार दिला. यवतमाळ

जिल्ह्यात बचत गटांनी मास्कची निर्मिती मोठ्या प्रमाणावर केली. बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यात वाडी-वस्त्यांवर स्वस्त धान्य दुकानामार्फत अन्नधान्य पोहोचवण्याची काळजी घेतली गेली.

विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

कोकण विभाग

नवनिर्मिती आणि कोविड-१९

कोविड-१९ च्या काळातील लढ्यात कोकण विभागाने आपत्तीमधूनही नव्या निर्मितीचा वसा कायम ठेवला आहे. केवळ कोकणासाठीच नव्हे तर देशासाठी म्हणून कामास येईल अशी नवनिर्मिती कोकण विभागाने केली आहे संकट काळात आपले योगदान सिद्ध केल्याचे चित्र दिसून आले आहे.

ठाणे

व्हेंटिलेटरची निर्मिती

देशाच्या शस्त्रनिर्मितीमध्ये महत्त्वाचा वाटा बजावणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथच्या आयुध निर्माणी कंपनीने देशात कोरोना अधिक बळावल्यास व्हेंटिलेटर कमी पडू नयेत म्हणून लॉकडाऊनच्या काळात उपलब्ध मोटार आणि काही पॅरामेडिकल सुटे भाग या साधनसामग्रीमधून व्हेंटिलेटर तयार केले आहेत. रुग्णांच्या गरजेनुसार दर मिनिटाला १२ ते ३० वेळा श्वास घेता येऊ शकणारी व्यवस्था या व्हेंटिलेटरमध्ये आहे. थेट वीज आणि बॅटरी अशा दोन्ही पद्धतीने हे व्हेंटिलेटर काम करते. तीन तासाचा बॅटरी बॅकअप असल्याने रुग्णवाहिकेत रुग्णाला त्याचा सहज उपयोग होऊ शकतो. या व्हेंटिलेटरची किंमत अवघी २५ हजार रुपये आहे. आवश्यकता भासल्यास महिनाभरात दोन हजार व्हेंटिलेटर तयार करण्याची क्षमता आयुध निर्माणी कंपनीकडे आहे. संपूर्ण देशासाठी याचा फायदा होणार आहे.

ब्लूटूथ रिमोट यंत्र

ठाण्याच्या वागळे इस्टेट औद्योगिक क्षेत्रातील सीएम टेक्नोलॉजी या कंपनीतील अमित अबाड व त्यांच्या मित्रांनी मिळून तापाची तपासणी करण्यासाठी ब्लूटूथ रिमोट यंत्राची निर्मिती केली आहे. कोरोना रुग्णांच्या संपर्कात आलेले तसेच विलगीकरणात असलेल्यांच्या शरीराचे तापमान सतत तपासण्यासाठी तापमापी असलेले एक छोटे यंत्र संबंधित व्यक्तीच्या काखेच्या खाली चिकटवावे लागते. या यंत्राला ब्लूटूथची जोडणी करून ते 'आरोग्य सेतू'सारखे ॲप्लिकेशन किंवा रुग्णालयाच्या तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या संगणक प्रणालीशी सहज जोडता येते. या यंत्रामुळे संबंधित यंत्रणेला रुग्णाचे किंवा संशयित व्यक्तीच्या शरीराच्या तापमानाची माहिती वेळोवेळी स्वयंचलित पद्धतीने मिळत राहते. अमित अबाड आणि त्यांच्या चमूने या उपकरणाची किंमत केवळ १ हजार २०० ते १ हजार ५०० इतकी कमी ठेवली आहे. कोरोनानंतरही रुग्णालयाच्या व्यवस्थापनेत हे यंत्र कामात येऊ शकते.

को-रोबोची निर्मिती

ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवलीत कोरोना संसर्ग गतिमान झाला. रुग्णांच्या संपर्कात येणाऱ्या परिचारिका, डॉक्टरांना कोरोनाची लागण मोठ्या प्रमाणात होत आहे. हे टाळण्यासाठी रुग्णांना औषधे, गोळ्या, जेवण देण्यासाठी खास रोबोची निर्मिती डोंबिवलीकर तरुण प्रतिक तिरोडकर यांनी केली. या रोबोला त्यांनी 'को-रोबो' असे नाव दिले आहे. यात एक डिस्प्ले स्क्रिन, कॅमेरा आणि एक स्पिकरदेखील आहे. तसेच नाव सॅनिटायझर, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या रोबोला इंटरनेटच्या माध्यमातून कार्यान्वित करण्याची सुविधा आहे. लॉकडाऊनच्या काळात मर्यादीत यंत्रसामग्रीत हा रोबो तयार करण्यात प्रतिकला यश मिळाले आहे. सद्या हा प्रयोग प्राथमिकस्तरावर सुरू आहे.

पिंक आर्मी मैदानात

ठाणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प राबवला जातो. जिल्ह्यात १८५४ अंगणवाड्या कार्यरत आहेत. या अंगणवाड्यांमधील सेविका उर्फ पिंक आर्मीमार्फत शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालके, गरोदर माता, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींना पूरक आहार पुरवणे, आरोग्य तपासणी, लसीकरण संदर्भसेवा, आरोग्य शिक्षण इत्यादी नित्याची कामे कोरोनाच्या काळात घरोघरी जाऊन केली जात आहेत. कोरोना संबंधित लोकांमध्ये जनजागृती, रुग्ण आढळून आल्यास त्या क्षेत्रात सर्वेक्षण सहभाग, लाभार्थ्यांची घरोघर जाऊन विचारपूस आवश्यक तेथे आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधून

संबंधितांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्यासाठी अंगणवाडी सेविका तत्परतेने काम करत आहेत.

पालघर

कोविड चाचणी लॅब

या पूर्वी पालघर जिल्ह्यातील कोरोना संशयित रुग्णांची घशातील स्वॅब टेस्टिंग मुंबई येथे करण्यात येत होती. हे अहवाल प्राप्त होण्यासाठी किमान ३ ते ४ दिवसांचा कालावधी लागत होता. आता जिल्ह्यातच ही चाचणी लॅब सुरू झाल्याने प्रशासनास जास्तीत जास्त चाचण्या करणे शक्य होणार आहे आणि कोरोना चाचणी अहवालास गती मिळणार असल्याने निदान झालेल्या पॉझिटिव्ह कोरोना रुग्णांवर तातडीने उपचार करणे शक्य होणार आहे. डहाणू येथील कॉटेज हॉस्पिटलच्या

कोविड चाचणी प्रयोगशाळा

प्रांगणात मॉडर्न रुरल हेल्थ सेंटर बिल्डिंगमध्ये ही लॅब सुरू करण्यात आली आहे. आयसीएमआरच्या गाईडलाईनप्रमाणे या तपासण्या केल्या जाणार आहेत. पालघर हा आदिवासी बहूल जिल्हा आहे. डहाणू उपजिल्हा रुग्णालयात कोरोना चाचणीचे विशेष केंद्र स्थापन झाल्याने डहाणूसह पालघर जिल्ह्यासाठी ही दिलासादायक बाब ठरली आहे.

रायगड

मुक्या प्राण्यांसाठी मानवता संदेश

बोलू शकणाऱ्या माणसांसाठी सर्वच

मदतीसाठी पुढे येतात. परंतु रायगड जिल्ह्यात मुक्या प्राण्यांसाठी पशुसंवर्धन विभागसुद्धा अहोरात्र झटत आहे. पशुपक्षीसुद्धा निसर्गाच्या जीवसृष्टीचा अविभाज्य घटक आहे. त्यांचे अस्तित्व मानवजातीच्या प्रगतीसाठी, जीवनासाठी आवश्यक आहे. काळाची गरज ओळखून मोकाट जनावरांच्या चारापाण्याची व्यवस्था करण्यासाठी नोंदणीकृत गोशाळा, सेवाभावी संस्था, दानशूर व्यक्ती यांची मदत घेऊन या सत्कर्माचा विडा पशुसंवर्धन विभागाच्या पशुवैद्यकांनी, कर्मचाऱ्यांनी आणि काही स्वयंसेवी संस्थांनी उचलला. अथक प्रयत्न केले आणि नवीन पायंडा निर्माण केला.

पेणच्या श्रीमती सीमा शांतीलाल पुनमिया यांची पंख फाऊंडेशनच्या वतीने मुक्या प्राण्यांची भूक शमवण्यासाठी फूड बँकची स्थापना केली आहे. माथेरान या पर्यटनस्थळी जवळपास ४५० घोड्यांचा वाहतुकीसाठी केला जातो. जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या पुढाकारातून या घोड्यांसाठी डॉ. जयराम यांच्या मदतीने प्राथमिक स्वरूपात ३०० किलो गोदरेज कंपनीचे पौष्टिक अश्वखाद्य वाटप करण्यात आले. माणसासोबतच मुक्या जनावरांसाठीचा रायगड पॅटर्न यामुळे पुढे आला. पालकमंत्री ना. आदितीताई तटकरे यांच्या सुयोग्य मार्गदर्शनामुळे रायगडमधील मुक्या जनावरांना या काळातही विशेष काळजी घेता आली हे महत्त्वाचे आहे!

विभागीय माहिती कार्यालय, कोकणभवन

कोल्हापूर विभाग

क्वारंटाईनचा कोल्हापूर पॅटर्न

रेड झोनमध्ये असणाऱ्या जिल्ह्यातून बऱ्याचशा प्रमाणात कोल्हापूर जिल्ह्यामध्ये लोक येत आहेत. त्यांचा स्वॅब घेतल्यानंतर त्याचा अहवाल निगेटिव्ह आल्यानंतर पुढील १४ दिवस संस्थात्मक अलगीकरण करावे लागते. यावर पर्याय शोधून खासदार धैर्यशील माने यांनी नवा पॅटर्न करण्यास प्रारंभ केला आहे. निगेटिव्ह आल्यानंतर त्यांच्या घरामध्ये ते राहण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचे घर रिकामे करायचे आणि त्या घरात राहत असणाऱ्या त्यांच्या सदस्यांनी आपल्या भाऊबंदांकडे किंवा शेजाऱ्यांकडे राहायचे. पुढील १४ दिवस संपर्कात यायचे नाही. त्या घरावर फलक लावून त्यावर अलगीकरण कालावधी लिहायचा. त्यांच्या खाण्या-पिण्याची सोय त्यांच्या घरच्या लोकांनीच करायची. येणाऱ्या लोकांची सोय करण्यात प्रशासनाला मर्यादा येत आहेत. त्यामुळे गावच्या सुरक्षिततेसाठी गावाच्या मदतीने या नव्या पॅटर्नची सुरुवात शाहुवाडी-पन्हाळा तालुक्यातून करण्यात येत आहे.

मुस्लिम समाजाचे योगदान अतुलनीय!

कोरोनाच्या संकटकाळात पवित्र रमजान ईदच्या दिवशी मुस्लिम समाजाने इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयातील अतिदक्षता (आयसीयू) विभाग सुरू करण्यासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. जात-पात, धर्म-भेद बाजूला ठेवून कोरोनाच्या उच्चाटनासाठी एकजुटीने लढा देण्यासाठी इचलकरंजीतील हे योगदान आदर्शवत आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या वतीने केलेल्या आवाहनानुसार मुस्लिम समाजाने ईदमधील अनावश्यक खर्चाला फाटा देत रमजानच्या पवित्र महिन्यातील जकात, सदका आणि इमदादची रुपये ३६ लाखांची रक्कम कोरोनाविरुद्धच्या लढाईसाठी दिली. या रकमेतून इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयात १० बेडचा अतिदक्षता विभाग सुरू करण्यात आला आहे.

क्वारंटाईनसाठी खासदारांचे घर

निगेटिव्ह अहवालानंतर कराड येथून रुकडीत परतणाऱ्या विद्यार्थ्याला खासदार धैर्यशील माने यांनी स्वत:चं घर देऊन 'आपुलकी गृह' या कोल्हापुरी पॅटर्नची सुरुवात स्वत:पासून केली. आपुलकी गृहाच्या माध्यमातून गावातील भाऊबंदकीतील कडवटपणा संपवून बंधुभाव वाढीस लागेल हा संदेश या निमित्ताने खासदार श्री. माने यांनी दिला. प्रत्यक्ष कृतीतून स्वत:चे घर देणारे देशातील पहिले खासदार असतील. गृह अलगीकरणाच्या या संकल्पनेला 'आपुलकी गृह'चे नाव देत या कोल्हापुरी पॅटर्नला हातकणंगले तालुक्यातील रुकडी येथील स्वत:चे घर देऊन प्रत्यक्षात उतरवले आहे.

२४ तास केअर

लॉकडाऊनच्या कालावधीत रेड झोनमधून मोठ्या प्रमाणात परवानगी घेऊन येणाऱ्या प्रवाशांसाठी जिल्ह्यात १३ ठिकाणी स्वॅब घेण्याची सोय करण्यात आली आहे. जिल्ह्यात प्रादुर्भाव होऊ नये यासाठी कागल तपासणी नाक्याजवळील कोविड काळजी केंद्र प्रादुर्भाव रोखण्यासाठी २४ तास सेवा बजावत आहे. बाहेरच्या जिल्ह्यांमधून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्रवेश करण्यासाठी एकूण २० ठिकाणी तपासणी नाके आहेत. या नाक्यांमधून रीतसर परवानगी घेऊन येणाऱ्या प्रवाशांना नोंदणी करून प्रवेश दिला जातो. त्याचबरोबर त्यांची वैद्यकीय तपासणी केली जाते.

जिल्ह्यामध्ये एकूण ४१ ठिकाणी कोविड काळजी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली असून १३ ठिकाणी स्वॅब कलेक्शनची सोय करण्यात आली आहे. कर्नाटक सीमा भागातून कोल्हापूरमध्ये येणाऱ्यांसाठी कोगनोळी टोल नाक्याशेजारी हे कोविड काळजी केंद्र उभे करण्यात आले आहे. संस्थात्मक अलगीकरणासाठी ४० बेड्सची सुविधा, तर माईल्ड रुग्णांसाठी १२ बेड्सचे रुग्णालय केले आहे. जवळच असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहामध्ये १०० जणांची सोय करण्यात आली आहे. या ठिकाणीही संस्थात्मक अलगीकरण करण्यात येते.

सांगली

'लॉकडाऊन'चे अचूक नियोजन

संपूर्ण जगात कोरोना विषाणूचे थैमान सुरू असून प्रत्येक देश आपापल्या पातळीवर या विषाणूचा प्रतिबंध रोखण्यासाठी प्रयत्न करत आहे. आपल्या देशात आणि राज्यातही कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आहे. त्याचा प्रतिबंध करण्यासाठी इस्लामपूर-सांगलीने एक नवा पॅटर्न निर्माण केला आहे. इस्लामपूरमध्ये असलेले कोरोनाचे चौदा रुग्ण बरे होऊन स्वगृही परतले. ही बाब निश्चितच आनंददायी अशीच आहे. जनतेचे सहकार्य, शासनाचे कार्य आणि पालकमंत्री जयंत पाटील यांच्या प्रयत्नांची पराकाष्ठा या त्रिसूत्रीने कोरोनास प्रतिबंध केला. हा पॅटर्न निश्चितच अनुकरणीय असा आहे.

सांगली जिल्ह्यात कोरोनाबाधितांचा आकडा १०० च्या वर गेला असला तरी उपचाराखालील रुग्णांची संख्या ४७ आहे. कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व आरोग्य यंत्रणेने त्वरेने केलेल्या उपाययोजना कौतुकास्पद आहेत. ऑक्सिजन, व्हेंटिलेटर्स, औषधसाठा याबरोबरच कोरोनाबाधितांवर उपचार करणाऱ्या वैद्यकीय मनुष्यबळाला आवश्यक संरक्षक सामग्री उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सिंधुदुर्ग

शर्थीचे प्रयत्न

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आतापर्यंत २४ जण कोरोनाबाधित आढळले आहेत. तर जिल्हा आरोग्य यंत्रणेमार्फत एक हजारपेक्षा जास्त नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. रोज सुमारे ६० नमुने तपासणीसाठी कोल्हापूर येथे पाठवण्यात येत आहेत. जिल्ह्याबाहेरून येणाऱ्यांना गृह अलगीकरणात ठेवण्यात येत आहे. तसेच काही व्यक्तींना संस्थात्मक अलगीकरणात ठेवण्यात येते. त्यांची सोय व्हावी यासाठी ग्रामपातळीवर अलगीकरणासाठी ग्राम समिती, नागरी भागात वॉर्ड समिती स्थापन करण्यात आली असून त्यांनी गावातील अलगीकरणात लोकांना ठेवता येतील अशा जागा निश्चित केल्या आहेत.

जिल्ह्यात सापडणाऱ्या रुग्णांच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेऊन त्यांचेही नमुने तपासणीसाठी पाठवले जात आहेत. तसेच जिल्ह्यात रुग्ण सापडलेल्या ठिकाणी बाधित क्षेत्र घोषित करून या क्षेत्रातील व्यक्तींची आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. जिल्ह्यात सध्या ९४ फिव्हर क्लिनिक कार्यरत असून त्यासोबतच १७ संस्थांमध्ये कोविड केअर सेंटर, ४ डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर व १ डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल कार्यरत आहेत.

विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

“कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. अवघ्या जगाला या विषाणूने विळखा घातला आहे. सर्व वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि समाजमाध्यमांनाही त्याने व्यापून टाकले आहे. त्यावर लस येईल तेव्हा येईल, मात्र सध्या तरी हा आजार नेमका काय आहे, काय खबरदारी घ्यायला हवी, त्याची लक्षणे काय, तो होतो कसा आणि त्यापासून दूर कसे राहायचे या सर्व प्रश्नांची उत्तरे सर्वांना माहीत हवीतच, तेव्हाच आपण त्यापासून दूर राहू शकतो. जाणून घेऊया या विषाणूविषयी व घ्यावयाच्या काळजीबाबत..”

कोरोनाला ठेवूया दूर

संपूर्ण जगाची अपरिमित जीवित व आर्थिक हानी करणारे ‘कोरोना’ हे एका विषाणू समूहाचे नाव आहे. हे विषाणू भारताला पूर्वीपासून माहीत आहेत. २००३ मध्ये आढळलेला सार्स हा आजार किंवा २०१२ मध्ये आढळलेला मर्स हा आजार हेसुद्धा कोरोना विषाणूमुळे होणारे आजार आहेत. परंतु डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या वुहान शहरात सुरू झालेल्या या उद्रेकामध्ये जो कोरोना विषाणू आढळला तो यापूर्वीच्या कोरोना विषाणूपेक्षा वेगळा आहे. म्हणून त्याला नॉवेल अर्थात नवीन कोरोना विषाणू असे संबोधण्यात येते. जागतिक आरोग्य संघटनेने या आजारास ‘कोविड-१९’ असे नाव दिले आहे. कोरोना हा विषाणू प्राणी जगतातून मानवाकडे आलेला विषाणू आहे. तो मुख्यत्वे वटवाघळामध्ये आढळतो. बेसुमार जंगलतोड, वाढते शहरीकरण, कच्चे मांस. खाण्याची सवय इत्यादी कारणांमुळे प्राणी जगतातील सूक्ष्मजीव मानवामध्ये प्रवेश करतात.

कोरोना आजाराची लक्षणे

या आजाराची लक्षणे ही मुख्यत्वे श्वसनसंस्थेशी निगडित असतात. ती सर्वसाधारणपणे इन्फ्लुएन्झा आजारासारखीच असतात. सर्दी, खोकला, श्वास घ्यायला त्रास होणे, ताप, न्यूमोनिया, काही वेळा मूत्रपिंड निकामी होणे अशी लक्षणे असतात. काही रुग्णांना अंगदुखी, घसा खवखवणे किंवा अतिसार असू शकतो. ही लक्षणे सहसा सौम्य असतात आणि हळूहळू त्यांची सुरुवात होते. बहुतेक लोकांमध्ये (सुमारे ८० टक्के) सौम्य प्रकारचा असतो तसेच विशेष उपचार न घेताच स्वतःच्या प्रतिकार शक्तीने या आजारापासून ते बरे होतात. मात्र अशी लक्षणे दिसताच त्वरित डॉक्टरांना दाखवून निदान करून घ्यावे. ताप, खोकला व श्वसनास त्रास होणाऱ्या व्यक्तीने तसेच हा त्रास कोणत्या आजारामुळे होतो आहे हे स्पष्ट होत नसल्यास किंवा रुग्णाने कोरोनाबाधित क्षेत्रात प्रवास केला असल्यास त्यांनी त्वरित उपचार करून घ्यावेत.

असा पसरतो आजार

ज्या व्यक्तीला या आजाराची लागण झाली आहे त्याच्यापासून हा आजार शिंकण्या-खोकल्यातून जे सूक्ष्म थेंब बाहेर पडतात त्यातून पसरतो. याशिवाय शिंकण्या-खोकल्यातून उडालेले थेंब आजूबाजूला पृष्ठभागावर पडतात. त्यानंतर इतर लोकांनी अशा वस्तूंना किंवा पृष्ठभागास स्पर्श केल्यास त्यांच्या हातावाटे डोळे, नाक किंवा तोंडातून हा विषाणू शरीरात प्रवेश करतो. संसर्ग असलेल्या एखाद्या व्यक्तीच्या संपर्कात आल्यास आपल्यालादेखील हा आजार होऊ शकतो. म्हणूनच आजारी असलेल्या व्यक्तीपासून १ मीटर (३ फूट) लांब राहणे महत्त्वाचे आहे.

हात साबणाने स्वच्छ केल्याशिवाय नाक, डोळे व तोंडाला लावू नये. कोरोना विषाणू आजारावर कोणतेही औषध अथवा लस उपलब्ध झाली नसल्याने रुग्णास त्याच्या लक्षणानुसार उपचार केले जातात.

असे ठेवा कोरोनाला दूर

कोरोना किंवा श्वसनावाटे पसरणाऱ्या स्वाईन फ्ल्यू, क्षयरोग असे आजार टाळण्यासाठी खालील खबरदारी घेणे आरोग्यासाठी हिताचे आहे.

■ श्वसनसंस्थेचे विकार असणाऱ्या व्यक्तीशी संपर्क ठेवताना संसर्ग न होण्याची काळजी घेणे. ■ हात वारंवार धुणे. ■ शिंकताना, खोकताना नाकातोंडावर रुमाल अथवा टिश्यू पेपर धरणे. ■ अर्धवट शिजलेले, कच्चे मांस खाऊ नये. ■ फळे भाज्या न धुता खाऊ नयेत.

हात केव्हा धुवाल?

खोकल्यावर अथवा शिंकल्यावर, एखाद्या आजारी व्यक्तीची काळजी घेत असाल तेव्हा, स्वयंपाक करण्यापूर्वी, तयार करताना आणि तयार केल्यानंतर, जेवणापूर्वी, शौचानंतर, प्राण्यांचा सांभाळ केल्यानंतर आणि प्राण्यांची विष्ठा काढल्यानंतर हात धुवावे. त्याचबरोबर जेव्हा जेव्हा बाहेरील वस्तूंना स्पर्श झाला असेल तेव्हा धुवावे.

रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी

■ दररोज कोमट पाण्याचे सेवन करावे.

■ दररोज कमीत कमी ३० मिनिटे योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा करावी.

■ आपल्या आहारात/जेवणात हळद, जिरे, कोथिंबीर आणि लसणाचा समावेश करा.

■ शक्य असल्यास रोज सकाळी एक चमचा च्यवनप्राशचे सेवन करावे.

■ दिवसातून एक किंवा दोन वेळा हर्बल टी किंवा काढ्याचे (जो तुळस, दालचिनी, काळी मिरी, सुंठ, बेदाणे यांच्या मिश्रणाने बनवला असेल) सेवन करा. आवश्यकता असल्यास चवीसाठी गूळ/साखर किंवा लिंबाचा रस घालता येईल.

■ दिवसातून एक ते दोन वेळा हळदीच्या दुधाचे (१५० मिली. गरम दुधात अर्धा चमचा हळद मिसळा) सेवन करावे.

■ घसा खवखवणे किंवा कोरडा खोकला येत असल्यास दिवसातून एक वेळा ताज्या पुदिन्याच्या पानांची किंवा ओव्याची पाण्यातून वाफ श्वासासह आत घ्या. दिवसातून २-३ वेळा लवंग पावडरचे साखरेसोबत किंवा मधासह सेवन करा. (कोरडा खोकला व घशातील खवखव यांसारखी लक्षणे कायम राहिल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा).

मनातील काही प्रश्न

एखाद्या व्यक्तीमध्ये लक्षणे दिसत नसतानाही प्रसार होऊ शकतो का?

हा आजार पसरण्याचा मुख्य मार्ग म्हणजे श्वासोच्छ्वास (ज्या व्यक्तीला हा आजार आहे त्याच्या खोकल्यातून/शिंकण्यातून पडणाऱ्या थेंबातून पसरला जातो). त्यामुळे संसर्ग झालेल्या व्यक्तीने मास्क वापरल्यास त्या व्यक्तीकडून हा आजार पसरण्याचा धोका टळतो.

गंभीर आजार होण्याचा धोका कोणाला आहे?

वृद्ध लोक आणि उच्च रक्तदाब, हृदयरोग किंवा मधुमेह यासारखे दीर्घ मुदतीचे आजार असणाऱ्यांना गुंतागुंत होण्याची शक्यता असते. ताप, खोकला आणि श्वास घेण्यात अडचण असलेल्या लोकांनी तत्काळ वैद्यकीय उपचार घ्यावे.

मी व माझ्या घरच्यांनी या विषाणूच्या संसर्गापासून दूर राहण्यासाठी काय काळजी घ्यावी?

हा आजार सामान्यत: सौम्य असतो, विशेषत: मुले आणि तरुण प्रौढांसाठी. तथापि, हा विषाणू वृद्ध लोक आणि उच्च रक्तदाब, हृदयरोग किंवा मधुमेही व्यक्तींमध्ये गंभीर आजारास कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे त्यांच्यावर आणि निकटवर्तीयांवर होणाऱ्या या संसर्गाच्या परिणामाविषयी जागरूक राहणे आवश्यक आहे. त्यामुळे स्वत:, निकटवर्तीयांचे व समाजाचे संरक्षण करण्यासाठी काही सवयी व नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. त्यामध्ये सर्वात प्रथम मुख्य म्हणजे नियमित आणि स्वच्छ हात धुणे आणि श्वसनासंबंधी आरोग्यदायी सवयींचा अवलंब करणे. दुसरे म्हणजे, आजाराच्या माहितीविषयी जागरूक राहा तसेच स्थानिक आरोग्य अधिकाऱ्यांच्या सल्ल्याचे अनुकरण करा (विशेषत: शाळा, महाविद्यालये, प्रवास, उत्सव, समारंभ, मेळावे ई. गर्दीविषयक देण्यात येणारे निर्देश).

या आजारावर लस, औषध किंवा उपचार उपलब्ध आहेत का?

अजून नाही. आजपर्यंत हा विषाणू रोखण्यासाठी किंवा उपचार करण्यासाठी कोणत्याही लसीचा शोध लागला नाही आणि विशिष्ट अँटिव्हायरल औषध उपलब्ध नाही. संभाव्य लस आणि काही विशिष्ट औषधोपचारांची चाचणी चालू आहे. जागतिक आरोग्य संघटना या विषाणूच्या प्रतिबंधासाठी लस आणि

औषधे विकसित करण्यासाठी क्लिनिकल चाचण्याद्वारे आंतरराष्ट्रीय सहकार्यातून प्रयत्न करीत आहे.

स्वतःचे रक्षण करण्यासाठी मी मुखवटा (फेस मास्क) घालायचा का?

जर आपणास या आजाराची लक्षणे (विशेषतः खोकला) असतील किंवा-संसर्ग झालेल्या आजारी व्यक्तीच्या संपर्कात आला तर मुखवटा (फेस मास्क) घालणे आवश्यक आहे. डिस्पोजेबल फेस मास्क फक्त एकदाच वापरला जाऊ

शकतो, अन्यथा या मास्कची विल्हेवाट योग्य प्रकारे न केल्यास इतरांना धोका निर्माण होऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटना (डब्लूएचओ) लोकांना अनावश्यक मास्कचा वापर करू नये, असा सल्ला देत असून सर्वसामान्य नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी हातरुमालाचे तीन पदर करून मुखवटा (फेस मास्क) वापरावा, जो रोज योग्य प्रकारे धुतला जाऊ शकतो. दरम्यान सध्या कोरोनाचा संसर्ग मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने मास्क लावल्याशिवाय बाहेर पडू नये.

हे करा...

- नियमितपणे साबण व पाणी वापरून आपले हात वारंवार स्वच्छ धुवा. त्यामुळे हातावर असलेले विषाणू नष्ट होतात.
- **निकट संपर्क टाळावा** : स्वतःमध्ये आणि खोकणाऱ्या किंवा शिंकणाऱ्या व्यक्तीमध्ये कमीत कमी १ मीटर (३ फूट) चे अंतर ठेवा. जेव्हा एखाद्या व्यक्तीला खोकला किंवा शिंक येते तेव्हा त्याच्या नाकातून किंवा तोंडातून लहान द्रव थेंबावाटे फेकले जातात, ज्यात विषाणू असू शकतो. जर तुम्ही त्या व्यक्तीच्या खूप जवळ असाल तर तुमच्यादेखील. शरीरात प्रवेश करण्याची शक्यता असते.

- **शिंकताना, खोकताना या गोष्टीची सवय लावा** : आपण आणि आपल्या सभोवतालच्या लोकांनी श्वसनासंबंधी आरोग्यदायी सवयींचा अवलंब करणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा की, जेव्हा आपण खोकतो किंवा शिंकतो तेव्हा आपले तोंड किंवा नाक आपल्या हाताच्या कोपराने किंवा टिश्यू पेपरने झाकावे. मग वापरलेल्या टिश्यू पेपरची त्वरित विल्हेवाट लावा.

- जर आपल्याला ताप, खोकला आणि श्वास घेण्यास त्रास होत असेल तर लवकर वैद्यकीय सेवा घ्या. आपल्याला अस्वस्थ वाटत असल्यास घरी राहा. जर आपल्याला ताप, खोकला आणि श्वास घेण्यास त्रास होत असेल तर वैद्यकीय मदत घ्या व पूर्वसूचना म्हणून डॉक्टरांशी संपर्क करा. या काळात आपल्या स्थानिक आरोग्य अधिकाऱ्यांच्या निर्देशांचे पालन करा. कारण आपल्या भागातील परिस्थितीविषयी स्थानिक आरोग्य अधिकाऱ्यांकडे अद्ययावत माहिती असते. पूर्वसूचना म्हणून संपर्क केल्यास आपल्या जवळच्या आरोग्य केंद्रामध्ये त्वरित आपल्याला योग्य आरोग्य सुविधा मिळवून देता येईल. यामुळे आपले संरक्षणदेखील होईल आणि जीवघेणे विषाणू आणि इतर संसर्गाचा फैलाव रोखण्यास मदत होईल.

हे करू नका

- सार्वजनिक ठिकाणी, उघड्यावर थुंकणे
- तुम्हाला ताप व खोकला यांसारखी लक्षणे असताना इतरांशी निकटचा संपर्क ठेवणे
- कोविड-१९ची लक्षणे असल्यास स्वतःच स्वतःचा उपचार करू नका अथवा आजार लपवू नका, ताबडतोब डॉक्टरांकडे धाव घ्या.
- कत्तलखाने व उघड्यावर मांस असणाऱ्या ठिकाणी जाणे टाळा.
- अनावश्यक घराबाहेर पडू नका, खूप गरजेचे असेल तर घरातील एकानेच बाहेर पडावे.
- मास्क वापरून लावल्यानंतर मास्क काढताना मास्कच्या तोंडासमोरील भागास हात लावू नये. मास्कची दोरी अलगद कानाच्या बाजूला करून मास्क कचराकुंडीत टाकावा अथवा धुण्यायोग्य असल्यास बादलीत टाकावा.

या आजाराचा अधिशयन कालावधी किती आहे?

अधिशयन कालावधी म्हणजे विषाणूचा शरीरामध्ये प्रवेश झाल्यापासून ते आजाराची लक्षणे दिसण्यापर्यंतचा काळ. हा कालावधी आजपर्यंतच्या अभ्यासावरून साधारणपणे १ ते १४ दिवसांचा असतो, तथा सर्वसाधारणपणे ५ दिवसांचा असतो.

एखाद्या प्राण्याच्या माध्यमातून मनुष्यामध्ये हा विषाणू संक्रमित होऊ शकतो का?

कोरोना हे विषाणूच्या एका समूहाचे नाव आहे, जे प्राण्यांमध्ये सामान्यत: आढळून येतात. कधी कधी लोकांना प्राण्यांचा अथवा त्यांच्या मांसाचा निकट संपर्क आल्यामुळे या विषाणूची लागण होते, जी नंतर संसर्गामुळे इतर लोकांमध्ये पसरू शकते. उदाहरणार्थ, सार्स हा आजार मांजरींशी संबंधित होता आणि मर्स हा आजार उंटांद्वारे प्रसारित झाल्याचे अनुमान आहे. याकरिता स्वत:चे रक्षण करण्यासाठी मांसविक्रीच्या बाजारात जाताना, प्राणी आणि त्यांच्या मांसाच्या संपर्कात असलेल्या पृष्ठभागाशी थेट संपर्क टाळा. कच्चे मांस, दूध किंवा जनावरांच्या अवयवांना काळजीपूर्वक हाताळा. कच्च्या अर्धवट शिजवलेल्या अन्न पदार्थांचे सेवन करणे टाळा.

वस्तूंवर/पृष्ठभागांवर विषाणू किती काळ टिकून राहतो?

या आजाराला कारणीभूत असलेला विषाणू पृष्ठभागावर किती काळ टिकतो हे निश्चित नाही. अभ्यासानुसार कोरोना विषाणू काही तास किंवा कित्येक दिवस पृष्ठभागावर टिकून राहू शकतात. हे परिस्थितीनुसार भिन्न असू शकते (उदा. पृष्ठभागाचा प्रकार, वातावरणाचे तापमान आणि आर्द्रता). जर आपल्याला असे वाटत असेल की एखादा पृष्ठभाग संक्रमित झाला आहे, तर विषाणू नष्ट करण्यासाठी आणि स्वत:चे व इतरांचे संरक्षण करण्यासाठी साध्या जंतुनाशकाने तो पृष्ठभाग साफ करा. आपले हात साबण आणि पाणी वापरून स्वच्छ धुवा. आपले डोळे, तोंड किंवा नाकास स्पर्श करणे टाळा.

डोळे, नाक आणि तोंडाला स्पर्श करणे का टाळावे?

आपल्या हाताद्वारे बऱ्याचशा वस्तू, फर्निचर, हॅण्डल्स इ. ठिकाणी स्पर्श केला जातो, ज्यामुळे विषाणू संक्रमणाची शक्यता असते. एकदा का दूषित झाल्यास आपल्या हाता वाटे ते विषाणू डोळे, नाक किंवा तोंडात शिरकाव करतात. मग तेथून, विषाणू आपल्या शरीरात प्रवेश करून आपण आजारी पडू शकतो.

संकलन : राजाराम देवकर,
उपसंपादक, माहिती व जनसंपर्क

हेही ठेवा लक्षात

- थंड पाणी किंवा बर्फ यामुळे कोरोना नष्ट होऊ शकत नाही.
- हॅण्ड ड्रायर कोरोना विषाणू नष्ट करण्यास परिणामकारक नाही.
- लिक्विड किंवा स्प्रेने नेहमी नाक स्वच्छ केल्याने कोरोनापासून बचाव होतो असे नाही. तसे दाखले उपलब्ध नाहीत.
- उष्ण व दमट वातावरणातही कोरोनाचा प्रसार होऊ शकतो.
- निर्जंतुकीकरणासाठी अल्ट्रोव्हायोलेट किरणांचा वापर करू नये. यामुळे त्वचाविकार होऊ शकतात.
- लसूण आरोग्यासाठी चांगला आहे. परंतु त्याचे सेवन केल्याने कोरोनापासून रक्षण होत असल्याचा काही पुरावा अथवा उदाहरणे नाहीत.
- डास चावल्यामुळे कोरोनाचा प्रसार होत नाही.
- थर्मल स्कॅनरने केवळ शरीराचे तापमान मोजले जाते. समोरील व्यक्तीला कोरोना आहे की नाही हे या स्कॅनरच्या माध्यमातून कळत नाही. ताप आढळल्यास कोरोना संशयित रुग्ण म्हणून त्याची थुंकी घेऊन कोरोना चाचणी केली जाते.
- प्रतिजैविके (ॲण्टिबायोटिक्स) केवळ शरीरातील आपल्याला आजारी पाडणाऱ्या जिवाणूंवर (बॅक्टेरिया) काम करते, व्हायरसवर नाही.
- कुत्रा किंवा मांजरीसारख्या पाळीव प्राण्यांपासून कोरोनाचा प्रसार होत असल्याचे पुरावे नाहीत. मात्र या व्हायरसचे संक्रमण झालेल्या व्यक्तींपासून प्राण्यांना दूर ठेवलेले बरे.
- जर शरीरात कोरोनाचा प्रवेश झाला असेल तर शरीरावर अल्कोहोल किंवा क्लोरीन शिंपडल्याने तो नष्ट होत नाही. त्यासाठी योग्य उपचार घेणे गरजेचे.
- आजपर्यंत कोरोनाला रोखणारे अथवा रुग्ण बरा करणारे कुठलेही ठराविक औषध अथवा लस उपलब्ध नाही.
- गरम पाण्याने अंघोळ केल्याने कोरोनापासून बचाव होत नाही.
- न्यूमोनियावरील लस कोरोनावर प्रभावी ठरत नाही.

“केंद्र आणि राज्य शासन कोविड-१९ या संसर्गजन्य साथीच्या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी विविध उपाययोजना करत आहे. यामध्ये राज्य शासन कोरोना विषाणूची सर्वसामान्य नागरिकांना ‘महाइन्फोकोरोना’ या संकेतस्थळाच्या माध्यमातून माहिती देत आहे. तसेच केंद्र शासन आरोग्य सेतू ॲपच्या माध्यमातून माहिती देण्याचे काम करत आहे. याच पद्धतीने राज्य शासन महाकवच ॲप, ऑनलाइन स्व-चाचणी टूल, आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकांना ’स्नेह सेतू’ चा आधार, आरोग्य सल्ल्यासाठी मोफत ऑनलाइन ई-संजीवनी ओपीडी अशा डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करत आहे.”

डिजिटल प्लॅटफॉर्म

‘महाइन्फोकोरोना’ संकेतस्थळ

कोविड-१९ या संसर्गजन्य साथीच्या रोगाची राज्यात सध्या काय स्थिती आहे, कोविड-१९ अर्थात कोरोना विषाणूविषयीची खरी माहिती, कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व बाधितांवर उपचारासाठी राज्य शासन करत असलेली कार्यवाही, कोरोना आजारापासून मुक्ती मिळालेल्यांची माहिती, लॉकडाऊनमुळे अडचणीत आलेल्या नागरिकांसाठी कुठे-कुठे कॅम्प उभारले आहेत, वेगवेगळ्या जिल्ह्यात जिल्हा प्रशासनाने केलेल्या उपाययोजना या सर्वांची एकत्रित, अधिकृत व खात्रीशीर माहिती आता एका क्लिकवर मिळणार आहे. यासाठी राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने https://www.mahainfocorona.in/ या संकेतस्थळाची निर्मिती केली आहे. हे संकेतस्थळ सर्वांसाठी खुले झाले आहे.

जगभरासह देशात व राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढला आहे. या विषाणूचा संसर्ग वाढू नये, यासाठी केंद्राबरोबरच राज्य शासन विविध उपाय योजत आहे. त्याचबरोबर कोरोनाबाधितांची योग्य ती काळजी घेऊन रुग्णांना बरे करण्यासाठी राज्याची आरोग्य यंत्रणा अविरत झटत आहे. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे, आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री आपापल्या विभागामार्फत राज्यातील जनतेची काळजी घेत आहेत. या सर्वांची माहिती प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमे तसेच सर्वसामान्य नागरिकांपर्यंत योग्य रीतीने पोहोचणे आवश्यक आहे. समाजमाध्यमाद्वारे अनेक वेळेस चुकीची माहिती पसरली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये विनाकारण भीती निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते. कोविड-१९ अर्थात कोरोना विषाणूची माहिती, राज्य शासन करत असलेल्या

प्रयत्नांची खात्रीशीर माहिती वेळोवेळी तत्काळ मिळावी, यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने या संकेतस्थळाची निर्मिती केली आहे.

वेळोवेळी माहिती होणार अपडेट

या संकेतस्थळावर कोविड-१९ ची सर्वसाधारण माहिती दिली आहे. ज्यामध्ये हा रोग कसा होतो, कोरोना संसर्गापासून बचावासाठी काय काळजी घ्यावी, कोरोनाच्या प्रतिबंधासाठी कोणकोणते प्रयत्न केले जात आहेत. कोरोनाबाधितांची जिल्हानिहाय रोजच्या आकडेवारीची इन्फोग्राफिकसह माहिती दिली आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय कॉल सेंटर व राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाचे क्रमांकही देण्यात आले आहेत. त्याचबरोबर जिल्हानिहाय हेल्पलाईनचे क्रमांकही या ठिकाणी देण्यात आले आहेत.

तसेच सार्वजनिक सुविधा या सदरात प्रत्येक जिल्ह्यात कोणकोणत्या सोयी-सुविधा केल्या आहेत, त्याची जिल्हानिहाय सविस्तर माहिती देण्यात आली आहे. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या अन्नधान्य पुरवठ्याचीही माहिती उपलब्ध आहे.

घडामोडी या सदरात राज्य शासनाच्या विविध विभागांनी घेतलेले निर्णय, जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी, मुख्यमंत्री, इतर मंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्या पत्रकार परिषदांची व बैठकांची माहिती, राज्यात घडणाऱ्या ठळक घडामोडी आदींची माहिती देण्यात आली आहे. माध्यमांना लवकरात लवकर माहिती मिळावी, यासाठी हे सदर वेळोवेळी अद्ययावत होणार आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने ट्विटर आणि फेसबुकवर देण्यात येणाऱ्या माहितीची लिंकही येथे देण्यात आली आहे. विश्लेषण सदरात राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या वतीने कोरोना प्रादुर्भावाची राज्यातील स्थिती याचा विश्लेषणात्मक माहितीचा अहवाल देण्यात आला आहे. ही माहिती येथून डाऊनलोडही करता येणार आहे.

क्यूआर कोड

कोरोनाविरुद्धच्या लढ्यात सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधी-कोविड-१९ च्या खात्याची माहितीही देण्यात आली असून या खात्याचा क्यूआर कोडही येथे देण्यात आली. जेणेकरून इच्छुकांना थेट मदत देता येईल.

COVID-19

cmrfmahacovid19@sbi

कोरोनाविरुद्धचा लढा जिंकण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांच्या अधिकृत व खात्रीशीर माहितीसाठी माहिती व जनसंपर्कच्या https://mahainfocorona.in/en/home या संकेतस्थळावर नियमित भेट देण्याचे आवाहन राज्य शासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

आरोग्य सेतू ॲप

सगळे जग सध्या कोरोनाशी लढत आहे. प्रशासन, सजग नागरिक, सामाजिक संस्था आपले सर्व स्रोत वापरत या कोरोनारूपी संकटाला सामोरे जात आहे. संपूर्ण जगाला कोरोनाच्या प्रादुर्भावाने ग्रासले आहे. २१व्या शतकातील हे अस्मानी संकट संपावे आणि पुन्हा दैनंदिन जीवनमान सुरू व्हावे, हा विश्वास घेऊन नागरिक जगत आहेत. या विश्वासाला सकारात्मकतेची जोड देण्याचे कार्य शासनाकडून होत आहे. यामध्ये नागरिकांना अधिकृत माहिती पोहोचवण्यासाठी शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. याचाच भाग म्हणून केंद्र सरकारकडून एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात 'आरोग्य सेतू' हे ॲप सुरू करण्यात आले आहे. ज्या माध्यमातून लोकांना कोरोनाबद्दल सर्व माहिती मिळत आहे.

आरोग्य सेतू या ॲपने अगदी दीड महिन्याच्या कालावधीमध्ये तब्बल ११ कोटींपेक्षा अधिक नोंदणीकृत वापरकर्त्यांचा आकडा ओलांडला आहे. लॉकडाऊनच्या काळामध्ये सर्वाधिक डाउनलोड केले गेलेले हे ॲप लोकांच्या आरोग्याची पूर्णपणे काळजी घेत आहे. या ॲपचा वापर नागरिकांनी अधिकाधिक करणे हे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. यामध्ये वेगवेगळ्या झोनच्या माहितीसह सामाजिक अंतर कसे टिकवायचे, कोविड-१९ बद्दल माहिती, कोविड-१९ विरुद्ध उपाययोजना अशी वेगवेगळ्या स्वरूपाची माहिती उपलब्ध आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावापासून कसा बचाव केला पाहिजे आणि आरोग्याच्या दृष्टीने आपण काय काळजी घेतली पाहिजे याची माहिती या ॲपमुळे लोकांना मिळत आहे. विशेषतः आपल्या भागातील जे नागरिक कोरोनाबाधित आहेत, त्यांचीही माहिती हे ॲप उपलब्ध करून देत आहे. यामुळे नागरिक अधिक सतर्कपणे आणि गांभीर्यपूर्वक वागत आहेत.

कोरोनाच्या या लढ्यामध्ये आरोग्य सेतू ॲप अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावत आहे. हे ॲप देशातील ११ भाषांमध्ये उपलब्ध असल्याकारणाने सर्व भागांतील आणि सर्व स्तरांतील नागरिक याचा योग्य प्रकारे वापर करू शकत आहेत.

आरोग्य सेतू हे ॲप आपला ब्लूटूथ आणि स्थानाद्वारे कोविड-१९ पॉझिटिव्ह चाचणी घेऊ शकणाऱ्या एखाद्या व्यक्तीबरोबर सामाजिक आलेखाद्वारे आपला संवाद ट्रॅक करते. या ॲपच्या अलर्टद्वारे विलगीकरणविषयी सूचना आणि नागरिकांना लक्षणे उत्पन्न झाल्यास काय करावे, याविषयी मदत आणि माहिती मिळते.

या ॲपच्या मदतीने नागरिक स्वत:चे, आपल्या कुटुंबाचे आणि मित्रांचे रक्षण करू शकतात आणि कोविड-१९ शी लढण्याच्या प्रयत्नात आपल्या देशास मदत करू शकतात. आपण आत्म मूल्यांकन चाचणीसुद्धा या ॲपच्या माध्यमातून करू शकतो. यामध्ये सतत विचारले जाणारे प्रश्न (फ्रिक्वंटली आस्कड क्वेश्चन्स) अत्यंत माहितीपूर्ण दिल्यामुळे नागरिकांना असंख्य प्रश्नांची उत्तरे सहजरीत्या येथे मिळताहेत.

'मैं सुरक्षित, हम सुरक्षित, भारत सुरक्षित' हे ब्रीदवाक्य असणारे 'आरोग्य सेतू' ॲप सर्वांच्या फायद्याचे आहे. ज्याचा वापर करून आपण स्वत: सुरक्षित राहू शकतो. याच्या वापरामुळे आपल्या देशातील एकंदरीत कोरोनाची सध्याची स्थिती आपल्याला अवगत होते. तसेच राज्यातील आणि आपल्या स्थानिक पातळीची अद्ययावत माहिती अधिकृतपणे आपणास समजते. ज्या माहितीच्या उपयोगाने आपण आपापल्या ठिकाणी एका सजग नागरिकाची भूमिका चांगल्या प्रकारे पार पाडू शकतो.

शासन आपल्या पातळीवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी स्थानिक, राज्य आणि केंद्रीय पातळीवर अत्यंत चांगल्याप्रकारे कार्य करीत आहे. नागरिकांनी शासनास पूर्णपणे सहकार्य करीत, शासनाकडून येणाऱ्या सर्व सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलताना दिसत आहे. या जागतिक संकटाशी समकालीन काळामध्ये दोन हात करीत असताना नागरिकांना खोट्या आणि अफवा पसरवणाऱ्या माहितीचा सामना करावा लागत आहे. यासाठी नागरिकांनी केवळ अधिकृत आणि शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवावा. आरोग्य सेतू ॲप नागरिकांना दररोज देशाच्या एकंदरीत कोरोना स्थितीशी अवगत करते. यामध्ये दररोज वाढणारे कोरोनाबाधित रुग्ण, बरे झालेले रुग्ण आणि मृत्यू झालेल्या रुग्णांची सविस्तर माहिती मिळते. विशेषकरून आपल्या स्थानिक पातळीवर कोरोनाबाधित असलेल्या रुग्णांची आकडेवारी या ॲपच्या माध्यमातून आपल्याला दररोज समजते. यामध्ये ५०० मीटर, एक, दोन, पाच आणि दहा किलोमीटर अंतरामध्ये आरोग्य सेतू ॲपच्या मदतीने आपल्याला पॉझिटिव्ह रुग्ण, ॲप वापरणाऱ्या व्यक्तींची संख्या आणि आत्म मूल्यांकन चाचणी केलेल्या नागरिकांची संख्या समजते.

महाकवच ॲप

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि संसर्ग रोखण्यासाठी केंद्र शासनाचे राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी, नाशिक डिस्ट्रिक्ट इनोव्हेशन कौन्सिल आणि नाशिक महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल प्लॅटफॉर्म्सची निर्मिती करण्यात आली आहे. 'नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर' ही या प्लॅटफॉर्म्सची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

महाकवच ॲप वैशिष्ट्ये

या डिजिटल प्लॅटफॉर्मची दोन मुख्य वैशिष्ट्ये आहेत. पहिले म्हणजे, 'कॉन्टॅक्ट ट्रेसिंग' आणि दुसरे 'क्वारंटाइन ट्रॅकिंग'.

कॉन्टॅक्ट ट्रेसिंग म्हणजे कोरोनाबाधित व्यक्ती ही अन्य कोणाच्या संपर्कात आली होती का, याचे ट्रेसिंग. अशा व्यक्तीने स्मार्टफोन बाळगला असल्यास त्याच्याआधारे ती व्यक्ती नेमक्या किती आणि कोणकोणत्या व्यक्तीच्या संपर्कात आली होती याचे ट्रेसिंग करणे या ॲपमुळे शक्य होणार आहे. शिवाय, अशी व्यक्ती हॉटेल, रेस्टॉरंट, धार्मिक स्थळे, रेल्वे स्टेशन अशा कोणत्या गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी वावरली होती याचे ट्रेसिंगही महाकवच ॲपमुळे अचूकपणे आणि कमीत कमी वेळेत होणार आहे. सध्या ही तपासणी प्रशासनाला मॅन्युअल पद्धतीने म्हणजे प्रत्यक्ष कर्मचाऱ्यांना पाठवून करावी लागते. यात वेळही खूप जातो. पण आता 'महाकवच'मुळे प्रशासनाला करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी निश्चित दिशेने प्रयत्न करता येतील आणि तेही कमीत कमी वेळेत.

महाकवच प्लॅटफॉर्मचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे क्वारंटाइन ट्रॅकिंग. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण, परदेशातून आलेली व्यक्ती किंवा संशयित रुग्ण यांनी किमान १४ दिवस स्वत:चे विलगीकरण म्हणजेच क्वारंटाइन करणे अतिशय आवश्यक असते. पण, बऱ्याचदा लोक निष्काळजीपणा दाखवतात व नियमांचे उल्लंघन करून अनेकांच्या संपर्कात येतात. त्यामुळेच कोरोनाचा संसर्ग वाढत जातो. पण आता अशा व्यक्तींच्या स्मार्ट फोनमध्ये जेव्हा महाकवच ॲप इन्स्टॉल केले जाईल, तेव्हा अशा व्यक्तींचे क्वारंटाइन ट्रॅकिंगही डिजिटली करता येणार आहे. याची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे जिओ फेन्सिंग व सेल्फी अटेंडन्स होय. अशा व्यक्तींना एका मर्यादित त्रिज्येतच वावरण्याची मुभा असेल. जेव्हा ही त्रिज्या ओलांडली जाईल तेव्हा ॲपद्वारे ही माहिती प्रशासनाला समजेल. यानंतर योग्य ती कार्यवाही प्रशासनातर्फे होणार आहे. या ॲपचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सेल्फी अटेंडन्स. प्रशासनाकडून जेव्हा जेव्हा विचारणा होईल तेव्हा अशा व्यक्तीला सेल्फी काढून तो ॲपद्वारे प्रशासनाकडे पाठवावा लागेल.

महाकवच ॲप हे गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असून ते केवळ कोरोना लक्षणित व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या व्यक्तींसाठी आहे. फक्त अशाच व्यक्ती हे ॲप वापरू शकतात. इतर लोकांना मात्र हे

ॲप वापरण्याची परवानगी नसेल.

याचबरोबर, महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीकडून 'सेल्फ असेसमेंट टूल'चीही निर्मिती करण्यात आली असून ते लवकरच लॉन्च करण्यात येणार आहे. या प्लॅटफॉर्मच्या निर्मितीमध्ये आणि अंमलबजावणीमध्ये नॅशनल हेल्थ ऑथॉरिटी - भारत सरकार, महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी - महाराष्ट्र शासन, नाशिक डिस्ट्रिक्ट इनोव्हेशन कौन्सिल, नाशिक महापालिका, डिजिटल इम्पॅक्ट स्क्वेअर (टीसीएस फाऊंडेशनचा उपक्रम), कुंभेथॉन इनोव्हेशन फाऊंडेशन या संस्थांचा महत्त्वाचा सहभाग राहील.

सध्या हा प्लॅटफॉर्म तयार झाला असून नाशिक प्रशासनात त्याचा वापर सुरू आहे. लवकरच तो संपूर्ण महाराष्ट्रभरात लॉन्च करण्यात येईल. डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी, प्रशासकीय व्यवस्था, पोलीस आणि समाजातील अनेक मंडळी कोरोनाविरुद्धची ही लढाई लढत आहेत. आता या व्यापक लढ्याला या प्लॅटफॉर्ममुळे एक अत्यंत वेगळा असा डिजिटल प्रयत्नही जोडला जात आहे. कोरोनाला प्रतिबंध करण्यात याची महत्त्वाची भूमिका असेल.

स्नेह सेतू

कोरोना संकटाच्या या गंभीर परिस्थितीत राज्यातील शासकीय आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी दूरध्वनीद्वारे स्नेहाचा संवाद साधून आपुलकीची भावना प्रस्थापित करण्याचे कार्य 'स्नेह सेतू' या उपक्रमाद्वारे करण्यात येणार आहे. आदिवासी विकास विभागाच्या संकल्पनेतून साझा संस्थेच्या सहकार्याने हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आदिवासी विकास विभागाच्या प्रधान सचिव मनिषा वर्मा आणि आयुक्त डॉ. किरण कुलकर्णी यांच्यासह ठाणे, नाशिक, अमरावती आणि नागपूर येथील अप्पर आयुक्तांच्या उपस्थितीत वेबिनारच्या माध्यमातून या उपक्रमाला सुरुवात झाली.

लॉकडाऊनमुळे आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी आपल्या घरी आहेत. या काळात उदरनिर्वाहाचे साधन बंद असल्याने या विद्यार्थ्यांचे पालक घरीच आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत पालकांनी खचून न जाता धीराने सामोरे जायला हवे, या उद्देशाने आदिवासी विकास विभागातर्फे हा 'स्नेह सेतू' उपक्रम संपूर्ण राज्यभरात राबवण्यास सुरुवात केली आहे. 'जोडूया पालकांशी जिव्हाळ्याचे नाते' हे बोधवाक्य अनुसरून सुरू करण्यात आलेल्या या

ऑनलाईन स्व-चाचणी टूल

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि संसर्ग रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सेल्फ असेसमेंट (स्व-चाचणी) टूल बनवले आहे. प्राथमिक पातळीवर करोनाची लक्षणे ओळखण्यासाठी या टूलचा उपयोग होतो. हे टूल https://covid-19.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध असून वैद्यकीय सल्ला हवा असेल तर आवश्यक ती माहिती आणि संपर्क क्रमांक या लिंकवर उपलब्ध आहे.

हे स्व-चाचणी टूल मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये उपलब्ध आहे. कोविड-१९ चा प्रभावीपणे सामना करण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यक्षमता वाढवणे, महत्त्वपूर्ण माहिती एकत्र करणे तसेच योग्य जनजागृती करून विद्यमान संसर्गाचे अधिक चांगले व्यवस्थापन करणे हा या सुविधेचा मुख्य हेतू आहे.

जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) आणि केंद्र व राज्याचा आरोग्य विभाग यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कोरोनासदृश्य लक्षणे दिसणाऱ्या व्यक्तीने स्वत:चे विलगीकरण करणे आणि तीव्र लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. पण बऱ्याच नागरिकांमध्ये काही किरकोळ (निम्न) लक्षणे जसे की सर्दी, ताप, खोकला, ज्यांचा कोरोना विषाणू संसर्गाशी संबंध नसू शकतो, अशा वेळेस नागरिक घाबरून न जाता योग्य ती कार्यवाही करू शकतात. अशा बाबतीमध्ये प्राथमिक पातळीवर आपल्या घरीच स्व-चाचणी करता यावी यासाठी महाराष्ट्र शासन व अपोलो २४ x ७ यांच्या संयुक्त विद्यमाने हे सेल्फ असेसमेंट टूल बनवण्यात आले आले.

विशेष बाब म्हणजे, या प्लॅटफॉर्ममुळे प्रशासनाला चाचणी घेतलेल्या नागरिकांचा रिअल टाइम डॅशबोर्ड बघता येतो. तसेच इतर स्व-चाचणी टूल फक्त परिणाम दर्शवितात, मात्र या टूलने चाचणी केल्यावर एखाद्या व्यक्तीमध्ये कोरोनासदृश लक्षणे ही मध्यम किंवा उच्च स्वरूपाची असल्यास अशा व्यक्तीचे वैयक्तिक तपशील प्रशासनापर्यंत पोहोचवले जातात. यामुळे प्रशासनाला सक्रिय पद्धतीने संभाव्य संक्रमणास अधिक प्रभावीपणे शोधण्याची मदत होईल. हे सेल्फ असेसमेंट (स्व-चाचणी) टूल प्रत्येकाच्या वापरासाठी उपलब्ध आहे. या सुविधेमध्ये कोविड-१९ रोखण्यासाठी 'काय करावे' आणि 'काय करू नये' हेल्पलाइन क्रमांक आणि संबंधित माहिती उपलब्ध आहे. डॉक्टरांकडून दूरध्वनी, व्हिडिओ कॉलद्वारे आरोग्य सेवेचा सल्ला घेण्यासाठी सुविधा लवकरच उपलब्ध होईल. ही सुविधा 'क्यूआर कोड' रूपात सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि खासगी दवाखाने येथे उपलब्ध होणार आहे. जेणेकरून तिथेही रुग्णांना स्व-चाचणी करता येईल. या नोंदी केल्याने सतत अद्ययावत होणारा डॅशबोर्ड प्रशासनाला पाहता येईल आणि संभाव्य धोका लक्षात घेऊन तातडीने निर्णय घेता येतील.

या सुविधेच्या निर्मिती आणि अंमलबजावणीमध्ये नॅशनल हेल्थ ऑथॉरिटी-भारत सरकार, कौशल्य विकास विभागाचे महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी-महाराष्ट्र शासन, नाशिक डिस्ट्रिक्ट इनोव्हेशन कौन्सिल, नाशिक महापालिका, डिजिटल इम्पॅक्ट स्क्वेअर (टीसीएस फाऊंडेशनचा उपक्रम), कुंभेथॉन इनोव्हेशन फाऊंडेशन या संस्थांचा महत्त्वाचा सहभाग आहे.

उपक्रमाद्वारे राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांशी संवाद साधला जाणार आहे. या सर्व शाळांमधून स्वतःहून स्वयंसेवक म्हणून पुढे आलेले शिक्षक/ शिक्षिका व अधीक्षक / अधीक्षिका असा १०४ जणांचा समूह या पालकांशी 'सुपर रिसेप्शनिस्ट' या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून संवाद साधणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून साधल्या जाणाऱ्या संवादाद्वारे पालकांचे रोजचे काम, निरनिराळ्या जीवनावश्यक गोष्टींची पूर्तता, गावात रोजगार हमी योजना कामाची आवश्यकता, शिधापत्रिका तसेच अन्य लाभांची सद्यःपरिस्थिती, मुलांचा अभ्यास, त्यांचे रोजचे दिनक्रम याविषयी आढावा घेण्यात येणार आहे. तसेच कोरोनापासून दूर राहण्यासाठी घ्यावयाची काळजी, कौटुंबिक हिंसाचार होत असेल तर तो रोखण्यासाठी काय करायला हवे यांसारख्या इतर विविध गोष्टींवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या वेळी पालकांशी संवाद साधण्याचे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यासाठी साझा संस्थेचे सहकार्य मिळत आहे. कोरोनाच्या या संकटमय परिस्थितीत पालकांशी संवाद साधून त्यांच्याशी भावनिक नाते तयार करण्याच्या उद्दिष्टाने 'स्नेह सेतू' उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. पालकांशी संवाद साधल्यानंतर घेतलेली संपूर्ण माहिती स्वयंसेवक हे एका गुगल परिशिष्टात समाविष्ट करणार आहेत. या सर्व निरीक्षणाचा उपयोग विभागाला भविष्यात आदिवासींसाठी विविध योजना तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

उपक्रमाद्वारे शासकीय योजनांचीही दिली जाणार माहिती

कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी सुरू असणाऱ्या लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे अन्नपाण्यावाचून हाल होऊ नये याकरिता केंद्र व राज्य शासनाकडून लाभार्थ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती 'स्नेह सेतू' या उपक्रमाच्या माध्यमातून पालकांशी संवाद साधताना देण्यात येणार आहे.

मोफत ऑनलाइन ओपीडी

कोरोनामुळे राज्यात लॉकडाऊन सुरू आहे त्यामुळे काही ठिकाणी खासगी दवाखाने बंद आहेत अशा परिस्थितीत नागरिकांना आरोग्यविषयक तपासणी, सल्ला घेताना येणारी अडचण लक्षात घेऊन ऑनलाइन ई-संजीवनी ओपीडी सेवा सुरू करण्यात आली आहे. राज्यात प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेली ही सेवा पूर्णपणे सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी www.esanjeevaniopd.in या संकेतस्थळाला रुग्णांनी भेट देऊन तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी केले आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्या आरोग्य विभागाचा हा संयुक्त उपक्रम असून त्यासाठी रुग्णाकडून शुल्क आकारले जाणार नाही. ही ऑनलाइन ओपीडी सकाळी ९. ३० ते दुपारी १.३० या काळात उपलब्ध असणार असून रविवारी ही सेवा उपलब्ध नसणार आहे. मात्र टप्प्याटप्प्याने त्याची वेळ वाढवण्यात येणार असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

नांदेड, भंडारा, नाशिक येथील जिल्हा रुग्णालयातील १६ वैद्यकीय अधिकाऱ्यांना ऑनलाइन ओपीडी सेवेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. गेले काही दिवस प्रायोगिक तत्त्वावर ही सेवा सुरू करण्यात आली. आता मात्र राज्यभर सर्वत्र सेवा सुरू झाली असून आतापर्यंत सुमारे ४०० हून अधिक रुग्णांना या सेवेमार्फत उपचार देण्यात आले आहेत. या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून एखादा रुग्ण राज्यातील कोणत्याही जिल्ह्यातून कुठल्याही जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत संगणक, लॅपटॉप अथवा मोबाइल याचा वापर करून कुठल्याही आजारावर सल्ला मसलत करू शकतो. थेट व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, लिखित संदेश याद्वारे वैद्यकीय अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करता येईल.

कशी वापरता येईल सेवा

- **नोंदणी करून टोकन घेणे -** त्यासाठी मोबाईल क्रमांकद्वारे नोंदणी करत येईल. त्यावर 'ओटीपी' आल्यानंतर त्या माध्यमातून रुग्णाने नोंदणी अर्ज भरायचा आहे. त्यानंतर टोकनसाठी विनंती करायची. आजाराबाबत काही कागदपत्रे, रिपोर्ट असतील ते अपलोड करता येतील. त्यानंतर एसएमएसद्वारे रुग्णाचा ओळख क्रमांक आणि टोकन क्रमांक प्राप्त होईल.
- लॉग इन करण्यासाठी एसएमएसद्वारे नोटिफिकेशन येईल. त्यानंतर रुग्णाला दिलेल्या ओळख क्रमांकाच्या आधारे लॉगइन करता येईल. **• वेटिंग रुम -** वेटिंग रुमवर एन्टर केल्यानंतर काही वेळातच 'कॉल नाऊ' हे बटन कार्यान्वित (ॲक्टिवेट) होईल. त्यानंतर व्हिडिओ कॉल करता येईल. • तुम्हाला डॉक्टर स्क्रीनवर दिसतील. त्यांच्याशी चर्चा झाल्यानंतर लगेच ई-प्रिस्क्रिप्शन प्राप्त होईल.

संकलन : टीम लोकराज्य

> लॉकडाऊनच्या काळात राज्यामध्ये काही गुन्हेगार व समाजकंटक समाजमाध्यमांचा गैरवापर करत आहेत. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र सायबर विभागाने कठोर पावले उचलली आहेत. राज्यात सायबर संदर्भात ४६२ गुन्हे दाखल झाले असून २५४ व्यक्तींना अटक केली आहे. त्यामुळे सोशल मीडियावर एखादी पोस्ट शेअर करताना ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न तर निर्माण करणारी नाही याचा प्रथम विचार करावा. त्याचबरोबर ऑनलाइन होणाऱ्या फसवणुकींपासूनही आपण सावध राहायला हवे.

समाजमाध्यमे वापरा जपून...

राज्यात दाखल झालेल्या सर्व सायबर गुन्ह्यांचे महाराष्ट्र सायबरने जेव्हा विश्लेषण केले तेव्हा असे निदर्शनास आले की, आक्षेपार्ह व्हॉट्सॲप मेसेजेस फॉरवर्ड केल्याप्रकरणी १९२ गुन्हे दाखल झाले आहेत, आक्षेपार्ह फेसबुक पोस्ट्स शेअर केल्या प्रकरणी १८६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, टिकटॉक व्हिडिओ शेअर प्रकरणी २३ गुन्हे दाखल झाले आहेत व ट्विटरद्वारे आक्षेपार्ह ट्विट केल्याप्रकरणी ८ गुन्हे तर इन्स्टाग्रामवरून चुकीच्या पोस्ट टाकल्याप्रकरणी ४ गुन्हे दाखल झाले आहेत. अन्य सोशल मीडियाचा (ऑडिओ क्लिप्स, यूट्यूब) गैरवापर केल्याप्रकरणी ४९ गुन्हे दाखल झाले आहेत व त्यामध्ये आतापर्यंत २५४ आरोपींना अटक केली आहे. यापैकी १०७ आक्षेपार्ह पोस्ट्स टेकडाऊन करण्यात यश आले आहे.

काही प्रातिनिधिक गुन्हे

पुणे

पुणे शहरामध्ये एका गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीने आपल्या फेसबुक प्रोफाईलवर कोरोना महामारीला राजकीय रंग असणाऱ्या आशयाची पोस्ट शेअर केली होती, त्यामुळे परिसरातील वातावरण बिघडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकला असता.

जळगाव

जळगाव जिल्ह्यातील पिंपळगाव पोलीस स्टेशनमध्ये एका गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील आरोपीने आपल्या फेसबुक प्रोफाईलवर फिर्यादी हा कोरोनाग्रस्त रुग्ण आहे, अशा आशयाचा चुकीचा मजकूर असणारी पोस्ट शेअर केली होती. फिर्यादीचे स्वास्थ्य उत्तम असून देखील त्यास या पोस्टवरील मजकुरामुळे मानसिक त्रास दिला गेला.

नांदेड

नांदेड जिल्ह्यातील वजिराबाद पोलीस ठाण्यामध्ये एका गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील आरोपीने कोरोना महामारीला धार्मिकतेचा रंग देणाऱ्या आशयाची पोस्ट आपल्या व्हॉट्सॲपवरून विविध ग्रुप्सवर टाकली होती. त्यामुळे परिसरामध्ये शांतता बिघडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकला असता.

सातारा

सातारा जिल्ह्यातील फलटण पोलीस ठाण्यामध्ये एका गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील आरोपीने आपल्या फेसबुक प्रोफाईलवर कोरोनाग्रस्त रुग्णांची चुकीची माहिती असणारी पोस्ट शेअर करून अफवा पसरवली होती त्यामुळे परिसरातील लोकांमध्ये भीती व संभ्रम निर्माण झाला होता.

मुंबई काळाचौकी

मुंबई विभागातील काळाचौकी पोलीस स्टेशनमध्ये नोंद झालेल्या गुन्ह्यातील आरोपीने आपल्या व्हॉट्सॲपद्वारे विविध व्हॉट्सॲप ग्रुप्सवर कोरोनाग्रस्त नागरिकांबद्दल चुकीची व खोटी माहिती पसरवून, त्यांची नावेदेखील जाहीर केली होती व कोरोनाग्रस्त नागरिकांची नावे जाहीर न करण्याच्या नियमांचे उल्लंघन केले होते.

सेटिंग 'ओन्ली ॲडमिन' करावे

सध्या कोरोना महामारीच्या काळात व्हॉट्सॲपवर तसेच अन्य सोशल मीडियावर कोरोनाग्रस्त रुग्णांची नावे व अन्य माहिती प्रसारित होत आहे. महाराष्ट्र सायबर सर्व नागरिकांना अशी विनंती करते की, कृपया तुम्हाला अशा आशयाच्या पोस्ट्स आल्या तर आपण त्या पोस्ट्स पुढे पाठवू नये. रुग्णांची माहिती अशा प्रकारे जर कोणी तुम्हाला फॉरवर्ड करत असतील तर तुम्ही त्या व्यक्तीस तसे करण्यापासून परावृत्त करा. तुम्ही व्हॉट्सॲप ॲडमिन किंवा निर्माते (ग्रुप क्रिएटर) असाल आणि जर कोणी अशी माहिती पाठवत असेल तर तत्काळ सदर ग्रुप सदस्याची त्या ग्रुपवरून हकालपट्टी करावी आणि ग्रुप सेटिंग 'ओन्ली ॲडमिन' असे करावे. कोरोनाग्रस्त रुग्णांची माहिती अशा प्रकारे प्रसिद्ध करणे हा कायदेशीर

गुन्हा आहे.

व्हॉट्सॲप ग्रुपचे निर्माते किंवा ॲडमिन असणाऱ्यांनी चुकीच्या पोस्ट्स अथवा अफवा पसरवणारे मेसेजेस व व्हिडिओ ग्रुपवर येणार नाहीत याची खबरदारी घ्यावी. तसे न केल्यास व्हॉट्सॲप ग्रुप निर्माते व ॲडमिन यांच्यावरदेखील गुन्हा दाखल केला जाऊ शकतो.

हरवलेल्या फोनबाबत ई-मेल

सध्या लॉकडाऊनच्या काळात सायबर भामटे हे नागरिकांना फसवण्यासाठी विविध क्लृप्त्यांचा वापर करत आहेत. आपल्याकडे बरेच नागरिक स्वतःचा मोबाइल फोन हरवला की त्याची तक्रार नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये करतात व त्याचा तपास न लागल्यास, परत नवीन मोबाइल विकत घेऊन आपल्या रोजच्या आयुष्यात व्यग्र होतात. याच गोष्टीचा फायदा घेऊन सायबर भामटे पोलिसांच्या नावाने एक ई-मेल पाठवत आहेत. या ई-मेलमध्ये नमूद असते की 'तुमचा हरवलेला मोबाइल सापडला आहे. त्याचा परत मिळवण्याचा ठरावीक खर्च आहे तो तुम्ही केलात की तुम्हाला तुमचा मोबाइल परत मिळेल. लॉकडाऊनच्या काळात आम्ही प्रत्यक्ष येऊ शकत नाही, त्यामुळे ई-मेलमध्ये नमूद केलेल्या बँक खात्यात पेटीएम, गुगल पे किंवा अन्य माध्यमांद्वारे आपण ठरावीक रक्कम जमा करावी.

कृपया असल्या ई-मेल किंवा मेसेजला बळी पडून कोणत्याही प्रकारची रक्कम, खात्यात भरू नका. हा ई-मेल खरा आहे का खोटा याची आधी तपासणी करा. ही तपासणी सोप्या पद्धतीनेदेखील करता येते, जर तुम्ही जी-मेलचा वापर करत असाल तर असे मेसेज आल्यावर व तो ओपन केल्यावर 'रिप्लाय'च्या बाजूला ३ उभे ठिपके दिसतील. त्यावर क्लिक करा व त्यातील 'शो ओरिजनल ऑप्शन' क्लिक करा, त्यामुळे या ई-मेलचा इंटरनेटवरचा सर्व प्रवास समजू शकतो. लक्षात ठेवा जर एखाद्या ई-मेलवर अशा प्रकारचा मेसेज दिसला तर शक्यतो तसा ई-मेल न उघडताच डिलिट करा.

असे ई-मेल आल्यास खालील मुद्द्यांच्या आधारे त्या ई-मेलची सत्यता पडताळण्यास उपयोग होईल.

- कोणतेही पोलीस अधिकारी कोणत्याही परिस्थितीमध्ये अशा प्रकारच्या पैशांची मागणी, चोरीच्या सापडलेल्या वस्तू परत करण्यासाठी करणार नाहीत.
- असा ई-मेल आल्यास तुम्ही ज्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली आहे, तिथे संबंधित अधिकाऱ्यांशी फोनवर बोलून किंवा प्रत्यक्षपणे भेटून ई-मेलमधील मजकुराची सत्यता पडताळून बघा.
- अधिकृत ई-मेलवरून येणारे ई-मेल्स हे तुमच्या इनबॉक्समध्ये येतात 'स्पॅम'मध्ये नाही.

त्यामुळे असे ई-मेल आल्यास घाबरून जाऊ नका व त्याची तक्रार www.cybercrime.gov.in या संकेतस्थळावर नोंदवा, तसेच कोणत्याही परिस्थितीमध्ये अशा ई-मेलमध्ये नमूद खात्यामध्ये पैसे ट्रान्सफर करू नका.

चुकीच्या मेसेजपासून सावधान

आपणास कोणी अपरिचित व्यक्तीने किंवा आपण ज्या व्हॉट्सॲप ग्रुप्सवर आहात त्यावरील परिचित किंवा अपरिचित व्यक्तीने धार्मिक भावना दुखावून समाजात तेढ निर्माण होऊ शकेल असे व्हिडिओ, फोटोज, मेसेजेस किंवा अन्य काही पोस्ट्स पाठवत असल्यास तत्काळ त्याची तक्रार जवळच्या पोलीस ठाण्यांमध्ये द्यावी. तसेच आपण असे व्हिडिओ, फोटोज, मेसेजेस किंवा अन्य काही पोस्ट्स कोणालाही पाठवू नयेत, त्या त्वरित डिलीट कराव्यात.

'मित्रो' ॲपसाठी सावधगिरी

सध्या इंटरनेटवर छोटे व्हिडिओज बनवण्यासाठी अनेक ॲप्स उपलब्ध आहेत. त्यात प्रामुख्याने टिकटॉकचा वापर केला जातो. पण टिकटॉक हे चायनानिर्मित ॲप असल्यामुळे 'मित्रो' नावाच्या दुसऱ्या एका ॲपला लोक पसंती देत आहेत. सध्या लॉकडाऊनच्या काळात बहुतांश नागरिक घरीच असल्याने करमणुकीसाठी हे ॲप डाऊनलोड करून त्यावर व्हिडिओ बनवून ते सोशल मीडियावर प्रसारित केले जात आहेत. महाराष्ट्र सायबर सर्व नागरिकांना विनंती करू इच्छिते कृपया हे 'मित्रो' ॲप डाऊनलोड करताना विचार करा व गरज असल्यासच डाऊनलोड करा. हे ॲप

डाऊनलोड केल्यावर ते वापरात आणण्यासाठी तुमच्या मोबाइल फोनच्या ॲक्सेसची परवानगी विचारते, पण या ॲपमधून तुमच्या फोन प्रोफाईलवरील सर्व माहिती कोणीही ॲक्सेस करून त्याचा गैरवापर करू शकते. हा संभाव्य धोका विशेषकरून हॅकर्स व सायबर भामटे यांच्याकडून जास्त प्रमाणात आहे. तांत्रिकदृष्ट्या युजर प्रायव्हसीच्या बाबतीत हे ॲप अगदीच कुचकामी ठरते. तसेच या ॲपची कोणतीही प्रायव्हसी पॉलिसी किंवा युजर पॉलिसी नाही. त्यामुळे या ॲपच्या माध्यमातून आपल्या माहितीचा कोणीही व कसाही वापर करू शकतो.

या ॲपची मालकी कोणाकडे आहे त्याबद्दलदेखील अनेक मतप्रवाह आहेत व संशय असा आहे की, एका पाकिस्तानी कंपनीने या ॲपची निर्मिती केली आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या ॲपचा वापर शक्यतो टाळणे हेच हितकारक आहे. जर कोणत्या व्यक्तीस हे ॲप वापरायचेच असेल तर ते डाऊनलोड करून आपल्या मोबाइल फोनमधील प्रायव्हसी सेटिंगमध्ये योग्य तो बदल करूनच हे वापरावे, असे आवाहन महाराष्ट्र सायबर विभागामार्फत करण्यात आले आहे.

टीम लोकराज्य

“ शासन हे विविध पातळ्यांवर काम करत असते. यामध्ये मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय महत्त्वपूर्ण असतात. कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे मंत्रिपरिषदेची बैठक व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात येत आहे. मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णय आणि उपसमितीच्या निर्णयांचा थोडक्यात आढावा.. ”

मंत्रिमंडळात ठरले !

शिवभोजन योजना आता तालुकास्तरावर

शिवभोजन योजनेचा तालुकास्तरावर विस्तार करून पुढील तीन महिने पाच रुपये इतक्या दरात शिवभोजन थाळी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मजुर, स्थलांतरित, बेघर तसेच बाहेरगावचे विद्यार्थी व इतर लोक यांचे जेवणाअभावी हाल होऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला. सध्या जिल्हा

संग्रहित छायाचित्र

शिवभोजन ग्रहण करताना लाभार्थी

मुख्यालयी ही शिवभोजन केंद्रे चालवली जातात. आता तालुकास्तरावर सुरू होतील. पुढील तीन महिन्यांसाठी शिवभोजनाच्या प्रति थाळीचा दर पाच रुपये इतका करण्यात आला आहे.

शिवभोजन थाळीची किंमत शहरी भागात ५० रुपये प्रति थाळी असून ग्रामीण भागात ३५ रुपये इतकी आहे. प्रत्येक ग्राहकाकडून मिळालेल्या पाच रुपये एवढ्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रक्कम शहरी भागात प्रति थाळी ४५ रुपये आणि ग्रामीण भागात प्रति थाळी ३० रुपये असे अनुदान संबंधित केंद्र चालकाला देण्यात येईल. ही भोजनालये सकाळी ११ ते दुपारी ३ या काळात सुरू राहतील. या शिवभोजन केंद्र चालकांनादेखील कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता ठेवणे, निर्जंतुकीकरण करून घेणे, कर्मचाऱ्यांनी वारंवार साबणाने हात धुणे तसेच मास्कचा वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

कोरोना रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांना मान्यता

कोरोना प्रादुर्भावामुळे होत असलेला संसर्ग आटोक्यात आणण्यासाठी राज्यात तातडीने विविध उपाययोजना, अधिसूचना व आदेश काढण्यात आले. या उपाययोजनांना मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात आली.

१३ मार्च २०२० च्या अधिसूचनेनुसार राज्यात साथरोग कायदा १८९७ लागू केला. उपाययोजनांसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली १३ मार्च रोजी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली.

१४ मार्च २०२० रोजी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अधिसूचना लागू झाली. त्याअंतर्गत अलगीकरण व विलगीकरण याबाबतचे नियम ठरवण्यात आले. तसेच अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाई, खासगी रुणालयामध्ये विलगीकरण कक्ष स्थापन करणे या बाबी या नियमावलीमध्ये आहेत. गर्दीमुळे होणारा संसर्ग टाळण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या. आपत्कालीन परिस्थितीत औषधे व यंत्रसामग्री व उपकरणे खरेदी करण्यासाठी आरोग्य सेवा आयुक्त तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान त्याचप्रमाणे संचालक, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांच्या स्तरावर समिती गठीत करून त्यांना काही अटी व शर्तीनुसार खरेदी करण्यास मुभा देण्यात आली.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने गेल्या काही दिवसांत विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळा, विविध परिषदांच्या नोंदणीकृत वैद्यक व्यावसायिक, शुश्रूषा सेवा, पॅरावैद्यक व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती यांच्या सेवा अधिग्रहित करणे.

कोरोना विषाणूच्या अनुषंगाने सर्व शासकीय व खासगी रुग्णालयात स्वतंत्र विलगीकरण इमारत / कक्ष निर्माण करण्याच्या मार्गदर्शक सूचना देणे. कोविड आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी परिसर निर्जंतुकीकरण करणे.

आर्थिक पुनरुज्जीवनासाठी दोन समित्या

कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला आहे. यासंदर्भात दोन समित्या नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिली समिती ही आर्थिक परिणामांचा पुनरुज्जीवन अहवाल तयार करेल. यात अर्थतज्ज्ञ, उद्योजक, निवृत्त अधिकारी, वित्त विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असेल. याशिवाय दुसरी समिती ही मंत्रिमंडळातील सदस्यांची असून त्यात उपमुख्यमंत्री अजित

मंत्रिमंडळ उपसमितीकडून महत्त्वाचे निर्णय

महाराष्ट्र कोरोनाविरुद्धची लढाई लढत असतानाच आर्थिक स्तरावरही आता महत्त्वाचे निर्णय घेण्यास सुरुवात झाली आहे. राज्यात स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार सुरू करून त्यांची नोंदणी पूर्ववत ऑनलाइन पद्धतीने करण्यास परवानगी देण्यात आली आहे. आरोग्यविषयक कामांची गरज लक्षात घेऊन चालू आर्थिक वर्षासाठी जिल्हा नियोजन योजनेचा २५ टक्के निधी आरोग्यविषयक कामांकडे वळवण्यात येणार आहे. आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण, पोलिस, होमगार्ड व इतर विभागातील अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे वेतन-मानधन तत्काळ अदा करण्याचे निर्देश जारी करण्यात आले आहेत. कोरोनाच्या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी स्थापन मंत्रिमंडळ उपसमितीने हे निर्णय घेतल्याची माहिती समितीप्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

मंत्रिमंडळाच्या उपसमितीने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले असून नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव देबाशिष चक्रवर्ती यांनी यासंदर्भातील अंमलबजावणीचे पत्र सर्व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि प्रशासकीय प्रमुखांना पाठवले आहे. या पत्रात मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेले निर्णय कळवण्यात आले असून त्यावर कार्यवाही करण्याचे व कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास कळवले आहे. कोरोनाविरुद्धच्या लढाईत ग्रामविकास विभागाचे अनेक अधिकारी-कर्मचारी योगदान देत आहेत. अशा कर्मचाऱ्यांना २० लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात येणार आहे. कोणत्या कर्मचाऱ्यांना हे विमा संरक्षण असेल याचे आदेश आरोग्य व ग्रामविकास विभाग काढणार आहेत. गडचिरोली, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर जिल्ह्यातील तेंदूपत्ता व मोहाची फुले गोळा करणाऱ्या बांधवांच्या संदर्भातील निर्णयही तत्काळ घेण्याबाबत संबंधित जिल्हा प्रशासनाला कळवण्यात आले आहे. शेती व शेतीपूरक उद्योगांच्या संदर्भात, द्राक्ष उत्पादकांच्या संदर्भात, मनरेगाच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीबाबत, ई-कॉमर्स व्यवसायांबाबत, कम्युनिटी किचनबाबतही संबंधित यंत्रणांना केंद्रीय मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तत्काळ अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या विषयांसदर्भातही निर्णय घेण्यात आले आहेत. ऊसतोड कामागारांना त्यांच्या घरी, मूळ गावी परत पाठवण्यासंदर्भातही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

पवार, मंत्री जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, छगन भुजबळ, अशोक चव्हाण, एकनाथ शिंदे, अनिल परब यांचा समावेश असेल.

आमदार – ३० टक्के वेतन कपात

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता राज्यातील सर्व विधिमंडळ सदस्य, लोकप्रतिनिधींच्या वेतनात या महिन्यापासून म्हणजे एप्रिल २०२० पासून पुढील वर्षापर्यंत म्हणजे एप्रिल २०२१ पर्यंत ३० टक्के वेतन कपात करण्याचा निर्णय झाला.

निवारा केंद्रांची भोजन क्षमता

कोरोनासंदर्भात राज्यातील वाढते रुग्ण लक्षात घेता लॉकडाऊनची अंमलबजावणी अधिक कडक करण्याबाबत तसेच निवारा केंद्रांमध्ये भोजन, शिवभोजन यांची क्षमता अधिक वाढवणे व लाभार्थी नागरिकांना अधिक चांगली सुविधा देणे. याबाबत मंत्रिमंडळातील सदस्यांनी महत्त्वपूर्ण सूचना केल्या, याचीदेखील काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

खासगी रुग्णालयांसाठी पालिकेचे अधिकारी

कोरोना उपाययोजनांवर मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. मुंबईतील खासगी रुग्णालयांनी राज्य शासनाच्या ८० टक्के बेड्स राखीव ठेवण्याच्या आदेशांचे काटेकोर पालन करावे, यासाठी अशा सर्व रुग्णालयांमध्ये पालिकेने अधिकारी नियुक्त करून नियंत्रण करावे व रुग्णांची हेळसांड होणार नाही, असे पाहावे असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी निर्देश दिले.

याप्रसंगी पालिका आयुक्त आय.एस. चहल यांनी गेल्या काही दिवसांत मुंबईत बेड्स व इतर साधनसामग्रीची कशी वाढ करण्यात आली आहे आणि यामुळे संक्रमण रोखण्यात आपल्याला कसे यश मिळत आहे असे सांगितले. प्रत्येक बेडला युनिक आयडी देणार, डायलिसिस रुग्णांना यापुढे उपचार मिळणार, प्रयोगशाळाना २४ तासात चाचणी अहवाल देणे बंधनकारक करणार आहे. मुंबईत रुग्ण दुपटीचा वेग १९ दिवसांवर गेला आहे. कोविड योद्धा म्हणून डॉक्टर्स, परिचारिका पुढे येत आहेत. ३७५० डॉक्टर उपचारांसाठी उतरत आहेत. ४५० डॉक्टर्सपैकी ६० जणांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. मुंबईत सध्या २१ हजार ॲक्टिव्ह रुग्ण आहेत असे त्यांनी सांगितले. प्रारंभी प्रधान सचिव आरोग्य डॉ. प्रदीप व्यास यांनी सादरीकरण केले.

आजमितीस देशाच्या एकूण रुग्ण संख्येच्या ३५.२३ टक्के रुग्ण महाराष्ट्रात आढळत आहेत. देशाच्या तुलनेत ३१.१९ टक्के रुग्ण सुधारण्याचे प्रमाण आहे. महाराष्ट्रात मृत्यू दर ३.३७ टक्के असून देशाचा मृत्यू दर २.८२ टक्के आहे. जगात दर दहा लक्ष लोकांमागे ७७८ मृत्यू असताना महाराष्ट्रात हे प्रमाण ४८ इतके आहे. आज महाराष्ट्राच्या तुलनेत गुजरातमध्ये मृत्यू दर ६.१८ टक्के, पश्चिम बंगालमध्ये ५.६ टक्के, मध्य प्रदेशात ४.३२ टक्के इतका जास्त आहे. एक वेळेस राज्यातील मृत्यू दर ७.५ टक्के होता तो कमी होऊन ३.३७ टक्के इतका खाली उतरला आहे.

राज्यातील ३० ते ४० वयोगटात कोरोना लागण होण्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ४० टक्के, तर ४० ते ५० वयोगटात ते १८ टक्के आहे. ५० ते ६० वयोगटात ते १६.५ टक्के आहे. मृत्यू पावलेल्या ३२ टक्के

सर्वांना जन आरोग्य सुविधा

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व नागरिकांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यामुळे आता या योजनेच्या अंगीकृत असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये नागरिकांना उपचार घेता येणार आहेत. या संदर्भातील निर्णयास मंत्रिमंडळाने कार्योत्तर मंजुरी दिली.

आतापर्यंत राज्यातील ८५ टक्के नागरिकांचा या योजनेत समावेश होता. कोरोनाचा उद्रेक पाहता आता उर्वरित १५ टक्के नागरिकांनाही योजनेचा लाभ मिळणार असल्याने राज्यातील १०० टक्के जनतेचा समावेश या योजनेत करण्यात आल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. ३१ जुलै २०२० पर्यंत ही योजना अमलात राहील.

कोरोनाच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य परिस्थितीचा विचार करून महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार करण्याकरिता या दोन्ही योजनांचे लाभार्थी नसलेल्या इतर रुग्णांनादेखील महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत असलेल्या अंगीकृत खासगी रुग्णालयांमध्ये कोरोनासाठी उपचार घेता येतील.

महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ९९६ उपचार व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १२०९ उपचार पुरवले जातात. त्याचा राज्यातील २ कोटी २३ लाख कुटुंबांना लाभ मिळत आहे. या अंतर्गत राज्यातील सुमारे ८५ टक्के लोकसंख्येचा समावेश होतो. तथापि, राज्यातील कोरोनाची सद्य:स्थिती पाहता महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट नसलेल्या राज्यातील नागरिकांनासुद्धा महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अनुज्ञेय ९९६ उपचार पद्धतींचा लाभ मान्यताप्राप्त दराने सर्व अंगीकृत रुग्णालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

त्याचबरोबर शासकीय रुग्णालयांकरिता राखीव असलेल्या १३४ उपचारापैकी सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व श्रवणयंत्राचा उपचार वगळता १२० उपचार अंगीकृत खासगी रुग्णालयांमध्ये ३१ जुलै २०२० पर्यंत मान्यताप्राप्त दराने करण्यात येतील. लाभ घेण्यासाठी रहिवासी पुरावा म्हणून वैध पिवळी, केशरी, पांढरी शिधापत्रिका, तहसीलदार यांचा दाखला व अधिवास प्रमाणपत्र यांपैकी कोणतेही एक कागदपत्र पुरावा म्हणून सादर करावे लागेल. त्याबरोबरच शासनमान्य फोटो ओळखपत्र देणे आवश्यक राहील. कोरोनाच्या साथीचे गांभीर्य आणि उपचाराची तातडी पाहता आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांबाबत शिथिलता देण्याचे अधिकार राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. कोरोनासाठी शासनाने जाहीर केलेल्या खासगी अंगीकृत रुग्णालयांकडून कोरोना संशयित रुग्णांवर उपचार करण्याकरिता पीपीई किट्स व एन ९५ मास्कचा आवश्यक वापर करण्यात येईल. त्या प्रमाणात शासनाने ठरवलेल्या दरानुसार निधी देण्यात येईल. याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यामार्फत संनियंत्रण केले जाईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित जिल्हा शल्यचिकित्सकांची असणार आहे.

रुग्णांना इतर कोणतेही आजार नव्हते. ६७ टक्के लोकांमध्ये इतर आजारही होते. मुंबईमध्ये रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ४१.३३ टक्के, तर ठाण्यात ३६.५९ टक्के आहे

महाराष्ट्र राज्यात आतापर्यंत ४.५ लक्ष चाचण्या झाल्या आहेत. राज्यात ३६३१ चाचण्या दर दशलक्ष झाल्या असून देशात २६२१ चाचण्या होतात. केवळ आंध्र आणि तामिळनाडू राज्यांत आपल्यापेक्षा जास्त चाचण्या होत आहेत. पूर्वी राज्यात एकूण झालेल्या चाचण्यांपैकी १८ टक्के पॉझिटिव्ह होते, आता ते कमी होऊन १५.५ टक्के झाले आहे, अशी माहितीही बैठकीत देण्यात आली.

सध्या या चाचण्यांचे प्रमाण वाढवण्यात आले असून यासाठी एकूण १८ हजार पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

या वेळी बैठकीत ८० टक्के बेड्सची अंमलबजावणी रुग्णालयांनी काटेकोरपणे करावी, रुग्णवाहिका तत्काळ उपलब्ध करण्यासाठी खासगी रुग्णवाहिकासुद्धा अधिग्रहित कराव्यात, रुग्णालयांमध्ये वैद्यकीय कर्मचाऱ्यांना येणे सोयीचे जावे म्हणून उपनगरीय रेल्वे सेवा त्यांच्यासाठी सुरू करण्याकरिता पाठपुरावा करावा आदी बाबींवर मंत्रिमंडळ सदस्यांनी सूचना मांडल्या.

दिघी एमआयडीसी

केंद्र शासनाच्या दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्पातील दिघी औद्योगिक क्षेत्रामधील अधिसूचित झालेले क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत विकसित करण्यास मान्यता देण्यात आली. महामंडळाकडे मोठ्या प्रमाणात मेगा प्रोजेक्ट व परकीय गुंतवणूक करण्यासाठी दिघी औद्योगिक क्षेत्रात उद्योगांकरिता मोठ्या प्रमाणात जागेची मागणी होत आहे. मात्र, महामंडळाकडे पुरेसे क्षेत्र उपलब्ध नसल्याने कॉरिडॉर प्रकल्पांतर्गत १२ हजार १४०.८४२ हे.आर क्षेत्रापैकी ५० टक्के क्षेत्र सर्व कायदेशीर बाबी तपासून महामंडळामार्फत विकसित करण्याचे ठरले आहे. या दृष्टीने केंद्र शासन व संबंधित विभागास अवगत करण्यात येईल.

“ कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासनाने विविध स्तरांवर चांगल्या भूमिका घेऊन योग्य पावले उचलली. यामध्ये मंत्री महोदयांनी, विविध विभागांनी धोरणात्मक निर्णय घेतले, त्याचा थोडक्यात आढावा तसेच अन्य घडामोडींची माहिती. ”

मंत्रालयात कोरोना नियंत्रण कक्ष

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील समस्या समजून घेण्यासह मदतकार्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संस्था, व्यक्तींना मार्गदर्शन करण्यासाठी मंत्रालयात कोरोना नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात कोरोना विषाणूमुळे (कोविड-१९) उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी मंत्रालयात राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

कोरोना विषाणूच्या प्रतिबंधासाठी विविध संस्था, व्यक्ती यांना शासकीय यंत्रणांना सहकार्य, सहयोग करण्याची इच्छा असते त्यांनी ccrmaharashtra.aid@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा. शासनाने केलेल्या उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर उद्योग-व्यवसायांच्या अनुषंगाने काही प्रश्न असतील तर त्यांनी ccrmaharashtra.ind@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधण्याचे आवाहन करोना नियंत्रण कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित शंकांचे निरसन कुणाला करावयाचे आहे त्यांनी ccrmaharashtra.ind@gmail.com या ई-मेलवर, तर शासनाने दिलेल्या निर्देशांबद्दल, आखलेल्या धोरणांच्या अंमलबजावणीबद्दल स्पष्टीकरण हवे असल्यास ccrmaharashtra.policy@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधण्याचे आवाहन या कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

मंत्रालय नियंत्रण कक्षात संपर्क दूरध्वनी क्रमांक

मंत्रालय नियंत्रण कक्षात संपर्कासाठी नवीन दोन दूरध्वनी क्रमांक सुरू करण्यात आले आहेत. नियंत्रण कक्षात संपर्कासाठी एमटीएनएलचे ०२२-२२०२७९९० व ०२२-२२०२३०३९ हे दोन क्रमांक कार्यरत असून या दोन दूरध्वनीशिवाय ९३२१५८७१४३, ९३२१५९०५६१ हे दोन नवीन क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

रेशनिंगविषयी तक्रार आणि माहितीसाठी हेल्पलाईन

कोरोना साथरोग नियंत्रणासाठी लागू केलेल्या लॉकडाऊन कालावधीत राज्यात रेशनिंगसाठी हेल्पलाइन कार्यरत करण्यात आली आहे. जनतेने रेशनिंगसंदर्भातील तक्रारी आणि माहिती मिळवण्यासाठी १८००२२४९५० किंवा १९६७ या नि:शुल्क हेल्पलाईन क्रमांकाचा वापर करावा, असे आवाहन अन्न व नागरी पुरवठा विभागाने केले आहे.

लॉकडाऊन कालावधीत शिधावस्तू उपलब्धतेचे संनियंत्रण करताना रेशनिंग हेल्पलाईनबाबतीत जनतेत जागरूकता निर्माण करण्याची गरज असल्याचे दिसून आले आहे. रेशनिंगसाठीच्या तक्रारीसाठी/रेशनिंगची माहिती मिळविण्यासाठी हेल्पलाईन क्रमांकाचा वापर करा किंवा ई-मेल वा ऑनलाइन तक्रार प्रणालीचा वापर करून आपली तक्रार नोंदवा, असे आवाहन जनतेस करण्यात आले आहे.

राज्यस्तरीय हेल्पलाईन ही सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहणार असून त्याचा **हेल्पलाईन क्रमांक** : १८०० २२ ४९५०/१९६७ (नि:शुल्क) आहे. अन्य **हेल्पलाईन क्रमांक** : ०२२- २३७२०५८२ / २३७२२९७० / २३७२२४८३, **ई-मेल-** helpline.mhpds@gov.in, ऑनलाइन तक्रार नोंदवण्यासाठी mahafood.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन तक्रार निवारण प्रणाली याचा वापर करा. तसेच मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले असून हा कक्ष सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू राहील. त्याचा **हेल्पलाईन क्रमांक-** ०२२-२२८५२८१४, **ई-मेल-** dycor.ho.mum@gov.in असा आहे.

कामगारांची मोफत वैद्यकीय तपासणी

लॉकडाऊनच्या काळात आपल्या गावी जाऊ इच्छिणारे स्थलांतरित कामगार, लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या व्यक्ती यांना प्रवास सुरू करण्यापूर्वी आवश्यक असलेली वैद्यकीय तपासणी मोफत केली जाणार आहे.

यासंदर्भातील आदेशानुसार, प्रवास करू इच्छिणारे स्थलांतरित

कामगार, लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या व्यक्ती यांची डिजिटल थर्मामीटरच्या साहाय्याने तपासणी आणि सिम्टोमॅटिक एक्झामिनेशन (रोगलक्षणात्मक तपासणी) होणे गरजेचे आहे. शासकीय तसेच महापालिकांचे वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत ही वैद्यकीय तपासणी पूर्णतः मोफत केली जाईल किंवा महापालिकांकडून याकामी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांची सेवा घेता येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, तपासणी करण्यात आलेल्या आणि एन्फ्लुएन्झासारखा कोणताही आजार न दर्शवणाऱ्या व्यक्तींची एकत्रित यादी प्रमाणित करून वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत जारी करण्यात येईल. प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्र वैद्यकीय प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही, असेही या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या यादीतील व्यक्ती प्रवास करू शकतील.

कोविड मदत निधी

कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासन काटेकोर उपाययोजना करत असून या उपाययोजनांमध्ये अनेक स्वयंसेवी संस्था, उद्योजक, धार्मिक संस्था स्वयंप्रेरणेने सहभागी होत आहेत, मुख्यमंत्री सहायता निधीस मदत करत आहेत, करू इच्छित आहेत. केवळ याच प्रयोजनार्थ मुख्यमंत्री सहायता निधी- कोविड-१९ हे स्वतंत्र बँक खाते स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये उघडण्यात आले आहे. त्याचा बचत खाते क्रमांक ३९२३९५९१७२० आहे.

सढळ हाताने मदत करा

उद्योजक, कंपन्यांचे प्रमुख, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था राज्य शासनाच्या बरोबरीने या युद्धात सहभागी होऊन मदत करू इच्छितात त्या सर्व संस्था आणि नागरिकांनी मुख्यमंत्री सहायता निधी-कोविड -१९ या नावाने सुरू करण्यात आलेल्या खात्यात सढळ हाताने मदतीची रक्कम जमा करावी, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आहे. खात्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

Chief Minister's Relief Fund-COVID-19
Savings Bank Account Number : 39239591720
State Bank of India, Mumbai Main Branch,
Fort Mumbai 400023
Branch Code 00300
IFSC CODE- SBIN0000300

मराठीत :-
मुख्यमंत्री सहायता निधी-कोविड-१९
बँकेचे बचत खाते क्रमांक- ३९२३९५९१७२०
स्टेट बँक ऑफ इंडिया,
मुंबई मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई ४०००२३
शाखा कोड ००३००
आयएफएससी कोड : SBIN0000३००

सदर देणग्यांना आयकर अधिनियम १९६१ च्या ८० (G) नुसार आयकर कपातीतून १०० टक्के सूट देण्यात येते.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत हेल्थ केअर सेवांबाबत १० हजार ८१५ तरुणांना प्रशिक्षण

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत मेडिकल, नर्सिंग आणि हेल्थ केअर सेक्टरमधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये आतापर्यंत एकूण १० हजार ८१५ युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनवण्यात आले आहे. सध्या सुरू असलेल्या कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सेवकांची असलेली मोठी गरज लक्षात घेऊन सोसायटीने या युवक-युवतींची यादी आरोग्य विभागास तसेच सर्व जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे. हेल्थ केअर सेक्टरमधील हे प्रशिक्षित उमेदवार असून आवश्यकतेनुसार त्यांच्या नियुक्तीबाबत विचार व्हावा, अशी शिफारस करण्यात आली आहे. प्रशिक्षितांपैकी ९८५ उमेदवारांनी नियुक्तीसाठी होकारही दिला असून विविध जिल्हे आणि महापालिकांमार्फत या उमेदवारांना नियुक्त्या देण्याचे विचाराधीन आहे. काही ठिकाणी त्याप्रमाणे कार्यवाहीही करण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागांतर्गत असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत विविध प्रकारची कौशल्य विकासाची प्रशिक्षणे देण्यात येतात. यामध्ये लघु कालावधीची प्रशिक्षणेही असतात. सोसायटीमार्फत आरोग्य सेवा क्षेत्रातील बेडसाईड असिस्टंट, नर्सिंग एड, जनरल ड्यूटी असिस्टंट, जनरल ड्यूटी अटेंडंट, लॅबोरेटरी असिस्टंट, लॅबोरेटरी टेक्निशियन, डायलिसिस असिस्टंट, ऑपरेशन थिएटर टेक्निशियन तसेच फार्मसी असिस्टंट या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये आतापर्यंत १० हजार ८१५ युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनवण्यात आले आहे. सध्या देशभरात होत असलेला कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव, आरोग्य सेवा पुरवणाऱ्या यंत्रणेवरील ताण आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचा तुटवडा लक्षात घेता या उमेदवारांचा उपयोग होऊ शकेल. त्या दृष्टीने या उमेदवारांच्या नियुक्तीबाबत विचार व्हावा, अशी शिफारस सोसायटीमार्फत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना त्या त्या जिल्ह्यातील उमेदवारांची यादी पाठवून करण्यात आली आहे. काही जिल्ह्यांमध्ये या उमेदवारांची मदत घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. प्रशासन आणि उमेदवारांमध्ये समन्वय घडवून आणून त्यांच्या सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास सोसायटी पाठपुरावा करीत आहे.

हाफकिनकडून प्रमाणित पीपीई किट, एन-९५ मास्क विक्रीला परवानगी

कोरोना रुग्णांवर उपचारासाठी आवश्यक असलेल्या पी.पी.ई. किट व एन-९५ मास्कचे उत्पादन व विक्री करण्यापूर्वी हाफकिन बायोफार्मास्युटिकल महामंडळाकडून त्यांचा दर्जा व गुणवत्ता प्रमाणित करून घेण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहे. दर्जा व गुणवत्तेबाबतच्या मानकाव्यतिरिक्त इतर साहित्य वापरून तयार केलेल्या किट व मास्कची विक्री ही अनधिकृत समजण्यात येणार असून अशा किट व मास्कची विक्री करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे जाहीर केले आहे.

कोरोना रुग्णांवर उपचार करणाऱ्या आरोग्य सेवेतील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, निमवैद्यकीय कर्मचारी यांना प्रादुर्भावापासून रोखण्यासाठी पीपीई किट व एन-९५ मास्क आवश्यक असते. त्यामुळे केंद्र शासनाने पीपीई किट व मास्क यांना औषधे म्हणून

अधिसूचित केले आहे. किट व मास्कचा तुटवडा पाहून अनेक उत्पादकांनी पीपीई किट व एन-९५ मास्कचे उत्पादन सुरू केले आहे. मात्र, या किट व मास्कचा दर्जा व गुणवत्ता ही ठरवलेल्या मानकानुसार नसल्यास आरोग्य सेवा देणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना प्रादुर्भावास सामोरे जावे लागते. तसेच अशी उत्पादने ही वैद्यकीयदृष्ट्या उपयोगाची नसतात. त्यामुळे राज्य शासनाने हे साहित्य प्रमाणित असावे, यासाठी आदेश निर्गमित केले आहे.

त्यानुसार, पीपीई किट व एन-९५ मास्क यांचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांनी या साहित्याचा दर्जा व गुणवत्ता हाफकिन बायोफार्मास्युटिकल महामंडळाकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे. त्याशिवाय या साहित्याची विक्री कोणत्याही उत्पादक/वितरक/अडते(एजंट) यांना करता येणार नाही. अशी विक्री केल्याचे आढळून आल्यास अशा उत्पादन करणाऱ्या व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

तसेच राज्यातील या साहित्याची कमतरता लक्षात घेऊन अनावश्यक साठेबाजी करण्यास प्रतिबंध करण्यासाठी प्रमाणित पी.पी.ई. किट व एन-९५ मास्कची विक्री व वितरण फक्त राज्य शासनाच्या मान्यतेने व शासनाने ठरवून दिलेल्या दराने राज्य शासनास अथवा हे साहित्य खरेदीस परवानगी दिलेल्या संस्थेस करण्याचे निर्देशही यामध्ये देण्यात आले आहेत.

यासंबंधी काही अडचणी अथवा मार्गदर्शन हवे असल्यास व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायोफार्मास्युटिकल महामंडळ, मुंबई येथे ०२२-२४५१०६२८ किंवा सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (०२२-२२६२२१७९) व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (०२२-२२६१७३८८) या ठिकाणी संपर्क साधण्याचे आवाहनही या अधिसूचनेद्वारे करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांविरुद्ध साथरोग नियंत्रण कायदा १८९७ मधील तरतूद, आपत्ती व्यवस्थापन कायदा आणि अन्न व औषधी व्यवस्थापन कायद्यातील विविध तरतुदीनुसार दंडनीय कारवाई करण्यात येणार असल्याचेही यामध्ये नमूद केले आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेचा पहिला हप्ता जमा

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेली आर्थिक व सामाजिक परिस्थिती लक्षात घेता केंद्र शासनामार्फत प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत देशातील प्रधानमंत्री जनधन खातेधारक असलेल्या सर्व महिलांच्या बचत खात्यावर एप्रिल ते जून २०२० पर्यंत तीन महिन्यांसाठी प्रतिमाह ५०० रुपये प्रमाणे प्रत्येकी एकूण रक्कम १ हजार ५०० रुपये जमा करण्यात येणार आहे. यानुसार माहे एप्रिल २०२० ची आर्थिक रक्कम प्रधानमंत्री जनधन खातेधारक असलेल्या महिलांच्या बचत खात्यावर जमा करण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या पहिल्या हप्त्याची रक्कम २ हजार रुपये थेट हस्तांतरणाद्वारे शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर जमा करण्यात येत आहे.

महावितरणच्या दैनंदिन कार्यपद्धतीत बदल

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महावितरणला आपल्या दैनंदिन कार्यपद्धतीत बदल करण्याचे आदेश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिले आहेत.

ग्राहकांशी रोजचा होणारा संपर्क टाळण्याच्या सूचना दिल्या आहेत. मीटर रीडिंग करण्यासाठी व बिलाचे वितरण करण्यासाठी ग्राहकांच्या घरी २३ मार्चपासून पुढील आदेश येईपर्यंत जाऊ नये. या काळात मीटर रीडिंग न झाल्यामुळे ग्राहकांना सरासरी बिल पाठवण्याची सूचना देण्यात आल्या आहेत. या काळात वीज बिलाची छपाई करण्यात येणार नाही. तथापि महावितरणच्या संकेतस्थळावर बिले उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सोबतच ग्राहकांनी महावितरणकडे नोंदविलेल्या मोबाइल नंबरवर

डॉ. नितीन राऊत
ऊर्जा मंत्री

बिलासंबंधीचे एसएमएस पाठवण्यात येतील. या कालावधीत थकबाकीसाठी ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित न करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वीजचोरी व बिलासंबंधीच्या तक्रारीला अनुसरून ग्राहकांच्या घरी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी भेटी देऊन तपासणी करू नये, अशा सूचना मंत्री डॉ. राऊत यांनी महावितरण प्रशासनाला दिल्या आहेत.

कोरोना संकटानंतर रेडीरेकनर दर जाहीर

बाळासाहेब थोरात
महसूल मंत्री

राज्य सरकारकडून दर वर्षी मार्च अखेरीस रेडीरेकनरचे दर जाहीर केले जातात. मात्र गेल्या काही दिवसांपासून महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचारी कोरोनाच्या संकटातून जनतेला सावरण्यासाठी झटत आहेत. त्यामुळे यावर्षीचे रेडीरेकनर दर जाहीर होणार नसून कोरोनाच्या संकटातून महाराष्ट्र मुक्त झाल्यानंतर हे दर जाहीर केले जातील, अशी माहिती महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली.

ग्रामपंचायत, अंगणवाडी कर्मचारी, आशा कार्यकर्तींना प्रोत्साहनपर रक्कम आणि विमा संरक्षण

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत स्तरावर जोखीम पत्करून काम करणारे सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी, मिनी अंगणवाडी कार्यकर्त्या, अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्ती यांना मिळणाऱ्या नियमित वेतन, मानधनाव्यतिरिक्त त्यांना १ हजार रुपये इतकी प्रोत्साहनपर रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

याशिवाय केंद्र शासनाने आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी काढलेल्या ५० लाख रुपयांच्या विम्याच्या धर्तीवर या कर्मचाऱ्यांचा ९० दिवसासाठी २५ लाख रुपयांचा विमा उतरवण्यासही मान्यता देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. यासंदर्भातील परिपत्रक निर्गमित करण्यात

महिन्याभरापासून क्रूझवर अडकलेल्या भारतीय खलाशी, कर्मचाऱ्यांचा मुंबई बंदरावर उतरण्याचा मार्ग मोकळा

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रयत्नाने अखेर मरिला डिस्कव्हरी या एका मोठ्या क्रूझ शिपवर महिन्याभरापासून अडकून पडलेल्या १४६ भारतीय खलाशी व नाविक यांना मुंबई बंदरावर उतरण्याची परवानगी मिळाली आहे. मुख्यमंत्री स्वत: नौकानयन राज्यमंत्री मनसुख मांडविया यांच्याशी बोलल्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने यासंदर्भातील एक आदेश जारी केला. त्याचा फायदा समुद्रात ठिकठिकाणी जहाजांवर अडकलेल्या सुमारे ४० हजार खलाशी, जहाजावरील कर्मचाऱ्यांनासुद्धा होणार आहे.

मरिला डिस्कव्हरी

या क्रूझवरील खलाशी व कर्मचाऱ्यांची मुंबई बंदरावर उतरल्यानंतर वैद्यकीय तपासणीही होईल. प्रसंगी त्यांना क्वारंटाईन करण्यासाठी एक इमारतही उपलब्ध ठेवण्यात आली आहे.

२ ते ६ एप्रिल या कालावधीत मरिला डिस्कव्हरी ही क्रूझ कोचीन, न्यू मंगलोर, गोवा आणि मुंबई अशा ठिकाणी पोहचणार होती. दरम्यान कोरोनाचा उद्रेक सुरू झाला आणि या क्रूझने लाएम चाबँग या थायलँड येथे १४ मार्च रोजी सर्व प्रवासी सोडले. ही क्रूझ १२ एप्रिल रोजी कोचीन येथे पोहोचली, पण या क्रूझवरील कर्मचाऱ्यांना उतरण्यास परवानगी नाकारण्यात आली. नंतर ही क्रूझ मुंबईजवळच्या समुद्रात १४ एप्रिल रोजी पोहोचली आणि तेव्हापासून त्यावरील कर्मचारी मुंबईला उतरण्याची वाट पाहत होते. जहाजावरील कुठल्याही कर्मचाऱ्यास कोरोना लागण झाली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. थायलँड सोडून ३७ दिवस होऊन गेले होते, मात्र जहाजावर कुठलाही संसर्ग नसल्याचे कंपनीने सागितले तरी परवानगी मिळत नव्हती.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यासंदर्भात नौकानयन मंत्रालयाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. प्रधान सचिव विकास खारगे, आशिष कुमार सिंह आणि मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष संजय भाटिया हे सातत्याने पाठपुरावा करीत होते. यासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाने एक आदेश काढला. यात व्यापारी व व्यावसायिक जहाजांवरील कर्मचारी, खलाशी यांना भारतीय बंदरांवर उतरणे तसेच बंदरांवरून जाणे शक्य व्हावे म्हणून निश्चित कार्यपद्धती दिली आहे. यानुसार या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या गेल्या २८ दिवसांतील प्रवासाची माहिती कळवणे, तसेच बंदरावर उतरल्यावर कोविड चाचणी करून घेणे, प्रसंगी क्वारंटाईन करणे, या खलाशी व कर्मचाऱ्यांना थेट त्यांच्या घरी सोडण्यासाठी ट्रांझिट पास, वाहनाची व्यवस्था आदी बाबींचा समावेश आहे. याचा फायदा समुद्रात सध्या विविध जहाजांवर अडकलेल्या ३५ ते ४० हजार भारतीय खलाशांना होणार आहे.

आले असून सर्व जिल्हा परिषदांना कार्यवाहीसाठी सूचना देण्यात आल्या आहेत. हा खर्च १४व्या वित्त आयोगाच्या निधीतून भागवण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयातून राज्यातील ग्रामीण भागातील करोना विषाणूच्या विरोधात लढा देणाऱ्या २ लाख ७३ हजार कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम मिळणार असून या कर्मचाऱ्यांना विम्याचेही संरक्षण दिले जाणार असल्याची माहिती मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी दिली.

ग्रामविकास अधिकाऱ्यांना विमा संरक्षण

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावांमध्ये काम करणारे अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्याबरोबरच आता राज्यातील सर्व ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी आणि आपले सरकार सेवा केंद्रांतर्गत काम करणारे केंद्र चालक (संगणक परिचालक) यांनाही २५ लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती राज्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

हसन मुश्रीफ
ग्रामविकास मंत्री

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखणे, यासाठी घ्यावयाच्या दक्षतांबाबत घरोघरी जाऊन लोकांचे प्रबोधन करणे, संशयित रुग्णांना मार्गदर्शन व मदत करणे यासाठी गावपातळीवरील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, संगणक परिचालक आदी सर्व जण अहोरात्र काम करीत आहेत. जीवाची जोखीम पत्करून काम करणारे ग्रामीण पातळीवरील हे सर्व कर्मचारी म्हणजे कोरोनाविरुद्धच्या लढ्यातील सैनिकच आहेत. केंद्र सरकारने कोरोना रोखण्यासाठी कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांचा ५० लाख रुपयांचा विमा उतरवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात ग्रामीण भागात या कामात इतर ग्रामीण कर्मचारीही कार्यरत असल्याने राज्य शासनाने ३१ मार्च रोजी परिपत्रक काढून गावपातळीवरील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, ग्रामपंचायत कर्मचारी यांना ९० दिवसांकरिता २५ लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. आता हा निर्णय अधिक व्यापक करून यामध्ये ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी आणि संगणक परिचालक यांचाही समावेश करण्यात आला असून आता त्यांनाही ९० दिवसांकरिता २५ लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

संगणक परिचालक हे कंत्राटी पद्धतीवर कार्यरत कर्मचारी आहेत. तरीही कोरोनाविरुद्धच्या लढ्यात ते गावागावांमध्ये जीवाची जोखीम पत्करून काम करीत आहेत. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी हेही अहोरात्र काम करीत आहेत. त्यामुळे त्यांना विमा संरक्षण देण्याचा निर्णय शासनाच्या ग्रामविकास विभागाने घेतला असल्याचे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले. यासंदर्भात ३१ मार्च २०२० रोजीच्या परिपत्रकात दुरुस्ती करणारे शुद्धिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

दरम्यान, ३१ मार्च रोजीच्या परिपत्रकान्वये गावांमध्ये कोरोना रोखण्यासाठी कार्यरत अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, ग्रामपंचायत कर्मचारी यांना त्यांच्या नियमित वेतनाव्यतिरिक्त १ हजार रुपये अतिरिक्त रक्कम देण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला असून त्यासंदर्भात सर्व जिल्हा परिषदांना सूचना पाठविण्यात आल्या आहेत. लवकरच हे मानधन या कर्मचाऱ्यांना देण्यात येत आहे, असे श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

करवसुलीच्या टक्केवारीची अट शिथील

राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना २०२०-२१ या चालू आर्थिक वर्षात करवसुलीवर आधारित वेतन न देता त्यांना किमान वेतन देण्याचा निर्णय राज्याचे ग्रामविकास मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी घेतला आहे.

गावांमधील कोरोनाचे संक्रमण रोखण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी योद्ध्याप्रमाणे काम केले. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना चालू वर्षी करवसुलीशी निगडित वेतन न देता किमान वेतन देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

मागील वर्षी राज्यात आपत्ती, पूरपरिस्थिती अशी संकटे उद्‌भवली होती. तसेच सध्या कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर गावांमध्ये सर्व प्रकारची करवसुली कमी झालेली आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता गावागावांमध्ये आदर्श असे काम केले आहे. वेतनाच्या सध्या प्रचलित पद्धतीनुसार त्यांचे वेतन करवसुलीच्या टक्केवारीशी जोडण्यात येते. सध्या ही पद्धती अवलंबिल्यास त्यांना अत्यल्प वेतन मिळेल, जे की अन्यायकारक ठरेल. त्यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना चालू आर्थिक वर्षात सध्या करवसुलीच्या टक्केवारीच्या आधारे वेतन न देता त्यांना निर्धारित किमान वेतन देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले. यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना गावामध्ये कमी करवसुली झाली असली तरी चांगले वेतन मिळणार आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च ग्रामपंचायत आणि राज्य शासनामार्फत करण्यात येतो. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन देण्यासाठी राज्य शासनाचा हिस्सा देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या हिश्श्यामधून अधिकचा खर्च भागवण्यासही मान्यता देण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

राज्यातील राष्ट्रीय महामार्गासाठी २० हजार कोटी द्या!

राज्यामध्ये राष्ट्रीय महामार्गाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. या महामार्गाच्या निर्मितीसाठी अनेक अडचणी येत आहेत, काही प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात यावी व त्यासोबतच राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे काम जलद गतीने होण्यासाठी २० हजार कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारने राज्यातील

राष्ट्रीय महामार्गास द्यावा, अशी मागणी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोकराव चव्हाण यांनी केंद्रीय रस्ते मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली.

अशोकराव चव्हाण
सार्वजनिक बांधकाम मंत्री

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी देशातील विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सचिव यांच्याशी दिल्ली येथून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. महाराष्ट्राच्या वतीने राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोकराव चव्हाण यांनी या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे झालेल्या चर्चेत सहभाग घेतला होता. या वेळी त्यांनी राज्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ते निर्मितीतील विविध अडचणी आणि येणाऱ्या समस्या याविषयी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्र्यांना अवगत केले.

राज्यामध्ये राष्ट्रीय महामार्गाचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. परंतु अनेक ठेकेदार वेळेवर काम करीत नाहीत. त्यामुळे वाहतूक अडथळा निर्माण होत आहे. जे ठेकेदार विहित वेळेत काम करीत नाहीत अशांची कामे रद्द करावीत व त्यांना काळ्या यादीत टाकावे अशी मागणी सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोकराव चव्हाण यांनी केली. राज्यातील राष्ट्रीय महामार्गाची कामे जलद गतीने होण्यासाठी व येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विभागीय आयुक्तस्तरावर समितीचे गठन करण्यात यावे व त्या माध्यमातून राष्ट्रीय महामार्गाच्या कामांना गती द्यावी अशी मागणी त्यांनी या वेळी केली.

महाराष्ट्रातील अंकलेश्वर - चोपडा - ब्राहणपूर - देवराई - शेवगांव - नेवासा - संगमनेर, कोल्हापूर - महाबळेश्वर - शिरूर, सागरी मार्ग - खोल - अलिबाग - रत्नागिरी - वेंगुर्ला - रेड्डी - गोवा या मार्गांना राष्ट्रीय महामार्गाची मान्यता देण्यात यावी अशी मागणी मंत्री अशोकराव चव्हाण यांनी केली आहे.

दुधाचे रूपांतर दूध भुकटीत

कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेल्या विपरीत परिस्थितीतही राज्यातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने अतिरिक्त ठरणाऱ्या दुधापैकी प्रतिदिन १० लक्ष लिटर दुधाचे रूपांतरण दूध भुकटीत करण्यास व त्यासाठी येणाऱ्या १८७ कोटी इतक्या खर्चास शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री सुनील केदार यांनी दिली.

सुनील केदार
पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्यावर मोठ्या प्रमाणात प्रतिकूल परिणाम दिसून आला आहे. याच पार्श्वभूमीवर भारत सरकारने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पूर्ण देशामध्ये २४ मार्च पासून लॉकडाऊन घोषित केला आहे. लॉकडाऊनमुळे बाजारात पिशवीबंद दुधाच्या मागणीत घट झाली असून हॉटेल, रेस्टॉरंट व मिष्टान्न निर्मिती केंद्र मोठ्या प्रमाणात बंद झाली आहेत. परिणामी राज्यातील दुधाच्या मागणीत मोठ्या प्रमाणात घट झाल्यामुळे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांपुढे अतिरिक्त दुधाचा प्रश्न निर्माण झालेला होता.

सॅनिटायझर टनेलची निर्मिती

राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी रेल्वे स्टेशन, बस स्थानक, भाजीपाला मार्केट, शासकीय कार्यालय, विद्यापीठ, हॉस्पिटल प्रवेशद्वार अशा गर्दीच्या ठिकाणी टनेल सॅनिटायझरची उभारणी करून निर्जंतुकीकरण गरजेचे आहे. त्यासाठी 'इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी'ने पुढाकार घेऊन सॅनिटायझर टनेलची निर्मिती केली आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

देशातील विविध भागांमध्ये अशा प्रकारच्या टनेलचा वापर केला जातोय. ज्यामध्ये दिल्ली, हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू राज्यांचा समावेश आहे. तसेच भारतीय रेल्वेकडून हरियाणा येथे अशा प्रकारच्या टनेलची निर्मिती करण्यात आलेली आहे. या टनेलला 'फुमिगेशन टनेल' असे म्हटले जाते. कर्नाटकातील हुबळी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्येसुद्धा याचा उपयोग केला जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) व्यावसायिक मार्गदर्शक सूचनेनुसार 'इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी'च्या पुढाकाराने या टनेलची निर्मिती केली आहे.

उदय सामंत
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

यामध्ये पाण्यात १% सोडियम हायपोक्लोराईडच्या मिश्रणाचा वापर केला जातो. टनेलमधून जाण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला ४ ते ५ सेकंदाचा वेळ लागतो. ज्या माध्यमातून निर्जंतुकीकरण केले जाते. अशा प्रकारच्या टनेलच्या निर्मितीसाठी १२ फूट लांबीच्या पोर्टा केबिनचा वापर केला गेला आहे.

नोझलद्वारे निर्माण होणाऱ्या धुक्यांचे अधिक चांगले वितरण सुनिश्चित करण्यासाठी फ्लूड फ्लो सिस्टम अँनसिस (एएनएसवायएस) या कार्यक्षम सॉफ्टवेअरमध्ये डिझाइन आणि सिम्युलेट केले गेले आहे. द्रवपदार्थाप्रमाणे दोन फ्लूड प्रणालीच्या पद्धतीचा वापर येथे केला आहे. डिस्क्रिट पार्टिक्युलेट मॉडेल (डीपीएम)चा उपयोग सीएफडी मॉडेलमध्ये वापरून द्रवपदार्थ सर्व ठिकाणी कसा पोहोचला जाईल हे बघितले आहे. मानवी शरीरावर याचा प्रत्यक्षात काही विपरीत परिणाम होतो आहे का नाही याचा शोध घेण्यासाठी ही पद्धत वापरली जात आहे.

अशा प्रकारे कोरोनाशी लढा देण्यासाठी कमी खर्चात या अभिनव उपकरणांची निर्मिती करण्यात आलेली आहे. यामुळे कोरोनाच्या विषाणूचा प्रादुर्भाव रोखला जाणे शक्य होईल. मात्र, कोणत्याही प्रकारची ॲलर्जी असणाऱ्यांनी या टनेलमध्ये प्रवेश करणे योग्य


सॅनिटायझर टनेल

नसल्याचे श्री. सामंत यांनी सांगितले.

या टनेल निर्मितीसाठी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे कुलगुरू प्रा.अनिरुद्ध पंडित, शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाचे प्राध्यापक राजेंद्र सोनकवडे, प्रा. सचिन मठपती व त्यांचे विद्यार्थी विक्रम कोरपाले यांनी संशोधन करून ह्या उपकरणाचे डिझाईन केले आहे.

विद्यापीठांच्या परीक्षा

राज्यातील कोरोनाची सध्याची परिस्थिती पाहता विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या परीक्षेसंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना प्राप्त झाल्यानंतरच निर्णय घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी चुकीच्या माहितीवर आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले आहे.

श्री.सामंत यांनी सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून संवाद साधला आणि विद्यापीठीय परीक्षेसंदर्भात गठीत समितीचा आढावा घेतला. विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षेसंदर्भात समिती नेमली आहे, आयोगाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतरच समितीच्या अहवालावर तत्काळ निर्णय घेण्यात येईल. सर्व विद्यापीठांची आपापल्या पातळीवर परीक्षा घेण्याची तयारी झालेली आहे. ऑनलाइन अध्यापन सध्या सुरू असून ऑनलाइन परीक्षासंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात वेळोवेळी माहिती दिली जाईल तसेच परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची संपूर्ण काळजी घेतली जाईल.

कोरोना टेस्टिंग प्रयोगशाळा

कोरोनाच्या टेस्टिंग प्रयोगशाळा सर्व विद्यापीठांमध्ये सुरू करण्यात येणार आहेत. आतापर्यंत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ही प्रयोगशाळा सुरू झाली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील प्रयोगशाळेचे काम अंतिम टप्प्यात आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कोरोना विषाणूशी लढा देण्यासाठी व्हेंटिलेटर तयार केले असून ते लवकरच पाच रुग्णालयांमध्ये वापरले जाणार आहे. एसएनडीटी विद्यापीठामध्ये 'जीवनरक्षक' कोर्सची निर्मिती करण्यात येत असून हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी आरोग्य यंत्रणेला मदत करू शकतील. हा अभ्यासक्रम आपत्ती व्यवस्थापनाचे धडे विद्यार्थ्यांना देईल, असेही श्री. सामंत यांनी सांगितले.

कोरोना संकटाचा मुकाबला करण्यासाठी प्रत्येक विद्यापीठांने आपत्कालीन निधीतील काही रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधी कोविड-१९ साठी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन श्री. सामंत यांनी केले. या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, संचालक धनराज माने, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य संचालक डॉ. अभय वाघ, विद्यापीठीय परीक्षेसंदर्भात गठीत समितीचे सर्व सदस्य तसेच सर्व विद्यापीठांचे कुलगुरू यांनी सहभाग घेतला.

अंतिम सत्राच्या परीक्षा

विद्यापीठ अनुदान समितीने अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राची परीक्षा १ ते ३१ जुलैदरम्यान घ्याव्यात अशा सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे राज्य शासनाने निर्णय घेतला होता. पण, सध्याच्या कोरोनाच्या परिस्थितीमध्ये ज्याप्रमाणे अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रापर्यंतच्या सर्व परीक्षा रद्द केल्या आहेत. त्याचप्रमाणे अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द कराव्यात याविषयी यूजीसीला पत्र पाठवण्यात आल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्या वेळी त्यांनी ही माहिती दिली. राज्यातील ८ ते १० लाख विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा तसेच मानसिक स्वास्थ्याचा विचार करता अंतिम सत्राच्या परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना मार्क्स ग्रेडेशन पद्धतीने देण्याविषयी यूजीसीला लिहिले आहे. या प्रकारे ग्रेडेशन करताना कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही अशा पद्धतीने हे मार्क्स ग्रेडेशन करण्यात येणार आहे. यूजीसीच्या मार्गदर्शनानुसारच हे ग्रेडेशन देण्यात यावे. विद्यार्थ्यांच्या हिताचा, आरोग्याचा आणि मानसिक स्वास्थ्याचा विचार करून यूजीसीला पत्र केले आहे. या पत्राचा यूजीसीला विचार करावाच लागेल, असे श्री. सामंत यांनी सांगितले.

सीईटीच्या परीक्षांसाठी तालुकास्तरावर केंद्र

सीईटीच्या परीक्षांसाठीचे वेळापत्रक सध्या जाहीर करण्यात आले आहे. पण त्याविषयी विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून काही निर्णय घ्यावे लागले तर तसे निर्णयही भविष्यात घेतले जातील. सध्या जुलैच्या ४ तारखेपासून ३१ तारखेपर्यंत यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यामधून काही विद्यार्थ्यांची परीक्षा राहिल्यास पुन्हा ३ ते ५ ऑगस्टदरम्यान परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ५ लाख २४ हजार ९०७ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. पण, या परीक्षा देताना काही विद्यार्थी शिल्लक राहिले तर त्यांचाही विचार या परीक्षांमध्ये करण्यात येणार आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता जिल्हा केंद्रांवर होणारी ही परीक्षा तालुका केंद्रावर घेण्यात येणार आहे. तालुका केंद्रावर परीक्षा घेताना सामाजिक अंतराचे तंतोतंत पालन केले जाईल.

विद्यार्थ्यांना सेंटर बदलाची मुभा मिळणार आहे. लॉकडाऊनमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर येण्यात अडचणी उद्‌भवल्यास त्यांना केंद्रावर नेण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू

वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या पदव्युत्तर वैद्यकीय व पदव्युत्तर दंत वैद्यकीय अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विभागामार्फत सुरू करण्यात आली आहे. लॉकडाऊनमुळे किंवा इतर काही कारणांमुळे लिंक, वेबसाईटमध्ये काही अडथळे निर्माण झाले असतील तर त्या लिंक, वेबसाईटही पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या उर्वरित सीईटी परीक्षांच्या तारखाही लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत. कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या सर्व अडचणींचाही आढावा घेतला जाणार आहे. विद्यार्थ्यांना आरोग्याच्या कोणत्याही समस्या उद्‌भवणार नाहीत यासाठी शासन कटिबद्ध आहे आणि त्या दृष्टीनेच

काम करण्यात येणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द झाल्या आहेत, त्यांच्या परीक्षा शुल्क पुढील सत्रासाठी वापरणे किंवा त्यांना शुल्क परत करणे याविषयी चर्चा सुरू आहे. त्यातून विद्यार्थ्यांना दिलासा दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठीचे निर्णय राज्य शासन घेईल, असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले.

अंगणवाडीतील बालकांना घरपोच शिधा

कोरोनाच्या संसर्गाचा धोका निर्माण होऊ नये म्हणून टाळेबंदीमुळे राज्यातील बहुतांश व्यवहार ठप्प आहेत. महिला व बालकल्याण मंत्रालयांतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांमध्ये दिले जाणारे शालेयपूर्व शिक्षण व पोषण आहारही स्थगित करण्यात आला आहे. मात्र, असे असले तरी तीन ते सहा वर्षे वयोगटांतील बालकांना घरपोच शिधा देण्यात येणार आहे. येत्या १५ दिवसांत संपूर्ण राज्यात १०० टक्के

ॲड. यशोमती ठाकूर
महिला व बालकल्याण मंत्री

गरम ताज्या आहाराऐवजी कोरडा शिधा वाटपाचे उद्दिष्ट महिला व बालकल्याण मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी आखले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या अभूतपूर्व परिस्थितीतही राज्याचा कारभार प्रभावीपणे हाकण्याचा प्रयत्न शासनातर्फे होत आहे. या पार्श्वभूमीवर महिला व बालकल्याण मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्यासह अमरावती येथून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे राज्यातील सर्व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) यांच्याशी संपर्क साधून आढावा घेतला. कोरोनामुळे अंगणवाड्यांमध्ये तीन ते सहा वर्षे वयोगटातील मुलांना दिले जाणारे शालेयपूर्व शिक्षण व पोषण आहार हे उपक्रम सध्या बंद आहेत. मात्र, बालकांच्या पोषण आहारात खंड पडू नये यासाठी त्यांना घरपोच शिधा देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गरम ताज्या आहाराऐवजी बालकांना घरपोच शिधा (टीएचआर) दिला जाणार आहे. महाराष्ट्र कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेडतर्फे हा शिधा पोहोचवला जाणार आहे.

नऊ लाख मास्कनिर्मिती

दरम्यान, या अडचणीच्या काळामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत (माविम) महिला बचत गटांनी अत्यंत प्रभावी कामगिरी बजावली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सध्या मास्कचा बाजारात असलेला तुटवडा पाहता माविमच्या २५ जिल्ह्यांतील सुमारे १०८ बचत गटांतील महिला मास्क निर्मिती व वाटपाच्या उपक्रमात सहभागी झाल्या असून शासकीय तसेच खासगी कंपन्यांकडून आलेल्या मागणीनुसार सुमारे ९ लाख ३१ हजार मास्क तयार करून वितरित करण्यात आले आहेत. राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी शिवभोजन योजना सध्याच्या कोरोना परिस्थितीमध्ये गोरगरिबांसाठी मोठा आधार ठरली आहे. या योजनेतही राज्यातील १२ जिल्ह्यांत माविमचे २२ महिला बचत गट योगदान देत असून आतापर्यंत भंडारा, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, गडचिरोली, बुलडाणा, वाशिम, नाशिक, नंदुरबार, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये शिवभोजन उपक्रम चालू आहे. टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात विविध ठिकाणी अडकलेल्या मजूर, ऊसतोड कामगार, माथाडी कामगार यांच्याकरिता जेवणाची सोय करण्याकरिता माविम बचत गटांनी पुढाकार घेतला आहे. १३ जिल्ह्यातील २५ 'कम्युनिटी मॅनेज्ड रिसोर्स सेंटर'मार्फत (सीएमआरसी) सुमारे १५ हजार लोकांना जेवण पुरवले जात आहे.

३२ हजार कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, साडेबारा हजार टन भाजीपाल्याचे वितरण

हातावर पोट असलेल्या गरजू कुटुंबांचे उत्पन्नाचे साधन बंद झाल्यामुळे अनेक कुटुंबांना दैनंदिन जीवनावश्यक वस्तूचा तुटवडा जाणवत आहे. २३ जिल्ह्यांतील १२२ गटांमार्फत ३२,४१० कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यात आला. वाहतुकीची साधने बंद झाल्यामुळे भाजीपाल्याची वाहतूकही बंद झाली. या अडचणी लक्षात घेता माविमच्या ६ सीएमआरसीमार्फत १२ हजार ३०० टनचा भाजीपाला मुंबई, ठाणे, नवी मुंबई या परिसरात वितरित करण्यात आला. असे अनेक उपक्रम माविममार्फत राबविण्यात येत आहेत.

अमृत आहार योजनेंतर्गत दिला जाणारा चौरस आहार, अंगणवाडी सेविकांचे मानधन त्यांच्या खात्यात जमा करणे, नागरी भागात काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका-मदतनीसांनी प्रोत्साहनपर भत्ता विमा मिळणे, आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्यात आलेली प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज इन्शुरन्स स्कीम अंगणवाडी सेविका-मदतनीसांनाही लागू करण्याबाबत प्रस्ताव तयार करणे इत्यादी विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

'तिच्या' भल्यासाठी

देहविक्रय व्यवसायात नाइलाजाने आलेल्या महिलांची परिस्थिती सुधारण्यासाठी व त्यांना सन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत प्रयत्न केले जात आहेत. सध्याच्या परिस्थितीत या महिलांना कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्याने महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी विभागाच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना सूचना देऊन या महिलांना अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू तसेच व्यक्तिगत स्वच्छता साधने पुरवण्याचे निर्देश दिले. त्यानुसार आत्तापर्यंत सुमारे साडेबारा हजार महिलांना शासनाने साहाय्य केले आहे.

या कामात स्वयंसेवी संस्थांनीही शासनासोबत काम करत खूप चांगले सहकार्य केले आहे. मुंबईतील कामाठीपुरा, फोकलँड, खेतवाडी, काँग्रेस हाऊस, सिप्लेक्स बिल्डिंग, ॲण्टॉप हिल, पारस रोड, दामोदर मॅन्शन या भागातील देहविक्रय करणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी दिवसरात्र खुली निवारागृहे चालवली जात आहेत. शासनासोबतच १५-१६ सामाजिक संस्था त्यांच्यासाठी काम करत असून महानगरपालिकेमार्फत अन्नाचे डबे त्यांच्यापर्यंत पोहोचवले जात आहेत. या महिलांना पुढील १५ दिवस पुरेल इतके अन्नधान्याचे (रेशन) किट पुरवण्यात आले असून त्यानंतरही महिनाभराचे रेशन पुरवण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे. त्याचबरोबर सॅनिटायझर्स, सॅनिटरी किट, सोया बिस्किटे व इतर खाद्य वस्तू या वस्त्यांमध्ये पुरवण्यात येत आहेत. अन्नधान्य पुरवठ्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या वतीने मोफत सुलभ शौचालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. 'एचआयव्ही'ग्रस्त महिलांसाठी 'एआरटी' उपचारपद्धती सुरू असून नियमितपणे औषधे पुरवण्यात येत आहेत.

पुणे जिल्ह्यात सुमारे २ हजार ५०० महिला या व्यवसायात असून त्यांच्यासाठी काम करणाऱ्या १२-१३ संस्थांनी पोलिसांच्या मदतीने त्यांच्यापर्यंत अन्नधान्य, रेशन किट, सॅनिटरी किट पोहोच केले आहे. फरासखाना पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी या मदत कार्यात विशेष भूमिका बजावली आहे. तसेच आरोग्य विभागाकडून नियमित आरोग्य तपासणी केली जात आहे. बुधवार पेठेमध्ये अशा महिलांच्या मुलांची संख्या मोठी असून त्यांच्यासाठी शासकीय दूध योजनेतून दुधाचा पुरवठा करण्यात येत आहे. यासाठी कात्रज दूध संघाने मदत केली आहे. 'सहेली' संस्थेने येथील महिलांचे मोबाइल रिचार्ज केले असून त्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबांशी संवाद साधता येत असल्याने मानसिक स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी त्याची मदत झाली आहे.

नाशिक, अहमदनगर, नागपूर आदी मोठ्या शहरांसोबतच सर्वच जिल्ह्यांत या महिलांसाठी रेशन किट वाटप, सॅनिटरी किट वाटप आदी उपक्रम सुरू असून अनेक स्वयंसेवी संस्था तसेच या महिलांच्या मुलांसाठी चाईल्डलाईन संस्था काम करत आहे. काही जिल्ह्यांत नोंदणी नसलेल्या छुप्या पद्धतीने या व्यवसायात महिला असून त्यांनाही मदत मिळावी यासाठी महिला व बालविकास विभाग अन्य शासकीय यंत्रणा तसेच स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न करत आहे. या व्यवसायातील शिधापत्रिका नसलेल्या महिलांनाही शासनाच्या वितरण व्यवस्थेमार्फत रेशन पुरवठा व्हावा या दृष्टीने पाठपुरावा सुरू आहे.

बांधकाम कामगारांना साहाय्य

दिलीप वळसे-पाटील
कामगार मंत्री

कोरोना या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या स्थितीत राज्य व केंद्र शासनाकडून लॉकडाऊन घोषित करण्यात आला आहे. लॉकडाऊन कालावधीत राज्यातील इमारत व इतर बांधकामे बंद झाली असल्याने बांधकाम कामगारांना दररोज रोजगार मिळत नाही. त्यामुळे दैनंदिन जीवनातील मूलभूत गरजा भागवण्यासाठी कामगारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याच पार्श्वभूमीवर मंडळाकडील नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना दोन हजार रुपये एवढे आर्थिक साहाय्य थेट बांधकाम कामगाराच्या बँक खात्यात डीबीटी पद्धतीने जमा करण्यात येणार आहे. याचा फायदा राज्यातील १२ लाखांपेक्षा अधिक नोंदीत बांधकाम कामगारांना होणार असल्याची माहिती कामगार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिली.

पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पाणीपुरवठा केंद्रावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता व २५ लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

या निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पाणीपुरवठा केंद्रांवर कार्यालयात असणारे व अत्यावश्यक सेवेमध्ये समाविष्ट असणारे व 'गट-क' आणि 'गट-ड'मधील नियमित कर्मचारी,

रूपांतरित आस्थापनेवरील कर्मचारी तसेच प्राधिकरणांतर्गत जे कर्मचारी अद्यापही कार्यरत आहेत. असे कंत्राटी कर्मचारी अशा सर्वांना ९० दिवसांच्या कालावधीकरिता प्रत्येकी १ हजार रुपये इतका प्रोत्साहनपर भत्ता देण्यात येणार असून २५ लाख रुपयांचे विमा संरक्षणही देण्यात येणार आहे. राज्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पाणीपुरवठा केंद्रांवरील सुमारे २ हजार ८०० कर्मचाऱ्यांना याचा प्रत्यक्ष लाभ होणार आहे असे मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

गुलाबराव पाटील
पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील एकूण ५० पाणीपुरवठा केंद्रामार्फत ग्रामीण तसेच शहरी भागात किरकोळ व ठोक पद्धतीने पाणीपुरवठा करण्यात येतो. पाणीपुरवठा केंद्रावरील कर्मचाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याची संबंधित गळती थांबवणे, पंप चालू करणे, व्हॉल्व उघडणे व बंद करणे, मीटर रीडिंग घेणे, बिले वाटणे, वसुली करणे, जलशुद्धीकरण केंद्रावरील आवश्यक कामे करणे इत्यादी प्रकारचे काम अहोरात्र केले जात आहे. त्यांचे काम हे अत्यावश्यक सेवेत येते. त्यामुळे त्यांना प्रोत्साहनपर भत्ता तसेच विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

स्वच्छाग्रहींना साहाय्य

कोविड-१९चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्याच्या ग्रामीण भागातील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मार्फत ग्रामपंचायतस्तरावर स्वच्छतेची कामे सुरू आहेत. या स्वच्छाग्रहींच्या सुरक्षिततेसाठी हॅण्ड ग्लोव्हज, सॅनिटायझर तसेच मास्क खरेदीसाठी कोविड-१९चा प्रादूर्भाव असलेल्या राज्यातील २७ जिल्ह्यांना प्रत्येकी दहा लाख याप्रमाणे एकूण २ कोटी ७० लाख रुपयांचा निधी 'जागतिक बँक प्रोत्साहन अनुदान' अंतर्गत देण्यात आला आहे. या संदर्भातील शासन निर्णयही जारी करण्यात आला आहे, अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

ग्रामपंचायतींची निवड करताना कोविड-१९ या आजाराचा प्रादूर्भाव झालेल्या ग्रामपंचायतीबरोबरच त्यांच्या नजीकच्या ग्रामपंचायती, प्रादूर्भाव झालेल्या शहरी ठिकाणांच्या शेजारील ग्रामपंचायती, जिल्हाधिकाऱ्यांनी ठरवलेल्या ग्रामपंचायती अशा ग्रामपंचायतींची निवड करावी. ग्रामपंचायत निवडीचा अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा राहील.

सध्या कोविड-१९ या आजाराचा प्रादूर्भाव असलेल्या अहमदनगर, बीड, बुलडाणा, धुळे, गोंदिया, हिंगोली ,जळगाव, जालना, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, उस्मानाबाद, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे, वाशिम, यवतमाळ, औरंगाबाद, अमरावती, अकोला, लातूर आणि सोलापूर जिल्ह्यात हा निर्णय लागू आहे. तथापि या जिल्ह्याव्यतिरिक्त अन्य जिल्ह्यात या आजाराचा प्रादुर्भाव झाल्यास संबंधित जिल्ह्यांनाही पूर्व परवानगी घेऊन सदर निधी खर्च करण्याची परवानगी देण्यात येईल, अशी माहितीही मंत्री श्री.पाटील यांनी दिली.

मुबलक व स्वच्छ पाणीपुरवठ्याकडे विशेष लक्ष

भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाने दिलेल्या सूचनेनुसार कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव झालेल्या राज्यातील ग्रामीण भागात विशेष काळजी घेण्यात येत आहे. मुबलक व स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठी युद्ध पातळीवर उपाययोजना करण्यात येत असून ग्रामपंचायत स्तरावर त्याची कार्यवाही सुरू आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला दहा लाख रुपयांचा अतिरिक्त निधी देण्यात येत आहे, अशी माहिती मंत्री श्री. पाटील यांनी दिली.

कोविड -१९ विषाणूचा प्रादूर्भाव झालेल्या जिल्ह्यात सर्वांना विशेषतः विलगीकरण केंद्र, रुग्णालये, दलित वस्ती, झोपडपट्टी, वृद्धाश्रम इत्यादींना मुबलक व स्वच्छ पाणीपुरवठा कसा होईल, या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात येत आहे, त्या दृष्टीने तातडीच्या उपाययोजनादेखील करण्यात येत आहेत. ग्रामपंचायतींची निवड करताना ज्या जिल्ह्यात कोविड-१९ या आजाराचा प्रादुर्भाव झालेल्या ग्रामपंचायती, प्रादुर्भाव झालेल्या शहरी ठिकाणांच्या शेजारील ग्रामपंचायती, जिल्हाधिकाऱ्यांनी निवड केलेल्या ग्रामपंचायती अशा ग्रामपंचायतींची निवड करावी. पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक रसायनांचा (ब्लिचिंग पावडर, सोडियम क्लोराइड, क्लोरीन टेब्लेट्स) वापर केल्यानंतरच पाणीपुरवठा करण्यात यावा तसेच ठरावीक

कालावधीनंतर पाणी गुणवत्ता तपासणी करण्यात यावी. त्यासाठी आवश्यक प्रमाणात रसायने तसेच जैविक पाणी गुणवत्ता चाचणी संच यांचा मुबलक पुरवठा असेल याची खात्री करावी. या प्रक्रियेत अडथळा येणार नाही या दृष्टीने आवश्यकतेप्रमाणे रसायने तसेच पाणी गुणवत्ता चाचणी संचांची खरेदी करण्यात यावी, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत. पाणीपुरवठ्याशी संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना मास्क आणि सॅनिटायझर यांचा पुरवठा करावा अशा सूचनाही संबंधितांना देण्यात आल्या आहेत अशी माहितीही मंत्री श्री.पाटील यांनी दिली.

'मिशन कोविड'

कोविड-१९ म्हणजेच कोरोना विषाणूच्या प्रतिकारासाठी राज्याच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने 'मिशन कोविड'च्या अंतर्गत अनेक महत्त्वाच्या उपाययोजना केल्या असल्याची माहिती, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

मंत्री श्री. पाटील म्हणाले, कोविडग्रस्त जिल्ह्यांमध्ये स्वच्छाग्रहींची नियुक्ती करण्यात आली असून आधीच नियुक्त झालेल्या स्वच्छागृहींना मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यातील २७ हजार ७८६ ग्रामपंचायतींमध्ये ४० हजार ५०१ गावांमध्ये ४५ हजार स्वच्छाग्रही लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याचे काम करीत आहेत. या स्वच्छाग्रहींच्या सुरक्षा साधन खरेदीसाठी प्रत्येक जिल्ह्यास १० लाख रूपयांचा निधी प्रदान करण्यात आला आहे. प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोरोनाचा संसर्ग होऊ नये म्हणून सुरक्षा साहित्य खरेदीला मंजुरी देण्यात आली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे चालवण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ९० दिवसांपर्यंत विम्याचे सुरक्षा कवच प्रदान करण्यात आले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षित पेयजल पुरवठा व्हावा म्हणून जलजीवन मिशनच्या अंतर्गत १० लाखांपर्यंत खर्चाची मंजुरी देण्यात आली आहे.

कोरोना विषाणू संक्रमण होऊ नये म्हणून राज्यस्तरावरून युनिसेफ, जागतिक आरोग्य संघटना आणि आरोग्य विभाग यांच्याकडून तयार झालेले स्वच्छता प्रचार साहित्य, बुकलेट्स इत्यादीची प्रारुपे, केंद्र सरकारने उपलब्ध करून दिलेले आणि आरोग्य विभागाने तयार केलेले व्हिडिओ संदेश गाव पातळीवर पोहोचवले जात आहेत. राज्यातील टंचाईग्रस्त भागातील नागरिकांची कामे कोरोना आपत्तीच्या कालावधीत तत्काळ घेण्याबाबत ग्रामसभेची अट शिथिल करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. टाळेबंदीमुळे विस्थापित झालेल्या व अडकलेल्या कामगारांकरिता जिल्ह्यातून निर्माण करण्यात आलेल्या छावण्यांना त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत पाणीपुरवठा होत नसल्यास टँकर्समार्फत पाणीपुरवठा करण्याची परवानगी देण्यात आली आहे, अशी माहिती मंत्री श्री.पाटील यांनी दिली.

ग्रामीण भागातील जनतेला मनरेगाच्या रोजंदारीचा लाभ

टाळेबंदीच्या काळात ग्रामीण भागात रोजगाराचा प्रश्न निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने संपूर्ण राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांना मोठ्या प्रमाणात कामे सुरू करण्याचे नियोजन केले असून शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण जनतेने शासनाच्या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रोजगार हमी योजना मंत्री संदीपानराव भुमरे यांनी केले आहे.

शासनाने सोशल डिस्टन्सिंगविषयक निर्देशाचे पालन करत महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमीच्या कामांना मान्यता दिली आहे. त्यामुळे जलसंधारण, सिंचन विहिरी, पशूंसाठी गोठ्याचे बांधकाम, फलोत्पादन आदी वैयक्तिक स्वरूपाच्या कामांसोबतच शेतीला जोडणारे रस्ते, जलसंधारण, नाला सरळीकरण, सामूहिक विहिरी, वृक्षारोपणाची पुर्वतयारी तसेच ग्रामीण भागातील

संदीपानराव भुमरे
रोजगार हमी योजना मंत्री

रस्त्यांची कामे सुलभ होणार असल्याचे मंत्री भुमरे यांनी सांगितले.

राज्यातील सर्व गावात गावनिहाय मंजूर करण्यात आलेल्या कामांचे नियोजन करून त्यानुसार प्रत्यक्ष कामे सुरू करण्याच्या सूचना जिल्हास्तरावर रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे. लाभार्थ्यांनी काही समस्या आली असेल तर आयुक्त (मनरेगा), सचिव (रोहयो) किंवा व्यक्तिशः संपर्क साधावा, असेही मंत्री भुमरे यांनी सांगितले.

स्थलांतरित मजुरांसाठी ४० हजार कोटी

शहरामधून गावाकडे स्थलांतरित मजुरांना त्यांच्या गावात मागणीनुसार काम उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने त्यांची नोंदणी करणे, त्यांना रोजगार पत्रक उपलब्ध करून देणे व त्यांना मागणीनुसार काम देणे यासाठी नियोजन करण्याची सूचना राज्याचे रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे यांनी केंद्र सरकारला सुचवले होते, या मागणीला यश आले असून केंद्र सरकारने राष्ट्रीयस्तरावर अतिरिक्त ४० हजार कोटींची तरतूद केली आहे.

कोरोनासारख्या वैश्विक महामारीच्या अनुषंगाने केंद्रीय ग्रामविकास मंत्री नरेंद्रजी तोमर यांनी २४ एप्रिल २०२० रोजी देशातील सर्व रोजगार हमी व ग्रामविकास मंत्री यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधलेला होता.

आयात निर्यातदारकांना हवी शुल्क माफी

कोविड-१९च्या प्रादुर्भावामध्ये लॉकडाऊनमुळे निर्यात व

आयातदार आर्थिक अडचणीत आहेत. त्यामुळे आयात-निर्यातदारांकडून खासगी कंटेनर फ्रेट स्टेशनमध्ये वसुल केली जाणारी नजरबंदी, भू-भाडे व विलंब शुल्क माफ करण्याची विनंती बंदर विकास मंत्री अस्लम शेख यांनी एका पत्राद्वारे केंद्रीय नौकानयन व जहाजबांधणी राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. मनसुख मांडवीय यांना केली आहे.

मंत्री श्री. शेख यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, कोविड-१९च्या प्रादुर्भाव काळात उद्योग व्यापाराला चालना देण्यासाठी नौकानयन मंत्रालयाने अनेक चांगले कृतिशील निर्णय घेतले आहेत. या संकटाच्या काळात नौका वाहतूक व त्याचे परिचलन सुलभपणे होण्यास व्यापाराला चालना मिळण्यास त्यामुळे मदत होणार आहे.

व्यापार सुरळीत चालण्यासाठी जहाजावरून माल वाहतूक करण्यापूर्वी किंवा माल आल्यानंतर कंटेनर ठेवण्यासाठी (कंटेनर फ्रेट स्टेशन (सीएफएफ)) देण्यात येणारी नजरबंदी, भू-भाडे आणि विलंब शुल्क माफ करण्याविषयी नौकानयन महासंचालनालयाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. शासकीय सीएफएफमध्ये या सूचनांचे काटेकोर पालन होत आहे. मात्र, राज्यातील खासगी सीएफएफकडून या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात येत असून निर्यात व आयातदारांकडून शुल्क आकारणी सुरू आहे. त्यामुळे लॉकडाऊन काळात निर्यात व आयातदारांना मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी नौकानयन महासंचालनालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, माफ केलेले शुल्क आकारू नयेत अशा कडक सूचना खासगी सीएफएफ चालकांना द्यावेत. तसेच सर्व दंडात्मक नजरबंदी, जमीन भाडे व विलंब शुल्कही तातडीने माफ करून आकारलेली रक्कम व्यापाऱ्यांना देण्याचे निर्देशही देण्यात यावे, अशी विनंती श्री. शेख यांनी श्री. मांडवीय यांना या पत्राद्वारे केली आहे.

अस्लम शेख
बंदर विकास मंत्री

प्रभागनिहाय कम्युनिटी किचन सुरू करण्याचे निर्देश

लॉकडाऊन आदेशामुळे बंद झालेल्या उद्योग व व्यवसायातील प्रभावित कामगार, परराज्यातील विस्थापित कामगार व बेघर व्यक्ती यांच्या दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न सुटावा यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत 'कम्युनिटी किचन' हा उपक्रम राबवला जातोय. ह्या उपक्रमात अधिक सुसूत्रता यावी, खाद्यपदार्थांच्या वाहतुकीसाठी लागणारा वेळ वाचावा व लोकांना ताजे अन्न मिळावे यासाठी प्रभागनिहाय कम्युनिटी किचन सुरू करण्याचे निर्देश मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख यांनी पत्राद्वारे महानगरपालिकेस दिले आहेत.

श्री. शेख यांनी पत्रात म्हटले आहे की, मुंबईतील अतिसंवेदनशील भागांमध्ये राहणाऱ्या मुस्लिम बांधवांसाठी रमजानच्या महिन्यात खजूर, फळे व दूध इत्यादी खाद्यपदार्थ महानगरपालिका व पोलीस कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून घरपोच देण्यात येत आहेत. नागरिकांची भूमिकाही प्रशासनाला सहकार्य करण्याची असायला हवी. लोकांनी बाहेर पडणे टाळावे व कोरोनाविरोधातल्या या लढ्यात प्रशासनाला सहकार्य करावे.

सीएसआर निधीतून जे.जे. रुग्णालयाला ५० व्हेंटिलेटर सुपूर्द

औद्योगिक समूहांच्या औद्योगिक सामाजिक बांधिलकी (सी.एस.आर) निधीच्या माध्यमातून वैद्यकीय यंत्रणा सक्षम करण्याचा प्रयत्न केला जातोय. याचाच एक भाग म्हणून 'अमेरिकन इंडिया फाऊंडेशन' ने दिलेले ५० व्हेंटिलेटर पालकमंत्री अस्लम शेख यांच्या हस्ते जे. जे. रुग्णालयाला सुपूर्द करण्यात आले.

चांगले इंटरनेट नेटवर्क हवे

कोरोनामुळे भविष्यात निदान माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात तरी घरातूनच काम करणे (वर्क फ्रॉम होम) हे नित्याची गोष्ट होऊन जाईल. त्यामुळे राज्यातील माहितीचे संरक्षण आणि सुरक्षा, चांगले इंटरनेट नेटवर्क यांची पूर्तता करण्याचे मोठे आव्हान असेल. या सर्वांचा विचार करून यासंदर्भातील पायाभूत सुविधा उभारणे व घरातून काम करण्याच्या नियमांची चौकट तयार करण्यावर भर दिला पाहिजे, असे मत माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री सतेज (बंटी) डी. पाटील यांनी व्यक्त केले.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची सद्य:स्थिती व कोरोनानंतरच्या काळातील रोडमॅप निश्चित करण्यासंदर्भात केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री रविशंकर प्रसाद व केंद्रीय माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री संजय धोत्रे यांच्याशी राज्यमंत्री श्री.पाटील यांनी राज्य सरकारच्या वतीने व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला.

या वेळी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची भविष्यातील वाटचाल व धोरण या संदर्भात राज्यमंत्री श्री.पाटील यांनी विविध सूचना केल्या. येणाऱ्या काळामध्ये सर्वच क्षेत्रांमध्ये डिजिटलायझेशनची वाढ होणार आहे. अशा वेळी सायबर गुन्ह्यांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्र सरकारने याबाबत पुढाकार घेऊन ही समस्या सोडवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशातील अनेक संशोधकांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स आणि हेल्थकेअर क्षेत्रात बरचे नवीन संशोधन केले आहे. या संशोधकांना किंवा संशोधन संस्थांच्या नवनवीन शोधांना मंजुरी देण्यासाठी तसेच ते प्रत्यक्षात वापरात

सतेज डी. पाटील
माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री

आणण्यासाठी केंद्र सरकारने एक खिडकी योजना आखावी. जेणेकरून कोरोनानंतरच्या काळात नवनवीन संशोधन करण्यासाठी संशोधकांना प्रोत्साहन मिळेल. भविष्यात व्हर्च्युअल शिक्षण हेच सर्वव्यापी असेल. त्यामुळे त्या दिशेने वाटचाल करताना सध्या वापरत असलेल्या तंत्रज्ञानामध्ये काही समस्या आढळतात. यावर उपाय म्हणून केंद्र शासनाने देशात तयार झालेले स्वदेशी तंत्रज्ञान सर्व सरकारी शाळांमध्ये मोफत उपलब्ध करून द्यावे तसेच याबाबत मार्गदर्शन व पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशा मागण्याही राज्यमंत्री श्री. पाटील यांनी केल्या.

भारत नेट-२ हा उपक्रम महाराष्ट्र राज्य उत्तमरीत्या राबवत आहे. पण याला अधिक सक्षम करण्यासाठी केंद्र शासनाचे मार्गदर्शन व मदतीची गरज आहे. या संदर्भातील निधी केंद्राने राज्य शासनाला तत्काळ देऊन सहकार्य करावे तसेच केंद्र शासनाने आधार सक्षम पेमेंट सिस्टिम वापरण्याला प्रोत्साहन द्यावे, अशी मागणीही राज्यमंत्री श्री. पाटील यांनी केली.

एसटीच्या स्मार्टकार्ड योजनेला १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

करोनाच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाच्या स्मार्ट कार्ड योजनेला १५ ऑगस्ट २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री अनिल परब यांनी दिली.

राज्य शासन एसटी महामंडळाच्या माध्यमातून सुमारे २७ विविध सामाजिक घटकांना ३३ टक्के ते १०० टक्क्यांपर्यंत प्रवासी भाड्यामध्ये सवलत देते. या सवलत योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित लाभार्थींना आधार क्रमांकाशी निगडित असलेल्या स्मार्ट कार्ड काढण्याची योजना एसटीने यापूर्वीच सुरू केली आहे. त्यानुसार एसटीच्या प्रत्येक आगारामध्ये ज्येष्ठ नागरिक व अन्य सवलत धारकांना स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रिया सुरू आहे. परंतु कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर सध्या अनेक प्रवाशांना आगारात येऊन स्मार्ट कार्ड घेणे शक्य नसल्याने तसेच त्यासंबंधीची माहिती आगारात येऊन प्रत्यक्ष देता येत नसल्याने या योजनेला १५ ऑगस्ट २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यामुळे ज्या भागात एसटी बसेस सुरू असतील त्या भागांमध्ये प्रवाशांना पूर्वीप्रमाणे सवलत लागू राहणार आहेत, असेही श्री. परब यांनी सांगितले.

ॲड. अनिल परब
परिवहन मंत्री

अडकलेल्या मजुरांसाठी बससेवा

लॉकडाऊनमुळे राज्यातील विविध जिल्ह्यांत तसेच इतर राज्यांत अडकलेल्या आदिवासी मजुरांना त्यांच्या मूळ गावी आणण्यासाठी एसटी बस अथवा खासगी बसेसची व्यवस्था करण्यात येत आहे. त्यासाठी आदिवासी विभागाच्या न्यूक्लियस बजेट योजनेमधून खर्च करण्यात येणार असून या मजुरांना मूळ गावी पोहोचवण्यासाठी प्रवास व्यवस्था, भोजन व इतर व्यवस्था करण्यासाठी गटनिहाय आर्थिक मर्यादा शिथिल करण्याचा व वित्तीय मंजुरीच्या अधिकारात वाढ करण्यात आली असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री ॲड. के. सी. पाडवी यांनी दिली.

ॲड. के. सी. पाडवी
आदिवासी विकास मंत्री

अनेक राज्यात तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात कामासाठी आदिवासी मजूर स्थलांतरित झाला आहे. लॉकडाऊनमुळे हा मजूर वर्ग त्या ठिकाणी अडकला असून रोजगार नसल्यामुळे त्यांची परिस्थिती कठीण झाली आहे. अशा आदिवासी मजुरांना त्यांच्या मूळ गावी पोहोचवण्याची व्यवस्था करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. यासाठी राज्य परिवहन विभागाची बस असेल तर त्यांच्या दराप्रमाणे आणि जेथे एसटी बस उपलब्ध नसेल तेथे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने निर्धारित केलेले दर मर्यादा मानून त्यापेक्षा कमी दराने खासगी बस, मिनी बसची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच प्रवासादरम्यान व प्रवासापूर्वी अशा मजुरांची भोजन व्यवस्थाही करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत. या सर्व प्रक्रियेसाठी लागणारा खर्च हा न्यूक्लिअस बजेट योजनेतून करण्यात येणार आहे. प्रकल्पस्तरावर आवश्यक ती मदत करण्यासाठी गटनिहाय आर्थिक मर्यादा शिथिल करण्यात आली आहे. डोंगराळ अतिदुर्गम भागातील आदिवासी समाज हा मुख्यतः मोलमजुरी करून दैनंदिन उपजीविका भागवितात. परंतु कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर त्यांची रोजगाराची साधने बंद झाली आहेत. दळणवळणाची साधने, जोड व्यवसाय यावर बंधने आहेत. मजुरी करणाऱ्या आदिवासींना तातडीची आवश्यक ती मदत करणे गरजेचे आहे. त्यासाठी ही गटनिहाय आर्थिक मर्यादा शिथिल करण्यात आली आहे, असे श्री. पाडवी यांनी सांगितले.

सुधारित वित्तीय अधिकार

मजुरांना मूळ गावी आणण्यासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाची मंजुरी देण्यासाठी वित्तीय अधिकारातही वाढ करण्यात आली आहे.

वैयक्तिक किंवा सामूहिक लाभाच्या योजनासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांना असलेली पाच लाखांची मर्यादा आता ५० लाख, अपर आयुक्तांना असलेली २० लाखांची मर्यादा आता ७५ लाख, तर आदिवासी विकास आयुक्त यांना ४० लाखांची असलेली मर्यादा आता १ कोटी आणि आदिवासी विकास सचिव यांना १ कोटीपेक्षा जास्त खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

गटनिहाय आर्थिक मर्यादेमध्ये शिथिलता आणि वित्तीय अधिकारात केलेली वाढ ही मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी बांधवांच्या कल्याणात्मक योजनेंतर्गत आपत्कालीन किंवा अपवादात्मक परिस्थितीत तातडीने साहाय्य करण्यासाठी एक वेळेची विशेष बाब म्हणून केवळ कोरोना प्रादुर्भावाच्या काळात तात्पुरत्या स्वरूपात पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहेत. यासाठी प्रकल्पस्तरीय आणि अपर आयुक्तस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत मंजूर केलेल्या योजना, कार्यक्रम, मदत यांचा वरील दोन्ही समितीने वेळोवेळी आढावा घ्यावा आणि आदिवासी विकास आयुक्त, नाशिक यांनी संनियंत्रण करून शासनाला अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले असल्याचे मंत्री श्री.पाडवी यांनी स्पष्ट केले. कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तसेच आंतरराज्य व राज्यांतर्गत प्रवासासाठी घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देशही श्री.पाडवी यांनी दिले आहेत.

शेतकऱ्यांना खरीप कर्ज

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांच्या अंतिम यादीत नाव असलेल्या मात्र कोरोनाच्या संकटामुळे कर्जमुक्तीचा लाभ न मिळालेल्या कर्जदार शेतकऱ्यांना खरीप कर्ज मिळणार आहे. याबाबत बँकांना सूचना देण्यात आल्याची माहिती सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली. यासंदर्भात राज्य शासनाने शासन निर्णयदेखील जाहीर केला आहे.

१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या कालावधीसाठी अल्प मुदतीचे पीक कर्ज घेतलेल्या तसेच या कालावधीत घेतलेल्या अल्प मुदतीच्या पीक कर्जाचे पुनर्गठन/फेर पुनर्गठन केलेल्या कर्जामधील ३० सप्टेंबर २०१९ रोजी रुपये २ लाखांपर्यंत थकीत व परतफेड न झालेली रक्कम असलेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. या योजनेची कार्यवाही सुरू झाली, मात्र त्याच दरम्यान देशासह राज्यात कोरोनाचे महासंकट आले. त्यामुळे राज्यामध्ये लॉकडाऊन जाहीर झाले. प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुरक्षित अंतर ठेवणे गरजेचे होते. यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे कर्जमुक्तीच्या पात्र लाभार्थ्यांच्या अंतिम यादीतील काही शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला नाही.

बाळासाहेब पाटील
सहकार मंत्री

अंतिम यादीमध्ये नाव असूनही ज्या शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळाला नाही. त्या शेतकऱ्यांचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, व्यापारी बँक, सहकारी संस्था, ग्रामीण बँकांमध्ये कर्ज आहे. या बँकांनी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे, असे गृहित धरून यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांना येत्या खरीप हंगामासाठी कर्ज उपलब्ध करून द्यावे अशा सूचना बँकांना देण्यात आल्या आहेत, असेही मंत्री. श्री. पाटील यांनी संगितले.

शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन तारण कर्ज उपलब्ध

लॉकडाऊन कालावधीत शेतकऱ्यांना शेतमाल बाजारपेठेत घेऊन जाताना काही अडचणी आल्या किंवा शेतमालास योग्य किंमत मिळत नसल्यास नजीकच्या महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामांमध्ये मालाची साठवणूक करता यावी आणि प्राप्त गोदाम पावतीवर ऑनलाईन पद्धतीने तारण कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी राज्य वखार महामंडळ आणि राज्य सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने प्रायोगिक तत्त्वावर ऑनलाइन तारण कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे.

ही नावीन्यपूर्ण योजना प्रायोगिक तत्त्वावर तीन महिन्यांसाठी प्रथमता राबवण्यात येत आहे व यासाठी मिळणारा प्रतिसाद पाहून इतर बँकांच्या माध्यमातूनही सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. राज्य वखार महामंडळाची राज्यात विविध ठिकाणी गोदामे असून सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्य तसेच शेतमाल, औद्योगिक मालाची मोठ्या प्रमाणात साठवणूक करण्यात येते. गोदामातील साठवणुकीवर वखार पावती देण्यात येते. ही वखार पावती वखार अधिनियम, १९६० नुसार पराक्रम्य (Negotiable) असून त्यावर बँकेमार्फत तारण कर्ज उपलब्ध होते.

नागरी सहकारी संस्थांवर लॉकडाऊनचा परिणाम

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर देशात लॉकडाऊन जाहीर करण्यात आला आहे. त्याचा अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. परिणामी राज्यातील सहकार क्षेत्रावरदेखील याचा

कृषी उत्पन्न बाजार समित्यांवरील परिणामांचा अभ्यास

कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर झालेले दूरगामी परिणाम आणि येणाऱ्या अडचणी यावर उपाययोजना करण्यासाठी शासनाने समिती गठीत केली आहे, अशी माहिती पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.

लॉकडाऊन कालावधीत संपूर्ण देशात सामाजिक व आर्थिक जनजीवन विस्कळीत झाले. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या आहेत. कृषी शेतमालाच्या विक्री व्यवस्थेत कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे महत्त्वाचे योगदान आहे, त्यांना अधिक बळकट करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे जाहीर झालेल्या लॉकडाऊनचे दूरगामी परिणाम आणि त्यावर करावयाच्या उपाययोजना याबाबत समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीने बाजार समित्यांवर झालेले परिणाम आणि करावयाच्या उपाययोजना याचा अभ्यास करून दोन महिन्यांच्या आत अहवाल शासनाला सादर करावा, असे श्री .पाटील यांनी सांगितले.

पणन संचालक सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठीत करण्यात आली असून या समितीमध्ये पणन संचालनालयाचे सहसंचालक विनायक कोकरे, हे सदस्य सचिव आहेत तर ए.के. चव्हाण, सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबई, बी.जे.देशमुख, प्रशासक कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे, कृषी उत्पन्न बाजार समिती लातूरचे सभापती ललित शहा, कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगणघाटचे सभापती सुधीर कोठारी, कृषी उत्पन्न बाजार समिती जळगावचे सभापती कैलास चौधरी, कृषी उत्पन्न बाजार समिती बारामतीचे सचिव अरविंद जगताप, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे हे या समितीचे सदस्य आहेत असेही श्री.पाटील यांनी संगितले.

परिणाम होणार आहे. त्यासाठी व्यवसायिक, नोकरदार यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या नागरी सहकारी बँका व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांवर लॉकडाऊनचे होणारे दूरगामी परिणाम आणि त्यावर करावयाच्या उपाययोजना यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे, अशी माहिती सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.

राज्याच्या अर्थव्यवस्थेत सहकार चळवळीचे मोठे योगदान आहे. राज्यात सुमारे दोन लाख सहकारी संस्था कार्यरत असून राज्यातील ५.५ कोटी नागरिक विविध सहकारी संस्थांचे सभासद आहेत. राज्याच्या सहकार क्षेत्रातील खेळते भांडवल सुमारे ३.५ लाख कोटी असून सहकार क्षेत्रात सुमारे ३.० लाख पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत. गठीत केलेल्या समितीने राज्यातील व्यावसायिक आणि नोकरदार यांना कर्ज पुरवठा करण्यात नागरी सहकारी बँका व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांवर कोविड-१९ व लॉकडाऊनचे होणारे दूरगामी परिणामांचा अभ्यास करून त्यावर काय उपाययोजना करता येतील याबाबतचा अहवाल दोन महिन्यात शासनाला सादर करावा असेही श्री. पाटील यांनी सांगितले आहे.

महाराष्ट्र राज्य अर्बन बँक फेडरेशन मुंबईचे अध्यक्ष विद्याधर अनासकर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठीत करण्यात आली आहे. डॉ. पी. एल. खंडागळे अप्पर निबंधक सहकारी संस्था पुणे, धनंजय डोईफोडे प्रादेशिक सहसंचालक साखर पुणे, जयवंत जालगावकर अध्यक्ष दापोली अर्बन बँक, काका कोयटे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य नागरी सह. पतसंस्था फेडरेशन पुणे, जिजाबा पवार चेअरमन ज्ञानदीप नागरी सह. पतसंस्था मुंबई, आनंद कटके मिलिंद सोबले उपनिबंधक सहकारी संस्था पुणे हे समितीचे सदस्य सचिव आहेत.

कर्जपुरवठा पत संरचनेचा अभ्यास

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर जाहीर केलेल्या लोकडॉऊनमुळे देशात सामाजिक आणि आर्थिक जनजीवन विस्कळीत झाले आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेवर याचा परिणाम झाला आहे. सहकार क्षेत्रावर देखील याचा परिणाम झाला असून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या त्रिस्तरीय पत संरचनेवर होणारे दूरगामी परिणाम व त्यावरील उपाययोजना करण्यासाठी शासनाने एक समिती गठीत केली आहे अशी माहिती सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.

या समितीने राज्यातील शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या त्रिस्तरीय पत संरचनेवर कोविड-१९मुळे जाहीर झालेल्या लॉकडाऊनच्या होणाऱ्या दूरगामी परिणामांचा अभ्यास करून त्या अनुषंगाने उपाययोजना सुचवाव्या आणि समितीचा अहवाल दोन महिन्यात शासनास सादर करावा, असेही श्री. पाटील यांनी सांगितले.

ही समिती सहकार आयुक्त अनिल कवडे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. समितीचे अन्य सदस्य डॉ.आनंद जोगदंड, अप्पर आयुक्त व विशेष निबंधक पुणे, श्रीकृष्ण वाडेकर विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर, अजित देशमुख, कार्यकारी संचालक महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई, शैलेश कोतमिरे प्रशासक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सोलापूर, डॉ. संतोष कोरपे चेअरमन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अकोला, प्रताप चव्हाण मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पुणे, अशोक खरात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बुलडाणा हे असून डी. एस. साळुंखे उपनिबंधक यांचा सदस्य सचिव म्हणून समावेश आहे.

नरडवे सिंचन प्रकल्पाला पर्यावरण मंत्रालयाची मंजुरी

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील नरडवे मध्यम सिंचन प्रकल्पाला केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने पर्यावरणीय मंजुरी दिली आहे. या मंजुरीमुळे प्रकल्पाच्या कामाला गती येणार असून परिसरातील ५३ गावांतील ८ हजार ८४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली

येणार आहे. नरडवे मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत गड नदीवर १२३.७४ दशलक्ष घन मीटर क्षमतेचे धरण बांधण्यात येत आहे. कोकण पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत येणाऱ्या या प्रकल्पाचा समावेश 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत' करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे कणकवली तालुक्यातील ४० गाव, कुडाळ तालुक्यातील ५ आणि मालवण तालुक्यातील ८ अशा एकूण ५३ गावांतील ८ हजार ८४ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

सोलापूर पालकमंत्री दत्तात्रय भरणे

सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याची कोविड परिस्थिती हाताळण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. नागरिकांनी लॉकडाऊनचे काटेकोर पालन करत स्वतःबरोबरच इतरांनाही सुरक्षित ठेवावे, असे प्रतिपादन श्री. भरणे यांनी केले आहे.

न्या. दीपांकर दत्ता यांनी घेतली मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ

कोलकाता उच्च न्यायालयातील ज्येष्ठ न्यायाधीश, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली. राजभवन येथे निवडक लोकांच्या उपस्थितीत झालेल्या छोटेखानी शपथविधी समारंभामध्ये राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी न्या. दीपांकर दत्ता यांना पदाची शपथ दिली.

घरभाडे वसुली तीन महिने पुढे ढकलावी

देशात कोविड-१९ या साथीच्या रोगाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन जारी राहणार आहे. या परिस्थितीत सर्व व्यापार, व्यवसाय, उद्योगधंदे बंद असल्याने रोजगारावर परिणाम झाला आहे. राज्यात भाड्याच्या घरात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण लक्षणीय असल्याने घरभाडे वसुली किमान तीन महिने पुढे ढकलावी अशा सूचना गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव संजय कुमार यांनी सर्व घरमालकांना दिल्या आहेत.

लॉकडाऊन परिस्थितीमुळे सर्व बाजारपेठा, व्यावसायिक संस्था, कारखाने व एकूणच सर्व आर्थिक व्यवहार बंद आहेत. याचा सर्वसामान्य जनतेच्या रोजगारवरही परिणाम झालेला असून, अनेकांचे उदरनिर्वाहाचे साधन बंद झालेले आहे. यामुळे अनेकांना अत्यंत कठीण अशा आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. मोठ्या प्रमाणात भाड्याच्या घरात राहणाऱ्यांना नियमित भाडे भरणे शक्य होत नसून, भाडे थकत असल्याची वस्तुस्थिती आहे.

या परिस्थितीत घरभाडे वसुली किमान तीन महिने पुढे ढकलावी व या कालावधीत वेळेवर भाडे रकमांची अदायगी न झाल्याने किंवा भाडे थकल्याने कोणत्याही भाडेकरूंना भाड्याच्या घरांमधून निष्कासित करण्यात येऊ नये, अशा सूचना सर्व संबंधित घरमालकांना अपर मुख्य सचिव संजय कुमार यांनी परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत.

विधान परिषद द्वैवार्षिक निवडणूक बिनविरोध

महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी दाखल नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या अंतिम मुदतीमध्ये १३ पैकी ४ उमेदवारांनी आपली नामनिर्देशनपत्रे मागे घेतल्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह ९ उमेदवारांची बिनविरोध निवड झाली, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली.

विधानसभा सदस्यांद्वारे निवडून द्यावयाच्या विधान परिषदेच्या एकूण ९ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली.

विधान परिषद सदस्यपदी बिनविरोध निवड झालेले सदस्य पुढीलप्रमाणे : ● श्री. गोपीचंद कुंडलिक पडळकर (भारतीय जनता पार्टी), श्री. प्रवीण प्रभाकरराव दटके (भारतीय जनता पार्टी), श्री. रणजितसिंह विजयसिंह मोहिते-पाटील (भारतीय जनता पार्टी), श्री. रमेश काशिराम कराड (भारतीय जनता पार्टी). ● श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे (शिवसेना), डॉ. नीलम दिवाकरराव गोऱ्हे (शिवसेना). ● श्री. शशिकांत जयवंतराव शिंदे (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी), श्री. अमोल रामकृष्ण मिटकरी (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी). ● श्री. राजेश धोंडीराम राठोड (इंडियन नॅशनल काँग्रेस).

वन्यजीव-मानव संघर्ष कमी करण्यासाठी नवीन धोरण

राज्यातील वन्यजीव-मानव संघर्ष कमी करण्यासाठी लवकरच नवीन धोरण आणणार असल्याचे वनमंत्री संजय राठोड यांनी सांगितले. वन्यजीव-मानव संघर्ष कमी करणे तसेच राज्यातील काही वाघांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थानांतरण या दोन्ही बाबींवर उपाययोजना सुचवण्यासंदर्भात वन भवन नागपूर येथे सादरीकरण करण्यात आले. त्या वेळी मंत्री श्री. राठोड यांनी ही माहिती दिली.

१ जानेवारी २०२० ते २० मे २०२० या कालावधीत राज्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये वाघांच्या हल्ल्यात १२ जणांचा, तर एका अन्य वन्यप्राण्याच्या हल्ल्यात एका व्यक्तीचा अशा एकूण १३ जणांचा मृत्यू

आदिवासींना मिळणार रोजगार

राज्यात जंगलांतील इमारती लाकूड आणि जळाऊ निष्कासनाची कामे जंगल कामगार सहकारी संस्थांना देण्यात येत असतात. त्या संस्थांना शासनातर्फे कूप वाटप केले जाते. परंतु बांबूबद्दल अशी कूप वाटपाची पद्धत नव्हती. त्यांना जंगलातील बांबू निष्कासनाची परवानगी नसल्यामुळे बांबूचे उत्पादन वाढून ते पडून राहत होते. म्हणून राज्यातील जंगल कामगार सहकारी संस्थांना पेसा व सामूहिक वनहक्क क्षेत्र वगळून बांबू कूप निष्कासनाची परवानगी देण्याबाबतचे धोरण लवकरच ठरवण्यात येईल, अशी माहिती वनमंत्री संजय राठोड यांनी दिली.

राज्यात नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, औरंगाबाद, यवतमाळ आणि अमरावती असे सहा वनवृत्त आहेत. या सहा वनवृत्तांमध्ये सुमारे २०० जंगल कामगार

सहकारी संस्था कार्यरत आहेत. या संस्थांच्या माध्यमातून वर्षभरात सुमारे १२७ कोटी ६१ लाख रुपयांची उलाढाल झालेली आहे.

राज्यात गडचिरोली, सिरोंचा, गोंदिया, वडसा, भामरागड, आलापल्ली या भागात बांबूचे ४४ हजार २१९ हेक्टर वनक्षेत्र निष्कासनासाठी उपलब्ध असून उत्पादन क्षमता ७१ लाख ४६ हजार ९६७ हेक्टर इतकी आहे. यातून शासनाला २३ कोटी ५९ लाख रुपये इतका महसूल प्राप्त होणार आहे. जंगल कामगार सहकारी संस्थांना बांबू कूप निष्कासनाची कामे दिल्यामुळे सुमारे २०० जंगल कामगार सहकारी संस्थांमधील आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल तसेच बांबूवर चालणाऱ्या उद्योगधंद्यांनाही त्याचा फायदा होईल, असा विश्वास वनमंत्री श्री.राठोड यांनी व्यक्त केला.

झालेला आहे. तसेच काही ठिकाणी माणसांच्या हल्ल्यामध्ये किंवा इलेक्ट्रिक तारेचा स्पर्श झाल्यामुळे वन्यप्राण्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर वन्यजीव-मानव संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने तातडीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

संजय राठोड
वने मंत्री

राज्यात एकूण ३१२ वाघ आहेत. त्यापैकी एकट्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये १६० वाघांचे अस्तित्व आहे. चंद्रपूर शहरापासून केवळ पाच किलोमीटरच्या परिघामध्ये २१ वाघांचा संचार आहे. त्यामुळे या ठिकाणी वन्यजीव-मानव संघर्ष मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्यातच येत्या वर्षभरात या परिसरात आणखी ६० नवीन वाघाच्या बछड्यांची भर पडणार आहे. त्यावर उपाय म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील ५० वाघांचे इतर जिल्ह्यांतील जंगलात स्थानांतरण कशा प्रकारे करता येईल याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. या ५० वाघांना ज्या जंगलात सोडणार आहे त्या जंगलामध्ये सर्वप्रथम तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढवावी लागेल याबाबतही या बैठकीत चर्चा झाली. वन्यजीव - मानव संघर्ष कमी करणे आणि वाघांच्या स्थानांतरणासंदर्भात राज्य वन्यजीव मंडळासमोर लवकरच प्रस्ताव सादर करण्यात येईल आणि धोरण निश्चित करण्यात येईल, अशी माहितीही वनमंत्र्यांनी या वेळी दिली.

सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास शिक्षा

कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने राज्यात सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच अन्य तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, थुंकण्यास व धूम्रपानास प्रतिबंध करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांना दंडासह शिक्षा ठोठावण्यात येणार आहे.

सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यामुळे अनेक संसर्गजन्य व प्राणघातक आजारांचा फैलाव होतो. आता तर कोरोनासारख्या महामारीचा संसर्ग हा थुंकीच्या माध्यमातून होत असल्याचे निष्पन्न झाल्याने याबाबत दक्षता घेऊन जनतेच्या हितासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी साथरोग अधिनियम, आपत्ती व्यवस्थापन कायद्यामधील तरतुदींनुसार राज्यात सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच अन्य तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, थुंकण्यास व धूम्रपानास प्रतिबंध करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शासन निर्णयातील आदेश राज्यात सर्वत्र लागू राहतील.

सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या, धूम्रपान करणाऱ्यास मुंबई पोलिस अधिनियमानुसार पहिल्या गुन्ह्यासाठी एक हजार रुपये दंड व एक दिवस सार्वजनिक सेवा करावी लागेल. त्याच व्यक्तीच्या दुसऱ्या गुन्ह्यासाठी ३ हजार रुपये दंड व तीन दिवस सार्वजनिक सेवा आणि तिसऱ्या व त्यानंतरच्या गुन्ह्यासाठी ५ हजार रुपये दंड व ५ दिवस सार्वजनिक सेवा अशा शिक्षेची तरतूद आहे.

भारतीय दंड संहितेनुसार विविध कलमांनुसार सहा महिने, २ वर्षे शिक्षा व दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा ठोठावण्यात येणार आहेत. नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये किंवा धूम्रपान करू नये, असे आवाहन करण्यात येते आहे.

“ निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड आणि पुणे जिल्ह्यातील काही तालुक्यांत मोठे नुकसान झाले आहे. रायगड जिल्ह्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी, तर पुणे जिल्ह्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकसानग्रस्त गावांची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. त्याचबरोबर तत्काळ मदत करून तातडीने पंचनामे करण्याचे निर्देशही दिले. ”

अलिबाग तालुक्यातील उमटे गावातील दशरथ बाबू वाघमारे, वय वर्षे ५८ ही व्यक्ती चक्रीवादळामुळे विजेचा खांब अंगावर पडून मृत्युमुखी पडली होती. त्यांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई म्हणून चार लाख रुपयांचा धनादेश देताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे. सोबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे, मत्स्य व्यवसाय मंत्री अस्लम शेख, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे आदी.

नुकसानीची पाहणी करतेवेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे. सोबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे, पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे, मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख, नगरविकास, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे आदी.

आपत्तीत शासन पाठीशी

रायगड जिल्ह्यासाठी १०० कोटी

निसर्ग चक्रीवादळाला रायगडकरांनी खंबीरपणे तोंड दिले, मात्र चक्रीवादळामुळे जिल्ह्याचे अपरिमित नुकसान झाले आहे. असे असले तरीही आपल्याला पुन्हा उभे राहावेच लागेल, यासाठी रायगड जिल्ह्याला तातडीची मदत म्हणून शासनाकडून १०० कोटी रुपये देण्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड जिल्ह्याच्या झालेल्या नुकसानीबाबत जिल्हा नियोजन सभागृहात मुख्यमंत्र्यांनी आढावा बैठक घेतली. तत्पूर्वी त्यांनी मुंबईहून बोटीने मांडवा येथे येऊन थळ या गावाला भेट देऊन नुकसानीची पाहणी केली.

निसर्ग दिवसेंदिवस आपले रंग दाखवत असताना यंत्रणेनेही आता कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याची पूर्वतयारी ठेवली पाहिजे आणि त्यासाठी उत्तम नियोजन ही काळाची गरज आहे. रायगड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी या संकटाचा निश्चितच उत्तम मुकाबला केला. त्यामुळे कमीत कमी जीवितहानी झाली, त्याबद्दल लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणेचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

नुकसानीचे फोटो पंचनाम्यात ग्राह्य

पंचनामे पूर्ण होण्यासाठी आठ ते दहा दिवसांचा कालावधी लागू शकतो. मात्र नुकसान झालेल्या लोकांनी झालेल्या नुकसानीचे फोटो काढून ठेवावेत, व्हिडिओ काढून ठेवावेत. पावसाळा सुरू झाला आहे, त्यामुळे आधी आपले घर आवरून घ्यावे. नुकसानीचे काढलेले फोटो व व्हिडिओ पंचनाम्याच्या कार्यवाहीत ग्राह्य धरण्यात येतील. सर्वात जास्त नुकसान विजेच्या खाबांचे झाले आहे. घरांची पडझड झाली आहे. झाडांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या सर्व गोष्टी पुन्हा सुरळीत होण्यासाठी अधिक तांत्रिक मनुष्यबळाची गरज लागणार आहे. यासाठी शासन स्तरावरून मदत निश्चित केली जाईल. याबरोबरच ज्या नागरिकांचा या वादळामुळे अन्नधान्याचा आणि जेवणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, शासन त्यांच्या अन्नधान्याचा, जेवणाचा प्रश्न निश्चितच सोडवणार आहे. जनतेच्या पाठीशी हे शासन खंबीरपणे उभे असल्याचे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी सांगितले.

नुकसानीचा आढावा

निसर्ग चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी

पंचनामे तत्काळ

निसर्ग चक्रीवादळादरम्यान प्रशासनाची खऱ्या अर्थाने सतर्कता काय असते ती पाहायला मिळाली. तरी निसर्ग चक्रीवादळामुळे राज्यातील विविध जिल्ह्यात जीवित व वित्त हानी झाल्याचे निदर्शनास आले आहे. हे चक्रीवादळ नैसर्गिक आपत्ती असून त्यामुळे झालेली नुकसानभरपाई देण्यासाठी जिल्हास्तरावर सविस्तर पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या चक्रीवादळामुळे शेतीपिकाचे नुकसान झाले असल्यास अशा नुकसानीचे संयुक्त पंचनामे करण्यात यावेत व ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानी प्रकरणी बाधित शेतकऱ्यांना शासन निर्णयानुसार विहित केलेल्या दरानुसार मदत देण्यासाठी आवश्यक असलेल्या मदतीचा सविस्तर प्रस्ताव कृषी आयुक्तांमार्फत शासनास पाठवण्यात यावा, असे निर्देश प्रशासनास दिले आहेत.

- बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री

व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारेदेखील आढावा घेतला. निसर्ग चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे दोन दिवसात सादर केल्यास शेतकरी व गावकऱ्यांना तातडीने मदत करता येईल. विशेषत: रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विजेचे खांब पडले असून महावितरणने तातडीने वीजपुरवठा सुरू करावा व प्रसंगी त्यासाठी इतर ठिकाणाहून अधिक मनुष्यबळ, साधनसामग्री उपलब्ध करावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

सावित्रीबाईंचे साकडे

'आई जशी संकटाच्या येळेला कंबर बांधून लेकरांच्या पाठीशी वुभी राहती, तसेच तुम्ही प्रजेसाठी ऊभे राहावा' अशा शब्दांत मावळ तालुक्यातील पवळेवाडी येथील ७० वर्षीय सावित्रीबाई गुणाजी जागेश्वर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. 'निसर्ग' चक्रीवादळात त्यांच्या फुलशेतीचे अतोनात नुकसान झाले असले तरी या संकटाच्या काळी शासन आपल्या पाठीशी उभे आहे, हा विश्वास त्यांच्या शब्दा-शब्दातून ओसंडून वाहत होता. आपद्ग्रस्तांना दिलासा मिळावा तसेच शासन आपल्या पाठीशी उभे आहे, ही भावना निर्माण व्हावी यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्ह्याचा दौरा केला, त्यावेळी श्रीमती सावित्रीबाईंनी उपमुख्यमंत्री श्री. पवारांना एक प्रकारे साकडेच घातले.

आपुलकीचा संवाद

निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड आणि पुणे जिल्ह्यातील काही तालुक्यात मोठे नुकसान झाले आहे. उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी मावळ तालुक्यातील भोयरे, पवळेवाडी, खेड तालुक्यातील नवलाख उंबरे, करंजविहिरे, शिवे, वहागाव, धामणे, जुन्नर तालुक्यातील सावरगाव, पांढरे, येणेरे, ढगाडवाडी या भागाचा दौरा केला. या वेळी त्यांनी आपद्ग्रस्त शेतकरी, नागरिकांच्या भावना जाणून घेऊन त्यांना दिलासा दिला. त्यांच्याशी संवाद साधला. या वादळामुळे राज्यात मोठे नुकसान झाले आहे. घरे, शाळा, अंगणवाड्या, गुरांचे गोठे, भाजीपाल्याची पिके, फळबागांचे झालेले नुकसान प्रचंड आहे. पोल्ट्री शेड, कांदा चाळी, पॉली हाऊसचे पत्रे उडून गेल्याचे प्रकार घडले आहेत. विजेच्या तारा व खांब मोडून पडल्याने वीज यंत्रणेचेही नुकसान झाले आहे. पाहणी दौऱ्यादरम्यान उपस्थित शासकीय अधिकाऱ्यांना नुकसानीचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करण्याचे आदेश दिले. कोणत्याही बाधितांचे नुकसानीचे पंचनामे राहता कामा नयेत, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. पंचनामे पूर्ण होऊन अहवाल येताच मदतीबद्दल निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मावळ तालुक्यातील पवळेवाडी येथील ७० वर्षीय सावित्रीबाई जागेश्वर यांच्याशी आपुलकीने संवाद साधताना उपमुख्यमंत्री अजित पवार.

आपत्कालीन मदत यंत्रणेचे आभार

चक्रीवादळाच्या संकटकाळात मदतकार्यात सहभागी झालेले लाईफ गार्ड, पोलीस, संरक्षण दलांचे, एनडीआरएफचे जवान, स्थानिक स्वराज संस्थांचे कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, आपत्कालीन यंत्रणेतील, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, नागरिकांचे उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर आभार मानले.

टीम लोकराज्य

कोविड - १९

घाबरू नका... पण जागरुक राहा

स्वत:चे आणि इतरांचे आजारी पडण्यापासून संरक्षण करा

आपले हात स्वच्छ धुवा



- खोकलल्यावर अथवा शिंकल्यानंतर
- एखाद्या आजारी व्यक्तीची काळजी घेताना
- स्वयंपाक करण्यापूर्वी, तयार करताना आणि तयार केल्यानंतर
- जेवणापूर्वी
- शौचानंतर
- प्राण्यांचा सांभाळ केल्यानंतर आणि प्राण्यांची विष्ठा काढल्यानंतर

अधिक माहितीसाठी आपल्याजवळील शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधा.

राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. +९१-११-२३९७८०४६

राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्र. ०२०-२६१२७३९४

टोल फ्री हेल्पलाईन क्र. १०४

श्री. उद्धव ठाकरे
मा. मुख्यमंत्री

श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब थोरात
मा. महसूल मंत्री

श्री. राजेश टोपे
मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

श्री. राजेंद्र पाटील-यड्रावकर
मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

कोरोना विषाणू

घाबरू नका... पण जागरुक राहा !

हे करा... स्वत:ला व इतरांना सुरक्षित ठेवा

वारंवार साबणाने हात
स्वच्छ धुवा.

शिंकताना व खोकताना तोंडावर
व नाकावर रुमाल ठेवा.

ताप, कोरडा खोकला व श्वास घेण्यास
त्रास असलेल्या व्यक्तीशी निकट संपर्क टाळा.

● अधिक माहितीसाठी संपर्क साधा ●

राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्र. ०२०-२६१२७३९४ | टोल फ्री हेल्पलाईन क्र. १०४ | राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. +९१-११-२३९७ ८०४६

श्री. उद्धव ठाकरे
मा. मुख्यमंत्री

श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब थोरात
मा. महसूल मंत्री

श्री. राजेश टोपे
मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

श्री. राजेंद्र पाटील-यड्रावकर
मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे